म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८७५
९८६३

# विचारधारा

सौ. यमुनाबाई हिर्लेकर

REFBK-0013107

निबंध

७३६५६
२।३।६९
१८७५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक निबंध
अनुक्रम ७३६५६ वि: १८७५
क्रमांक १८७५ नों दि: २-३-६९



लेखिका सौ. यमुनाबाई हिर्लेकर
एम्.ए.

एक नामवंत लेखिका, व्याख्यात्या आणि शिक्षण-तज्ज्ञ म्हणून सौ. यमुनाबाई हिर्लेकर यांचा महाराष्ट्रांत मोठा लौकिक आहे. शिक्षण-शास्त्राचा आणि समाज-शास्त्राचा त्यांचा गाढा व्यासंग असून त्या अनुषंगानें शैक्षणिक, सामाजिक आणि स्त्रीजीवन-विषयक असे त्यांचे विविध लेख केसरी, तरुण-भारत, महाराष्ट्र टाईम्स्, नवशक्ती, लोकसत्ता, अलमगीर, स्त्री, किर्लोस्कर इत्यादि मराठी व टाईम्स् ऑफ इंडिया, फ्रीप्रेस, भारतज्योति, अमृत-बझार-पत्रिका, नागपूर-टाईम्स्, हितवाद, प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन यांसारख्या इंग्रजी नियत-कालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाले आहेत.

सौ. यमुनाबाई या गणित घेऊन एम्.ए.होणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या पहिल्याच विद्यार्थिनी. महाविद्यालयीन शिक्षणक्रमांत त्यांनीं अनेक बक्षिसें आणि शिष्यवृत्त्या पटकावून स्वावलंबनानें आपलें शिक्षण पूर्ण केलें. शैक्षणिक व्यासंग आणि लेखन याबरोबरच अध्यापन हेंहि त्यांच्या आवडीचें क्षेत्र असून अलाहाबाद, मुंबई, पुणें इत्यादि ठिकाणीं मुलींच्या शाळांचें आणि महाविद्यालयांचें प्राचार्यपद त्यांनीं भूषविलें असून गणित विषयाच्या एक उत्कृष्ट अध्यापिका असा लौकिक मिळविला.

विवाहापूर्वी १९२७ सालीं शिक्षणशास्त्राचा अभ्यास करण्याकरतां त्या इंग्लंड व जर्मनी या देशांत जाऊन आल्या. त्यानंतर १९४९ सालीं त्याच उद्देशानें त्या अमेरिकेंत पांच महिने जाऊन आल्या. यानंतर १९५४, १९५६, १९५९ व १९६१ या सालीं चार वेळां अनुक्रमें जर्मनीमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, पूर्वप्राथमिक शिक्षण व धंदेशिक्षण या विषयांचें निरीक्षण व अभ्यास

# विचारधारा

[ शिक्षण व जीवनविषयक
संकीर्ण निबंध ]

93906

लेखिका :
सौ. यमुनाबाई हिर्लेकर
एम्.ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

प्रथमावृत्ति

मूल्य : रु. ४.५०

विद्वान् सर्वत्र पूज्यते

अ. वि. गृह प्रकाशन. पुणें २.

**प्रकाशक :**
**दि. दा. गांगल**, एम्. एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

© प्रकाशकांचे स्वाधीन

प्रथमावृत्ति :
दि. २६।३।१९६३
वर्षप्रतिपदा शके १८८५

**मुद्रक :**
**दि. दा. गांगल**, एम्. एस्सी.
लोकसंग्रह छापखाना,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

सादर

अर्पण

माझे पतीस

REFBK-0013107

# प्रकाशकांचें निवेदन

आधुनिक पद्धतीचें इंग्रजी शिक्षण देऊन ज्या भारतीय स्त्रियांच्या पिढ्या बाहेर पडल्या त्यांत सौ. यमुनाबाई हिर्लेकर यांची तिसरी पिढी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. या पिढीचा अनुभव आणि तिचे विचार प्रातिनिधिक स्वरूपांत वाचकांना या ग्रंथांत सांपडतील.

सौ. हिर्लेकर यांनीं आपल्या हयातींत अध्यापिका, मुख्याध्यापिका, महाविद्यालयाच्या प्राचार्या इत्यादि अनेक भूमिकांनीं काम केलेलें आहे. परंतु शैक्षणिक कामाची आपली व्याख्या आकुंचित न ठेवतां विशाल दृष्टीनें त्यांनीं शिक्षणाच्या क्षेत्रांत काम केलेलें आहे. प्रत्यक्ष अध्यापनाबरोबर त्यांनीं भारतांतील विविध प्रदेशांत आणि परदेशांतही सामाजिक व शैक्षणिक निरीक्षण केलेलें आहे. इतक्या व्यापक दृष्टीनें शिक्षणाचा अनुभव घेतलेल्या विदुषी फारच थोड्या! आणि त्यांतही तो स्वतःचा अनुभव लेखनकलेच्या रूपानें समाजाला देणाऱ्या स्त्रिया विरळाच!

या ग्रंथांतील लेख सौ. यमुनाबाई हिर्लेकर यांच्या शैक्षणिक जीवनकार्याचा परिपाक आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. निरीक्षणाची सूक्ष्मता, अनुभवाची व्यापकता, आणि विचारांची प्रगल्भता या गुणांचा प्रत्यय वाचकांना आल्याशिवाय राहाणार नाहीं.

आमच्या विनंतीवरून सौ. यमुनाबाईंनीं या लेखांचें प्रकाशन-कार्य संस्थेकडे दिलें आणि त्या बाबतींत पूर्ण निरिच्छता ठेवून प्राप्त होणारा सर्व फायदा संस्थेकडे सुपूर्त केला आहे. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. संस्था त्यांची अत्यंत आभारी आहे. हा एक प्रकारचा वाग्-यज्ञच आहे.

आमच्या विद्वान्–लेखक व लेखिका वर्गांत आणखी एका विदुषीची भर पडली याबद्दल आनंद व अभिमान वाटतो. वाचक ही सेवा गोड करून घेवोत.

दि. ६ मार्च १९६३

ग. श्री. खैर.
कार्याध्यक्ष, अ. वि. गृह, पुणें.

# प्रास्ताविक

१९५६ सालीं "नव्या जगांत" हें माझें पुस्तक प्रकाशित झालें. माझे परदेशांतील कांहीं अनुभव व निरीक्षण यावर आधारलेले व तेथूनच लिहून पाठविलेले कांहीं लेख इकडील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले. सुहृज्जनांच्या प्रेमळ सल्ल्यावरून ते सर्व लेख वरील पुस्तकांत संकलित केले व या पुस्तकाचे वाचकवर्गानेंही चांगलें स्वागत केलें.

१९५६ नंतरही मला सीलोन, चीन, जपान, जर्मनी इत्यादि देशांना जाण्याची संधि मिळाली. तेव्हां तेथील वास्तव्यांत प्रस्तुत संग्रहांतील कांहीं लेख लिहिले. परदेशांतून परत हिंदुस्थानांत आल्यावर येथील परिस्थितीकडे पाहण्याचा माझा एक वेगळा दृष्टिकोन बनून गेला. त्यामध्यें थोडीशी परदेशाशीं तुलना, आपल्या इकडील परिस्थितीबद्दल थोडें असमाधान व त्या दृष्टीनें येथें कांहींतरी बदल व्हावा, निदान थोडीबहुत तरी तशी चालना मिळावी अशी कांहींशी आंतरिक तळमळ इत्यादि भावना दडलेल्या होत्या. हे लेख जसजसे पाठविले तसतसे ते वर्तमानपत्रांनीं व नियतकालिकांनीं प्रसिद्धही केले. लेखांचे विषय विविध असले तरी बहुसंख्य लेख शिक्षणविषयक आहेत, कांहीं जीवनविषयक स्वानुभवाचे आहेत. परन्तु त्यांमधील 'विचारधारा' एकाच स्वरूपाची असून त्याची परिणती शेवटच्या लेखांत केलेली आहे. आधीं ठरवलें नसतांना हेही लेख मित्रमंडळीच्या प्रोत्साहनावरून पुस्तकरूपानें संकलित करावयाचें ठरविलें.

हे लेख वेगवेगळ्या वेळीं लिहिलेले असल्यामुळें एकत्रित केल्यावर कांहीं लेखांत थोडीशी विचारांची पुनरावृत्ति झालेली दिसेल. तसेच

शिक्षणाच्या माध्यमाचा लेख भाषावार प्रांतरचनेच्या पूर्वीं लिहिलेला असला तरी सद्यःस्थितीला उपयुक्त आहे असें वाटल्यावरून फरक न करतां तसाच ठेवलेला आहे.

कांहीं लेख आकाशवाणीवरील भाषणें या स्वरूपाचे आहेत. ते छापण्याची परवानगी आकाशवाणीनें पूर्वीच दिली होती त्याबद्दल त्यांचे आभार.

पुणें अनाथ विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष, सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. अण्णासाहेब खेर, पुणें यांनीं प्रकाशनाचें कार्य आपुलकीनें अंगिकारलें याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहें.

लोकसंग्रह छापखान्यानें अल्पवेळांत छपाईचें काम सुंदर रीतीनें करून दिलें याबद्दल तेथील सेवकवर्गास धन्यवाद देणें उचित आहे.

**सौ. यमुनाबाई हिर्लेकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | जर्मनीमधील पूर्वप्राथमिक शिक्षण | १ |
| २ | जर्मनीमधील धंदेशिक्षण | ९ |
| ३ | जर्मनीमधील विद्यार्थी व त्यांच्या संघटना | १७ |
| ४ | श्रीमती भंडारनायक यांच्या समवेत कांहीं क्षण | २८ |
| ५ | आजचा सिलोन | ३२ |
| ६ | लंकासुंदरीच्या सहवासांत | ४० |
| ७ | जपानांतील शिक्षणाची वाटचाल | ४८ |
| ८ | जपानी शाळांमधील नैतिक शिक्षण | ५६ |
| ९ | समाजशिक्षणाचें केंद्र-कोमिंकान | ६५ |
| १० | अतिपूर्वेची नवलाई | ७१ |
| ११ | अमेरिकन महिला | ८९ |
| १२ | मुलें आणि पुस्तकें | ९६ |
| १३ | आजचा विद्यार्थी | १०१ |
| १४ | एस्. एस्. सी. विद्यार्थ्यांनीं करावें तरी काय ? | ११० |
| १५ | विद्यापीठ-प्रवेशावर नियंत्रण पाहिजे काय ? | ११६ |
| १६ | विद्यार्थ्यांची बेशिस्त | १२४ |
| १७ | शिक्षक-पालक सहकार्याची योजना | १३२ |
| १८ | शिक्षणाचें माध्यम काय असावें ? | १३८ |
| १९ | स्वातंत्र्योत्तर शिक्षणाची नवी दिशा | १४८ |
| २० | स्त्री-शिक्षण स्त्रीत्वाला पोषक हवें ! | १५३ |
| २१ | पदवीधर स्त्रियांचीं कर्तव्यें | १५८ |
| २२ | विनोबा आणि शिक्षण : एक मुलाखत | १६४ |
| २३ | मानवी जीवन : एक अमूल्य संधि | १७० |
| २४ | माझी षष्टयब्दि | १७५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों. दि ..........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 39000

१

# जर्मनीमधील पूर्वप्राथमिक शिक्षण

'किंडरगार्टन' हा जर्मन शब्दप्रयोग आज कित्येक देशांच्या भाषेंत रूढ झाला आहे. इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशांतील इंग्लिश भाषिकांमध्यें देखील तो इतका रूढ झाला आहे कीं, 'किंडरगार्टन' हा एक आंतरराष्ट्रीय शब्द आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. 'बालोद्यान' किंवा Children's garden अशा भाषांतरित शब्दापेक्षां 'किंडरगार्टन' शब्द सर्वांना अधिक परिचित झाला आहे. तथापि, अलीकडे मॉंटेसोरी शाळा, बालवाडी, शिशुविहार, बालमंदिर इत्यादि शब्दप्रयोग करून तोच अर्थ सूचित केला जातो. वास्तविक, या वेगवेगळ्या पद्धति असून त्यांमध्यें तत्त्वतः बराच फरकहि आहे. सर्वसाधारणपणें पूर्वप्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांनाच हे शब्द वापरले जातात. आपल्याकडे हल्लीं मोठ्या शहरांतून या शाळांचें प्रमाण खूपच वाढलें आहे. म्हणूनच, या शाळांचें प्रयोजन काय व त्यांची उत्क्रांति कशी झाली हें समजून घेणें उद्बोधक ठरेल. या शाळांचा उगम प्रथम जर्मनीमध्यें अठराव्या शतकाच्या शेवटीं झाला. गेल्या दोनतीन महिन्यांत प्रत्यक्ष जर्मनीमध्यें या शाळा पाहण्याची मला संधि प्राप्त झाली.

## पहिलीं सात वर्षें

आपल्याकडे आजपर्यंत प्राथमिक शाळेपासूनच शिक्षणाला सुरुवात होते असें समजलें जात असे. लेखन, वाचन व अंकगणित हे शिक्षणाचे प्राथमिक विषय समजले जात. पाटीवर 'श्रीगणेशाय नमः' तदनंतर 'गमभन' या

सोप्या अक्षरांनीं मुलाच्या शिक्षणास सुरुवात होई. परंतु, पुस्तकी शिक्षण हा शिक्षणाचा संकुचित अर्थ अलीकडे शिक्षणतज्ज्ञांनीं त्याज्य मानला असून मुलाचा मानसिक, बौद्धिक व शारीरिक—म्हणजेच सर्वांगीण—विकास हेंच खरें शिक्षण होय, असें आतां सर्वमान्य झालें आहे. या प्रकारचा विकास व्यक्तीच्या जन्मापासूनच सुरू होतो हें उघड आहे. प्राथमिक शाळेंत प्रथम प्रवेश करणाऱ्या मुलाचें वय पांच ते सात वर्षांचें असतें. तत्पूर्वी मुलानें या विकासाची पुष्कळच मजल मारलेली असते. मुलाचा हा विकास आपो-आपच होत असतो. आईबापांचें छत्र व भोंवतालचें वातावरण यांमध्यें हरघडी घडणाऱ्या प्रसंगांनीं मुलांच्या मनावर संस्कार होत असतात, व त्यांचा त्यांच्या मानसिक व शारीरिक वाढीवर परिणाम होत असतो. हे परिणाम सामान्यतः फार सूक्ष्म पण चिरकाल टिकणाऱ्या स्वरूपाचे असतात. म्हणूनच शिक्षणतज्ज्ञ म्हणतात कीं, मुलांच्या आयुष्याचीं पहिलीं सात वर्षें संस्कारांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. त्यांतूनहि जितकें मूल लहान तितके त्याच्यावर होणारे संस्कार अधिक परिणामकारक असतात. जीव-नाचें पहिलें वर्ष या दृष्टीनें इतकें महत्त्वाचें आहे कीं, या नांवाचें, सुमारें ३०० पानांचें एक स्वतंत्र पुस्तकच इलिझाबेथ प्लाटनर नांवाच्या एका जर्मन बाईनें लिहिलें आहे. बालमनावर होणारे हे संस्कार आपलें चांगलें अथवा वाईट कार्य बिनचूक करीत असतात. हें कार्य कोणी थांबवूं शकत नाहीं. श्वासो-च्छ्वासाप्रमाणें तें अखंड चालू असतें. याकरितां हे संस्कार चांगलेच असतील, अशी खबरदारी आई-बापांनीं घ्यावयास हवी. हे संस्कारच मुलाच्या सर्वांगीण शिक्षणाचें कार्य करीत असतात. यावरून, हें लक्षांत यावें कीं, तथाकथित प्राथ-मिक शिक्षणाच्या पूर्वींच मुलाचें किती तरी शिक्षण होऊन गेलेलें असतें.

## दोन स्वतंत्र पद्धति

सामान्यतः सहा वर्षांच्या मुलाला प्राथमिक शाळेंत प्रवेश मिळतो. तत्पूर्वींच्या जीवनाचे दोन कालखंड पाडतां येतील. जन्मापासून तीन वर्षांपर्यंत

व तीन ते सहा वर्षांपर्यंत. पहिल्या कालखंडांत मूल सर्वस्वीं आईच्या सान्निध्यांत असतें. आईबाप व घर यांतच त्याचें विश्व सामावलेलें असतें. पण पुढील कालखंडांत त्याचें अनुभवक्षेत्र विस्तार पावतें. बाहेर खेळावें, इतर मुलांच्या संगतींत राहावें असें त्याला वाटतें. चालणें, बोलणें, खाणें, खेळणें यांस्तव व इतर शारीरिक क्रियांसाठीं जरूर तो इंद्रियांच ताबा त्यानें मिळविलेला असतो. निकटवर्ती माणसांशिवाय बाहेरील व्यक्तींशीं सामाजिक व्यवहाराचा त्याला अनुभव घ्यायचा असतो. म्हणून दुसऱ्याशीं वागावें कसें, समवयस्क मुलांशीं एकोप्यानें खेळावें कसें, त्यांच्याशीं देवाणघेवाण करावी कशी हें त्याला समजावें लागतें. हल्लींच्या विभक्त कुटुंबपद्धतींत घरांमध्यें समवयस्क मुलें नसतात. जागेची टंचाई, आई, वडील आपापल्या उद्योगांत, त्यांतून आईदेखील नोकरी करणारी असली म्हणजे तर मुलाची फारच कुचंबणा होते व त्याची त्या वयांत जी स्वाभाविक वाढ व्हावयाची ती होऊं शकत नाहीं. अर्थात् याचा अर्थ असा नव्हे कीं ' किंडरगार्टन ' शाळा या आदर्श घराची उणीव भरून काढूं शकतात. पण सामाजिक परिस्थितीमुळें निर्माण झालेल्या घरांतील वातावरणाच्या उणीवा अंशतः भरून काढण्याचें कार्य ' किंडरगार्टन ' मध्यें होऊं शकतें. या शाळा तीन ते सहा वर्षें वयाच्या मुलांकरितां असतात. त्यांना पूर्व-प्राथमिक शाळा म्हणतात. या शाळांना आपल्याकडे पूर्वी ' किंडरगार्टन ' तर हल्लीं ' मॉंटेसोरी शाळा ' असें संबोधिलें जातें. पण पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या या दोन स्वतंत्र पद्धति आहेत व त्यांमध्यें कांहीं मूलभूत फरकहि आहेत.

अठराव्या शतकांतील प्रसिद्ध जर्मन शिक्षणतज्ज्ञ फ्रोबेल यानें जी शिक्षण-पद्धति चालू केली तिला ' किंडरगार्टन ' पद्धति म्हणतात. ही पद्धति व्यवसायप्रधान आहे. फ्रोबेल यानें कांहीं वस्तु लहान मुलांना ' देणग्या ' म्हणून दिल्या. त्या वस्तु मुलांना व्यवसायप्रवण करतात, असें त्याला आढळून आलें. हे व्यवसाय अंतःस्फूर्त व स्व-कपोलकल्पित असले पाहिजेत,

असा त्याचा कटाक्ष आहे. लहान मुलांच्या या शाळेला फ्रोबेलनें प्रथम किंडरगार्टन म्हणजे 'मुलांची बाग' हें नांव दिलें. बागेमध्यें माळी ज्याप्रमाणें फुलांची निगा राखतो व हळुवारपणें फुलझाडें वाढवितो, त्याप्रमाणें या लहान मुलांना शिक्षकानें हळुवारपणें व दक्षतेनें वाढवलें पाहिजे, ही या नांवामागील मध्यवर्ती कल्पना आहे. फ्रोबेलच्या पद्धतींत मुलांचा कल्पनाविकास व शिक्षकांची प्रेमळ शिस्त यांवर भर दिला जातो.

**नव्या कल्पना, नवीं साधनें**

फ्रोबेलनंतर सुमारें शंभर वर्षांनीं इटालियन बाई डॉ. मॉंटेसोरी यांनीं बालशिक्षणपद्धतींत वैचारिक क्रांति निर्माण करणारीं कांहीं तत्त्वें प्रतिपादन केलीं. यांच्या पद्धतींत इंद्रियविकास, स्वावलंबन इत्यादि गोष्टींवर भर देण्यांत आला. बाईंनीं इंद्रियविकासासाठीं साधनें बनवलीं व तीं साधनें वापरण्याची विशिष्ट पद्धति घालून दिली. बाईंनीं पहिले प्रयोग कांहीं अधू मुलांवर करून पाहिले. एरवीं जो इंद्रियविकास सहजगत्या व्हावयाचा तो होण्यासाठीं या अधू मुलांच्या बाबतींत या साधनांद्वारा मदत होते, असें त्यांना आढळून आलें. त्यावरून त्यांनीं आपली शिक्षणपद्धति सरसहा सर्व मुलांच्या बाबतींत चालू केली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जर्मनीमध्येंहि मॉंटेसोरीबाईंच्या शिक्षणपद्धतीचा बराच प्रसार झाला. पण मॉंटेसोरीबाई स्वतःच म्हणत कीं, त्यांची पद्धत प्रयोगावस्थेंत असून त्यामध्यें सुधारणेला पुष्कळच जागा आहे. मॉंटेसोरीबाई स्वतः कांहीं वर्षें हिंदुस्थानांत येऊन राहिल्या व त्यांनीं स्वतःच्या शिक्षण-पद्धतीचे मुंबई, मद्रास येथें वर्ग चालविले. त्यामुळें त्यांच्या शिक्षण-पद्धतीचा हिंदुस्थानांत बराच प्रसार झाला. लहान मुलांच्या शाळेचें 'किंडरगार्टन' हें नांव मागें पडून 'मॉंटेसोरी' शाळा असें नांव प्रचलित झालें. पण एखाद्या शाळेला मॉंटेसोरी शाळा म्हटलें तरी ती मॉंटेसोरी पद्धतीवर असेलच असें नसतें. खेडोपाडीं ज्या शाळा असतात त्यांना 'बालवाडी' असें म्हणतात. यामधील साधनें व व्यवसाय स्थानिक परिस्थिति,

गरजा व स्थानिक उपलब्ध वस्तु यांवर अवलंबून असतात.

अलीकडे या दोन्ही पद्धति जर्मनीमध्यें मागें पडत असून नवीन कल्पना, नवीन विचार व नवीन साधनें दृष्टोत्पत्तीस येऊं लागलीं आहेत.

याचीं मुख्यतः दोन कारणें सांगतां येतील. सध्यांच्या यंत्रयुगामध्यें माणसाच्या राहणीमध्यें बराच फरक पडला व या गोष्टींचा लहान मुलांच्या जीवनावर मोठाच परिणाम झाला हें एक, मानसशास्त्राच्या प्रगतीमुळें मुलांकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टि निर्माण झाली व मुलांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची जाणीव झाली हें दुसरें.

## प्रमुख वैचारिक बदल

यांत्रिक साधनांच्या प्रसारामुळें लहान बालकें नैसर्गिक जीवन व राहणी याला पारखीं झालीं आहेत. बटन दाबलें कीं दिवा लागतो, नळाची तोटी फिरवली कीं पाणी येतें, सांखळी ओढली कीं मैला धुऊन जातो या गोष्टी मुलांना इतक्या परिचयाच्या झाल्या आहेत कीं, त्यामागील मानवी बुद्धि, कष्ट, अडचणी या सर्व गोष्टी त्यांच्या नजरेआड राहतात.

वडील माणसांनीं शारीरिक श्रमांनीं एखादी गोष्ट करावी व मुलानेंहि आपल्या अल्पशक्तीप्रमाणें त्यांचें अनुकरण करावें, अशा तऱ्हेनें अनुभवाची व ज्ञानाची पायरी चढत जावें, कष्टसाध्य मिळालेल्या वस्तूच्या प्राप्तीनें आनंद पावावें, अशी परिस्थिति आतां राहिली नाहीं. वडील दिवसभर बाहेर कामाला जाणार, मुलाशीं प्रेमानें खेळायला किंवा बोलायलासुद्धां त्यांना सवड नाहीं, राहणीचें मान वाढलेलें, त्यामुळें वडिलांची प्राप्ति पुरत नाहीं, म्हणून बहुधा आईनेंसुद्धां अर्थार्जनाच्या मागें लागावें, मग पूर्वीं मुलांना वडिलधाऱ्या मंडळींच्या अनुकरणानें जें ज्ञान प्राप्त होत असे तें त्यांना या युगांत कसें मिळणार? त्यांच्या बुद्धिविकासामध्यें ही एक मोठीच कमतरता राहणार. परिस्थितीचा हा एक पालट लक्षांत घेऊन जर्मनीमध्यें सध्यां बालशिक्षणपद्धतींत खूपच वैचारिक बदल होऊं लागला आहे.

मुलाचा मानसिक विकास कसा होत आहे, हें समजून घेण्यासाठीं मुलाच्या कल्पनाशक्तीला जास्तींतजास्त वाव देणें व त्याच्या कृतीवर शक्य तितके कमी निर्बंध घालणें हीं तत्त्वें आतां सर्वमान्य झालीं आहेत. आपले विचार व आपल्या कल्पना मुलांवर न लादतां त्यांना अशीच साधनसामग्री द्यावयाची कीं, त्यांनीं स्वयंस्फूर्त आपल्या कल्पना लढवून त्या सामग्रीचा उपयोग करावा. साधनसामग्रीचा विविध तऱ्हांनीं उपयोग करतां यावा, अशा प्रकारची ती सामग्री असली पाहिजे. या कारणामुळें मॉंटेसोरीचीं साधनें आतां जर्मनीमध्यें क्वचितच वापरण्यांत येतात. तसेंच फ्रोबेलच्या साधनांमध्येंहि आतां बराच बदल करण्यांत आला असून साधनांची विविधता व विपुलता हे सध्याच्या बालशिक्षणांत विशेष दिसून येतात. तसेंच, हीं साधनें शक्य तों साधीं व प्राथमिक स्वरूपाचीं; असावींत असा दंडक आहे. म्हणजे इंजिन, मोटार, रेडियो, टेलिफोन अशा यांत्रिक स्वरूपाचे खेळ म्हणजे साधनें नव्हेत; तर लाकडी ठोकळे, डबे, कमानी, कांचेचे मणी, फळाफुलांच्या वाळविलेल्या बिया, गुंजा, पिसें, गवत, कागद, चिकणमाती अशा स्वरूपाचीं साधनें व सामग्री मुलांना देऊन त्यांमधून त्यांनीं स्वतःच्या कल्पनेप्रमाणें एखादी कलाकृति निर्माण करावी, अशी कल्पना आहे. तसेंच, प्रत्येक ‘ किंडरगार्टन ’ मध्यें एखादें खेळांतील घर आढळतें. याला बाहुलीघर म्हणतात. मुलें घरांतील नाना प्रसंग कल्पून येथें लुटुपुटीचे खेळ खेळूं शकतात. अशा तऱ्हेनें मुलांचा कल्पनाविकास, स्वभाववैचित्र्य इत्यादि गोष्टींना वाव मिळतो. त्यांचें आचारविचारांचें व इतरहि सामान्यज्ञान वाढतें. कधीं दुकानाचा तर कधीं पोस्टाचा असे खेळ खेळून त्यांचें व्यवहारज्ञान, मनुष्यस्वभावाचें ज्ञान इत्यादि वाढूं शकतें.

### मुक्त व्यवसायांचें महत्त्व

जर्मन किंडरगार्टनमध्यें चित्रकला व रंगकाम यांवर विशेष भर दिला ·ातो. शाळेमध्यें खूपसे कागद, पेन्सिली, खडू, रंग, ब्रश इत्यादि सामान

ठेवलेलें असतें. मुलानें सर्वस्वी स्वयंस्फूर्तीनें त्यावर कांहींहि काढावें. सुरुवातीस नुसत्या रेघोट्या मारणारें मूल पुढेंपुढें खरोखरीच चांगलें अर्थपूर्ण चित्र काढूं लागतें असा अनुभव येतो. पुष्कळदां मुलांच्या या चित्रांपासून मोठ्या माणसांनासुद्धां नवीन कल्पना सुचतात. याशिवाय, हल्लीं मुक्तव्यवसायाला बालशिक्षणांत मोठें स्थान प्राप्त झालें आहे. मोठ्यांच्या कल्पना मुलांवर न लादतां त्यांच्या कल्पनाविलासाला भरपूर संधि देणारे व्यवसाय यांनाच '**मुक्तव्यवसाय**' किंवा Free activity म्हणतात. फ्रोबेल व मॉंटेसोरी या दोनहि बालशिक्षण-तज्ज्ञांनीं प्रतिपादिलेल्या तत्त्वांच्या पुढील पायरी म्हणजे मुक्तव्यवसाय होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. याशिवाय अंगणांतील खेळ म्हणजे झोपाळा, घसरगुंडी, सीसॉ, वाळू, पाणी इत्यादि गोष्टी उपयोगांत आणल्या जातात. त्याशिवाय सहली, सहभोजनें, अभिनय-गीतें, नाट्यप्रवेश, हस्तव्यवसाय इत्यादि कार्यक्रम ठेवून मुलाचें अनुभवक्षेत्र विस्तृत करण्यांत येतें. इतर समवयस्क मुलांच्या सहवासांत त्यांना रंजनाबरो-बरच सहजगत्या सामान्य व्यवहार व ज्ञान प्राप्त व्हावें, अशी बालशिक्षणाची मुख्य कल्पना आहे.

## अक्षर-ओळख प्राथमिक शाळेंत

लेखन-वाचनाची कल्पना शाळेशीं इतकी निगडित झालेली आहे कीं, पुष्कळ आईबापांना किंडरगार्टनमध्यें मुलें दोन-तीन वर्षे जाऊन सुद्धां लिहा-वाचायला शिकत नाहींत, किंबहुना त्यांना शिकविलें जात नाहीं, हें पसंत पडत नाहीं. शाळेची फीसुद्धां भरून मुलें कांहीं शिकत नाहींत; तेव्हां या शाळेंत पाठवावयाचें कशाला व फीतरी भरावयाची कशाला असें वाटतें. किंवा कांहींना वाटतें कीं, या केवळ मुलें संभाळण्याच्या योजना आहेत. दिवसांतून चार तास आईला मोकळीक मिळावी व निश्चिन्तपणें कांहीं उद्योग करावयास सवड मिळावी, तेवढ्याच कारणासाठीं मुल संभाळावयास एखादा स्वतंत्र मनुष्य ठेवण्यापेक्षां ही योजना बरी व कमी खर्चाची आहे असें वाटतें. या

शाळांमध्यें मुलांची शैक्षणिकदृष्ट्या खरोखरी प्रगति होत आहे, हें त्यांना पटत नाहीं, ही दुःखाची गोष्ट आहे. त्यामुळें कांहीं 'किंडरगार्टनें' मध्यें शेवटच्या वर्षांत थोडेंबहुत अक्षरज्ञान व आंकडे शिकविण्यांत येतात. पण जर्मन शाळांमध्यें या गोष्टीला विरोध आहे. **किंडरगार्टनमध्यें ३ ते ६ वर्षेंपर्यंत मूल असूनहि त्याला मुद्दाम अक्षर-ओळख करून द्यावयाची नाहीं, असें त्यांचें तत्त्व आहे.** सहा वर्षांनंतर मूल प्राथमिक शाळेंत जातें तेव्हांच त्याला अक्षरें शिकवावयाचीं, अशी तिकडे पद्धत आहे. याचें कारण किंडर-गार्टनमध्यें मुलांच्या पुढील शिक्षणाची केवळ पूर्वतयारी केली जाते. उदा-हरणार्थ, लेखन-वाचनास सुरुवात करण्यापूर्वीं भाषा तरी नीट यावयास हवी ना? मग या तीन वर्षांत मुलाला वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव दिल्यानें त्याच्या भाषेची शब्दसंख्या वाढेल, त्याचे उच्चार स्पष्ट होतील, त्याला आपल्या मनांतील विचार स्पष्टपणें सांगतां येतील, अशी खटपट करण्यांत येते. शाळेला नियमित जाणें, बरोबरीच्या वर्गबंधूंशीं खोड्या, भांडण वगैरे न करतां सहकार्यानें वागणें, शाळेंतील नियमबद्ध व शिस्तबद्ध चाकोरीची संवय लागणें या गोष्टी एकदम प्राथमिक शाळेंत पाऊल ठेवल्यावर ज्या कठीण वाटतात व शिक्षणाबद्दल अढी निर्माण होते तसें होऊं नये याची खबरदारी आणि शालेय शिक्षणाची पूर्वतयारी जर्मनीमधील किंडरगार्टन-मध्यें सध्यां केली जाते. अशी पूर्वतयारी झाली म्हणजे शालेय शिक्षणाचा मार्ग सुखकर होतो.

१

# जर्मनीमधील धंदेशिक्षण

नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वीं मुंबईचे गव्हर्नर श्रीप्रकाश यांनीं सुरतेला एका भाषणांत म्हटलें, "नागरिकांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्यासाठीं सध्यांच्या शिक्षणक्रमांत बदल केला पाहिजे." या विधानावर विचार करीत असतां दोन गोष्टी नजरेसमोर आल्या. दैनंदिन गरजांपैकीं पहिली गोष्ट म्हणजे अन्नवस्त्र व इतर जीवनोपयोगी वस्तु यांचा पुरवठा झाला पाहिजे, व दुसरी गरज म्हणजे या वस्तु विकत घेण्याइतकी आर्थिक शक्ति नागरिकांमध्यें निर्माण झाली पाहिजे. म्हणजेच त्यांची अर्थोत्पादनक्षमता वाढली पाहिजे. या दोन्ही दृष्टींनीं शिक्षणामध्यें बदल झाला पाहिजे हें उघड आहे.

आतां जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा कसा व्हावयाचा? आपल्याला सध्यांतरी यांपैकीं बऱ्याच वस्तु परदेशांमधून आणाव्या लागत आहेत. आयात वस्तूंवरील निर्बंध वाढल्यामुळें मध्यंतरी अशी परिस्थिति निर्माण झाली कीं, देशी वस्तु मिळत नाहींत किंवा मिळाल्यास चांगल्या दर्जाच्या मिळत नाहींत व परदेशी वस्तु एकतर मिळत नाहींत किंवा अतिरेकाच्या महाग झाल्या आहेत. तसेंच, आयात-निर्बंधाच्या धोरणामुळें परदेशांशीं व्यापार करणाऱ्या अनेक हिंदी लोकांना नोकरवर्गाची कपात करणें भाग पडलें. याचा अर्थ असा नव्हे कीं, आयातीवर निर्बंध घालूं नये. परदेशी चलन वाढविण्यासाठीं, तसेंच देशाची संपत्ति व धंदे वाढविण्यासाठीं हें धोरण योग्य असेंच आहे. तरीपण आयातीच्या निर्बंधाबरोबरच देशी वस्तु

अधिकाधिक प्रमाणांत निर्माण होतील; त्यांचा दर्जा, गुणवत्ता व उत्पादन योग्य प्रमाणांत टिकून राहील यासंबंधीं खबरदारी घ्यावयास पाहिजे; किंवा त्या दृष्टीनें प्रयत्न करावयास सुरुवात तरी व्हावयास पाहिजे.

### तांत्रिक कारागिरांची वाण

आपले धंदे भरभराटीस येत नाहींत. त्याच्या अनेक कारणांपैकीं एक महत्त्वाचें कारण असें आहे कीं, या धंद्याना लागणारा आपला कामगारवर्ग शिकलेला नाहीं. वरचा मनुष्य जरी उच्चविद्याविभूषित व तंत्रज्ञान प्राप्त करून घेतलेला असला तरी ज्या मनुष्यबळाच्या जोरावर त्याला काम करून घ्यावयाचें तो वर्ग जर सर्वस्वीं अशिक्षित असेल तर त्या वरच्या तंत्रज्ञाला उत्पादन कसें करवितां येईल ? एखाद्या इमारतीचा पाया कच्चा असावा व वरतीं मात्र उत्तम कळस बसवावा त्याप्रमाणें आपल्या धंद्यांची गत झाली आहे. एखादी वस्तु कच्च्या मालापासून संपूर्ण तयार होईपर्यंत ती ज्या ज्या कारागिरांच्या हातून संस्कार होऊन बाहेर पडते ते सर्व कारागीर त्यांच्या त्यांच्या कार्यापुरते अनुभवी व तज्ज्ञ असावयास पाहिजेत; तरच प्रथमपासून शेवटपर्यंत बिनचूक पद्धतीनें बनलेली ती वस्तु कलापूर्ण, टिकाऊ व उच्च दर्जाची होऊं शकेल हें उघड आहे. आपल्याकडे वेगवेगळ्या थरांचे असे तज्ज्ञ कारागीर आहेत का ? त्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे का ? तांत्रिक शिक्षणाबरोबरच प्रामाणिकपणा, सचोटी, जबाबदारीची जाणीव, कार्यतत्परता हे गुण प्रत्येक कारागिराच्या अंगीं बाणले आहेत का ? आपला धंदा हा निव्वळ पोट भरण्याचा व्यवसाय नसून तो समाजसेवेचा तसेंच देशसेवेचा एक मार्ग आहे; आपण आपलें काम नीट न केल्यास ती मालकाचीच नव्हे तर समाजाची फसवणूक ठरेल, याची त्याला जाणीव असते का ? म्हणजेच त्या कामगाराला तंत्रविषयक तसेंच नैतिक शिक्षण देण्याची गरज आहे, या दृष्टीनें आपण शिक्षणकारभारांत काय व्यवस्था केलेली आहे ?

## कारागिरांचें शिक्षण

सध्यां आपल्याकडे जे निरनिराळे कामगार व कारागीर आढळतात त्यांनीं आपल्या कामाचें शिक्षण कोठें व कसें मिळविलेलें असतें, याचा शोध केल्यास त्यांत दोन-तीन प्रकार दिसून येतात. साधारणतः अगदीं गरीब कुटुंबांत बापाचा धंदा तोच मुलाचा ठरतो. व बापाच्या हाताखालीं काम करून करूनच मुलाचें प्रात्यक्षिक शिक्षण होतें. मग त्या मुलाचें प्राथमिक शिक्षणसुद्धां झालें असेल याची शाश्वती नसते. तो बहुतकरून निरक्षरही असतो. अर्थात् या मुलाला त्याच्या धंद्याचें प्रात्यक्षिक जरी बापाच्या मार्गदर्शनाखालीं करतां आलें तरी त्या धंद्याची शास्त्रीय बाजू त्याला मुळींच माहीत नसल्या-मुळें त्या धंद्यांत प्रगति किंवा नवीन सुधारणा त्याचे हातून होणें शक्यच नसतें. पुस्तकी शिक्षण आजिबात नसल्यामुळें प्रगतीचा मार्गहि खुंटलेला असतो. गतानुगतिक पद्धतीनें एकच व्यवसाय करीत राहिल्यामुळें शेवटीं त्या माणसाचें यंत्रच बनतें. याकरतां प्रत्येक कामगाराला प्रात्यक्षिक शिक्षणा-बरोबरच थोडेंबहुत सांस्कृतिक व त्याच्या धंद्याचें शास्त्रीय शिक्षण देण्याची जरुरी असते. या बाबतींत प्रसिद्ध जर्मन शिक्षणशास्त्रज्ञ केर्शेनस्टाइनेर म्हणतो, “ आम्हांला माणसाचा सुतार बनवावयाचा नसून सुताराचा माणूस बनवावयाचा आहे. ” धंदेशिक्षणाच्या उद्दिष्टांमध्यें हें वाक्य सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखें आहे.

## दुसरे प्रकार

दुसरा प्रकार म्हणजे गरीब मध्यमवर्गीय कुटुंबांतील मुलांचा. हीं मुलें प्रथम शाळेंत जातात व हायस्कूलचें शिक्षण संपवून किंवा अर्धवट सोडून शिक्षणखर्च परवडत नाहीं म्हणून कोठेंतरी लहानसहान नोकरी करून घरखर्चाला हातभार लावतात. शिक्षण अपुरें झाल्यामुळें त्यांच्या नोकरी-मध्येंहि फारशी बढती होण्याचा संभव नसतो.

तिसऱ्या प्रकारचीं म्हणजे साधारण मध्यमवर्गातील मुलें मॅट्रिकपर्यंत

पोंचतात. पास झाल्यास व कॉलेजांत प्रवेश मिळाल्यास पुढेंही शिकत राहतात. पण मॅट्रिकच्या वाऱ्या कराव्या लागल्या म्हणजे मग मात्र काय करावें हें न समजल्यामुळें कोणाच्या तरी ओळखीनें जी मिळेल ती नोकरी किंवा धंदा करावयास सुरुवात करतात. व्यवसायमार्गदर्शनाची Vocational guidance आपल्याकडे मोठ्या प्रमाणांत सोय नसल्यामुळें बहुधा जीवनाचा हा मार्ग यदृच्छेनेंच ठरत असतो. एकंदरीनें मथितार्थ एवढाच कीं, आपल्याकडे धंदेशिक्षणाची सोय नसल्यामुळें अगदीं नवीन मनुष्य धंद्यामध्यें प्रवेश करून प्रात्यक्षिक करीत करीत चुकतमाकत तज्ज्ञ बनतो. तरीपण त्याला त्या धंद्याची शास्त्रीय, तांत्रिक व ऐतिहासिक माहिती मुळींच नसते. यामुळें आपल्या धंद्यांचा दर्जा कायम राहात नाहीं व जगाच्या पेठेंत आपल्या मालाला मागणी येत नाहीं. एक तऱ्हेचा नमुना परदेशीं पाठविला तर त्याच दर्जाचा पुढें पुरवठा होईल याची शाश्वति नसते. म्हणून हिंदी मालाला परदेशी मागणी फारशी नसते. म्हणून व्यवस्थित धंदेशिक्षणाची आपल्याकडे अत्यंत आवश्यकता आहे.

## शिक्षणसंस्था आहेत कुठें ?

वरील विवेचनावरून आणखीही एक विचार मनांत येतो. तो हा कीं, आर्थिक शक्यता असली तर आवडीनिवडीचा, पात्रापात्रतेचा किंवा इतर कोणत्याही गोष्टीचा विचार न करतां मॅट्रिक होण्याकडेच सर्व मुलांची प्रवृत्ति असते. मग त्यांची तिकडे बुद्धि असो वा नसो. मॅट्रिकला अनेकदां नापास झालें तरच इतर व्यवसायाकडे वळावयाचें. यामुळें मुलांच्या त्या बालवयांतील महत्त्वाच्या कालाचा फारच अपव्यय होतो. तसाच पैशाचाहि अपव्यय होतो. नापास झाल्यामुळें शिक्षण सोडून दिल्यामुळें न्यूनगंड निर्माण होतो व आत्मविश्वास नाहींसा होतो. मग धडपड करून कोठेंतरी धंद्याच्या मार्गें लागावयाचें त्यापेक्षां वेळींच धंद्यांत पडणें योग्य झालें नसतें काय ? खरें आहे. पण धंदेशिक्षणाच्या संस्था आहेत कोठें ? पालकांनीं तरी

काय करावयाचें ? कित्येक मुलांची पुस्तकी शिक्षणांत बुद्धि चालत नाहीं. पण धंदा, कला, कौशल्य, यंत्रविद्या यांमध्यें त्यांची बुद्धि चांगली चालते. अशा मुलांनासुद्धां कमींत कमी शिक्षण हवें असतें ही गोष्ट खरी. पण तें शिक्षण म्हणजेच चौदा वर्षें वयापर्यंतचें सात वर्षांचें प्राथमिक शिक्षण होय. आपल्या घटनेमध्येंहि सक्तीचें शिक्षण या वयापर्यंतच देण्याची योजना आहे. तेव्हां पुस्तकी शिक्षणाकडे ज्यांचा कल नाहीं, त्या मुलांनीं आपल्या आवडीच्या व्यवसायांत या वयाला प्रवेश करणें योग्य नाहीं का ? परंतु त्याजबरोबर हेंही खरें कीं, या वयांत व्यवसायाला लागलें तरी त्या मुलांना त्या व्यवसायाचें शास्त्रीय शिक्षण देणें जरुरीचें आहे. तसेंच इतिहास, काव्य, साहित्य इत्यादि स्वरूपाचें सांस्कृतिक शिक्षणहि इतक्या लहान वयांत थांबविणें योग्य नाहीं. म्हणून चौदा वर्षें वयाला आवडीच्या उद्योगधंद्यांत उमेदवार म्हणून कामाला सुरवात केली तरी या मुलांना आठवड्यांतून एक किंवा दोन दिवस अर्धवेळाच्या शाळेंत त्यांच्या विषयांचें शास्त्रीय शिक्षण व थोडें सांस्कृतिक शिक्षण दिलें गेलें पाहिजे.

## आजचें धंदेशिक्षण

आपल्याकडे जी कांहीं थोडी धंदेशिक्षणाची व्यवस्था आहे ती वरच्या थरावर आहे. मेडिकल कॉलेज, कॉमर्स कॉलेज, इंजिनियरिंग कॉलेज, शेतकी कॉलेज, टेक्नॉलॉजिकल कॉलेज या सर्व संस्था उच्च शिक्षणाच्या सदरांत मोडतात. या कॉलेजांमधून बाहेर पडलेले विद्यार्थी वरच्या नोकऱ्यांची अपेक्षा करतात. परंतु मॅट्रिकपूर्वी जे विद्यार्थी धंदेशिक्षणाकडे वळतात त्यांना असें शिक्षण देण्याची आपल्याकडे व्यवस्था नाहीं. अलीकडेच सरकारनें बहुलक्षी शाळांची योजना आंखली असून त्यामध्यें " टेक्निकल, कमर्शियल, ॲग्रिकल्चरल व जनरल " असे मॅट्रिकपूर्व चार विकल्प ठेवले आहेत. परंतु धंद्यांचे जे विविध प्रकार आहेत ते सर्व या विकल्पांत सामावले जात नाहींत. व या इतक्या विविध धंद्यांच्या प्रात्यक्षिक व शास्त्रीय

शिक्षणाची व्यवस्था या शाळांमधून होणें शक्य नाहीं. शिवाय या शाळा आर्थिक दृष्ट्या अव्यवहार्य दिसून येतात. आपल्या S. S. C. ला सुद्धां साठ प्रकारचे विकल्प ठेवण्यांत आले आहेत. पण कोणतीहि शाळा दोन किंवा तीनहून अधिक विकल्प विद्यार्थ्यांना देऊं शकत नाहीं. म्हणूनच चौदा वर्षे वयालाच कालापव्यय न करतां जी मुलें धंदेशिक्षणाकडे जावयाचें ठरवतील, त्यांचें, उमेदवारी करीत असतांच अर्धवेळाच्या शाळांत शिक्षण चालू ठेवण्याची व्यवस्था झाली पाहिजे. पण या अर्धवेळाच्या धंदेशिक्षणाच्या शाळा चालवावयाच्या कोणी, त्यांत शिक्षक कोण, जागा कोणती, पैसा कोणी द्यावयाचा व नोकरी करणाऱ्या या मुलांना शाळेंत जाण्यासाठीं वेळाची मोकळीक कशी मिळवावयाची हे प्रश्न उद्भवतात.

**जर्मनीनें प्रश्न कसा सोडविला ?**

आज जर्मन देशांत हेच प्रश्न कसे सोडविले गेलेले आहेत, याचा विचार करणें उद्बोधक ठरेल. अर्धवेळाच्या धंदेशिक्षणाच्या शाळांना तिकडे 'बेरूफ शूल' असें म्हणतात. प्रत्येक व्यवसायाचे कारखाने आपापल्या कारखान्याच्या जागेंत या शाळा चालवितात. उमेदवारांना आठवड्यांतून एक किंवा दोन दिवस या शाळांतून शिक्षण घेणें सक्तीचें केलेलें आहे. या शाळांचा खर्च कारखानेच करतात. याचें कारण शिक्षित व बुद्धिमान् कामगार सरतेशेवटीं धंद्याच्या दूरदृष्टीनें विचार करतां फायद्याचाच पडतो, ही गोष्ट कारखानदारांना पटलेली आहे. उमेदवारानें तीन वर्षे या शाळांत शिक्षण घेतल्यावर त्याची परीक्षा घेतली जाते. या परीक्षांचा अभ्यासक्रम व दर्जा त्यांच्या व्यवसायसंघटनेच्या मध्यवर्ती संस्थेतर्फे ठरविला जातो व परीक्षा घेऊन प्रमाणपत्रें दिलीं जातात. आपल्याकडे या गोष्टी व्हावयास हरकत कोणती ? मोठमोठ्या कारखान्यांनीं आपल्या जागेंत अशा शाळा चालवून उमेदवारांना शिकविलें पाहिजे, असें कायद्याचें बंधन सरकार उद्योगपतींवर घालूं शकणार नाहीं का ? उद्योगधंदे व शिक्षण यांची सांगड घालणें हल्लींच्या

यांत्रिक युगांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. उद्योगधंदे जर सुधारावयाचे व भरभराटीस यावयाचे असतील तर त्यांतील कामगारवर्ग तज्ज्ञ व शिक्षित असणें जरुरीचें आहे, हें उद्योगपतींना सहज समजण्यासारखें आहे. परमार्थ म्हणून नव्हे तर स्वार्थ म्हणून कां होईना, त्यांना हें तत्त्व पटल्याशिवाय राहणार नाहीं. जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा जर देशाला करावयाचा असेल तर अशा धंदेशिक्षणाची सोय करणें अत्यंत जरुरीचें आहे. अर्थात् धंदेशिक्षणाच्या सर्वच शाळा अर्धवेळाच्या असाव्या किंवा त्या सर्वच उद्योगपतींनीं चालवाव्या, असें नाहीं, तर या प्रकारच्या शाळांशिवाय पूर्ण-वेळाच्या पण पूर्वमॅट्रिक शिक्षण देणाऱ्या विविध प्रकारच्या धंदेशिक्षणाच्या शाळा सरकारनें तांत्रिक शिक्षण बोर्डाच्या साहाय्यानें काढणें जरुरीचें आहे. या शाळांमध्यें शिक्षण व संशोधन दोन्ही चालू ठेवावें लागेल. अशा प्रकारच्या शाळाहि जर्मनीमध्यें मोठ्या प्रमाणावर चालविलेल्या आहेत. त्यांना ‘ फाख शूल ’ असें म्हणतात.

**परस्परावलंबी गरजा**

लेखाच्या सुरवातीस उल्लेखिलेली नागरिकांच्या दैनंदिन जीवनांतील दुसरी गरज म्हणजे त्यांची अर्थोत्पादनक्षमता वाढली पाहिजे असें म्हटलें होतें. ती गोष्ट वरील विवेचनावरून धंदेशिक्षणाचा प्रसार झाल्यास सहजच साध्य होईल यांत शंका नाहीं. शिक्षित व तज्ज्ञ कामगारवर्ग मिळाला म्हणजे धंदे भरभराटीस येतील, व्यापार वाढेल, बेकारी नष्ट होईल; म्हणजे आपोआप जनतेची क्रयशक्ति वाढेल. तेव्हां सुरवातीला उल्लेख केलेल्या गरजा या परस्परावलंबी आहेत. एक साध्य झाली कीं दुसरी साध्य होईलच. आतां मोठ्या उद्योगधंद्यांप्रमाणेंच लहान उद्योगधंदेही देशाच्या विकासासाठीं वाढीस लागले पाहिजेत. यांत्रिक उत्पादन कितीही वाढलें तरी मानवाच्या हस्तकौशल्याला देशाच्या प्रगतींत नेहमींच स्थान राहील. किंवा लहान यांत्रिक उपकरणांच्या मदतीनें धंदे चालविण्याची गरज नेहमींच राहील.

परंतु याही कलाकारांना शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्यांना व्यवहाराचें, व्यापाराचें व संघटनेचें ज्ञान मिळालें पाहिजे. निव्वळ हस्तकौशल्य असूनहि चालणार नाहीं. उदाहरणार्थ, काश्मीरचे कलाकार मान मोडेपर्यंत काम करूनही गरीब ते गरीबच रहातात. याचें कारण त्यांच्या हस्तकलाकौशल्याच्या मोबदल्याचा मोठा वांटा व्यापारी लोक व दलालच उचलीत असतात व कलाकारांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना पोटापुरतेंही देत नाहींत. अशी स्थिति कलाकार शिक्षित असते तर झाली नसती.

## आजच्या युगांतील विविध धंदे

धंदे हे असंख्य प्रकारचे असूं शकतात. हल्लीं आपण जीवनोपयोगी वस्तु म्हणतो त्या किती विविध प्रकारच्या असतात, तसेंच प्रत्येक वस्तु तयार होतांना किती विविध प्रकारचें कौशल्य लागतें, याचा विचार केल्यास व्यवसाय किती विविध प्रकारचे असूं शकतात याची कल्पना करण्यास मदत होईल. हल्लींचें युग हें तज्ज्ञांचें युग आहे. त्यामुळें प्रत्येक व्यवसाय—मग तो कितीही सोपा दिसो वा असो—एका विशिष्ट तंत्राधीन बनतो. हें तंत्र तो व्यवसाय करणाऱ्याला आत्मसात् करावें लागतें. म्हणजेच त्याला त्याचें शास्त्रीय शिक्षण घ्यावें लागतें. असें झालें तर हल्लींच्या जीवनकलहांत व स्पर्धेच्या चढाओढींत त्याचा निभाव लागतो. म्हणून पुस्तकी शिक्षणाच्या संकुचित मार्गानें सर्वांनींच जाण्याची धडपड न करतां धंदेशिक्षणाचें जें प्रचंड क्षेत्र मोकळें आहे त्यामध्यें आपल्या कलाप्रमाणें नैपुण्य मिळविण्याचा प्रयत्न करावा व शिक्षणाधिकाऱ्यांनींही या शिक्षणाचीं द्वारें त्यांना खुलीं करून द्यावीं. मानवी समाजाच्या ऐहिक व पारमार्थिक सुखाचा हाच मार्ग आहे. धंदा लहान असो किंवा मोठा असो, आपापल्या क्षेत्रांत प्राविण्य मिळवून सचोटीनें अर्थार्जन करणें हीच समाजसेवा व देशसेवा आहे.

३

# जर्मनीमधील विद्यार्थी व त्यांच्या संघटना

जर्मन विद्यार्थी हा कॉलेजमध्यें प्रवेश करतो त्या वेळीं वयानें सुमारें १९ वर्षांचा किंवा त्याहून थोडा मोठाच असतो. कारण जर्मनीमधील आबिटूर म्हणजे मॅट्रिक ही परीक्षा तेरा वर्षांच्या शालेय शिक्षणानंतर घेण्यांत येते. अभ्यासाचा दर्जा पाहिल्यास ही परीक्षा आपल्याकडील इंटर आर्ट्स् किंवा सायन्सच्या बरोबरीची असते; व इंटरची परीक्षा आपल्याकडेहि १८–१९ वयाच्या सुमारासच होते. फरक एवढाच कीं, आपल्याकडील कॉलेजचीं पहिलीं दोन वर्षें जर्मनींत शालेय शिक्षणाचाच भाग असतो. पण याचा फायदा असा कीं, मुलाची किशोरावस्था अठरा वर्षांपर्यंत धरली जाते. तेव्हां कॉलेजांत प्रवेश करणारीं जर्मन मुलें किशोरावस्थेंतून बाहेर पडलेलीं अतएव समंजस, प्रौढ व स्वतंत्र बुद्धीचीं असतात.

याशिवाय बरींच मुलें आबिटूर होतांच कॉलेजमध्यें न जातां थोडे दिवस कांहीं इतर कामांचा किंवा कारखान्यांचा अनुभव घेऊन मग कॉलेजांत जातात. कांहीं अभ्यासक्रमांना प्रवेश मिळविण्यापूर्वी असा प्रात्यक्षिक अनुभव असला पाहिजे अशी अटच असते. उदाहरणार्थ, आबिटूरनंतर मेडिकल कोर्सला जावयाचें असल्यास एखाद्या हॉस्पिटलमध्यें निदान तीन महिने काम केलेलें असावें लागतें. इंजिनियरिंगला जाणाऱ्या विद्यार्थ्यानें निदान सहा

महिने एखाद्या कारखान्यांत प्रत्यक्ष काम केलेलें असावें लागतें. शेतकी, व्यापार इत्यादि इतर अभ्यास-शाखांमध्येंदेखील प्रवेश मिळविण्यापूर्वी वर्ष-सहा महिने प्रात्यक्षिक काम केलेलें असलें पाहिजे अशी अट असल्यामुळें, जर्मन कॉलेज विद्यार्थी आपल्याकडील विद्यार्थ्यांपेक्षां वयानें दोनतीन वर्षांनीं मोठा असतो. त्यामुळें कॉलेजमध्यें आल्याबरोबर तो वेगळ्याच पातळीवर येतो व तसा वागविलाहि जातो. तो अनेक बाबतींत पूर्ण स्वतंत्र असतो. अभ्यासाच्या कोणत्याहि शाखेंत व कोणत्याहि विद्यापीठांत आबिटूरनंतर वरीलप्रमाणें प्रात्यक्षिक कामाच्या सर्व अटी पाळल्यावर त्याला इच्छेप्रमाणें प्रवेश मिळतो. आपल्याकडे सायन्स, इंजिनियरिंग, मेडिकल इत्यादि अभ्यास-शाखांना प्रवेश मिळविण्याची विद्यार्थ्यांना जशी अडचण पडते तशी जर्मन विद्यार्थ्याला कोणत्याहि शाखेंत प्रवेश मिळविण्यास अडचण पडत नाहीं. ज्या अभ्यास-शाखांना प्रयोगशाळांची जरुरी असते त्या शाखांत क्वचित् जागेच्या अभावीं प्रवेश नच मिळूं शकला तर एक किंवा दोन टर्म-नंतर जागा होतांच त्याला प्रवेश आधीं दिला जातो. ही प्रवेश-सुलभता जर्मन विद्यार्थ्यांप्रमाणें परदेशीय विद्यार्थ्यांनासुद्धां दिली जाते. हायडेल्बर्गला मला बरेच हिंदी विद्यार्थी मेडिकल कोर्स घेतलेले आढळले. हिंदुस्थानांत मेडिकलला प्रवेश न मिळाल्यामुळें या विद्यार्थ्यांनीं जर्मन विद्यापीठांत मेडिकलला प्रवेश मिळविला होता.

## विद्यापीठें बदलण्याची मुभा

कॉलेजमध्यें नांव घातल्यावर व्याख्यानांना हजेरी दिलीच पाहिजे, अशी जर्मन विद्यार्थ्याला सक्ति नाहीं. फी भरल्यानंतर व्याख्यानांना जावयाचें कीं नाहीं किंवा कोणत्या व्याख्यानांना जावयाचें, हें त्यांच्या मर्जीवर अवलंबून असतें. व्याख्यानापासून फायदा होत असला तर तो अपरिहार्य कारण असल्याशिवाय ते बुडवीतच नाहींत. प्रयोग करावयाचे असले तर मात्र ते केल्याचा दाखला मिळवावा लागतो. एका विद्यापीठांतून दुसऱ्या विद्यापीठांत

जाण्यास त्याला कोणतीच आडकाठी नसते. तो कॉलेजच्या अभ्यासक्रमांत दोनतीनदां किंवा निदान एकदांतरी विद्यापीठ बदलत असतो. शेवटीं ज्या विद्यापीठांतून तो पदवी मिळवितो तेथील तो विद्यार्थी असें मानलें जातें. असा वरचेवर विद्यापीठाचा बदल करण्याचा हेतु हा कीं, विद्यार्थ्याला त्याच्या विषयांतील उत्तम प्रोफेसर ज्या विद्यापीठांत असतील तेथें शिकावयास मिळावें. तसेंच, दोनतीन विद्यापीठांतील शिक्षणपद्धतींचा अनुभव मिळावा, व त्यांत चांगलें कोणतें तें त्यानें स्वतःच्या अनुभवानें ठरवावें. किंबहुना जर्मनीमध्यें कॉलेज विद्यार्थ्यांचा दर्जा एखाद्या प्रौढ स्वतंत्र नागरिकाप्रमाणें असतो, असें म्हणावयास हरकत नाहीं. विद्यार्थ्यांचे प्रोफेसरांशीं स्नेहाचे संबंध असतात व प्रोफेसर विद्यार्थ्यांचा मित्र, सल्लागार व मार्गदर्शक या तिन्ही नात्यांनीं विद्यार्थ्यांस अत्यंत प्रिय व आदरणीय असतो.

## आर्थिक हलाखी

गेल्या दोन महायुद्धांनंतर दोनदां चलनवाढ व १९४८ सालची चलन-सुधारणा यामुळें जर्मन विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिति अत्यंत बिकट झाली. पश्चिम जर्मनीमधील एका विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची पाहणी केल्यावर असें दिसून आलें कीं, शेंकडा ६६ विद्यार्थ्यांना स्वतःच्या शिक्षण-खर्चाची तरतूद स्वतःच मिळवून करावी लागते. कित्येक विद्यार्थ्यांना कॉलेज चालू असतां अभ्यास सांभाळून आठवड्याचे ३० तास काम करावें लागतें. बऱ्याच विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकें घेण्याची ऐपत नसते. पश्चिम जर्मनींतील एकूण १,२६,००० कॉलेज-विद्यार्थ्यांपैकीं ६० टक्के विद्यार्थ्यांना नौकरी करावी लागते. १३ टक्के विद्यार्थ्यांना फीमध्यें सूट, मोफत जेवण अशा सवलती मिळतात. १ टक्का विद्यार्थ्यांना पूर्ण स्कॉलरशिप मिळते. २० टक्के विद्यार्थ्यांना सायकल, कॅमेरा, अशा साधारण चैनीच्या वस्तु घेण्यासाठीं निदान सुट्टीच्या दिवसांत काम करून पैसे मिळवावे लागतात आणि फक्त ६ टक्के विद्यार्थ्यांच्या सर्व आर्थिक गरजा पालकांकडून भागविल्या

जातात. वरील आंकड्यांवरून जर्मन विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना येईल.

## युवकांसाठीं खास खातें

विद्यार्थ्यांच्या या आर्थिक हलाखीची आज तेथील जनतेला व सरकारला खूप काळजी वाटत असून विद्यार्थ्यांना नाना प्रकारच्या सवलती देणें व त्यांच्या स्कॉलरशिपा वाढविणें या दृष्टीनें त्यांचा प्रयत्न चालू आहे. आपल्या पाठोपाठ हाच विद्यार्थी आपली जागा घेऊन देशाचें भवितव्य घडवील याची तेथील नेत्यांना जाणीव असल्यामुळें ' Nachwuchs ' किंवा उगवती पिढी जेणेंकरून बुद्धिमान्, नीतिमान् व कार्यक्षम होईल असे त्यांचे प्रयत्न चालू असतात. पश्चिम जर्मनीच्या केंद्र सरकारांत ' युवकांचे प्रश्न ' या नांवाचें एक स्वतंत्र खातें आहे. १९५४ सालीं सरकारनें या खात्यानिमित्त २,८८,००,००० मार्क मंजूर केले होते. या खात्यांत युवकांच्या सर्व समस्यांचा विचार केला जातो. प्रवास व सहलीमध्यें युवकांची उतरण्याची स्वस्त सोय, त्यांच्यासाठीं खास वाचनालयें व क्लब यांची सोय केली जाते. फुरसतीच्या व सुटीच्या दिवशीं या क्लबांत येऊन कांहीं वाचन किंवा कांहीं हौशीचे उद्योग शिकण्याची येथें सोय असते. अशा प्रकारें अभ्यासाव्यतिरिक्त वेळांत कांहीं उपयुक्त व्यवसाय पुरवून मुलें रिकामटेकडीं राहणार नाहींत व निरुद्योगापायीं कुमार्गाला जाणार नाहींत अशी दक्षता घेतली जाते.

## हितरक्षक संघटना

विद्यार्थ्यांच्या हितसंबंधांत जर्मनींतील तीन मोठ्या संघटनांचा उल्लेख करणें जरूर आहे. एक म्हणजे विद्यार्थी-संघ, दुसरी विद्यार्थी-सहाय्यक संघ व तिसरी जागतिक विद्यापीठ सेवासंघ. यांपैकीं पहिल्या दोन संस्था प्रत्येक विद्यापीठांत स्थापन झालेल्या असून विद्यार्थी-संघाच्या सर्व शाखांची एक मध्यवर्ति संस्था ' राष्ट्रीय विद्यार्थी-संघ ' या नांवानें बॉनमध्यें १९४९

सालापासून काम करीत आहे. विद्यार्थी-सहाय्यक संघाच्याहि सर्व स्थानिक शाखांची एक मध्यवर्ती संस्था 'राष्ट्रीय विद्यार्थी-सहाय्यक संघ' या नांवानें १९५० सालीं स्थापन करण्यांत आली व तिची कचेरीहि बॉनमध्यें आहे. तिसरी संस्था नांवाप्रमाणें जागतिक स्वरूपाची असून तिची मुख्य कचेरी जिनीव्हाला १३ रु कॅलव्हिन या ठिकाणीं आहे. या संस्थेच्या पश्चिम जर्मनींत तेरा शाखा असून त्यांची दरवर्षी एक परिषद् भरते. या परिषदेंत पहिल्या दोन्ही संस्थांचे प्रतिनिधि व इतरहि प्रतिनिधि भाग घेतात. या संस्थेनें जगांतील वेगवेगळ्या देशांतील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारची मदत दिलेली आहे. उदाहरणार्थ, १९५५–५६ सालीं पूर्व जर्मनी-मधून निर्वासित म्हणून आलेल्या ६००० विद्यार्थ्यांचें पुनर्वसन करून त्यांचा अभ्यास चालू करण्याचें काम या संस्थेनें केलें. २०००० रुग्ण जपानी विद्यार्थ्यांना सॅनेटोरियममध्यें राहतां यावें म्हणून २६००० मार्क दिले. इंडोनेशियाच्या विद्यार्थ्यांना पुस्तकें व प्रयोगशाळा यांसाठीं १५००० मार्क दिले. पश्चिम जर्मनींत अभ्यास करणाऱ्या ६००० परदेशीय विद्या-र्थ्यांच्या राहण्याची व निरनिराळ्या विद्यापीठांत प्रवेश मिळवून देण्याची व्यवस्था केली. याप्रमाणें जगांतील वेगवेगळ्या देशांतील विद्यार्थ्यांना वेग-वेगळ्या प्रकारची मदत या संस्थेतर्फे होत असते.

पहिल्या दोन संस्था आंतर्देशीय आहेत. त्यांच्या कार्यांचें स्वरूप खालील-प्रमाणें आहे. यावरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या विविध अडचणींचें निवारण कसें केलें जातें, हें दिसून येईल. त्या दोन्हींपैकीं विद्यार्थी-संघ ही संस्था सर्वस्वीं विद्यार्थ्यांची आहे व ती विद्यार्थी-जीवनांतील स्वराज्याची प्रतिकृति ( Self Government ) आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. ही संस्था प्रत्येक विद्यापीठांत अस्तित्वांत असून विद्यापीठांचे सर्व विद्यार्थी तिचे सदस्य असतात. प्रत्येक विद्यार्थी दर टर्मला २ ते ३ मार्क वर्गणी देतो. दर टर्मला निवडणूक होऊन विद्यार्थ्यांचें पार्लमेंट तयार होतें.

निवडणूक वर्षासाठीं असते; पण दर टर्मला निवडणूक होते. याचा अर्थ अर्धे सदस्य जुने राहतात व अर्धे नवे येतात. साधारणपणें १५० विद्यार्थ्यांमागें एक विद्यार्थी पार्लमेंटमध्यें निवडला जातो. या पार्लमेंटमध्यें निवडलेल्या सदस्यांतून एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व दोन चिटणीस निवडले जातात. याशिवाय सदस्यांतून एक शासन-समिति निवडली जाते. लोकशाही राज्य-सरकारच्या कायदेमंडळ व शासन-मंडळाप्रमाणेंच हें विद्यार्थ्यांचें पार्लमेंट व शासनसमिति असते. या शासनसमितीला ASTA ॲस्टा असें नांव आहे. ॲस्टाचे जरुरीप्रमाणें ६–७ विभाग असतात. प्रत्येक विभागाचा मंत्र्याप्रमाणें एक प्रमुख असतो व त्या त्या विभागाचा कारभार तो तो प्रमुख पाहात असतो. हे विभाग व त्यांचें कार्य साधारणतः खालीलप्रमाणें असतें.

(१) सामाजिक प्रश्न :— या विभागांत विद्यार्थ्यांच्या सामाजिक अडचणींचा परामर्श घेतला जातो. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांना ट्रॅम, आगगाडी, सिनेमा, प्रवास, जेवण यांसाठीं सवलतीची शिफारस करणारीं प्रमाणपत्रकें दिलीं जातात.

(२) शारीरिक शिक्षण विभाग :— या विभागातर्फे स्पोर्ट, कवायती, टूर्नामेंट, आंतरराष्ट्रीय खेळांचे सामने घडवून आणणें, त्यासाठीं खेळाडू तयार करणें व निवडणें हें काम चालतें.

(३) आर्थिक विभाग :— या विभागातर्फें 'पार्लमेंट'चा अर्थसंकल्प तयार करणें, व प्रत्येक विभागाला पैशाची वांटणी करण्याचें काम चालतें.

(४) शिष्यवृत्ति व आर्थिक मदत :— या विभागातर्फें हुषार, लायक व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व इतर आर्थिक मदत देवविणें व त्या बाबतींत माहिती पुरविणें, शिफारस करणें हीं कामें चालतात. ॲस्टाजवळ स्वतःचा पैसा नसला तरी ते दुसरीकडून आर्थिक मदत मिळवून देण्याची खटपट करूं शकतात. विशेष प्रसंगीं स्वतःजवळील पैशांतूनहि ते गरजू विद्यार्थ्यांची अडचण भागवूं शकतात.

(५) प्रसिद्धि खातें व सांस्कृतिक चळवळी :—या विभागातर्फे विद्यार्थी-वर्गाचे कार्यक्रम, चळवळी, समस्या इत्यादिकांना वर्तमानपत्रांतून प्रसिद्धि देण्यांत येते. त्याचप्रमाणें संगीत, नृत्य, नाटक, व्याख्यानें, चर्चा व इतर कार्यक्रम करण्यांत येतात.

(६) आंतरराष्ट्रीय स्नेहसंबंध :— या विभागातर्फे परदेशांतून आलेल्या विद्यार्थ्यांना सर्व तऱ्हेचा सल्ला व मदत देण्यांत येते. त्याचप्रमाणें परदेशाला जाणाऱ्या जर्मन विद्यार्थ्यांनाहि जरूर तो सल्ला व मदत देण्यांत येते. पर-देशांशीं विद्यार्थिजनांची अदलाबदल व परदेशांच्या प्रवासयोजनाहि पार पाडल्या जातात.

(७) जर्मनीच्या विभक्तीकरणामुळें उद्भवलेले प्रश्न :—या विभागातर्फे पूर्व जर्मनीमधून आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कौटुंबिक अडचणी, विस्कटलेल्या अभ्यासक्रमामुळें उद्भवलेल्या अडचणी इत्यादिकांचा परामर्श घेतला जातो. पूर्व विभागांत उरलेल्या विद्यार्थ्यांसाठीं अन्नधान्याची व पैशाची मदत करणें अशींहि कामें केलीं जातात.

याशिवाय जरूर वाटेल त्याप्रमाणें आणखीहि कांहीं विभाग वाढविण्यांत येतात. ॲस्टाची आठवड्यांतून एकतरी बैठक होते. ॲस्टानें घेतलेल्या निर्णयांना पार्लमेंटकडून संमतीचें शिक्कामोर्तब घ्यावें लागतें.

आतां पार्लमेंटचें मुख्य कार्य म्हणजे ‘ ॲस्टा ’ नेमून त्याच्या द्वारें वेगवेगळे विभाग चालविणें. याशिवाय ठिकठिकाणीं विद्यार्थीप्रतिनिधींच्या नेमणुका करणें. कांहीं जर्मन विद्यापीठांत सेनेटमध्यें विद्यार्थीप्रतिनिधि बोलाविण्यांत येतात; पण या प्रतिनिधींचे अधिकार मात्र वेगवेगळ्या विद्यापीठांत कमीअधिक आहेत. कांहीं विद्यापीठांत फक्त विद्यार्थीवर्गाच्या प्रश्नांपुरतेच या प्रतिनिधींना बोलावतात; तर कांहींत सर्व बैठकींना बोलावतात. कांहींत या प्रतिनिधींना मताचा हक्क आहे; तर कांहींत नाहीं. बार्लिनच्या ‘ फ्री युनिव्हर्सिटींत ’ तर विद्यार्थी-प्रतिनिधींना कमालीचे हक्क

मिळालेले आहेत. विद्यार्थी सेनेटच्या सर्व बैठकींना हजर राहून कोणत्याहि प्रश्नावर मत देऊं शकतात. या विद्यापीठाच्या सर्वच कमिट्यांवर विद्यार्थी-प्रतिनिधि असतात. ज्या फॅकल्टींना प्रोफेसरांची नेमणूक करण्याचा अधिकार असतो त्याहि फॅकल्टींचे ते सदस्य असतात. विद्यापीठाच्या शासनसमितीमध्येंहि ते असतात; इतकेंच नव्हे तर विद्यापीठाच्या शिस्त-पालनकमिटी ( Disciplinery committee ) मध्यें जे तीन सदस्य असतात त्यांमध्यें एक प्राध्यापक, एक न्यायमूर्ति व यांजबरोबर एक विद्यार्थी-प्रतिनिधीहि असतो. शिस्तपालन-कमिटीमध्यें विद्यार्थी-प्रतिनिधीला दुसऱ्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींच्या बरोबरीचें स्थान असल्यामुळें एकंदर विद्यार्थीवर्गाचा दर्जा काय समजला जातो हें दिसून येईल. शिवाय विद्यार्थ्यांचा प्रतिनिधि या कमिटींत असल्यामुळें विद्यार्थ्यांची बाजू योग्य तऱ्हेनें मांडली जाऊन गैरसमजुती न होतां शिस्तपालनाचा प्रश्नहि फार कठीण होत नाहीं व विद्यार्थी-प्राध्यापकांत सहकार्याचें वातावरण निर्माण होतें, ही गोष्ट ध्यानांत येण्यासारखी आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांची विषयवारी अभ्यासमंडळें नेमलीं जातात. हीं अभ्यासमंडळें विषयाचा अभ्यासक्रम, त्याची व्याप्ति व निवड, नियोजित पुस्तकें इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत विचारविनिमय करून विद्यार्थीवर्गाचा दृष्टिकोण व त्यांच्या विधायक सूचना प्राध्यापकवर्गासमोर मांडूं शकतात. अशा प्रकारें अभ्यासक्रमाच्या बाबतींतदेखील विद्यार्थी व प्राध्यापक यांचेमध्यें बरोबरीच्या व सहकार्याच्या भूमिकेवर निर्णय घेतले जातात. इतर विद्या-पीठांत बर्लिनच्या ' फ्री युनिव्हर्सिटी ' इतकी जरी विद्यार्थ्यांना सत्ता नसली तरी आपल्याइकडच्या मानानें खूपच जास्त आहे. त्यामुळें विद्यार्थीवर्ग या बाबतींत संतुष्ट व जबाबदारवृत्तीचा झाला आहे. यानंतर दुसरी मोठी संघटना म्हणजे ' विद्यार्थीहितसहाय्यक संघ ' ही होय.

प्रत्येक जर्मन विद्यापीठांत विद्यार्थी-सहाय्यक कमिटी असते. पहिल्या महा-

युद्धानंतर विद्यार्थीवर्गाची आर्थिक व कौटुंबिक दुर्दशा फार मोठ्या प्रमाणावर झाली. अनेक तरुण मुलांच्या डोक्यावरचें मायेचें व संरक्षणाचें छत्र नाहींसें झालें. त्यामुळेंच वरील प्रकारच्या संस्था कमी-अधिक काळाच्या अंतरानें प्रत्येक विद्यापीठांत निर्माण झाल्या. या सर्व स्वतंत्र असून त्यांच्या घटनाहि स्वतंत्र आहेत. पण त्यांचें ध्येय समान असल्यामुळें कार्यांत फारसा फरक पडत नाहीं. मागें लिहिल्याप्रमाणें या सर्वांचें केंद्रीकरण करून मध्यवर्ती संघाचें दप्तर बॉन येथें ठेवलेलें आहे. या कमिट्यांच्या सदस्यांत विद्यार्थीवर्ग, प्राध्यापक-वर्ग व शिक्षणप्रेमी सार्वजनिक कार्यकर्ते यांच्या प्रतिनिधींचा समावेश होतो.

विद्यापीठाचे कुलगुरु कमिटीच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष असतात. कार्यकारी मंडळांत सामान्यतः दोन प्राध्यापक, दोन सार्वजनिक कार्यकर्ते व दोन किंवा तीन विद्यार्थी असतात. कमिटीच्या पगारी नोकर-वर्गांत एक व्यवस्थापक, एक डॉक्टर, एक स्त्री-सुपरवायझर, एक कारकून, तीन चिटणीस, यांशिवाय स्वयंपाकी, मोलकरणी, गडी इत्यादि लोक असतात व विद्यापीठाच्या जवळपासच त्यांचें काम चालतें.

कमिटीच्या कामांची रूपरेषा साधारणतः खालीलप्रमाणें कमी-अधिक फरकानें सांगतां येईल. कमिटी विद्यापीठाच्या आवारांतच एक उपाहारगृह चालविते. हें चालविण्याला सरकारची २५ टक्के आर्थिक मदत मिळते. त्यामुळें दुरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना अगदीं स्वस्त दरांत कॉलेजच्याजवळ जेवण मिळूं शकतें. जवळचे विद्यार्थीसुद्धां याचा फायदा घेतात. येथील अन्न कांहीं वेळां घरच्यापेक्षांहि स्वस्त, इतकेंच नव्हे तर चांगलें व पौष्टिक असतें. गरजू विद्यार्थ्यांना येथें फुकटहि जेवण देण्याची सोय असते. येथें जवळजवळ तीन ते चार हजार विद्यार्थी रोजचें जेवण घेतात. यानंतर ही विद्यार्थी-साहाय्यक-कमिटी विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहें चालविते किंवा वसतिगृह नसल्यास बाहेरगांवच्या विद्यार्थ्यांची इतर जवळच्या कुटुंबांत राहण्याची सोय करवते किंवा खोली मिळवून देते. कमिटीतर्फें विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी

होते. विद्यार्थ्यांच्या फीपैकीं कांहीं भाग या कार्याकरितां वापरण्यांत येतो. दर दोन वर्षांनीं प्रत्येक विद्यार्थ्यांची फुकट तपासणी करून त्याला औषधोपचार सामान्यतः फुकटच करण्यांत येतो. आजारी विद्यार्थ्यांकरतां सेंट ब्लासीन या ठिकाणीं एक सॅनिटोरियम बांधलेलें आहे. येथें त्यांचें शिक्षण चालू ठेवण्याचीहि थोडीफार सोय केलेली आहे.

यानंतर विद्यार्थी-साहाय्यक कमिटी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याची खटपट करते. परीक्षेच्या वर्षीं विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा ताप होऊं नये म्हणून त्यांना बिनव्याजी कर्ज देण्यांत येतें. परीक्षा पास झाल्यानंतर नोकरी लागल्यावर हें कर्ज फेडावें अशी अपेक्षा असते. हें कर्ज फेडण्याच्या बाबतींत नानाप्रकारच्या सवलती ठेवण्यांत आलेल्या आहेत. कांहीं विद्यार्थ्यांना अल्पमुदतीच्या नोकऱ्या मिळवून देऊन त्यांची निकडीची आर्थिक अडचण ताबडतोब भागविण्याची सोय करण्यांत येते. परीक्षेनंतर कायम नोकरीहिं मिळविण्यास मदत करण्यांत येते. याशिवाय कमिटी विद्यार्थ्यांसाठीं एक वाचनालय, एक दैनंदिन गरजेच्या वस्तूंचें भांडार, स्नानगृहें इत्यादि सुखसोई शक्य तितक्या स्वस्त दरांत पुरविते.

विद्यार्थीसंघ ही संस्था सर्वस्वीं विद्यार्थ्यांची असून त्यांत विद्यार्थ्यांना स्वायत्तता आहे. विद्यार्थी-साहाय्यक संघ या संस्थेंत प्राध्यापक, पालक व विद्यार्थी या सर्वांचा समावेश आहे. यामध्यें पाठवलेले विद्यार्थीप्रातिनिधि विद्यार्थीसंघानें निवडलेले असल्यामुळें दोन्ही संस्थांच्या कामांत एकसूत्री-पणा व सहकार्य आढळून येतें. या दोन संस्था व जागतिक-विद्यापीठ-सेवासंघ या तिन्हीं संस्था मिळून विद्यार्थ्यांच्या सर्व समस्या बऱ्याच प्रमाणावर सोडवीत आहेत. विद्यार्थीसंघामध्यें जर्मन विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला, संघटनाकौशल्याला व नेतृत्वाला वाव मिळालेला आहे. विद्यार्थीजीवनांतील अडचणी दूर करणें व जबाबदारीचीं कामें पार पाडणें या गोष्टी त्यांना कराव्या लागतात. त्यामुळें आयुष्यांत पुढें ज्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर पडणार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
७३६५६ ... दि. १९-८-६७
९८०५ २-३-०७



आहेत त्यांचें त्यांना जणू कांहीं प्रात्यक्षिक करावयास मिळतें. विद्यार्थीसंघ ( Students' Union ) आपल्याकडे पण आहेत; परंतु या संघांचें कार्य व्याख्यानें करविणें, नाट्यसंगीत, संमेलन इत्यादि भरविणें यांपलीकडे फारसें गेलेलें नाहीं. जर्मन विद्यार्थी जीं मोठमोठीं जबाबदारीचीं कामें करतात व विद्यार्थी-जीवनांतील समस्या सोडवितात, त्या प्रकारचें काम जोंपर्यंत आपल्याकडील विद्यार्थी करीत नाहींत तोंपर्यंत त्यांच्यामध्यें शिस्तीची जाणीव येणार नाहीं.

विद्यार्थी साहाय्यक संघामध्यें वडीलधारीं माणसें विद्यार्थ्यांच्या अडचणींत सर्व तऱ्हेची मदत करण्यास तयार असल्यामुळें जुन्या-नव्या पिढीमध्यें तो एक आपुलकीचा दुवा निर्माण झाला आहे. कोणत्याहि परिस्थितींत उपयोगी पडणारी अशी विद्यार्थ्योंसाठीं ती संस्था असल्यामुळें विद्यार्थ्यांमध्यें सुरक्षित-तेची भावना निर्माण झाली आहे. जागतिक विद्यापीठ-सेवासंघ या संस्थेच्या योगानें विद्यार्थ्यांमध्यें आंतरराष्ट्रीय परिचय व स्नेहसंबध जोडले गेले आहेत.

विद्यार्थीजीवनाचें हें तिकडील चित्र व आपल्याकडील चित्र पाहून जर तुलना केली तर मनाला विषाद वाटल्यावांचून राहात नाहीं. विद्यार्थी-जीवनाचा काल हा फार महत्त्वाचा होय. त्या वयांत विद्यार्थी ध्येयवादी, भावनाप्रधान, संवेदनाक्षम अशा विश्वांत वावरत असतात. या वयांत त्यांना मदत, सहानुभूति, संरक्षण व मार्गदर्शन मिळाल्यास राष्ट्राचा उत्कर्ष होण्यास वेळ लागणार नाहीं.

✠ ✠ ✠

४

# श्रीमती भंडारनायक यांच्या समवेत कांहीं क्षण

गेल्या दोन महिन्यांपूर्वी एक अभूतपूर्व अशी घटना घडून आल्यामुळें रामायणकालापासून भारताला परिचित असलेल्या लंकाप्रदेशाकडे सर्व जगाचें लक्ष वेधलें गेलें. ही घटना म्हणजे खुद्द लंकेमध्येंच नव्हे तर सर्व जगामध्यें प्रथमच एक महिला पंतप्रधान झाली ही होय. लंकेमधील हें स्त्रीनेतृत्वप्रधान राज्य कसें काय यशस्वी होतें, याकडे जगाचे डोळे लागले आहेत. अमेरिकेच्या 'टाईम' या नियतकालिकानें तर याबद्दल शंकाच प्रदर्शित करून अवमानकारक उल्लेखहि केला आहे. इतरहि देशांनीं शंका जरी नाहीं तरी या प्रयोगाबद्दल कुतूहल खास दाखविलें आहे.

## प्रसिद्धिविन्मुखता

जगांतील पहिली पंतप्रधान होणाऱ्या या स्त्रीचें नांव श्रीमती सिरिमावो भंडारनायक हें होय. गेल्या वर्षी त्यांचे पति पंतप्रधान सॉलोमन भंडारनायक (सीलोनमध्यें त्यांच्या नांवाचा उच्चार भंडारनायक असाच करतात, बंदरनायके असा नव्हे!) यांचा एका बुद्ध भिक्षूनें गोळ्या घालून अंत केला. त्यामुळें त्यांचा 'लंका फ्रीडम पार्टी' हा पक्ष नेताविरहित होऊन विस्कळीत झाला. आणीबाणीच्या अशा परिस्थितींत या पक्षाचें नेतृत्व करून सिरिमावो यांनीं स्वतःचें वैयक्तिक दुःख धीरानें सहन करून पक्षाची एकी संभाळली, व इतर लहानमोठ्या पक्षांचें सहकार्य मिळवून युनायटेड नॅशनल पार्टी (यु. एन्. पी.) या बलिष्ठ व भांडवलदार पक्षाशीं निवडणु-



श्रीमती सिरीमावो भंडारनायक यांचेसमवेत लेखिका



डॉ. लुडविग एरहार्ड, व्हाइस चॅन्सेलर, फेडरल मिनिस्टर ऑफ इकॉनॉमिक्स् [पश्चिम जर्मनी], लेखिकेबरोबर.

कींत यशस्वी रीतीनें लढा दिला व आपल्या पक्षाला घवघवीत यश मिळविलें. त्या स्वतः सीलोनी पार्लमेंटच्या निवडणुकीस उभ्या राहिल्या नव्हत्या; तरीपण निवडणुकीच्या प्रचारांत त्यांनीं धडाडीनें भाग घेतला व नंतर पक्षाच्या इच्छेस मान देऊन पार्लमेंटच्या सदस्य होऊन त्या पंत-प्रधान झाल्या.

त्यांची प्रत्यक्ष भेट घेण्याची अपूर्व संधि मला नुकतीच मिळाली. सिरिमावो पंतप्रधान झाल्यावर त्यांची मुलाखत घेण्याकरितां ब्रिटिश, अमेरिकन, हिंदी व अन्य पत्रप्रतिनिधि बरेच आले. पण त्यांची त्यांनीं भेट घेण्याचें नाकारलें. याचीं सामान्यतः दोन कारणें सांगितलीं जातात. एक म्हणजे नुकत्याच झालेल्या निवडणुकींत सीलोनमधील प्रमुख वृत्तपत्रांनीं त्यांच्या पक्षाविरुद्ध व व्यक्तिशः त्यांच्याविरुद्धहि जो प्रचार केला, त्यांत सदभिरुचीची क्षितिहि बाळगली नाहीं. यामुळें त्यांना वृत्तपत्रांतील प्रसिद्धि—चांगली वा वाईट—नकोच असें सध्यांतरी झालें आहे.

## तपस्विनीचें जीवन

त्यांचे पति हयात असेपर्यंत त्यांनीं राजकारणांत भाग घेतला नव्हता. एका थोर नेत्याची पत्नी या नात्यानेंच त्या सार्वजनिक जीवनांत वावरल्या होत्या. आपल्या पतीबरोबर त्यांनीं परदेशाचा प्रवासहि केला; पण प्रत्यक्ष राजकारणाच्या क्षेत्रांत स्वतंत्रपणें नुकताच प्रवेश केल्यामुळें त्या अद्याप प्रसिद्धीच्या चाकोरीला रुळलेल्या नाहींत, आणि त्यामुळें त्यांना प्रसिद्धीपासून—विशेषतः परदेशी वृत्तपत्रांतील प्रसिद्धीपासून—दूर असावें असें वाटणें साहजिक आहे. मला जेव्हां सिरिमावो यांची भेट घेण्याची त्यांच्या कार्यवाहांकडून अनुमति मिळाली त्या वेळीं एका वृत्तपत्रव्यवसायांतील गृहस्थांनीं माझें अभिनंदनच केलें व ते म्हणाले, “ तुम्ही विशेषच नशीबवान् दिसतां ! ”

कोलंबोमध्यें “ टेंपल ट्रीज ” या भव्य सरकारी प्रासादांत पंतप्रधानांचें राहण्याचें स्थान आहे. येथील बगीचांतील झाडांचीं फुलें देवालयांत वाहिलीं

जातात. म्हणून या प्रासादाचें नांव " टेंपल ट्रीज " आहे, असें सांगण्यांत आले. श्रीमती भंडारनायक यांचें खासगी निवासस्थान " रोझमीड प्लेस " हें होय. मला भेटीसाठीं तेथेंच बोलावण्यांत आलें होतें. या ठिकाणीं जाण्याचा रस्ता गर्द झाडींतून असल्यामुळें मोठा रम्य वाटतो. मी भेटीसाठीं पंतप्रधानांच्या दालनांत प्रवेश करतांच सिरिमावो उठून सामोऱ्या आल्या व स्मितवदनानें त्यांनीं माझ्याशीं हस्तांदोलन केलें आणि आपल्याजवळच कोचावर बसावयास सांगितलें. त्यांचें बोलणें, चालणें, पोशाख हें सारेंच इतकें साधें होतें कीं, खरोखरी आपण ज्यांच्याशीं बोलतों त्या जगांतील अद्वितीय पंतप्रधान सिरिमावो भंडारनायक त्या ह्याच का, असा मला संशयच निर्माण झाला असता. पण त्यांचें छायाचित्र मीं खूपच वेळां पाहिलें असल्यामुळें त्या संशयाची जागा आदरानें व कौतुकानें घेतली.

त्या पांढरी शुभ्र पण बारीक काळ्या किनारीची साधी सुती साडी नेसल्या होत्या. रत्नांच्या खाणीच्या प्रदेशांत जन्म पावूनहि त्यांच्या अंगावर रोजचे साधे अलंकारहि नव्हते. सार्वजनिक व राजकीय जीवनांत पति निधनानंतर भाग घेऊन एक वर्ष झाल्यानंतरहि त्यांची वेशभूषा व वागणूक एखाद्या तपस्विनीप्रमाणें दिसत होती.

## आत्मविश्वासाचें बल

मीं माझीं जर्मन शिक्षणपद्धतीवरील तिन्हीं पुस्तकें त्यांना भेट म्हणून अर्पण केलीं. तेव्हां त्यांनीं मला जर्मन शिक्षणपद्धतीबद्दल कांहीं प्रश्न विचारले. राजकीय प्रश्नासंबंधीं चर्चा करण्याचा त्यांचा कल दिसला नाहीं; म्हणून मींहि त्याबद्दल आग्रह धरला नाहीं. एका भारतीय स्त्रीनें आपल्या शेजाऱ्या सिंहली भगिनीची आदरपूर्वक भेट घ्यावी, आपल्या देशांतील सामान्य भगिनींच्या सदिच्छा तिला व्यक्त करून दाखवाव्या, एवढाच या भेटीचा हेतु होता, तो मात्र सफल झाला.

सीलोनमधील सिंहली व तमीळ भाषिकांचा लढा सर्वश्रुतच आहे.

सिरिमावो यांच्या कारकीर्दीतील पार्लमेंटच्या पहिल्याच बैठकींत गव्हर्नरांचें भाषण सिंहली भाषेंत वाचून झालें, तसेंच तें तमीळमध्येंहि वाचलें जाण्याचा आग्रह धरून त्यांनीं तमीळ लोकांचा विश्वास संपादन केला आहे. ज्या हिंदी लोकांच्या पिढ्यान्‌पिढ्या सीलोनमध्यें गेल्या त्यांच्या नागरिकत्वाचा बऱ्याच वर्षांपासून भिजत पडलेला प्रश्नहि समाधानकारकपणें सोडविण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे. तमीळ-पुढारी श्री. थोंडामन यांना पार्लमेंटच्या वरिष्ठ सभागृहांत सरकारतर्फे नियुक्त करून त्यांनीं अल्पसंख्याकांना दिलासा दिला आहे. त्या धर्मानें बौद्ध असून, वृत्तीनें सहिष्णु आहेत. त्या स्वतः सिंहली भाषेंत उत्तम वक्तृत्व करूं शकतात. प्रत्यक्ष कारभारांत प्रत्येक गोष्ट सह-काऱ्यांच्या सल्ल्यानें करावयाची, एवढी विनम्रता त्यांच्या अंगीं आहे. एवढें जोखमीचें पंतप्रधानपद यशस्वी रीतीनें संभाळावयाचें, हा आत्मविश्वासहि त्यांच्या अंगीं दिसून येतो. अशा या सात्त्विक, सोज्ज्वळ व कर्तबगार महिलेच्या कारकीर्दीबद्दल ज्या मोठ्या आशा व आकांक्षा निर्माण झाल्या आहेत त्या अवास्तव वाटत नाहींत.

५

# आजचा सीलोन

सीलोन या चिमुकल्या देशांत गेल्या दोन महिन्यांपासून नवी राजवट सुरू झाली. तिचें वैशिष्ट्य म्हणजे तेथें आज प्रथमच एक महिला पंतप्रधानपदीं आरूढ झाली. यामुळें या देशाकडे आज सर्वांचें—विशेषतः भारतीयांचें लक्ष वेधलें आहे. चालू वर्षांत सीलोनमध्यें दोनदां सार्वत्रिक निवडणुका झाल्या. पहिली मार्च महिन्यांत झाली. त्या वेळीं युनायटेड नॅशनल पार्टी या पक्षाला फक्त पन्नासच जागा मिळाल्या. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यांत श्री लंका फ्रीडम पार्टीचे प्रमुख व त्या वेळचे पंतप्रधान सॉलोमन भंडारनायक यांचा एका बुद्ध भिक्षूनें गोळ्या घालून खून केला. त्यामुळें हा पक्ष फार विस्कळीत झाला. तेव्हां या पक्षाला आपण सहज चीत करूं, अशा अपेक्षेनें निवडणुकीच्या रंगणांत उतरलेल्या यु. एन्. पी. ला केवळ पन्नास जागा मिळून लंका फ्रीडम पार्टीला सेहेचाळीस जागा मिळाल्या. यु. एन्. पी. ला पार्लमेंटमध्यें निर्णायक बहुमत नव्हतें. म्हणून स्थिर सरकार बनविण्यासाठीं लंका फ्रीडम पार्टीमधील निवडून आलेल्या व्यक्तींना नाना तऱ्हेचीं प्रलोभनें देऊन आपल्या पार्टींत ओढण्याचा प्रयत्न यु. एन्. पी नें केला; पण तो अयशस्वी झाल्यामुळें पुन्हां जूनमध्यें निवडणूक घ्यावी लागली. पण या निवडणुकींत तर लंका फ्रीडम पार्टीला अधिकच भरघोस यश मिळून त्या पक्षाचें सरकार अधिकारावर आलें.

## यशाचीं कारणें

हा चमत्कार घडून येण्यास अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या. पहिलें कारण म्हणजे यू. एन्. पी. हा भांडवलदारांचा पक्ष होता. या पक्षाजवळ पैसा भरपूर, त्याला सीलोनमधील प्रमुख वृत्तपत्रांचा तसेंच सीलोनमधील ख्रिश्चन समाजाचा पूर्ण पाठिंबा होता. तरी याच कारणामुळें बहुजनसमाजाची सहानुभूति तो गमावून बसला होता. श्री. भंडारनायक यांची ' लंका फ्रीडम पार्टी ' हा पक्ष जरी सर्वस्वीं डावा पक्ष नसला तरी डाव्या पक्षाची त्याला मदत व सहकार्य होतें. त्यांत भर म्हणजे गेल्या वर्षी श्री. भंडारनायक यांचा खून झाल्यामुळें या पक्षाबद्दल जनतेमध्यें सहानुभूतीची लाट उसळली होती. या सर्वांवर कळस म्हणजे सिरिमावो या भंडारनायक यांच्या पत्नीनीं पक्षाची एकजूट कायम ठेवण्याकरितां केलेले अविरत श्रम ही गोष्ट होय. सिरिमावो यांच्या अश्रुपातामुळें त्यांच्या पक्षाला जय मिळाला, असे म्हणणारांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं सिरिमावो यांनीं स्त्रीस्वभावसुलभ भावनावश होऊन क्वचित् प्रसंगीं अश्रुपात केला असला तरी पतिनिधनानंतर निश्चयानें पक्षाचें नेतृत्व करण्यामध्यें त्यांनीं असामान्य धैर्य व संघटनाकौशल्य प्रकट केलें. पक्षाच्या आग्रहास्तव पंतप्रधानपद स्वीकारून त्यांनीं आज आपणांवर मोठीच जबाबदारी ओढवून घेतली आहे. कारण आज सीलोनमध्यें पुष्कळ समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठीं त्यांच्या सरकारनें नवीन योजना व धोरणें जाहीर केलीं आहेत. अर्थात् सिरीमावो यांचें सर्वसामान्य धोरण म्हणजे त्यांच्या पतींनीं आंखलेला राजकीय कार्यक्रम अमलांत आणणें हेंच होय.

## आजचे चर्चेचे दोन प्रश्न

सध्यां सीलोनच्या वृत्तपत्रांत नवीन सरकारच्या धोरणांतील दोन गोष्टींची सारखी उलटसुलट चर्चा होत असते. त्यांपैकीं एक म्हणजे तेथील दोन प्रमुख वृत्तपत्रसंस्था ताब्यांत घेण्याचें धोरण हें होय. याबद्दल सीलोनच्याच नव्हे तर परदेशीय वृत्तपत्रांतही बरीच टीका झाली. निवडणुकींत या वृत्तपत्रांनीं

लंका फ्रीडम पार्टीला विरोध केला होता म्हणून त्यांच्याविरुद्ध सूडभावनेनें त्यांचा ताबा घेण्यांत येत आहे असें म्हटलें जातें. नवीन पार्लमेंटसमोर झालेल्या गव्हर्नर जनरलच्या भाषणामध्यें वृत्तपत्रनियंत्रणाचा उल्लेख आहे. त्याला पार्लमेंटनें मान्यता दिली. तरीपण सीलोनच्या वृत्तपत्रसंघानें पंतप्रधान सिरीमावो यांचेकडे एखादें शिष्टमंडळ नेऊन त्यांना कांहीं तडजोडीच्या सूचना कराव्या, अशी मागणी श्री. हुलुगाल्ल या एका सुप्रसिद्ध सिंहली वृत्तपत्रव्यावसायिक गृहस्थानें केली आहे. हे गृहस्थ इटलीमध्यें सीलोनचे ॲंबॅसेडर म्हणून कांहीं काळ काम करीत होते. वृत्तपत्रसंस्थेचा दुरुपयोग होऊं नये, पण त्याचबरोबर त्या संस्थेचें स्वातंत्र्य गमावूं नये अशा हेतूनें त्यांनीं स्वतः कांहीं सूचना केल्या आहेत. त्या तपशीलांत शिरण्याचें येथें कारण नाहीं.

### शाळांचा प्रश्न

वृत्तपत्राप्रमाणेंच सरकारी मदत मिळणाऱ्या शाळा सरकारनें ताब्यांत घ्याव्या अशी दुसरी एक मोठी मतभेदाची बाब सध्यां चर्चिली जात आहे. पुष्कळ ख्रिश्चन लोकांना असें वाटतें, कीं निवडणुकींत त्यांनीं लंका फ्रीडम पार्टीला मतें दिलीं नाहींत, म्हणून त्यांच्याविरुद्ध ही उपाययोजना आहे. त्यांचें म्हणणें असें, कीं ज्या वेळीं सीलोनमध्यें शिक्षणाची सोय नव्हती, त्या वेळीं ख्रिश्चन मिशनरी लोकांनींच सीलोनी लोकांच्या शिक्षणाची थोडीबहुत सोय केली व आतां सीलोनला स्वातंत्र्य मिळाल्यावर मिशनऱ्यांचें हातून हें कार्य काढून घेणें हें सूडबुद्धीचें ठरेल. सरकारनें शाळा ताब्यांत घेतल्यास ख्रिश्चन शाळांत जें धार्मिक व सांस्कृतिक वातावरण होतें, तें नाहींसें होईल. तसेंच शाळा व विद्यादानाचें पवित्र कार्य हें ऊन-पावसाप्रमाणें बदलत्या सरकारच्या हातांतील खेळणें होईल. येथें हें नमूद करणें जरूर आहे, कीं सीलोनमध्यें ६४·४२ टक्के बौद्धधर्मीय, २० टक्के हिंदु, ९ टक्के ख्रिश्चन व बाकीचे इतर धर्मीय आहेत. आतां सीलोनमधील बौद्धधर्मीय कॉंग्रेसनें सरकारच्या या धोरणास पाठिंबा दिला आहे; इतकेंच नव्हे, तर सरकारी हुकूम अंमलांत

येण्यापूर्वीच स्वतःच्या ताब्यांतील दोन मोठ्या शाळा आपणहून सरकारचे स्वाधीन करण्याचा ठराव केला. तसेंच, बयाच्या २१ वर्षांपूर्वी धर्मांतर करविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याला कायद्यानें मोठी शिक्षा करावी असाहि एक ठराव करण्यांत आला. शाळा ताब्यांत घेण्यामागील सरकारची भूमिका अशी आहे, कीं हल्लीं वेगवेगळ्या संस्थांनीं चालविलेल्या शिक्षणसंस्थांचा दर्जा वेगवेगळा असतो. शहरांतील मुलांना चांगलें शिक्षण मिळून त्यांचा फायदा होतो. त्यांना पुढें येण्याची संधि मिळते; व लहान गांवें आणि खेडोपाड्यांतील मुलांचें नुकसान होतें. सरकारला शाळा ताब्यांत घेऊन राष्ट्रीय शिक्षणाची एक योजना अमलांत आणावयाची आहे. कांहीं चांगल्या शिक्षकांच्या लहान गांवीं बदल्या करून शिक्षणाचा दर्जा समान राखावयाचा आहे.

### राष्ट्रीय शिक्षण-तत्त्वें

राष्ट्रीय शिक्षण–योजनेमध्यें खालील तत्त्वें अनुस्यूत धरलेलीं आहेत.

( १ ) राष्ट्रीय शिक्षण–योजनेमुळें मुलांमध्यें देशभक्ति रुजेल.

( २ ) एतद्देशीय सांस्कृतिक मूल्यांचें पुनरुज्जीवन होईल.

( ३ ) सर्वांना समानसंधि मिळेल.

( ४ ) राष्ट्रांत एकता निर्माण होऊन राष्ट्राची भरभराट होईल.

सीलोनमध्यें प्राथमिकपासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व शिक्षण मोफत आहे व सरकार शिक्षणसंस्थांना आर्थिक मदत देतें. मग एकसूत्री शिक्षण योजना कां नको ? जातीय व धार्मिक शिक्षणसंस्थांची खाजगी मालकी काढून घेण्यांत सरकारला धार्मीक शिक्षण रद्द करावयाचें नसून, जातीयवादाचा संकुचितपणा फक्त नाहींसा करावयाचा आहे. तरीपण सरकारचें हें धोरण लोकशाहीविरोधी आहे अशी फार ओरड ऐकूं येते. याप्रमाणें उलटसुलट विचारप्रवाह वातावरणांत वाहात आहेत. ऑल सीलोन युनियन ऑफ टीचर्स या संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री. जे. डी. आशिर्वादम् यांनीं या बाबतींत शिक्षणमंत्री बहिउद्दिन महमूद यांचेकडे एक शिष्टमंडळ नेलें. शिष्टमंडळाची

मुख्य मागणी अशी, कीं शाळा सरकारनें ताब्यांत घेतल्यावर ज्या शिक्षकांना सेवानिवृत्त होण्याची इच्छा असेल, त्यांची आर्थिक नुकसानभरपाई करून निवृत्त होण्याचा त्यांना विकल्प असावा. शिष्टमंडळाच्या आणखी बऱ्याच मागण्यांपैकीं कांहीं पुढें दिल्या आहेत.

( १ ) शिक्षकांचे ते सरकारी नोकर झाल्यावरहि राजकीय हक्क अबाधित राहावेत.

( २ ) सध्यां काम करीत असलेल्या शिक्षकांच्या बदल्या केल्यास त्यांचा दर्जा कायम रहावा.

( ३ ) शिक्षकाच्या धार्मिक व सामाजिक जीवनांत ढवळाढवळ होऊं नये.

( ४ ) खासगी राहूं इच्छिणाऱ्या शाळांमध्यें काम करण्याची इच्छा नसल्यास त्या शिक्षकांना सरकारी नोकरीमध्यें सामावून घ्यावें.

**स्थायिक भारतीयांचें नागरिकत्व**

सीलोनमधील तिसरी महत्त्वाची समस्या म्हणजे भारतांतून पिढ्यान् पिढ्या येथें येऊन राहिलेल्या लोकांच्या नागरिकत्वाची होय. सीलोनच्या नव्वद लाख लोकवस्तीमध्यें अशा लोकांची संख्या सुमारें नऊ लाख आहे. या लोकांचें भारतीय नागरिकत्व गमावलें असून त्या सर्वांना सीलोनचें नागरिकत्वहि मिळालेलें नाहीं. म्हणून त्यांना सध्यां Stateless persons असें म्हणतात. या लोकांची स्थिति फार चमत्कारिक झाली आहे. त्यांना मताधिकार नाहीं. त्यामुळें त्यांना कायदेमंडळांतहि प्रवेश नाहीं. त्यांना तेथें जमीन मालकी हक्क नाहीं व सरकारी नोकरींत प्रवेश मिळत नाहीं. सीलोन मध्यें १९४८ सालीं इंडिया पाकिस्तान रेसिडेन्स सिटिझनशिप ॲक्ट पास झाला. त्याबरहुकूम या लोकांना सीलोनचें नागरिकत्व देण्यासंबंधीं कांहीं अटी घालण्यांत आल्या. त्यामध्यें त्या नागरिकत्वाला पात्र व्यक्तीचे वडील किंवा आजोबा सीलोनमध्यें जन्म पावलेले असले पाहिजेत, त्या व्यक्तींचे सीलोन देशाबद्दल आपुलकीचे संबंध असले पाहिजेत अशा स्वरूपाचीं कांहीं

कलमें आहेत. या कायद्यान्वयें नऊ लाखांपैकीं सुमारें एक लाख लोकांना सीलोनचें नागरिकत्व प्राप्त झालें आहे, तरीपण उरलेल्या आठ लाखांचा प्रश्न शिल्लक आहेच. या लोकांच्या नागरिकत्वाचा प्रश्न पंडित नेहरूंशीं विचार-विनिमय करून लौकरच आपण सलोख्यानें सोडवूं अशी पंतप्रधान सिरीमावो यांना आशा वाटते. या लोकांची डेमोक्रॅटिक वर्कर्स कॉंग्रेस नांवाची संघटना आहे. त्याचे अध्यक्ष तामिळ पुढारी थोंडामन हे आहेत. यांना नव्या सरकारनें वरिष्ठ कायदेमंडळांत नियुक्त करून या अल्पसंख्याकांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.

## भाषांचा वाद

सीलोनमध्यें सुमारें तेरा टक्के लोक तामीळभाषिक आहेत. सिंहली व तामीळ या दोन्ही भाषांची लिपि वेगवेगळी आहे. जेथें जेथें पाटी लिहिण्याचा प्रसंग येतो, तेथें तेथें सिंहली, तामीळ व इंग्रजी या तिन्ही भाषेंत पाट्या लिहिल्या जातात. तामिळभाषेला राज्यकारभारांत स्थान असावें अशी या अल्प-संख्याकांची मागणी आहे. त्यावरून पूर्वीच्या राजवटींत बरेच दंगेहि माजले होते. सध्यांच्या गव्हर्नरांनीं जेव्हां नवीन पार्लमेंटसमोर आपलें भाषण केलें, तेव्हां तें त्यांनीं सिंहली भाषेंत वाचलें. तामीळ भाषेंतहि वाचलें जावें अशी तामीळभाषिकांची मागणी होती. गव्हर्नरांना तामीळ येत नसल्यामुळें व गव्हर्नराशिवाय इतरांकडून तें भाषण वाचवून घेणें हें घटनेला धरून नसल्यामुळें पेंचप्रसंग निर्माण झाला होता. पण सिरीमावो यांनीं घटनानियमांच्या खोलांत न शिरतां तामिळमध्यें भाषण वाचवून घेण्याचा आग्रह धरून तामीळ भाषिकांचें समाधान केलें. या प्रसंगीं कायद्यावर बोट न ठेवतां प्रसंगीं योग्य गोष्ट करून सिरीमावोंनीं ' स्त्रियानाम् अशिक्षितपटुत्वं ' या कालिदासाच्या उक्तीची सार्थताच पटवली आहे. सीलोनमध्यें साक्षरता सुमारे ८० टक्के असून बहुतेक लोकांना कमी-अधिक प्रमाणांत इंग्रजी समजतें. सिरीमावो यांच्या वरील मिळत्या धोरणामुळें भाषिक वादाला स्थान राहणार नाहीं

अशी आशा बाळगावयास सबळ पुरावा आहे.

### उद्योगधंदे

सीलोनमध्यें मोठे उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. बहुतेक सर्व वस्तूंची परदेशाहून आयात होते. तांदूळ सिलोनमध्यें पिकतो व जमीन सुपीक असूनहि ५० टक्के तांदळाची आयात करावी लागते. तसेंच, लोकसंख्या सध्यां ९० लाख असली तरी ती वाढत्या प्रमाणांत आहे. त्यामुळें सध्यां जरी सिंहली माणसाचें सरासरी उत्पन्न हिंदी माणसाच्या तिप्पट असलें व सध्यां जरी सिंहली मनुष्य सामान्यत: सुखवस्तु असला तरी आज ना उद्यां देशाचें उत्पन्न वाढविण्याचे उपाय न योजल्यास दारिद्य व बेकारीचें संकट सीलोनवर ओढवल्यावांचून राहणार नाहीं. नवीन राजवटीचे अर्थमंत्री फेलिक्स भंडारनायक यांनीं सादर केलेल्या अर्थसंकल्पांत ४६ कोटी ९० लक्ष रुपयांची तूट दाखविली आहे. ती भरून काढण्यासाठीं तीन महिन्यांहून अधिक दिवस सीलोनमध्यें राहणाऱ्या सर्व बिगरसीलोनी लोकांवर वार्षिक ४०० रुपयांचा कर बसविला आहे. याचा परिणाम वर उल्लेख केलेल्या Stateless लोकांवर होणार असून त्यांचा प्रश्न मोठा बिकट होणार आहे.

### विकासाचे प्रयत्न

सर्वसाधारण सिंहली मनुष्य आरामप्रिय आहे. पण आतांपर्यंत जी गोष्ट चालून गेली ती यापुढें चालणार नाहीं. निसर्गानें सीलोनवर वरदहस्त ठेवला आहे. त्यामुळें नारळी, पोफळी, केळी, मसाले, इत्यादींची मुबलक पैदास, चहाचे मळे व रबराचे मळे व रत्नांच्या खाणी या नैसर्गिक सृष्टिसंपत्तीच्या आधारावर थोड्याबहुत कामानें माणसाचा उदरनिर्वाह होत असे. पण वर सांगितलेल्या कारणास्तव उद्योगधंद्याची वाढ, यंत्र व तंत्रविद्येची वाढ या गोष्टींची देशाच्या विकासासाठीं व भरभराटीसाठीं गरज भासू लागली आहे. सध्यांचे उद्योगमंत्री श्री. मैत्रिपाल सेनानायक यांनीं कोणी व्यक्ति अथवा कंपनी नवीन उद्योगधंदा सुरू करील त्याला सरकारतर्फे जरूर ती सर्व मदत

व उत्तेजन मिळेल, असें आश्वासन दिलें आहे. परकी भांडवल तसेंच देशी भांडवलसुद्धां अधिकाधिक प्रमाणांत धंद्यांत गुंतवलें जावें यासाठीं जरूर त्या सवलती देण्याची सरकारची तयारी आहे. सीलोनमध्यें पुष्कळ वस्तूंची परदेशांहून आयात होते. या वस्तु देशी कच्च्या मालापासून तयार केल्या तर होण्यासारख्या आहेत व यासाठींच देशी उद्योग-धंद्यांची गरज आहे. उद्योग-धंद्यांच्या वाढीसाठीं अनेक गोष्टींची गरज असते. कच्चा माल, भांडवल, तज्ज्ञ कारागीर, वाहतुकीचीं साधनें, संघटनाकुशल व सचोटीचा मालकवर्ग या सर्व साधनांनीं उद्योगधंदे वाढीस लागतात. यांपैकीं कच्चा माल या दृष्टीनें सीलोनला मिळालेल्या निसर्गदत्त संपत्तीचा योग्य त्या प्रमाणांत विनियोग होत नाहीं, याची सरकारला जाणीव आहे. धंदेशिक्षणाची वाढ होण्याकरतां जरूर त्या शिक्षणसंस्थांची सोय, तसेंच शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाची सोय करण्यांत येत आहे. सीलोनच्या जुन्या विद्यापीठाशिवाय गेल्या एक दोन वर्षांत विद्योदय व विद्यालंकार अशीं दोन नवीन बौद्ध विद्यापीठें स्थापन झालीं आहेत.

बँकिंग, इन्शुरन्स इत्यादि परकी लोकांच्या ताब्यांतील धंद्यांचें राष्ट्रीयीकरण तसेंच नारळ, चहा, रबर या मळ्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें श्री. भंडारनायक यांचें धोरण सध्यांचें सरकार अमलांत आणण्याच्या विचारांत आहे. सिरीमावो या त्यांचे पति हयात असेपर्यंत जरी राजकारणांत प्रत्यक्ष पडल्या नसल्या व त्यांना राजकारणाचा अनुभव नाहीं अशी जरी त्यांचेबद्दल कांहीं लोकांना भीति वाटत असली तरी त्यांचेमध्यें निश्चय व मनाचा खंबीरपणा आहे. त्यांची राजवट जरी डावीकडे झुकली असली तरी त्या धार्मिक वृत्तीच्या असून सिंहली जनतेवरहि बुद्ध धर्माचा बराच पगडा आहे. या कारणामुळें त्यांचा देश कम्युनिस्टांच्या आहारीं जाईल कीं काय अशी अस्पष्ट शंका येणाऱ्यांना तसें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं, असेंच म्हणावेंसें वाटतें.

६

# लंकासुंदरींच्या सहवासांत

रामायण कालापासून लंकानगरी ही अमरनगरी झाली. प्रत्येक हिंदवासीयाच्या स्मृतिचक्षूसमोर लंका हें नांव ऐकतांच सबंध रामायणांतील प्रसंग उभे राहतात. प्रभु रामचंद्राच्या आगमनानें पुनीत झालेली, सती सीतेच्या बंदिवासामुळें अमर झालेली ही लंकानगरी. महान् सेवक हनुमान् यानें लक्ष्मण युद्धांत जखमी झाल्यावर, त्याचेवर औषधी वनस्पति आणण्याची कामगिरी सोपवली असतां कोणती वनस्पति हें न कळल्यामुळें भारतांतील वनस्पतींचा सबंध डोंगरच उचलून लंकेंत आणला. त्याचा एक तुकडा लंकेच्या दक्षिणेस गॉल या ठिकाणीं पडला. औषधी वनस्पतींनीं समृद्ध अशी ही टेकडी अजून हनुमानाच्या स्वामिभक्तीची साक्ष देत आहे.

'अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा व मंदोदरी' या पापनिवारणासाठीं नित्य स्मरण कराव्या अशा पंचकन्या मानल्या जातात. त्यांपैकीं प्रभु रामचंद्राची सीता व रावणाची साध्वी स्त्री मंदोदरी या दोघींचेही लंकेंत वास्तव्य झालें. लंकेच्या मध्यभागीं पर्वतराजीमध्यें वसलेल्या या गिरिशिखरामध्यें सीताकुंड या नांवानें प्रसिद्ध असलेल्या गुहेमध्यें रावणानें सीतेला कांहीं काळ बंदिस्त करून ठेवलें. होते त्या भागांतच कोठेतरी अशोकवन या अज्ञात स्थळीं पुढें सीतेला ठेवलें होतें. रामायणांतील अशा अनेक चित्तथरारक प्रसंगांच्या स्मृतींशीं निगडित असलेली लंकानगरी, जिला प्रभु रामचंद्रांनीं 'स्वर्णमयी लंका' म्हटलें

ती फारादिवसापासून पाहाण्याची माझी मनीषा होती. ही मनीषा पूर्ण होण्याचा नुकताच योग आला.

पृथ्वीचा नकाशा पाहिल्यास लंका हें अगदीं चिमुकलें बेट भारताच्या दक्षिणेस लोंबत असल्याप्रमाणें दिसतें. त्यामुळें जणूं कांहीं वसुंधरेच्या कर्णफुलां-तील तो एक रत्नखचित लोलकच वाटतो. भारताकडे किंचित् लवणारा लंकेचा उत्तरेकडील भाग पाहिला, म्हणजे प्रभु रामचंद्राच्या आगमनाच्या वेळीं लंकानगरीनें त्यांचें सामोरे जाऊन आदरानें लवून स्वागत केलें कीं काय असा भास होतो. तसेंच, रामचंद्राचे पाय आपल्या नगरीस लागणार या अत्यादराच्या व अत्यानंदाच्या भावनेनें जणूं कांहीं विनयवती लंकेचें अंतःकरण उचंबळून आलें व म्हणूनच लंकेच्या मध्यभागीं पर्वतांच्या उंचउंच रांगा निर्माण झाल्या. अशा विविध प्रकारच्या भावनांनीं प्रेरित झालेली लंकानगरी ही मोठी भाग्यशाली नगरी आहे यांत शंका नाहीं. लंकानगरीवर निसर्गानें सौंदर्याची व समृद्धीची खैरात केली आहे. लंकेंत सोन्याच्या विटा म्हणतात किंवा तिला सुवर्णनगरी म्हणतात तें याच लाक्षणिक अर्थानें असावें. लंकेचें ऐश्वर्य व वैशिष्टय अजूनसुद्धां वेगवेगळ्या शब्दप्रयोगांनीं वर्णन करून सांग-ण्यांत येतें. येथील लोक स्वतःला सिंहाचे वंशज समजतात, म्हणून लंकेला सिंहलद्वीप म्हणतात. तसेंच लंकेंतील रत्नपुरा या भागांत माणिक, वैदूर्य, इंद्रनील इत्यादि रत्नांच्या खाणी आहेत. येथील जमिनींत खोल खड्डा खणला म्हणजे तेथील मातीमध्यें हीं रत्नें सांपडतात. मग तीं साफ करून मातींतून वेगळीं करून व त्यांना पैलू पाडून तीं व्यापाऱ्यांकडे जातात. येथील एका स्थायिक झालेल्या व्यापाऱ्यांनीं बावीस हजार रुपये किंमतीचा एक लहानसा इंद्रनील मणी आम्हांला दाखवला. एकदां माती काढल्यावर तो खड्डा बुजवून टाकावयाचा व मग त्या जागेवर भाताची शेती करायची. कांहीं वर्षांनीं पुन्हां त्याच जागेच्या खड्डयांतील मातींत रत्नें तयार होतात असें त्यांनीं आम्हांला सांगितलें

## मातींत रत्नें

येथील मातींत रत्नें रुजतात या वस्तुस्थितीला कविकल्पनेचा एक आधार सांपडतो. हनुमानानें जेव्हां प्रथम सीतामाईची लंकेंत भेट घेतली त्या वेळीं तिनें हनुमानास आपल्या गळ्यांतील रत्नखचित कंठा बक्षीस दिला. परंतु, हनुमान् मात्र त्यांतील एक एक रत्न फोडून पाही व आंत राम दिसला नाहीं म्हणून फेकून देई. ज्यांत राम नाहीं ती वस्तु कितीहि मौल्यवान् असली तरी हनुमानास ती मातीमोलच वाटे. निरुपयोगी वस्तु असली म्हणजे तिच्यांत राम नाहीं ही म्हण त्यामुळेंच पडली असावी.

हनुमानानें अयोध्येंत विखुरलेल्या रत्नांचा चुराच लंकेच्या मातींत रुजत असावा. रत्नपुरा या जिल्ह्यांतील बालनगोडा या विभागांत जन्म पावलेल्या श्रीमती सिरीमाओ भंडारनायक हेंहि या विभागांत निर्माण झालेलें एक स्त्रीरत्न होय असें म्हणावयास हरकत नाहीं. लंकेंतील रत्नांच्या या खाणीवरून लंकेला रत्नदीप असेंहि म्हणतात. लंकेला पाचूचें बेट असें एक नांव आहे. वास्तविक लंकेंत पाचू सांपडत नाहींत. पण समंध लंका हिरव्या गर्द झाडीनें व्यापलेली असल्यामुळें तिला पाचूचें बेट असें नामाभिधान प्राप्त झालें असावें. पाश्चात्यांनीं तर लंकेला Pearl of the orient अथवा पौर्वात्य देशांतील मौक्तिकमणि अशा शब्दांनीं गौरविलें आहे; तर कोणीं तिला स्वर्गीय बगीचा Garden of Eden असेंहि म्हटलें आहे. लंकेच्या सृष्टि-सौंदर्यानें मोहित झालेल्या प्रवाशांनीं तिला स्वतःच्या कल्पनेप्रमाणें आणखीहि वेगवेगळीं नांवें दिलेलीं आहेत.

रत्नांच्या खाणी असल्यामुळें स्त्री-स्वभावसुलभ अलंकारांचा तिजजवळ तोटा नाहीं. निसर्गानें तिला अंगभर लांबरुंद असा हिरवागार शालू नेसविला आहे. लाल पिवळ्या रंगीबेरंगी फुलांनीं या शालूवर नक्षीकाम केलेलें आहे. येथें पावसाचा ठराविक असा ऋतु नसून वर्षभर मधून मधून झिमझिम पाऊस पडतो व पटकन् थांबतो. त्यामुळें या पाण्याच्या शिडका-

व्यानें चमकणाऱ्या पानाफुलांनी एक विशेषच झळाळी प्राप्त होते.

## भरपूर निसर्गसंपत्ति

लंकासुंदरीला निसर्गानें आर्थिक विवंचना ठेवलेली नाहीं. कारण नारळ, रबर, चहा हीं तीन पिकें लंकेमध्यें प्रचंड प्रमाणांत आढळतात. किंबहुना लंकेचें वैशिष्ट्य सांगावयाचें म्हणजे केळीं, नारळी व पोफळीचीं झाडें, प्रशस्त समुद्रकिनारा व हत्ती हें सांगावें लागेल. लंकेमध्यें कोठेंहि प्रवासास निघालें म्हणजे हीं नारळाचीं झाडें जणूं कांहीं चवरीनें लंकेला मंदमंद वारा घालीत आहेत असा भास होतो. कांहीं कांहीं ठिकाणीं तर विशेषतः डोंगराच्या उतारावर हीं झाडें इतकीं वाकलेलीं आढळतात, कीं परदेशीय प्रवाशांकडे झेप टाकून तीं आपली आतिथ्यशीलता प्रकट करीत आहेत कीं काय असें वाटतें. आगगाडींतून प्रवास करतांना चहाचे मळे फारच आकर्षक दिसतात. चहाचीं झाडें हीं ' सुंदर, खाशीं, सुबक, ठेंगणीं ' अशीं असून एखाद्या गोंड्यासारखीं किंवा गुच्छासारखीं दिसतात. त्यांची उंची तीनचार फुटांहून अधिक नसते. सबंध डोंगरच्या डोंगर या हिरव्यागार मळ्यांनीं व्यापलेले आहेत. एखाद्या कॅन्व्हासच्या पटावर हिरव्या लोकरीचे गुच्छ भरून भरदार, गुबगुबीत व घनदाट गालिचा तयार करावा तसे हे मळे दिसतात. अशा मळ्यांच्या मध्यभागीं एक मोठी शुभ्र इमारत दिसते. येथें चहाच्या पानावरील इतर सर्व संस्कार होऊन तो मानवाचें श्रमपरिहारक पेय म्हणून तयार होतो. अर्थात् याला चहाचा कारखाना म्हणतात. चहाच्या मळ्यांत काम करणारे बहुतांश लोक हिंदी कामकरी आहेत. चहाच्या झाडांचीं अग्रें तोडणारांमध्यें स्त्रिया मोठ्या प्रमाणांत आहेत. एक स्त्री रोज सुमारें आठ तास काम करून तीस पौंड चहाचीं पानें तोडूं शकते व त्याबद्दल तिला रोजीं सुमारें अडीच रुपये मिळतात. चहाच्या मळ्यांत थोडथोड्या अंतरावर अकेशिया नांवाचीं उंच झाडें लावलेलीं दिसतात. सरळसोट, उंच बुंध्याची व विरळ

## मातींत रत्नें

येथील मातींत रत्नें रुजतात या वस्तुस्थितीला कविकल्पनेचा एक आधार सांपडतो. हनुमानानें जेव्हां प्रथम सीतामाईची लंकेंत भेट घेतली त्या वेळीं तिनें हनुमानास आपल्या गळ्यांतील रत्नखचित कंठा बक्षीस दिला. परंतु, हनुमान् मात्र त्यांतील एक एक रत्न फोडून पाही व आंत राम दिसला नाहीं म्हणून फेकून देई. ज्यांत राम नाहीं ती वस्तु कितीहि मौल्यवान् असली तरी हनुमानास ती मातीमोलच वाटे. निरुपयोगी वस्तु असली म्हणजे तिच्यांत राम नाहीं ही म्हण त्यामुळेंच पडली असावी.

हनुमानानें अयोध्येंत विखुरलेल्या रत्नांचा चुराच लंकेच्या मातींत रुजत असावा. रत्नपुरा या जिल्ह्यांतील बालनगोडा या विभागांत जन्म पावलेल्या श्रीमती सिरीमाओ भंडारनायक हेंहि या विभागांत निर्माण झालेलें एक स्त्रीरत्न होय असें म्हणावयास हरकत नाहीं. लंकेंतील रत्नांच्या या खाणीवरून लंकेला रत्नदीप असेंहि म्हणतात. लंकेला पाचूचें बेट असें एक नांव आहे. वास्तविक लंकेंत पाचू सांपडत नाहींत. पण सबंध लंका हिरव्या गर्द झाडीनें व्यापलेली असल्यामुळें तिला पाचूचें बेट असें नामाभिधान प्राप्त झालें असावें. पाश्चात्यांनीं तर लंकेला Pearl of the orient अथवा पौर्वात्य देशांतील मौक्तिकमणि अशा शब्दांनीं गौरविलें आहे; तर कोणीं तिला स्वर्गीय बगीचा Garden of Eden असेंहि म्हटलें आहे. लंकेच्या सृष्टि-सौंदर्यानें मोहित झालेल्या प्रवाशांनीं तिला स्वतःच्या कल्पनेप्रमाणें आणखीहि वेगवेगळीं नांवें दिलेलीं आहेत.

रत्नांच्या खाणी असल्यामुळें स्त्री-स्वभावसुलभ अलंकारांचा तिजजवळ तोटा नाहीं. निसर्गानें तिला अंगभर लांबरुंद असा हिरवागार शालू नेसविला आहे. लाल पिवळ्या रंगीबेरंगी फुलांनीं या शालूवर नक्षीकाम केलेलें आहे. येथें पावसाचा ठराविक असा ऋतु नसून वर्षभर मधून मधून झिमझिम पाऊस पडतो व पटकन् थांबतो. त्यामुळें या पाण्याच्या शिडका-

ण्यानें चमकणाऱ्या पानाफुलांनी एक विशेषच झळाळी प्राप्त होते.

## भरपूर निसर्गसंपत्ति

लंकासुंदरीला निसर्गानें आर्थिक विवंचना ठेवलेली नाहीं. कारण नारळ, रबर, चहा हीं तीन पिकें लंकेमध्यें प्रचंड प्रमाणांत आढळतात. किंबहुना लंकेचें वैशिष्ट्य सांगावयाचें म्हणजे केळीं, नारळी व पोफळीचीं झाडें, प्रशस्त समुद्रकिनारा व हत्ती हें सांगावें लागेल. लंकेमध्यें कोठेंहि प्रवासास निघालें म्हणजे हीं नारळाचीं झाडें जणूं कांहीं चवरीनें लंकेला मंदमंद वारा घालीत आहेत असा भास होतो. कांहीं कांहीं ठिकाणीं तर विशेषतः डोंगराच्या उतारावर हीं झाडें इतकीं वाकलेलीं आढळतात, कीं परदेशीय प्रवाशांकडे झेप टाकून तीं आपली आतिथ्यशीलता प्रकट करीत आहेत कीं काय असें वाटतें. आगगाडींतून प्रवास करतांना चहाचे मळे फारच आकर्षक दिसतात. चहाचीं झाडें हीं ‘ सुंदर, खाशीं, सुबक, ठेंगणीं ’ अशीं असून एखाद्या गोंड्यासारखीं किंवा गुच्छासारखीं दिसतात. त्यांची उंची तीनचार फुटांहून अधिक नसते. सबंध डोंगरच्या डोंगर या हिरव्यागार मळ्यांनीं व्यापलेले आहेत. एखाद्या कॅन्व्हासच्या पटावर हिरव्या लोकरीचे गुच्छ भरून भरदार, गुबगुबीत व घनदाट गालिचा तयार करावा तसे हे मळे दिसतात. अशा मळ्यांच्या मध्यभागीं एक मोठी शुभ्र इमारत दिसते. येथें चहाच्या पानावरील इतर सर्व संस्कार होऊन तो मानवाचें श्रमपरिहारक पेय म्हणून तयार होतो. अर्थात् याला चहाचा कारखाना म्हणतात. चहाच्या मळ्यांत काम करणारे बहुतांश लोक हिंदी कामकरी आहेत. चहाच्या झाडांचीं अग्रें तोडणारांमध्यें स्त्रिया मोठ्या प्रमाणांत आहेत. एक स्त्री रोज सुमारें आठ तास काम करून तीस पौंड चहाचीं पानें तोडूं शकते व त्याबद्दल तिला रोजीं सुमारें अडीच रुपये मिळतात. चहाच्या मळ्यांत थोडथोड्या अंतरावर अकेशिया नांवाचीं उंच झाडें लावलेलीं दिसतात. सरळसोट, उंच बुंध्याची व विरळ-

पर्णभाराची हीं झाडें चहाच्या ठेंगण्या-ठुसक्या व गुबगुबीत झाडांच्या मळ्यांत एकदम उठून दिसतात. लहान, खेळकर व रसरशीत मुलींच्या वर्गावर एखादी उंच, रोड व शिस्तप्रिय शिक्षिका देखरेख ठेवण्यासाठीं नेमावी त्याप्रमाणें हीं झाडें दिसतात. या झाडांचा उपयोग काय अशी चौकशी करतां असें सांगण्यांत आलें कीं, त्यांची पानें गळून पडलीं कीं तेंच चहाच्या झाडांना हिरवें खत म्हणून उपयोगी पडतें. दुसरें म्हणजे या उंच झाडांमुळें सोसाट्याच्या वाऱ्यापासून चहाच्या लहान झाडांना निवारा मिळतो; व तिसरें म्हणजे मळ्यांतील कामकऱ्यांना या झाडांपासून सर्पण मिळतें. अशीं हीं अकेशियाचीं झाडें दिसायला कृश व रुक्ष पण बहुगुणी आहेत. त्यांच्याहि अस्तित्वाला परमेश्वरानें कांहीं अर्थ ठेवला आहे. नाहींतर त्यांना स्वतःच्या जीवनाची विसंगति फारच बोचक झाली असती.

**गाडींतून दिसणारें रम्य दृश्य**

आगगाडींतून जातांना आणखी एक दृश्य दिसतें तें भाताच्या शेतांचें. ठिकठिकाणीं हे भाताचे वाफे पायऱ्यापायऱ्यांप्रमाणें डोंगराच्या उतारांवर तयार केलेले दिसतात. लंकेमध्यें पाण्याला तोटा नाहीं. वर्षभर पाऊस विखुरलेला असल्यामुळें सृष्टि सदैव हिरवीगार दिसते व ती नुकतेंच स्नान करून ओलेत्यानें देवपूजेची तयारी करणाऱ्या नववधूप्रमाणें आकर्षक दिसते. या संपूर्ण हरित सृष्टींत पिवळीं किंवा पिकलेलीं व रुक्ष पानें मुळींच कशीं नाहींत याचें आश्चर्य वाटतें. समवयस्क तरुणींच्या मेळाव्यांत एकाददुसरी पोक्तशी बाई असावी व एखाद दुसऱ्याच पांढऱ्या केसामुळें तिच्या वयस्कपणाचा अंदाज यावा असें क्वचित् एखाददुसरें झाड आढळतें पण अगदीं वाळलेलें झाड कधींच दिसत नाहीं. सर्वसाधारणपणें आपण एका चिरयौवनाचा आशीर्वाद मिळालेल्या सृष्टींत वावरतों आहों कीं काय असें वाटतें.

**साक्षरता**

लंकेमध्यें सर्वच लोक शिकलेले. साक्षरता सुमारें ८० टक्के. रस्त्यांवरील

सामान्य माणूसही मोडक्यातोडक्या का होईना पण इंग्रजी भाषेंत बोलेल, किंबहुना आपण इंग्रजींत बोलतों असें त्यास वाटेल. कधीं कधीं तें इंग्रजी न समजल्यामुळें आपल्याला इंग्रजी येतें हें खरें कीं खोटें असाच एखाद्या परदेशी प्रवाशाला भ्रम पडेल. पण एवढें खरें कीं इंग्रजी जाणणाऱ्या परकी माणसाला लंकेमध्यें फारशी अडचण भासणार नाहीं. याला मात्र कधीं कधीं अपवाद होऊं शकतो. एकदां बसमध्यें चढण्यापूर्वीं बस कंडक्टरला मीं विचारलें, ' ही बस अमुक ठिकाणीं जाते का ? त्यानें ' नागिंडा ' म्हणून दोननां तीनदां खेकसून सांगितलें तरी अर्थ न कळल्यामुळें मी चढलेंच नाहीं. पण " आंत या " असा त्याचा अर्थ होती म्हणे. कधीं कधीं ' इडुपोड्डा ' म्हणजे ' जरा थांबा ' म्हटलें असतांनासुद्धां माझ्यावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं हें पाहून एका माणसाचें माझ्याबद्दल काय मत झालें असेल याचा मीं विचारच केला नाहीं. मात्र केव्हांहि म्हटलें तरी फारसें चुकणार नाहीं अशा कल्पनेनें ' बोहोमा स्थुथी ' म्हणजे आभारी आहें हा शब्दप्रयोग मीं बरेच वेळां करून लंकेच्या लोकांना माझ्या सौजन्याची थोडी प्रचीति देत असे. एकदां मला एक म्हातारी, थोडी वाकलेली बाई, अंबाड्यासारखी बुचडी बांधलेली पण पुरुषाप्रमाणें ' सारोंग ' नेसलेली पाठमोरी दिसली. तिला रस्ता विचारावा म्हणून समोर गेलें तों काय आश्चर्य ! तिला दाढी व मिशा होत्या. मग कळलें कीं म्हातारे पुरुष अजून अंबाडी बांधतात. पण ही पद्धत आतां हळूहळू जात आहे. हें बरें आहे. नाहींतर कठीणच प्रसंग यायचे.

### विद्यापीठें

लंकेमध्यें तीन विद्यापीठें आहेत. एक सीलोन विद्यापीठ व दुसरीं दोन बुद्धिस्ट विद्यापीठें. त्यांचीं नांवें विद्योदय व विद्यालंकार अशीं आहेत. हीं दोन विद्यापीठें नुकतीच स्थापन झालीं आहेत. शांतिनिकेतन या टागोरांच्या विद्यापीठाचे धर्तीवर अनुराधापूर येथें एक विद्यापीठ काढण्याचें घाटत आहे. त्यांच्या इमारतीचा कोनशीला समारंभ गेल्या आठवड्यांत पार पडला.

सीलोन विद्यापीठ हें सर्वांत जुनें विद्यापीठ कोलंबो व पेरादेनिया या दोन ठिकाणीं विभागलेलें आहे. विद्यापीठाच्या साहित्य-शाखा पेरादेनिया या डोंगरांत वसलेल्या गांवांत आहेत. हें ठिकाण १६०० फूट उंचीवर असून अत्यंत रम्य आहे. विद्यापीठाच्या इमारती, वाचनालय व विद्यार्थ्यांचें वसतिगृह या सर्व इमारती नवीन बांधलेल्या आहेत. जंगल-विभागामध्यें वसलेल्या या मंगल विद्यापीठास पाहून पूर्वी अरण्यांत गुरुकुल अथवा आश्रम बांधून विद्यादान करण्यांत येत असे त्याची आठवण झाली. श्रवण, पठण, मनन व अभ्यास करण्यास आदर्श अशा तऱ्हेचें निसर्गरम्य व शांत वातावरण येथें दिसतें. विद्यापीठापासून दीड दोन मैलाच्या अंतरावर एक 'बोटॅनिकल गार्डन' आहे. लंकेमध्यें प्रसिद्ध असलेलीं दालचिनी, लवंग इत्यादि मसाल्याचीं झाडें येथें खूप दिसलीं. त्याशिवाय अनेक ग्रीष्म कुंज, फुलांचे ताटवे, कारंजीं, मोटमोठाले गगनचुम्बी वृक्ष ह्यांनीं ही बाग नटलेली आहे. पेरादेनियापासून कॅंडी ही लंकेची ऐककाळची राजधानी ५–६ मैल अंतरावर आहे. येथें लंकेंतील सुप्रसिद्ध बुद्धाचे दंत-देवालय आहे. येथें भारताचे राष्ट्रपति राजेंद्र-बाबू यांनीं दिलेलें एक पितळी जाळीदार दिव्याचें झुंबर दाखवण्यांत आलें. कॅंडीचें सरोवर व त्याचे भोंवताल्न सर्पाप्रमाणें वळणें घेत गेलेला सुंदर लाल चुटूक रस्ता हें दृश्य फार नयनमनोहर वाटतें. यानंतर लंकेंतील थंड हवेचीं डोंगरांतील रम्य स्थानें म्हणजे न्युरेलिया, बंदरवेला व एल्ल या ठिकाणीं आम्हीं एक एक दिवसांच्या धांवत्या भेटी दिल्या. एल्ल ठिकाणचें सरकारी विश्रांतिगृह REST HOUSE डोंगराच्या कड्यावर अगदीं अद्यावत पद्धतीनें बांधलेलें व सजवलेलें आहे. येथून निसर्गाची शोभा अप्रतीम दिसते. दूरवर एक गुहा दिसते. तिलाच सीताकुंड असें म्हणतात. जगाच्या धकाधकींतून, शहरी वातावरणांतील कर्णकटु आवाजाच्या दुनियेंतून त्रस्त होऊन बाहेर पडलेल्या प्रवाशाला येथील निःशब्द व भव्य वातावरण पाहून तृप्ति मिळते व तो समाधानाचा निःश्वास टाकतो.

यानंतर आम्ही अनुराधापूर या दुसऱ्या एका पुरातन राजधानीच्या ठिकाणीं आलों. हें शहर येथील पूर्वींच्या वैभवाच्या भग्न अवशेषांकरतां प्रसिद्ध आहे. हे अवशेष पाहण्याकरतांच मुख्यतः लोक इकडे येत असतात. याशिवाय पुरातन बौद्धधर्मीय देवळें, स्मारकें व पिंपळाचे वृक्ष येथें दिसतात. येथें पुरातन दागबा ( बुद्ध मंदिर ) खूप आहेत. त्यांमध्यें निद्रिस्त बुद्धाच्या प्रचंड मूर्ति व हात जोडून प्रणाम करीत असलेल्या अनुयायांचे पुतळे दिसतात. सध्यां लंकेंत सुमारें ६० टक्के लोक बौद्धधर्मीय आहेत.

लंकासुंदरी ही खरोखर एखाद्या खानदानी घराण्यांतील उंची वस्त्रालंकार-भूषित लावण्यवती तरुणीप्रमाणें मोहक वाटली. तिच्या सहवासांतील तेरा दिवस स्वप्नवत् व्यतीत झाले. आणि माझ्या या नूतन सखीबद्दल मला इतकें आकर्षण वाटूं लागलें कीं ‘ व्यतिषजति पदार्थान् आंतरः कोपि हेतुः ’ या भवभूतीच्या उक्तीची आठवण झाली.

७

# जपानांतील शिक्षणाची वाटचाल

आशियाई राष्ट्रामध्यें एक प्रगत व उद्योगशील राष्ट्र म्हणून जपानची ख्याति आपण अनेक वर्षांपासून ऐकत आहों. जपानी माल थोडा तकलुपी असला तरी फार सुंदर व स्वस्त समजला जात असे. त्यामुळें तो हिंदुस्थानांत फार मोठ्या प्रमाणावर खपत असे, पण जपानी माल आतां तकलुपीही राहिला नसून सुंदर व स्वस्त याबरोबर टिकाऊपणाचा गुण आतां त्यास प्राप्त झाला आहे. टेलिव्हिजन, ट्रॅन्झिस्टर, कॅमेरे इत्यादि वस्तु पाश्चात्य देशांच्या तोडीच्या, किंबहुना थोडया सरसच बनविणारे आशियाई राष्ट्र जपान हें एकच आहे.

दुसऱ्या महायुद्धांत जपानची फार धूळधाण उडाली. सर्व देश उद्ध्वस्त झाला. तथापि पश्चिमी राष्ट्रांत ज्याप्रमाणें जर्मनी त्याचप्रमाणें आशियाई राष्ट्रांत युद्धोत्तर जपान अधिकच जोमानें सावरला व सरसावला. राष्ट्राच्या प्रगतीचीं व उन्नतीचीं बीजें हीं त्याच्या शिक्षणपद्धतींत सामावललेलीं असतात. राष्ट्रांतील मूठभर पुढारी जरी राष्ट्राचीं राजकीय धोरणें आंखून नेत्रदीपक यशापयश मिळवीत असले, तरी त्या राष्ट्राची खरी अस्मिता त्यांतील सर्वसामान्य जनता घडवीत असते, आणि त्या जनतेचें सांस्कृतिक व आर्थिक जीवन तेथील शिक्षणपद्धति घडवीत असते. शिक्षणपद्धतीचा राष्ट्राच्या जीवनावर दूरगामी पण निश्चित बरावाईट परिणाम होत असतो. हा परिणाम दूरगामी व सूक्ष्मपणें होत असल्यामुळें शिक्षणाच्या धोरणाचें व पद्धतीचें महत्त्व सहजासहजीं लक्षांत येणें कठीण आहे. याकरितां राष्ट्राचें जीवन

घडवितांना त्यांतील शिक्षणाचा आमूलाग्र विचार करणें जरूर आहे. आपल्या भारतामध्यें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शैक्षणिक पुनर्घटनेच्या बाबतींत जे अनेक लहान-मोठे प्रयोग होत आहेत त्यांचा साकल्यानें विचार होणें जरूर आहे. आणि असा विचार करतांना ज्याप्रमाणें पाश्चात्य देशांत जर्मनी तसेंच पौर्वात्य देशांत जपान या देशांतील शिक्षणपद्धतीचा अभ्यास केल्यास आपणांस बराच उपयोग होणार आहे. प्रयोग करण्यापायीं नवीन पिढीचें जें नुकसान होत आहे त्याला थोडाबहुत आळा बसून इतर देशांतील अनुभवाचा फायदा आपणांस मिळणार आहे. अर्थात् प्रत्येक देशाची शिक्षणपद्धति त्या त्या देशाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व भौगोलिक परिस्थितीप्रमाणें घडविली पाहिजे. कोणत्याहि एका राष्ट्रांतील पद्धतीची सर्वतोपरी नक्कल करण्याची शक्यताहि नाहीं आणि जरुरीहि नाहीं. पण शैक्षणिक धोरणाचीं जीं मूलतत्त्वें आहेत तींच फक्त अभ्यासून आपणांस त्यांपासून काय घेतां येण्याजोगें आहे याचा विचार केल्यास तो आपणांस निश्चित उपकारक ठरेल.

## दुसऱ्या महायुद्धानंतर झालेला क्रांतिकारक बदल

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानी शिक्षणसंस्था व पद्धति यांमध्यें खूपच बदल घडून आला. हा फरक मुख्यतः लोकशाही धोरण व गुणानुसार समान संधि या तत्त्वांवर आधारलेला होता. सर्व मुलांमुलींना ६ वर्षांचें प्राथमिक व ३ वर्षांचें माध्यमिक असें एकंदर नऊ वर्षांचें शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यांत आलें. ६ वर्षांचें प्राथमिक शिक्षण गरीब-श्रीमंत, उच्च-नीच सर्व प्रकारच्या लोकांना समान ठेवण्यांत आलें. १९४७ सालीं शिक्षणविषयक मूलभूत कायदा पास करण्यांत आला; व त्यानंतर अभ्यासक्रमविषयक सुधारणा, क्रमिक पुस्तकें व शिक्षणपद्धति, शिक्षण–संस्थांची शासनपद्धति, यासंबंधीं अनेक विधेयकें पास करण्यांत आलीं. १९४७ च्या कायद्यामध्यें पूर्वीच्या सरंजामशाही विचारसरणीला फाटा देऊन व्यक्तिस्वातंत्र्य, स्वयंस्फूर्ति, बुद्धि व विचारस्वातंत्र्य या कल्पना पुढें आल्या व राष्ट्रीय शिक्षणाचीं मूलतत्त्वें

म्हणून समान संधि, सक्तीचें शिक्षण, मुलांमुलींचें सहशिक्षण, समाजशिक्षण व शिक्षणामध्यें पक्षीय राजकारणास मज्जाव यांचा निर्देश करण्यांत आला. सामाजिक जीवनामध्यें धर्माचें स्थान व परधर्मसहिष्णुता या गोष्टी शिक्षणामध्यें महत्त्वाच्या मानल्या असूनहि, सरकार व सार्वजनिक संस्था यांनीं चालविलेल्या शाळांमध्यें धार्मिक शिक्षण दिलें जाऊं नये किंवा धार्मिक कार्यक्रम केले जाऊं नयेत असें नमूद करण्यांत आलें आहे. तसेंच, सर्वसाधारण शिक्षणाचें ध्येय, व्यक्तीचा शारीरिक व मानसिक विकास कीं जेणेंकरून व्यक्तीमध्यें सत्य व न्याय यांची चाड, व्यक्तित्वावर निष्ठा, श्रमाची आवड, जबाबदारीची जाणीव व एका शांतताप्रिय समाजाचा व राष्ट्राचा स्वतंत्र घटक ही भावना निर्माण होईल हें ठरवलें गेलें.

अशा प्रकारें १९४७ च्या या कायद्यांत जपानमधील युद्धोत्तर शिक्षणाचें ध्येय व धोरणें सुस्पष्ट करण्यांत आलीं आहेत. आपल्याकडे सहशिक्षण, धार्मिक शिक्षण, राजकीय शिक्षण, शिक्षणाचें माध्यम हे बरेच मुद्दे वादग्रस्त व भिजत पडलेले आहेत. जपानी शैक्षणिक कायद्यांत या सर्व बाबतींत स्पष्ट धोरण ठरविलेलें आहे.

## पूर्व प्राथमिक शिक्षण

जपानमध्यें पूर्व प्राथमिक शिक्षण ऐच्छिक स्वरूपाचें आहे. ३ ते ६ वर्षें वयाच्या मुलांकरितां दोन प्रकारच्या पूर्व प्राथमिक शिक्षण संस्था उपलब्ध आहेत. एक नर्सरी व दुसरी किंडरगार्टन. जपानमध्यें ९००० नर्सरी शाळा आहेत व त्या समाजकल्याण या सरकारी खात्याच्या अधिकारांत आहेत. या संस्थांत सकाळीं सात ते सायंकाळीं सातपर्यंत मुलांचें संगोपन केलें जातें. मध्यमवर्गाची व नोकरी करणाऱ्या मातांचीं मुलें या शाळांत सांभाळलीं जातात. येथें फी अगदीं अत्यल्प असते. मुख्य खर्च सरकारचाच असतो. दुसऱ्या प्रकारच्या शाळा म्हणजे किंडरगार्टन या होत. त्या सरकारी शिक्षणखात्याच्या अधिकारांत आहेत. शाळेचा वेळ फक्त ३–४ तासांचा

३३३७०५

असतो. या शाळांत फी बरीच द्यावी लागते, त्यामुळे सामान्यतः श्रीमंत वर्गच याचा फायदा घेऊं शकतो. पण हें शिक्षण ऐच्छिक स्वरूपाचें असल्यामुळें त्याचा कोणाला भार वाटत नाहीं. नोकरी करणाऱ्या मातांच्या ३ वर्षांखालील लहान मुलांना सांभाळण्याकरितां कांहीं ठिकाणीं कारखान्यांतर्फे अथवा म्युनिसिपालिटीतर्फे क्रेशची ( संगोपनगृहें ) योजना असते. नाहींपेक्षां मुलें सांभाळण्याची कांहींतरी घरगुती सोय केली जाते.

**प्राथमिक व माध्यमिक शिक्षण**

सर्व मुलांना ६ व्या वर्षापासून ६ वर्षांचें प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें असतें. यानंतर ३ वर्षांचें माध्यमिक शिक्षण (Lower Secondary) हेंहि मोफत व सक्तीचें असतें. या काळांत मुलाच्या व्यावसायिक शिक्षणाची पार्श्वभूमि तयार केली जाते. मुलांमुलींना पाकक्रिया व शिवण शिकविलें जातें. येथपर्यंत एकंदर ९ वर्षांचें शिक्षण मोफत व सक्तीचें झाल्यानंतर कांहीं मुलें उच्च माध्यमिक ( Upper Secondary ) शिक्षणाकडे वळतात व तीन वर्षांनीं त्यांचें शालेय शिक्षण पूर्ण होतें. या कालांत मुलांना वैकल्पिक स्वरूपाचें शिक्षण घेतां येतें. त्यामध्यें सामान्यतः मुलें शेतकी, वाणिज्य, औद्योगिक व्यवसाय घेऊं शकतात; तर मुली गृहविज्ञान, शिवण, चित्रकला यांसारखे विषय घेतात. याप्रमाणें १२ वर्षांच्या शालेय शिक्षणानंतर वाटल्यास हीं मुलें विद्यापीठांत उच्च शिक्षण घेऊं शकतात, किंवा शिक्षण समाप्त झालें म्हणून उद्योगधंदा किंवा नोकरी करून जीवनांत पदार्पण करतात.

जीं मुलें ९ वर्षांच्या सक्तीच्या शिक्षणानंतर शाळा सोडतात त्यांपैकीं बहुसंख्य मुलें उमेदवार म्हणून उद्योगधंद्यामध्यें भरती होतात. मला असें सांगण्यांत आलें कीं मुलांपैकीं ७२ टक्के मुलें व मुलींपैकीं ६५ टक्के मुली हायस्कूलला जातात. बाकीची धंद्यांत उमेदवार म्हणून कामाला लागतात. या मुलांमुलींना सहा महिने ते एक वर्षपर्यंत उमेदवार म्हणून मानण्यांत येते. त्या काळांत त्यांना महिना १० हजार येन ( दहा पौंड ) वेतन मिळतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७३६५६ दि: १७।५।६१

त्यानंतर त्यांना कामगार समजलें जाते. त्यांना वर्षाचा कमीतकमी चार महिन्यांचा पगार किंवा जास्तींत जास्त दहा महिन्यांचा पगार बोनस म्हणून मिळतो. जपानमध्यें एकदां कामावर घेतलेला कामगार ती कंपनी कधींच सोडून जात नाहीं. याचीं दोन कारणें सांगितलीं जातात. एक म्हणजे कामगाराची स्वामिनिष्ठा व दुसरें म्हणजे कामगाराला दिली जाणारी चांगली वागणूक. त्यामुळें जपानमध्यें संप क्वचितच होतात. मुली कामगार २० ते २५ वयापर्यंत म्हणजे लग्न होईपर्यंत काम करून मग तें सोडतात. अलीकडे मात्र लग्नानंतरहि नोकरी करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण वाढत आहे.

## कारखान्यांतील सोय

प्रत्येक कारखान्यांत कामगार-कल्याणखातें असतें. या खात्यातर्फें काम करणाऱ्या मुलींना कारखान्याच्या जागेंत व वेळेंत गृहशिक्षणाचें पाठ ऐच्छिक विषय म्हणून देण्याची व्यवस्था केलेली असते.यामध्यें चहापानविधि, पुष्परचना, शिवण, जपानी वाद्यवादन इत्यादि विषय शिकवले जातात. यासाठीं बाहेरच्या संस्थांमधील खास शिक्षिका मुद्दाम बोलविण्यांत येतात. त्यासाठीं कारखान्याला खर्च येतो, पण मुलींना हें सर्व शिक्षण मोफत मिळतें. अशा प्रकारें कारखान्यांत काम करणारी तरुण मुलगी आपल्या भावी संसाराची अर्थोत्पादनापासून सर्व तयारीच करीत असते, असें म्हणावयास हरकत नाहीं. याशिवाय बाहेर रात्रीच्या शाळांमध्यें इंग्लिश संभाषण, टंकलेखन व इतर व्यावसायिक शिक्षण घेतां येतें. त्याचाहि मुलेंमुली फायदा घेऊं शकतात, पण येथें मात्र फी द्यावी लागते.

## कॉलेज हेंच विद्यापीठ

आतां कांहीं मुलें शालेय शिक्षणानंतर विद्यापीठाकडे वळतात. जपानमध्यें एकंदर ४०० विद्यापीठें आहेत. त्यांपैकीं ७५ सरकारी व ३२५ खासगी आहेत. हीं विद्यापीठें म्हणजे स्वतंत्र कॉलेजेंच आहेत. जपानमध्यें आपल्यासारखें विद्यापीठ व त्याला संलग्न अनेक कॉलेजें असा प्रकार नाहीं.

त्यामुळें प्रत्येक कॉलेज हेंच एक स्वतंत्र विद्यापीठ असून तें आपापल्या परीक्षा घेऊन पदवी देतें. कांहीं कॉलेजांत दोन वर्षांचा अभ्यासक्रम तर कांहींत चार वर्षांचा अभ्यासक्रम आहे. वरील ४०० पैकीं १८० इंटर-मीजिएट कॉलेजें म्हणजे दोन वर्षांचा अभ्यासक्रम शिकविणारीं आहेत. त्यांपैकीं १४४ धंदेशिक्षण देणारीं आहेत. याशिवाय एक सैनिकी विद्यालय व एक नौकानयन विद्यालय आहे.

या सर्व विद्यापीठांचा दर्जा अर्थातच समान नाहीं. टोकियो, हिटोट-सुबाशी, व कियोटो हीं सरकारी विद्यापीठें पहिल्या दर्जाचीं मानलीं जातात. तसेंच वासेडा व काइयो हीं खाजगी विद्यापीठें पहिल्या दर्जाचीं आहेत. शालान्त परीक्षा पास झालेल्यांपैकीं सुमारें ७० टक्के विद्यार्थी विद्यापीठांत जाऊं इच्छितात. पण शालान्त परीक्षेनंतर या विद्यापीठांत एकदम प्रवेश मिळतोच असें नाहीं. सुमारें २० टक्के विद्यार्थी शालान्त परीक्षेनंतर विद्या-पीठांत सरळ प्रवेश मिळवूं शकतात, तर बाकीच्या ८० टक्के विद्यार्थ्यांना १ ते २ वर्षें किंवा कधींकधीं ४ ते ५ वर्षें विद्यापीठ-प्रवेश तयारी करून देणाऱ्या शाळांमध्यें अभ्यास केल्यानंतर प्रवेश मिळतो. सरकारी विद्यापीठांना सर्वस्वीं सरकारचें आर्थिक पाठबळ असतें. खासगी विद्यापीठांचा खर्च धार्मिक संस्था किंवा खासगी देणगीदार अथवा एखादा विश्वस्त निधि यांच्या सहाय्यानें होतो. सरकारी विद्यापीठांत वार्षिक फी १२ हजार येन (१२ पौंड) असते तर खासगी विद्यापीठांत ती ५० हजार येन असते. विज्ञान व वैद्यकीय शाखांना तर खासगी विद्यापीठांत एक ते दीड लक्ष येनपर्यंत फी पडते. बहुतेक सर्व विद्यापीठांत सहशिक्षण आहे. कांहीं विद्यापीठें फक्त मुलींसाठीं आहेत. त्यांपैकींच एक पाहून महर्षि कर्वेंना स्त्रियांच्या विद्यापीठाची कल्पना सुचली असें म्हणतात. माझ्या जपानच्या वास्तव्यांत टोकियो युनिव्हर्सिटी व टोकियो वुइमेन्स ख्रिश्चन कॉलेज हीं दोन विद्यापीठें मीं पाहिलीं. सध्यां मुलांमुलींचें शिक्षण एकाच प्रकारचें असावें, मुलींना वेगळें शिक्षण देण्याची किंवा त्यांच्या

साठीं वेगळें कॉलेज असण्याची गरज नाहीं असेच जपानमध्यें विचारप्रवाह दिसून येतात. तरीपण चांगला संसार करतां यावा यासाठीं पुष्प-रचना, कलाकौशल्य, संगीत, चहाविधि, पाकक्रिया इत्यादि गोष्टी मुलींना आल्या पाहिजेत हेंहि सर्वमान्य आहे. म्हणून या इतर कला अवगत करून घेण्याकरितां स्वतंत्र शिक्षण संस्थाहि अस्तित्वांत आहेत. जपानमध्यें शिक्षकपालकसंघ या प्रभावी संस्था असून त्या शाळांचें बाबतींत सरकार ज्या गोष्टी करूं शकत नाहीं अशा अनेक बारीकसारीक बाबतींत लक्ष घालून मुलांच्या दृष्टीनें इष्ट अशा गोष्टी करीत असतात. शाळेंत साधनसामुग्री कमी असली किंवा शाळेच्या वाचनालयांत विशिष्ट पुस्तकें हवीं असलीं किंवा कांहीं दुरुस्ती करावयाची असली, शिक्षकांना आपली कार्यक्षमता वाढ-वण्यासाठीं कांहीं आर्थिक किंवा इतर मदत हवी असली तर हे संघ ती गरज भागवतात. सुमारें ९० टक्के शाळांमध्यें शिक्षक-पालक-संस्था अस्तित्वांत आहेत.

तसेंच, शाळांमध्यें दुपारचें जेवण देण्याची पद्धत विशेष उल्लेखनीय वाटते. मुलांना पौष्टिक व समतोल आहाराची संवय लावून त्यांचें आरोग्य सुधारणें, तसेंच सर्वसामान्य मुलांना एकवेळचें जेवण तरी योग्य प्रकारचें मिळेल याची तरतूद करणें, हा हें जेवण देण्याचा हेतु आहे. या जेवणाचा थोडा खर्च पालकांना द्यावा लागतो व सरकारहि या कार्यक्रमाला आर्थिक मदत करते. १९५५ सालीं स्थापन झालेले Japan School Lunch Association या कार्यक्रमाची सर्व व्यवस्था पहात असते व त्यावर सरकारी शिक्षणखात्याची देखरेख असते.

सध्यांच्या वैज्ञानिक व औद्योगिक विकासाच्या युगांत जपानमध्यें कसबी व तंत्रज्ञ कामगारांचा फार तुटवडा पडत आहे. त्यामुळें सक्तीचें शिक्षण संपून बाहेर पडलेल्या मुलांमुलींना व्यवसायक्षेत्रांत कसें आकृष्ट करावें व त्यांना कसें शिक्षण द्यावें याचाहि विचार जपानमध्यें चालू आहे. निव्वळ

पुस्तकी शिक्षणांत वेळ घालवून आवड नसलेला व जरूर नसलेला उच्च अभ्यासक्रम करीत राहण्यापेक्षां, १५–१७ या वयांत मुलें भराभर व्यवसाय-शिक्षण कसें घेतील या गोष्टीकडे शिक्षणतज्ज्ञांचें लक्ष वेधलें आहे. सक्तीचा शिक्षणकाल संपल्यानंतर पुढें काय करावे, कोणाला कोणता मार्ग रुचेल, पचेल व जमेल· हा एक अत्यंत महत्त्वाचा शैक्षणिक प्रश्न आहे. आपल्या घटनेप्रमाणें आपल्याकडे आतां ६–१४ वर्षांपर्यंत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचें व मोफत होणार आहे. तेव्हां हें शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या अल्पवयी मुलांमुलींनीं पुढें काय करावें व काय शिकावें हा एक मोठा प्रश्न आपल्यासमोर उभा आहे. त्याचें उत्तर शोधण्यासाठीं परकीय देशांनीं कसें प्रयत्न केले आहेत हें जाणून घेणें फार उपयुक्त ठरणार आहे.

✠ ✠ ✠

# ८

# जपानी शाळांमधील नैतिक शिक्षण

जपानमध्यें दुसऱ्या महायुद्धानंतर शिक्षणामध्यें अनेक नवनवीन प्रयोग करण्यांत येऊं लागले. तेथें सहा वर्षांचें प्राथमिक व तीन वर्षांचें माध्यमिक मिळून एकंदर नऊ वर्षांचें शिक्षण सार्वत्रिक, मोफत व सक्तीचें करण्यांत आलेलें आहे. या शिक्षणाचा पाठ्यक्रम १९४७ सालीं प्रसिद्ध करण्यांत आला. या पाठ्यक्रमांत १९५१ सालीं कांहीं फरक व सुधारणा करण्यांत आल्या. जपानवर नियंत्रण ठेवणाऱ्या अमेरिकन लोकांचा सल्ला व मार्गदर्शन यांची छाप या दोन्ही वेळीं त्यामध्यें स्पष्ट दिसून येत होती. १९५६ सालीं पुन्हां एक पाठ्यक्रम-सुधारणा-समिती नेमली गेली. या समितीमध्यें प्राध्यापक, अनुभवी शिक्षणतज्ज्ञ, प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षणसल्लागार अशी मंडळी होती. दोन वर्षें विचारविनिमय व परिश्रम करून या समितीनें मार्च १९५८ मध्यें आपला अंतिम अहवाल सरकारला सादर केला. या अहवालांत ज्या अनेक सुधारणा सुचविल्या गेल्या, त्यामध्यें नैतिक शिक्षणावर विशेष भर देणें ही एक सूचना होती. नैतिक शिक्षणा-संबंधीं ज्या शिफारशी करण्यांत आल्या तेवढ्याच प्रस्तुत लेखांत दिलेल्या आहेत.

### आठवड्यांतून एक तास

समितीनें शिफारस केलेला हा नवीन पाठ्यक्रम प्राथमिक शाळांमधून १९६१ सालापासून अमलांत यावयाचा होता व माध्यमिक शाळांमधून

१९६२ सालापासून अमलांत यावयाचा होता. सप्टेंबर १९५९ पासून जपानमधील सर्व शाळांमध्यें नैतिक शिक्षण नवीन पाठ्यक्रमाप्रमाणेंच हेतुपूर्वक देण्यांत येऊं लागलें. नैतिक शिक्षणाच्या योजनेनुसार प्रत्येक वर्गात आठवड्यांतून एक तास या शिक्षणासाठीं राखून ठेवण्यांत आला. अर्थात् या वेळपावेतों शाळांमध्यें नैतिक शिक्षण दिलें जात होतेंच; पण तें शालेय विषयांमधून व इतर शालेय कार्यक्रमांतून अप्रत्यक्षरीत्या दिलें जात होतें. नवीन योजनेनुसार देखील या धोरणामध्यें बदल मुळींच केलेला नाहीं. फक्त पूर्वीप्रमाणें सर्व विषयांच्याद्वारां नैतिक शिक्षण देऊनहि शिवाय एक तास त्यांसाठीं राखून ठेवला आहे. व शिकाविण्याचीं नैतिक मूल्यें स्पष्टपणें नमूद करण्यांत आलीं आहेत एवढेंच. माझ्या मतें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. कारण नैतिक शिक्षण द्यावयाचें म्हणजे काय करावयाचें याचीही शिक्षकास स्पष्ट कल्पना असणें जरूर आहे.

नैतिक शिक्षण हा कांहीं इतिहास, भूगोल, भाषा, गणित यांसारखा शिक्षणाचा किंवा अभ्यासक्रमाचा एखादा स्वतंत्र विषय नाहीं. तर ती एक आचारसंहिता आहे. जीवन व्यतीत करण्याची एक पद्धति आहे. प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण आहे. व त्या दृष्टिकोणाप्रमाणें वागण्याचें वळण आहे. त्यामुळें शालेय अभ्यासक्रमांतील प्रत्येक विषय नैतिक दृष्टिकोणांतून पाहणें व त्याप्रमाणें त्यांतुन प्रत्यक्ष जीवनामधीलें निष्कर्ष काढणें व वागणें या गोष्टींकडे शिकवितांना मुलांचें लक्ष वेधलें पाहिजे. नीतितत्त्वें समजावून देण्याचा जरी स्वतंत्र तास ठेवला तरी त्याचबरोबर प्रत्येक तास, प्रत्येक विषय व प्रत्येक शिक्षक किंबहुना शाळेमधील प्रत्येक घटना यांच्याद्वारां हें शिक्षण दिलें जावें, हें तत्त्व सर्वमान्य झालें आहे. खालीं जीं नीतितत्त्वें देण्यांत आलेलीं आहेत तीं कांहीं संपूर्ण आहेत असें नाही, तरीपण मुलांच्या जीवनांत जे प्रसंग घडतात व अनुभव येतात त्या सर्वांना सामान्यतः पुरीं पडतील एवढीं तरी तीं आहेत. याशिवाय तीं समजावून देतांना किंवा

त्यांचा विस्तार करतांना आणखीहि कांहीं प्रसंगोपात्त उदाहरणें देऊन मूलतत्त्वें अधिक विशद करतां येतील.

## विशिष्ट नीतितत्त्वें

प्राथमिक शिक्षणाचीं सहा वर्षें व माध्यमिक शिक्षणांतील पहिलीं तीन वर्षें अशा या नऊ वर्षांच्या सार्वत्रिक शिक्षणाच्या काळांत खालील नीति-शिक्षणाची योजना आखलेली आहे. जपानमध्यें शिक्षण सार्वत्रिक असल्या-मुळें प्रत्येक व्यक्तीचा त्यामध्यें अंतर्भाव होईल हें उघड आहे. आतां तींच तींच नीतितत्त्वें नऊ वर्षें प्रत्येक वर्गांत शिकवायचीं कीं काय याला उत्तर देतांना असें सांगतां येईल कीं, जसजसें मुलांचें वय व समजूत वाढते तसतसें त्यांना तींच तत्त्वें वेगवेगळ्या उदाहरणानें, त्यांच्या बुद्धीला झेपेल अशा पद्धतीनें व अशा पातळीवर सांगतां येतील. म्हणून कांहीं तत्त्वें कोणत्या वयांत व कशीं शिकवावीं याबद्दल कंसांत सूचना देण्यांत आल्या आहेत. अर्थात् शिक्षकाचें मूर्तिमंत उदाहरण हा एक मूर्तिमंत नीतिपाठ मुलांसमोर नेहमीं हवाच. तसेंच, शालेय शिक्षणाला पोषक असें घरचें व सामाजिक वातावरण हवें याबद्दल शंका नाहीं; व म्हणून प्रौढ शिक्षणाचीही एक सार्वत्रिक योजना जपाननें हातीं घेतलेली आहे.

जपानमध्यें नैतिक शिक्षणाचें ध्येय हें कीं, प्रत्येक जपानी माणसानें घर, शाळा व सामाजिक जीवन यांमध्यें दुसऱ्या माणसाशीं आदरानें वागावें, समाज व राष्ट्र यांच्या विकासामध्यें आपल्या वैयक्तिक समृद्ध जीवनानें सांस्कृतिक भर टाकावी व आंतरराष्ट्रीय मानवी व्यवहारामध्यें शांततेच्या धोरणाचा पुरस्कार करावा. हें ध्येय साधण्याकरितां नैतिक शिक्षणामध्यें खालील गोष्टी शिकविण्यांत याव्या.

( १ ) दैनंदिन जीवनामधील आचारपद्धतीचें विवरण करून ती आच-रणांत आत्मसात् करणें.

( २ ) नैतिक मूल्यांची महती समजावून देऊन योग्य व अयोग्य, चांगलें

व वाईट हें ठरविण्याची पात्रता अंगीं आणणें.

( ३ ) मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणें व स्वतःचें जीवन सफल व समृद्ध होईल, असा प्रयत्न करण्याची ईर्षा त्यांच्यामध्यें निर्माण करणें.

( ४ ) समाजामध्यें लोकशाही नांदावी व दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाची कदर करतां यावी यासाठीं दुसऱ्याबरोबर व्यवहार करतांना सचोटी, सदभिरुचि व सदाचार अंगीं बाणवावा अशी शिकवण देणें.

नीतिशिक्षणाचे हे हेतु साध्य होण्याकरितां नित्याचरणामध्यें खालील आचारतत्त्वें अमलांत आणण्याचा प्रयत्न करणें.

( १ ) मानवी जीवनाची महती लक्षांत घेऊन चांगलें आरोग्य राखणें व सुरक्षिततेची काळजी घेणें.

( २ ) स्वावलंबनाचें ध्येय डोळ्यासमोर ठेवणें.

( ३ ) आपला पोषाख, भाषा व वागणूक समयोचित ठेवणें व शिष्टाचार पाळणें.

( ४ ) स्वतः व्यवस्थित व नीटनेटके राहून वातावरण सुधारणें.

( ५ ) सर्व वस्तूंची काळजी घेणें, पैशाची किंमत ओळखून त्याचा योग्य विनिमय करणें. स्वतःची व दुसऱ्याची वस्तु हा फरक ओळखणें, सार्वजनिक मालमत्तेचा अर्थ समजावून घेणें व तिचा काळजीपूर्वक वापर करणें.

( ६ ) वेळेचा सदुपयोग करणें ( खालच्या इयत्तांमध्यें वक्तशीरपणाचें महत्त्व समजावून देणें व वरच्या इयत्तांमध्यें एखाद्या विशिष्ट योजनेनुसार वेळेच्या सदुपयोगाचें प्रयोजन सांगणें. )

## नैतिक विचार व मूल्यें यांचें पालन

( ७ ) स्वतःप्रमाणेंच दुसऱ्यांच्याहि व्यक्तित्वाचा व सुखदुःखाचा समभावनेनें विचार करणें.

( ८ ) स्वतःच्या निष्ठेप्रमाणें मतप्रदर्शन करणें व वागणें. अविचारानें दुसऱ्याच्या आहारीं न जाणें.

( ९ ) विचारपूर्वक ठरविलेल्या आपल्या मताप्रमाणें स्वतःच्या जबाबदारीवर निर्भयपणें वागणें ( वरच्या वर्गात स्वातंत्र्य व जबाबदारी यांचा अन्योन्य संबंध चांगल्या प्रकारें समजावून सांगणें. )

( १० ) वागण्यामध्यें, सचोटी, कळकळ व सुसंगति ठेवणें. ( खालच्या वर्गात खोटें न बोलणें, न फसवणें व दिलेलें वचन पाळणें हें शिकवावें व वरच्या वर्गात वागण्यांत प्रामाणिकपणा व कळकळ यांचें महत्त्व पटवावें.)

( ११ ) न्यायप्रियता अंगीं आणणें, अन्यायाची चीड बाळगणें व मोह आवरण्याचें मनोधैर्य मिळविणें.

( १२ ) इच्छित गोष्ट साध्य करण्याकरितां येतील त्या अडचणींना तोंड देण्याची तयारी ठेवणें.

( १३ ) स्वतः विचार करणें, लोकांचा सल्ला ऐकून घेणें व तदनंतर पूर्ण विचारांतीं कृति करणें. ( खालच्या इयत्तांत स्वतःची चूक मोकळेपणानें कबूल करणें व वरच्या इयत्तांत दुसऱ्याच्या सूचनांचा मोकळ्या मनानें विचार करून, स्वतःच्या विचारांशीं साधकबाधक तुलना करून योग्य तो मार्ग स्वीकारणें यावर भर द्यावा. )

( १४ ) निःस्वार्थीपणानें व संयमानें वागणें.

( १५ ) वागण्यांत नेहमीं सौजन्य व चटपटीतपणा ठेवणें.

( १६ ) जनावरें व रोपें यांची काळजीपूर्वक निगा राखणें.

( १७ ) सौंदर्य व उदात्तपणा यांची उपासना करणें.

**व्यक्तिविकास व नवनिर्मिति यांना पोषक मूल्यें**

( १८ ) स्वतःचा विशिष्ट कल व पात्रता ओळखून त्यांना कार्यान्वित करणें ( वरील वर्गात याला जास्त संधि मिळेल. )

( १९ ) उच्च आकांक्षा मनांत बाळगून त्या साधण्याची खटपट करणें. ( खालच्या वर्गात कोणतीहि गोष्ट उत्तम तऱ्हेनें करण्याची पराकाष्ठा करणें व ती साध्य झाल्याचा आनंद अनुभवणें. वरील वर्गात एखाद्या विशिष्ट

ध्येयासाठीं धडपड करणें व आयुष्यामध्यें एखादीतरी महत्त्वाकांक्षा बाळगणें.)

( २० ) बुद्धिप्रामाण्यानें वागणें. ( सदसद्विचार, योग्य निर्णय व व्यापक दृष्टिकोण ठेवून विचार करणें इत्यादि गोष्टींवर भर देणें. )

( २१ ) नवनवीन कल्पना अमलांत आणून जीवन सुधारणें. ( खालच्या वर्गांत वरील बाबतींत हस्तकौशल्यावर भर द्यावा. )

( २२ ) नेहमीं अभ्यासू-वृत्ति ठेवणें व सत्याचा शोध लावणें. (खालच्या वर्गांत अभ्यासावर भर देणें व वरच्या वर्गांत सत्यान्वेषणावर भर देणें. )

( २३ ) स्वतःला जें बरोबर वाटतें तें कृतींत आणणें व नवीन कल्पना लढविणें. ( खालच्या वर्गांत कृतीवर भर देणें व वरच्या वर्गांत नवीन कल्पना कृतीमध्यें आणण्यावर भर देणें. )

( २४ ) सर्वांबद्दल दयाळू वृत्ति ठेवणें. अधू, अशक्त व दुर्दैवी लोकांचे बाबतींत हळुवार वृत्ति बाळगणें.

( २५ ) दुसऱ्यांची जे सेवा करतात त्यांच्याबद्दल व त्यांच्या कार्याबद्दल आदर बाळगणें. ( खालच्या वर्गांत जे समाजाची सेवा करतात त्यांचेबद्दल आदर बाळगणें व वरच्या वर्गांत; त्यांच्या कार्याचें महत्त्व ओळखणें यावर भर देणें. )

( २६ ) परस्परांवर विश्वास ठेवणें व एकमेकांना मित्रत्व व सहकार्य देणें. ( खालच्या वर्गांत, दुसऱ्याबद्दल मित्रत्वाची भावना बाळगणें व वरच्या वर्गांत मित्रांना सल्ला देणें व त्यांच्या विश्वासास पात्र होणें. )

( २७ ) स्वतःच्याच कल्पना व स्वतःचेंच हित याला चिकटून न बसतां दुसऱ्याच्या बाबतींत न्यायी व निःपक्षपाती राहणें.

( २८ ) दुसऱ्याच्या परिस्थितीशीं समरस होऊन त्याच्या चुकांना सहानुभूतिपूर्ण वृत्तीनें क्षमा करणें. ( खालच्या वर्गांत, दुसऱ्याच्या चुकांना क्षमा करणें व वरच्या वर्गांत दुसऱ्याच्या मतांची कदर करणें. )

( २९ ) घालून दिलेले नियम समजावून घेणें व दिलेलें वचन आनंदानें

पाळणें. ( खालच्या वर्गांत, नियम व दिलेलीं वचनें पाळणें, वरच्या वर्गांत नियमांचा अर्थ व जरुरी समजून घेणें व स्वतः नियम घालून घेऊन ते पाळणें.)

( ३० ) आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून आपल्या रास्त हक्कांची जपणूक करणें. ( खालच्या वर्गांत, आपलें कर्तव्य नीटपणें बजावणें व वरच्या वर्गांत, कर्तव्य व हक्क यांचे परस्पर संबंध ध्यानांत धरूनच रास्त हक्कांची अपेक्षा करणें. )

( ३१ ) परिश्रमांची महती ओळखणें व दुसऱ्याच्या कामांत सक्रिय सहकार्य करणें. ( खालच्या वर्गांत, आपलें काम कष्टाळूपणें करणें व वरच्या वर्गांत परिश्रमाचें महत्त्व जाणून दुसऱ्यासाठींहि परिश्रम करण्याची तयारी ठेवणें. )

( ३२ ) सार्वजनिक मालमत्ता, सार्वजनिक नीतिनियम व दुसऱ्याचे हक्क यांची जपणूक करणें.

( ३३ ) घरांतील सर्व मंडळीबद्दल प्रेम व आदर बाळगणें व घरांत सुख व शांति नांदविण्यांत आपला वांटा उचलणें. ( खालच्या वर्गांत घरांतील वडील मंडळी, आईबाप, बहीणभाऊ, यांच्याबद्दल कृतज्ञता व आदर बाळगणें व वरच्या वर्गांत कुटुंबांतील आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावणें व कुटुंबाचा जबाबदार घटक होणें. )

( ३४ ) आपल्या सहाध्यायांशीं प्रेमानें व आदरानें वागणें व शाळेंतील चांगल्या परंपरांचें जतन करणें.

( ३५ ) जपानी राष्ट्रीयत्वाचा अभिमान बाळगून देशावर प्रेम करणें व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत आपल्या राष्ट्राचें स्थान व विकास यांसाठीं झटणें. खालच्या वर्गांत देशभक्तीची शिकवण देणें व वरच्या वर्गांत जपानी देश, संस्कृति व परंपरा यांचा अभिमान बाळगणें. सर्वांत वरच्या वर्गांत जपानी या नात्यानें स्वतःची जबाबदारी ओळखणें व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत जपानच्या विकासासाठीं खटपट करणें. )

( ३६ ) जगांतील, इतर देशांतील लोकांची माहिती करून देणें व त्यांच्याशीं मित्रत्वाचे संबंध ठेवणें. ( खालच्या वर्गांत परदेशीय व स्वकीय लोकांशी प्रेमाचे व सहकार्याचे संबंध ठेवण्यास शिकविणें व वरच्या वर्गांत आंतरराष्ट्रीय मैत्री, विश्वशांति व अंतिम मानवी कल्याण साधण्यांत व्यक्तीचा वांटा समजावून देणें. )

**अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर शालेय कार्यक्रम**

या कार्यक्रमाचा हेतु असा कीं,

( १ ) मुलांमध्यें दैनंदिन जीवनांत चांगल्या वर्तनाच्या संवयी लागाव्या व सामाजिक सहजीवनांत समरस होण्याची वृत्ति निर्माण व्हावी. ( २ ) सामुदायिक कार्यक्रमांत भाग घेऊन समूहाने कार्य पार पाडण्यांत सहभागी व्हावें. ( ३ ) कार्यक्रमांत सक्रिय भाग घ्यावयास लावून मुलांचा व्यक्तिविकास व्हावा व त्यांची मानसिक आणि शारीरिक उन्नति व्हावी.

हे कार्यक्रम विद्यार्थिपरिषद्, वर्गसंघटना व मुलांचा क्लब या शालेय संघटनांतर्फे होतात.

**विद्यार्थी-परिषद** :—यांमध्यें शाळेंतील सर्व मुलें भाग घेतात. त्यामध्यें शालेय जीवनांतील सर्व प्रश्नांचा विचार करण्यांत येतो. प्रत्येकावर शाळेचें कांहींतरी काम सोपविलें जातें. उदाहरणार्थ शाळेच्या आवारांतील साफसफाई आळीपाळीनें मुलेंच करतात. या परिषदेचें कामकाज मुख्यत: वरच्या वर्गां-तील मुलें करतात.

**वर्गसंघटना** :—यामध्यें वर्गांतील सर्व मुलें भाग घेतात. खास वर्गाचे असे सर्व प्रश्न विचारांत घेऊन प्रत्येकावर वर्गाचें कांहींतरी काम सोपविलें जातें.

**मुलांचा क्लब** :—सामान्यतः वरच्या वर्गांतील मुलें यांत भाग घेतात. समान आवडीच्या तत्त्वावर हे क्लब स्थापन करण्यांत येतात. उदा., संगीत क्लब, साहित्य क्लब, सायन्स क्लब, चित्रकला क्लब इ.

**शालेय समारंभ :**—शालेय अभ्यास, नीतिशिक्षण व वर दिलेले कार्यक्रम यांनीं मुलांच्या सर्वांगीण उन्नतीचा हेतु साध्य होतो व शालेय जीवनाची सार्थकता होते. याशिवाय इतर समारंभ, साहित्यिक चर्चा, शारीरिक शिक्षण, सहली, शालेय भोजन इत्यादि गोष्टींनी शालेय जीवन समृद्ध होतें व वर दिलेली नैतिक मूल्यें आचरणांत आणण्यास भरपूर संधि मिळते.

शाळांमध्यें नैतिक शिक्षण द्यावयास हवें याबद्दल आपल्याकडेहि कुणाचें दुमत नसेल. पण तें कसें व केव्हां द्यावें आणि ज्या मूल्यावर भर द्यावयाचा तीं मूल्यें तरी कोणतीं याबद्दल स्पष्ट कल्पना देण्यास वरील माहितीचा उपयोग होईल अशी आशा वाटते.

९

# समाजशिक्षणाचें केंद्र—कोमिंकान

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानमधील शिक्षणपद्धतींत खूप बदल झाले. शिक्षणसंस्थांमध्यें वाढ झाली, शिक्षण लोकाभिमुख झालें व शिक्षणाच्या कक्षा वाढल्या. याचें प्रत्यंतर विशेषेंकरून समाजशिक्षणाच्या वाढत्या प्रसारामध्यें दिसून येतें. जपानमध्यें शिक्षणाचे दोन भिन्न प्रांतच मानले गेले आहेत. एक शालेय शिक्षणाचा प्रांत. यामध्यें पूर्वप्राथमिक, प्राथमिकपासून तों विद्यापीठापर्यंतच्या सर्व शिक्षणाचा अंतर्भाव होतो. दुसरा शालाबाह्य शिक्षणाचा प्रांत. या शिक्षणप्रकाराचा आपल्याकडे अजून फारसा विचार व प्रसार झालेला नाहीं. परंतु हाच शिक्षणाचा प्रांत प्रचंड स्वरूपाचा, विविध प्रकारचा व सर्वव्यापी आहे. या बाबतींत जपाननें जी आघाडी मारली आहे ती अत्यंत कौतुकास्पद आहे.

**समाजशिक्षण**

शिक्षणाचे जर आपण तात्त्विक व प्रात्यक्षिक असे दोन भाग कल्पिले तर तात्त्विक शिक्षण हें मुख्यतः शाळेंत मिळत असतें व जीवनामध्यें त्याचें प्रात्यक्षिक करण्याची संधि मिळत असते. सर्वांगीण शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे, विविध प्रकारच्या माहितीचा तोंडपाठ साठा नव्हे, तर तें व्यक्तीच्या बौद्धिक, शारिरीक, नैतिक व हस्तकलाविषयक अंगभूत पण सुप्त शक्तींचा विकास हें होय. शिक्षणाची ही व्यापक व्याख्या जर आपण प्रमाण मानलीं तर शालेय शिक्षण हें व्यक्तीच्या जीवनांत फार तोकडें पडतें.

दिवसाचे चोवीस तास व सबंध जीवन हीच शिक्षणसंस्था आहे. या संस्थेंत हरघडी माणसाच्या मनावर बरे वाईट संस्कार होत असतात; मनःपटलावर आघात व प्रत्याघात होत असतात. आजच्या अनुभवावरून मनुष्य शिकत असतो व त्या अनुभवाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें त्याच्या पुढील वागणुकीवर परिणाम होत असतो. या प्रकारें शिक्षणाची क्रिया ही जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंड चालूं असते. परंतु याची आपल्याला जाणीव नसते. शिक्षणाचें स्थान म्हणजे फक्त शाळा असेंच वाटतें. परंतु मनुष्याचा खऱ्या अर्थानें सुसंस्कृत मानव बनविण्याच्या प्रक्रियेमध्यें शाळेचें स्थान आवश्यक असलें तरी तें एकमेव मात्र खास नाहीं. शालेय शिक्षणाला पूरक शिक्षण घरामध्यें मिळत असतें; तसेंच घराबाहेरील वातावरणांतहि मिळत असतें. प्रत्यक्ष वर्तनावर बाहेरील उदाहरणांचा परिणाम होतो. मुलांना शिस्त व चांगलें वळण लावण्याचें काम जसें शाळेचें तसें घराचें व समाजाचेंहि आहे. यास्तव शाळा, घर व क्रीडांगण ( बाहेरील जग ) या तिन्ही क्षेत्रांचें शैक्षणिक महत्त्व फार मोठें आहे. तरीपण सर्वसाधारणपणें या तिन्हींपैकी फक्त शाळेलाच आपण शिक्षणसंस्था मानतों व दुसऱ्या क्षेत्रामध्यें सुशिक्षणाची व सुसंस्काराची केवढी अमोल संधि आहे हें विसरतों. जपानमध्यें समाजशिक्षण ज्याला म्हणतात तें शिक्षण म्हणजे शाळेच्या बाहेर दिलें जाणारें शिक्षण, म्हणजेच जीवनाच्या विशाल क्षेत्रांत आपोआप दिलें जाणारें शिक्षण हें होय. देशाची सामाजिक, आर्थिक व नैतिक पातळी उंचावण्यामध्यें या शिक्षणाचा केवढा मोठा वांटा आहे हें ध्यानांत घेऊनच जपानमध्यें शालेय शिक्षणाप्रमाणें समाजशिक्षणहि ( शाळाबाह्य शिक्षण ) योजनाबद्ध केलेलें असून सरकारनें ती आपली जबाबदारी मानली आहे. तसेंच या समाजशिक्षणाची व्याप्ति फक्त मुलांपुरती मर्यादित नसून तरुण मुली, मुलें, स्त्रिया, प्रौढ व वयस्क माणसें या सर्वांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठीं आहे.

ज्ञान हें अनंत आहे. काळहि अनंत आहे. कालप्रवाहाबरोबर ज्ञानाच्या

क्षेत्राची वाढ व जीवनप्रवाहांत बदल होत असल्यामुळें एकदां पूर्ववयांत शाळाकॉलेजांत घेतलेलें शिक्षण अपुरें पडूं लागतें. त्यामुळें काळाबरोबर प्रौढ व्यक्तीचेंहि अद्यावत् शिक्षण चालू राहिलें पाहिजे हें उघड आहे. यामुळें जपानमधील समाजशिक्षणाच्या मर्यादा अत्यंत व्यापक आहेत. सरकारच्या शिक्षणखात्यांतच समाजशिक्षण-विभागाचा अंतर्भाव करण्यांत आलेला आहे.

## कोमिंकान

समाजशिक्षणाचे कार्यक्रम पार पाडण्यासाठीं एखादें मध्यवर्ती ठिकाण योजून तेथें लोकांनीं यावें, एकत्र जमावें, चर्चा कराव्या, विचारविनिमय करावा याची जरुरी होती. या मध्यवर्ती ठिकाणाला त्यांनीं कोमिंकान असें नांव दिलें. कोमिंकानची कल्पना १९४६ सालीं उदयास आली. दुसऱ्या महायुद्धामध्यें समाजाची घडी विस्कळित झालेली होती व युद्ध संपतांच समाजधारणेच्या व स्थैर्याच्या विविध योजना हातीं घेण्यांत आल्या. त्यामध्येंच ‘ कोमिंकान ’ची योजना होती. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कोमिंकान हें एका विभागांतील जनतेच्या शैक्षणिक व विविध सांस्कृतिक चळवळींचें केंद्र म्हणून स्थापन झालें. हीं केंद्रें म्युनिसिपालिटीनें स्थापन करावयाचीं असतात व त्याला सरकारची आर्थिक मदत मिळते. १९४९ सालीं समाजशिक्षणाचा कायदा पास करण्यांत आला. त्यामध्यें कोमिंकानचा उद्देश, कामाची रूपरेषा व चालू खर्चासाठीं मदत यांचा स्पष्ट उल्लेख करण्यांत आला. त्यामुळें लहानमोठ्या शहरामध्यें कोमिंकानची स्थापना झाली. शहर मोठें असलें तर तेथें एकच कोमिंकान असून भागणार नाहीं, कारण कांहीं लोकांना तें अतिशय दूर होऊन त्याचा फायदा घेतां येणार नाहीं. म्हणून मोठ्या शहरामध्यें वेगवेगळ्या विभागांत कोमिंकानच्या शाखा स्थापन करण्यांत आल्या. अशा एकाच शहरांत म्युनिसिपालिटीच्या कोमिंकानच्या २० शाखा आहेत. १९६० च्या सप्टेंबर महिन्यापर्यंत सबंध जपानमध्यें ७७२५ मुख्य कोमिंकान होते

आणि त्यांच्या खेडोंपाडीं एकंदर १२४६५ शाखा पसरलेल्या होत्या. याशिवाय समाजशिक्षणाच्या खासगी संस्थांचा आंकडा जवळजवळ तितकाच होता.

## कार्याची रूपरेषा

१९५९ सालीं सरकारच्या शिक्षणखात्यानें 'कोमिंकान' ची स्थापना व त्यानें पाळावयाच्या किमान अटी यासंबंधीं नियम घालून दिले. प्रत्येक कोमिंकाननें आपल्या विभागाची परिस्थिति, गरजा, लोकसंख्या वगैरे लक्षांत घेऊन आपलें कार्यक्षेत्र आंखून घ्यावें. कोमिंकान इमारतीची एकुण जागा निदान ३३० चौरस मीटर असावी. त्यामध्यें एक मोठें सभागृह असावें. या व्यतिरिक्त एक वाचनालय, एखादी प्रयोगशाळा, ऑफिससाठीं खोली, सामानासाठीं खोली अशा सोयी असाव्या. याशिवाय शारिरीक शिक्षणासाठीं मोकळी जागा व छंदव्यवसायासाठींहि जागा असावी. प्रत्येक कोमिंकानजवळ पुढील साधनसामुग्री असावी. ( १ ) डेस्क, खुर्च्या, टेबल, लिहिण्याचे फळे व शिकविण्याचीं इतर साधनें, ( २ ) कॅमेरा, प्रोजेक्टर, टेपरेकॉर्डर, ग्रॅमाफोन, स्लाइड्स्, रेडिओ, टेलिव्हिजन व इतर साधनें, ( ३ ) पियानो व इतर संगीत वाद्यें, ( ४ ) पुस्तकें, नियतकालिकें व इतर वाचनसामुग्री, ( ५ ) प्रयोगासाठीं सामान्य उपकरणें, ( ६ ) शारिरीक खेळासाठीं लागणारें विविध प्रकारचें सामान.

कोमिंकानची व्यवस्था पाहणारा एक पूर्णवेळ अधिकारी असावा व त्याचे हाताखालीं अंगीकारलेल्या कार्यक्रमाप्रमाणें जरूर लागतील तेवढीं माणसें असावीं. या लोकांना कोमिंकानच्या कार्यपद्धतीची माहिती असावी. एका कोमिंकानचें दुसऱ्या कोमिंकानशीं सहकार्य व दळणवळण असावें; तसेंच, वाचनालयें, वस्तुसंग्रहालयें, शाळा, सामाजिक संस्था यांच्याबरोबरहि सह-कार्य असावें. कोमिंकानच्या कार्यक्षेत्रांत सामान्यतः व अंशतः तसेंच कार्य करणाऱ्या इतर संस्था अस्तित्वांत असल्यास त्यांच्याशीं सहकार्य करावें

कोमिंकानचें कार्यक्षेत्र विस्तृत असल्यास बाहेरील व दूरचीं कामें करण्यासाठीं त्याची स्वतःची मोटारगाडी असावी. कोमिंकानचें एक सल्लागारमंडळ असावें. एखाद्या मुख्य कोमिंकाननें आपल्या सोयीप्रमाणें लहान शाखा काढाव्या व त्यांना कार्यक्रम देण्यास मदत करावी व सल्ला द्यावा.

## द्विविध कार्य

कोमिंकान हें सर्वसामान्य जनतेच्या उपयोगासाठीं स्थापन केलेलें आहे व सर्वांना त्याचें द्वार खुलें आहे. तेथें होणारे कार्यक्रम सामान्यतः सायंकाळचे असतात. कोमिंकानचें कार्य दोन प्रकारचें असतें. पहिल्या प्रकारचें कार्य म्हणजे कोमिंकाननें स्वतः आंखलेले व घडवून आणलेले कार्यक्रम होत. दुसऱ्या प्रकारचें कार्य म्हणजे समाजांतील लोकांना किंवा संस्थांना त्यांच्या कार्यांत सल्ला व मदत देऊन जरूर तेथें सक्रिय सहकार्य करणें हें होय. जनतेमध्यें परस्पर प्रेमाचें, सलोख्याचें व सहकार्याचें वातावरण निर्माण करून त्यांना जरूर ते सामुदायिक कार्यक्रम घडवून आणण्यास कार्यान्वित करणें हेंहि कोमिंकानचें कार्य आहे.

कोमिंकानमध्यें निरनिराळ्या विषयांवर लहानमोठ्या मुदतीचे अभ्यासवर्ग चालतात. या अभ्यासाचे विषय विविध प्रकारचे असूं शकतात. शेतकी, किराणामालाचें दुकान चालवणें, जमाखर्च ठेवणें, राजकारण, अर्थशास्त्र, साहित्य, सामाजिक प्रश्न, आरोग्य इ. तसेंच पाकक्रिया, बालसंगोपन, जीवन-सुधार इत्यादि स्त्रियांच्या सांसारिक प्रश्नासाठींहि खास वर्ग चालवण्यांत येतात. सक्तीचें शिक्षण संपवून नुकतेंच जीवनाच्या उंबरठ्यावर पुढें काय करावें अशा विचारांत असलेल्या मुलामुलींकरतांहि वर्ग चालतात. पुष्कळांना यांत व्यवसाय-मार्गदर्शन मिळतें. याशिवाय चालू घडामोडी, व्यापार, उद्योगधंदे यासंबंधींहि माहिती दिली जाते.

सर्व कोमिंकानमध्यें १६ मिलीमीटरचे लहानलहान चलच्चित्रपट दाखवले जातात व त्यांचें स्पष्टीकरण केलें जातें. वेगवेगळ्या प्रकारचीं प्रदर्शनें

भरवलीं जातात. यामध्यें हस्तकलाकौशल्य, गृहव्यवस्था, घरगुती उद्योगधंदे अशा विविध प्रकारचे विषय हाताळले जातात. कांहीं वार्षिक उत्सव व परिषदा भरवल्या जातात. वार्षिक उत्सवांमध्यें दोन विशेष उल्लेखनीय आहेत. १५ जानेवारीला किंवा तत्पूर्वीं २० वर्षें पूर्ण झालेल्या मुलामुलींचा " तारुण्यपदार्पण " हा उत्सव साजरा केला जातो. या उत्सवामध्यें जीवनामध्यें पदार्पण करतांना कोणत्या जबाबदाऱ्या अंगावर पडतील व त्या कशा संभाळाव्या यासंबंधीं मार्गदर्शन केलें जातें. १५ सप्टेंबरला किंवा तत्पूर्वीं ७० वर्षें पूर्ण झालेल्या वृद्ध स्त्री-पुरुषांचे गौरवार्थ " वृद्धांचा सन्मान " हा उत्सव साजरा केला जातो. जीवनसुधार-मोहीम या नांवाखालीं रोजच्या जीवनामध्यें बदलत्या काळानुसार काय फरक करणें जरूर आहे याचा विचार करून त्याचा प्रचार केला जातो. लग्नावर निष्कारण फार खर्च न करतां कोमिंकानमध्यें अल्प खर्चांत लग्नें लावण्याची योजना असते. सामान्य नागरिकांना जीवनांतील अडीअडचणींना कसें तोंड द्यावें याबद्दल सल्ला दिला जातो. तसेंच सूचनाफलक व पत्रकें याद्वारें विविध प्रकारची माहिती पुरवली जाते. वाचनालयाच्या द्वारें नागरिकांना चांगलें साहित्य उपलब्ध करून देण्यांत येतें. वाचनालयांत नुसतीं मागितलेलीं पुस्तकें पुरवणें एवढेंच कार्य केलें जात नाहीं तर वाचनालयाचा उपयोग कसा करावा, कोणत्या विषयावर कोणतीं पुस्तकें कशी वाचावीं अशा तऱ्हेचें मार्गदर्शन केलें जाते.

कांहीं विभागांत फिरतें कोमिंकान योजण्यांत आलें आहेत. तर कांहीं कोमिंकान सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन काम करतात. अशा प्रकारें कोमिंकान ही जपानमधील समाजशिक्षणाची एक प्रचंड संघटना असून ती देशव्यापी व बहुजनसमाजनिगडित आहे. राष्ट्राची ती एक अमोघ शक्ति आहे यांत शंका नाहीं.

✠ ✠ ✠

१०

# अतिपूर्वेची नवलाई

जपानहून परत आल्यावर सर्व मैत्रिणी मला प्रथम एकच प्रश्न विचारीत. जपानी स्त्रियांबद्दल तुमचा काय ग्रह झाला ? जपानी लोकांची उद्योगप्रियता, शिस्त, देशभक्ति इत्यादि गोष्टी आपण नेहमी ऐकतों. पण जपानी स्त्रिया कशा असतात याबद्दल हिंदी स्त्रियांना कुतूहल वाटणें स्वाभाविकच होतें. मीं देखील जपानी लोकांची शास्त्रीय प्रगति, औद्योगीकरणाची वाढ इत्यादि चौकशा करण्याचें काम सोयीस्करपणें ' यांच्यावर ' सोपवून साधारणपणें स्त्रिया, मुलें, कौटुंबिक जीवन, सामाजिक चालीरीती व शिक्षण एवढ्या गोष्टींवरच भर देण्याचें ठरवलें व त्या दृष्टीनें अवलोकन करूं लागलें. नवीन देशाची सगळीच नवलाई, तेव्हां आपल्याला काय पहायचें हें मनांत निश्चित ठरविल्याशिवाय दृष्टीवरील कोणतेही संस्कार स्थिर राहात नाहींत. पाहणें व दिसणें यांत किती फरक आहे हें मला या वेळीं लक्षांत आलें. आपल्याला सर्वच दिसत असतें. पण स्मरणांत त्या सर्वांची नोंद होत नाहीं, होणें शक्य नसतें व जरूरहि नसते. म्हणून ज्या गोष्टींत आपल्याला रस वाटतो ती मुद्दाम पाहावी लागते; स्मरणांतील इतर अनुभवाशीं त्याचा धागादोरा बांधावा लागतो; अवलोकनाला एक पार्श्वभूमि तयार करावी लागते. पूर्व-ग्रहाशीं तुलना, साधर्म्य व विषमता किती कोणत्या प्रमाणांत आहे याचा अंदाज करून नवीन अनुभवाप्रमाणें दिलखुलासपणें ग्रह बनवावे लागतात. पुष्कळ वेळां एखाद्याच व्यक्तीच्या संबंधांत आलेल्या अनुभवावरून चांगले

किंवा वाईट सर्वसामान्य मत ठोकून देण्याकडे प्रवृत्ति होते. यामध्यें योगायोगाचा फार मोठा भाग असतो. एखादेवेळीं सहजच फार असामान्य, चांगल्या किंवा वाईट, व्यक्तीशीं संबंध येतो. त्यावरून सर्व जनतेबद्दल कांहीं निष्कर्ष काढतां येणार नाहींत. म्हणून एखादद्दुसऱ्या अनुभवाला पुष्टि मिळण्यासारखे पुढील अनुभव आले तरच त्यावरून निष्कर्ष काढावयाचा, नाहींपेक्षां प्रथम अनुभवाला अपवादाच्या सदरांत टाकावयाचें असा बेत आधींच करून ठेवला होता. अशा सर्व मानसिक तयारीनें मीं जपानमध्यें माझ्या चार आठवड्याच्या वास्तव्यांत जें थोडेंबहुत निरीक्षण केलें त्यावरूनच मीं माझ्या मैत्रिणींच्या पृच्छेला उत्तरें दिलीं.

## सुदृढ व चैतन्यपूर्ण

जपानी स्त्रिया व मुलें मला एकंदरीत फार सुदृढ व रसरशीत वाटलीं. उंची फार नाहीं, पण चेहरा, मनगटें, पाय अगदीं ठाशीव व सशक्तपणाची निदर्शक. जपानी स्त्रियांचे डोळे बारीक, बरेच वेळा अर्धोन्मिलित व पापण्या किंचित् फुगलेल्या, असे दिसतात. पण मात्र अगदीं काळेभोर ! त्यामुळें प्रथमदर्शनीं नाहीं तरी कांहीं कालानें ते साधारण आवडूं लागतात. चेहरा साधारण सपाट, गालफडें उठून दिसणारीं, पण लांबट व गोरा असल्यामुळें एकंदरींत चांगला दिसतो. जपानी लोकांचें गोरेपण पाश्चिमात्यांसारखें लाल नसतें. त्यामुळें जपानी लोकांना पीतवर्णी समजलें जातें. स्त्रियांमध्यें हल्लीं दोन प्रकार उठून दिसतात. जुन्या वळणाच्या मध्यम व वयस्क स्त्रिया व आधुनिक वळणाच्या तरुण मुली व स्त्रिया.

## जुन्या वळणाची स्त्री

जुन्या वळणाची स्त्री किमोनो घालते. किमोनो हा एखाद्या गाऊन-सारखा दिसतो. मात्र मधला कमरपट्टा बराच रुंद असून त्याची एक सुंदर घडी पाठीवर येते. त्याला ओबी म्हणतात. किमोनोचें व ओबीचें कापड अतिशय सुंदर, तऱ्हतऱ्हेचें व कलाकुसरीचें असतें. आपल्या साड्यांत जसे

असंख्य प्रकार असतात, तसेच किमोनोचे पण असतात. स्त्रियांची केशभूषा आपण चित्रांत पाहतों त्याप्रमाणें नेहमींच गुंतागुंतीची असते असें नाहीं. साधीच असते. पण भांग मात्र मुद्दाम पाडलेला कोठें दिसत नाहीं. विशेष प्रसंगीं आपल्याप्रमाणें डोक्यांत फुलें (खरीं किंवा कृत्रिम) घालण्याची इकडे पद्धत दिसते. पायामध्यें मोजे असतात. पण ते आंगठ्यापाशीं दुभंगलेले असल्यामुळें त्यांना मोज्यावरूनही रबरी चपला किंवा लाकडी खडावा घालतां येतात. मात्र किमोनोचा खालचा घेर साधारण लहानच असल्यामुळें त्यांना दूरदूर पावलें टाकतां येत नाहींत; किंवा पळतां येणें शक्य नाहीं. तसेंच पावलें आंतल्या बाजूला वळवून टाकण्याची पद्धत आहे. त्यामुळें जपानी स्त्रीचें चालणें तुरतुरत गेल्यासारखें दिसतें.

## पाठीशीं बांधलेलीं मुलें

जपानी स्त्री आपल्या बाळाला पाठीशीं बांधून बाहेर जाते. आपण मुलें कडेवर घेतों, त्याचेऐवजीं त्या पाठीवर बांधतात. जवळजवळ दोन वर्षांपर्यंत मूल असें पाठीवरून नेतात. मला कांगारूच्या किंवा माकडाच्या पिलांची आठवण झाली. तीं पिलें पोटाशीं धरलेलीं असतात तर यांची पाठीशीं. वाल्मीकि ऋषींच्या आश्रमांत सीतामाई आपल्या लवबाळाला पाळण्यांत ठेवून व वाल्मिकींवर सोपवून नदीवर गेली. तेव्हां तेथें एका माकडीणीनें सीतामाईची निर्भर्त्सना केली, कीं आम्ही पाहा कशीं मुलें पोटाशीं बाळगतों. पण तुम्ही माणसें मुलांना एकटे टाकतां. तुम्हांला प्रेमच नाहीं. तेव्हां सीतामाई घाईघाईनें परत येऊन लवाला घेऊन गेली. इकडे वाल्मीकि जरा बाहेरून येऊन पाहतात तों पाळण्यांत बाळ नाहीं. तेव्हां त्यांनीं कुशदर्भांचा बाळ करून पाळण्यांत ठेवला. मला वाटतें रामायणकाळीं जपानी पद्धत अस्तित्वांत असती तर वरील घटना घडली नसती !

## पाहुणचाराची पद्धत

जपानी लोक एकमेकांना भेटले म्हणजे कमरेपासून दोनतीनदां वांकवांकून

एकमेकांना अभिवादन करतात. कोणी घरीं भेटायला आल्यास अभिवादन झाल्यावर बसायला सांगून घरांतून ओचा नांवाचा जपानी पद्धतीचा हिरवा गरमगरम चहा प्यायला देतात. हा चहा म्हणजे एक प्रकारची हिरवी पूड कपांत टाकून त्यावर आधणाचें पाणी ओतून करतात. किंचित् कडवट गरम पाणी प्याल्यासारखें वाटतें. जपानी स्त्री खाली बसली म्हणजे गुडघे टेकून बसते. ख्रिश्चन लोक ज्याप्रमाणें प्रार्थनेला बसतात किंवा मुसलमान लोक नमाज पढण्यासाठीं बसतात त्याप्रमाणें ती बसते. किंवा मला वाटतें योगासनाचा एक प्रकार असाच असतो. जुन्या जपानी घरांत खुर्च्या टेबलांचें बंड नाहीं. त्यामुळें मांडी घालून बसलें नाहीं तरी गुडघ्यावर बसणें किंवा इतर उठबस व कमरेंत वांकणें बरेंच होत असल्यामुळें जपानी स्त्री चपळ असते. जपानी स्त्रीचें आयुर्मान सरासरी ७० व पुरुषाचें आयुर्मान सरासरी ६५ असतें. यावरून जपानी जनतेच्या काटकपणाची कल्पना येते.

## अमेरिकन प्रभाव

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानी जीवनावर पाश्चिमात्यांचा विशेषतः अमेरिकन लोकांचा फार मोठा प्रभाव पडला. त्यांचीं जीवनमूल्यें व विचारसरणी ढवळून निघाली. सामाजिक जीवनांत एक प्रकारची क्रांति घडून आली. याचा दृश्य परिणाम विशेषतः स्त्रियांवर घडून आला. तरुण मुली बॉबकट करूं लागल्या, फ्रॉक व स्कर्ट घालूं लागल्या. अर्थात या मुली सणासुदीला जुन्या पद्धतीचा किमोनो घालतात. आपल्याकडे पांचवारी साडी नेसणाऱ्या मुली जशा कधीं काळी काष्टा घालून नऊवारी साडी नेसतात तसाच हा प्रकार! आधुनिक मुली पायामध्यें मोजे व उच टाचेचे बूट घालूं लागल्या. पर्समध्यें लहानसा आरसा व सौंदर्यप्रसाधनें बाळगून प्रवासांत, गाडींत जातां येतां आरसा काढून ओठ रंगवूं लागल्या. सार्वजनिक जीवनांत हरतऱ्हेचीं कामें करूं लागल्या.

## टोकियोंतील उपहारगृह

शास्त्रीय संशोधनामुळें व दळणवळण वाढल्यामुळें दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन लोकांशीं तसेंच इतर पाश्चात्य देशांशीं अधिकाधिक संबंध आल्यामुळें अमेरिकन जीवनाची या लोकांवर दाट छाप पडली आहे. टोकियोमध्यें तर दुकानांत जा, हॉटेलांत जा, वाहनांत जा, अगदीं सर्व ठिकाणीं अमेरिकेंत फिरल्यासारखें वाटतें. टोकियो शहराची लोकसंख्या १ कोटीचे वर आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें हें जगांतील सर्वांत मोठें शहर आहे. शहरांतून बस, ट्रॅम, मोटार, टॅक्सी, भुयारी आगगाडी, लोकल आगगाडी अशीं तऱ्हतऱ्हेचीं वाहनें वेगानें धांवत असतात. रहदारीनियंत्रणासाठीं मोठमोठ्या चौकांत ऑटोमॅटिक लालहिरव्यापिवळ्या दिव्यांची योजना आहे. रहदारीनियंत्रणासाठीं पोलिस फारसा कोठें दिसत नाहीं. तहानेल्या व भुकेलेल्या पथिकाचा श्रमपरिहार करण्यासाठीं ठिकठिकाणीं उपाहारगृहें चालू आहेत. त्यामध्येंही पाश्चात्त्य पद्धतीचा अवलंब दिसतो. एकरंगी झगे, त्याला पांढरी शुभ्र कॉलर, पांढरे एप्रन व बो बांधलेला पांढरा कमरपट्टा असे परिधान केलेल्या, बॉबकट केलेल्या, मोजेबूट घातलेल्या सुहास्यवदना वाढणाऱ्या तरुणी तुमच्या स्वागतास तेथें तयार असतात. त्या तुम्हांला रिकामी जागा दाखवून स्थानापन्न करतात व लगेच ' मेनू ' कार्ड समोर दाखवतात. हें मेनू कार्ड म्हणजे परीक्षेला बसतांना समोर आलेली प्रश्नपत्रिकाच असते. पुष्कळ ठिकाणीं जपानीबरोबर इंग्रजी भाषेंतहि पदार्थ लिहिलेला असतो. त्या दोन अडीचशें पदार्थांच्या यादींतून आपल्याला हवें असणारे व जमणारे पदार्थ निवडून काढणें व ते आपल्या अपेक्षेप्रमाणें मिघणें याला भाग्यवानच असावें लागतें. बरेच ठिकाणीं या सर्व पदार्थांच्या बशा बाहेर कांचेच्या कपाटांत ठेवलेल्या असतात. तेथें त्या पदार्थांचीं नांवें व किंमती लिहिलेल्या असतात. हे पदार्थ पॅरॅफिनचे करून ठेवलेले असतात. पण ते इतके हुबेहुब असतात, कीं ते पहातांच तोंडाला पाणी सुटावें व त्यांतून

वाफा निघत आहेत असा भास व्हावा. या व्यवस्थेमुळें पदार्थ शिळा किंवा खराब होऊन फुकट जात नाहीं. पण गिन्हाइकाला मात्र पदार्थांची बरोबर कल्पना येते.

## आकर्षक मांडणी

पदार्थांची। आकर्षक मांडणी व सजावट यांत जपानी लोक कोणालाच हार जाणार नाहींत. मेनूकार्डच्या 'परीक्षेला' ज्याला बसावयाचें नाहीं त्यानें बाहेर कांचेच्या कपाटांत हे पदार्थ व त्यांच्या किंमती पाहून काय घ्यायचें तें ठरवावें व मग आंत यावें. अशा प्रकारें खायला व प्यायला काय मागावयाचें याची वर्दी दिल्यावर ती हास्यवदना चपल परिचारिका कागद वा कापडाचें सर्व्हिएट व काटेचमचे किंवा चॉपस्टिकस्, तसेंच गरम पाण्यांत बुचकळून आणलेले लहान टॉवेलांचे पिळे तुमच्यासमोर आणून ठेवते. हे वाफेचे पिळे उलगडून तुम्ही आपलें तोंड, नाक, कान, डोळे, मान पुसली म्हणजे तुमचा अर्धा श्रमपरिहार होतो; ( ही पद्धत पाश्चात्य देशांत नाहीं ) व मग आलेल्या खाद्य पदार्थांवर तुम्हांला ताव मारतां येतो. खाल्लेल्या पदार्थांचें बिल लगेंच करून तुमच्या टेबलावर पालथें ठेवण्यांत येतें. म्हणजे खातांना तरी तुम्हांला बिलाचा आकडा पाहून धक्का बसत नाहीं, किंवा तुमच्याबरोबर आलेल्या पाहुण्याला तो आकडा कळत नाहीं. बिलावर वस्तूंच्या किंमती फक्त लिहिलेल्या असतात. त्यांची बेरीज केलेली नसते. याचें कारण बिल देतांना डेस्कवरची बाई यंत्रानें बेरीज करून आंकडा तुम्हांला सांगते. यंत्र स्वतःच ' आजारी ' असल्याशिवाय बेरीज करण्यांत कधी चूक करीत नाहीं हें सांगावयास नकोच ! जपानी उपाहारगृहें अत्यंत स्वच्छ। व नीटनेटकीं असतात. टेबलावर एखाद दुसरी फुलदाणी असते. भिंतीवर एखादी सुंदर जपानी कलाकृति तर एका बाजूला टेलिव्हिजनवरती कार्यक्रम चालू असतात.

## मुलींची लग्नें

जपानमध्यें दुकानें, डिपार्टमेंट स्टोअर, ऑफिसें या सर्व ठिकाणीं अगदीं

युरोप अमेरिकेप्रमाणें मुलींचें प्रमाण भरपूर दिसतें. यामध्येंच मुलामुलींच्या गांठी पडतात व त्यापासून लग्नेंही जमतात. जपानमध्यें आतां एकत्र कुटुंबपद्धति राहिलेली नाहीं. हुंड्याची प्रथा प्रथमपासूनच नाहीं. लग्नें मुली स्वतः जमवतात, किंवा आईबापही जमवतात. लग्नाचें बाबतींत जातपात, धर्म, हुद्दा याची फारशी अडचण भासत नाहीं. संबंध जपानमध्यें एकच भाषा आहे व तीच शाळांमध्यें शिकविली जाते. थोड्याबहुत बोलभाषा आहेत, पण लेखी भाषा एकच व सार्वत्रिक असल्यामुळें भाषाभिन्नत्वाची समस्या येथें नाहीं. तसेंच येथील समाजांत जातीचें अस्तित्व नाहीं. धर्म तीन आहेत. बौद्ध, शिंटो व ख्रिश्चन. या पैकीं ८० टक्के लोक बौद्धधर्मीय आहेत. १८-१९ टक्के लोकांचा शिंटो धर्म म्हणजे पितरोपासना हा आहे. सुमारें २ टक्के लोक ख्रिश्चन आहेत. परंतु धर्मभिन्नत्वाची विवाहकार्यांत अडचण येत नाहीं. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे धंद्यामुळें उच्चनीचपणाच्या कल्पना येथें नाहींत. एखाद्या प्रोफेसराचा किंवा वकीलाचा दर्जा एखाद्या हॉटेल मॅनेजराहून अधिक आहे असें नाहीं. अर्थात् व्यक्तीच्या शिक्षणावरून तिचा दर्जा आपोआपच ठरला जातो. पण धंदा कमी अधिक दर्जाचा मानला जात नाहीं. नोकरीचे बाबतींत वरच्या व खालच्या श्रेणीच्या वेतनांत फारसा फरक नसतो. अशा प्रकारें समाजवादावर जीवन आधारलेलें असल्यामुळें लग्नें जमण्यांत अडचणी पडत नाहींत. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न येथेंही उद्‌भवलेला असल्यामुळें कुटुंबनियोजन केलें जातें व सामान्यतः दोन ते तीनहून अधिक मुलें नसावीं असेंच आतां लोकांना वाटतें.

## कौटुंबिक जीवन

जपानमधील अनेक घरांमध्यें पूर्वीची जुनी जपानी जीवनपद्धती चालू आहे. तथापि आपल्याकडे निदान शहरामध्यें जसें स्वयंपाकाचा उंच ओटा, टेबलखुर्च्यांवर जेवण, पलंगावर अंथरूण, पाश्चात्य पद्धतीचा संडास या गोष्टी आतां डोकावूं लागल्या आहेत, तसेंच इकडे जुन्यानव्याचें मिश्रण दिसूं

लागलें आहे. किंवा एकाच घरांत कांहीं खोल्या जपानी पद्धतीच्या तर कांहीं पश्चिमात्य पद्धतीच्या सजवलेल्या असतात. आमच्या टोकियोच्या वास्तव्यांत आम्हाला एका जपानी कुटुंबानें एका आदितवारीं सकाळीं १० पासून सबंध दिवस घालवावयास त्यांचे घरीं बोलावलें. त्या कुटुंबाचें नांव सुझुकी. कुटुंबांत नवरा, बायको व त्यांची पांच मुलें (तीन मुली व दोन मुलगे) अशी मंडळी होती. सुझुकी हे एक शिंप्याचें दुकान चालवीत होते. पूर्वीं ते इंजिनियर होते पण कांहीं कारणानें त्यांनीं तो धंदा सोडून तयार कपड्याचा धंदा सुरू केला. त्यांच्या दुकानांत कामाला ५-६ माणसें होतीं. त्यांपैकीं दोन बाहेरगांवच्या मुली होत्या. त्या त्यांचेच घरीं रहात होत्या. एका लहान बोळांत त्यांचें स्वतःचें लहानसें घर होतें. घराच्या अंगणांतच जपानी पद्धतीप्रमाणें रस्त्याचे पायांतील बूट किंवा चपला काढून ठेवायच्या व समोर ठेवलेल्या, घरीं घालण्याच्या सपाता घालावयाची सोय होती. यावेळीं मात्र पुरुषांच्या लेसच्या बुटापेक्षां आम्हां बायकांच्या चपला फार सोयीच्या वाटल्या. सपाता घालून आंत गेल्यावर त्यांनीं आम्हाला आसनावर बसावयास सांगितलें व आंतून लगेच ओचा ( जपानी हिरवा चहा ) प्यायला आला. त्याबरोबर थोडीं जेली व फळाच्या फोडी एका बशींतून आल्या. खाणेंपिणें, थोड्या गप्पा ( दुभाषामार्फत ) झाल्यावर जेवण आलें.

**कलाकृतियुक्त मांडणी**

हें जेवण बुटक्या टेबलावर बशांमधून वाढलें होतें. घरच्या मंडळींनीं चॉप स्टिकनीं जेवण केलें. आम्हाला कांटे चमचे दिले होते. चॉपस्टिकनीं पदार्थ उचलून तोंडांत टाकण्याची कसरत करण्याचा प्रयत्न मीं केला. पण घास त्या काड्यांत पकडला न जातां उडवल्यासारखा भलतीकडे पडण्याचा रंग दिसतांच 'डिस्क्रिशन इज़् दी बेटर पार्ट ऑफ व्हॅलर' असा विचार करून मीं निमूटपणें कांटेचमच्यांचा अवलंब केला. ( त्याची तरी वरचेवर युरोपला गेल्यामुळें चांगली संवय झाली होती एवढें बरें. ) जेवण जपानी पद्धतीचें



श्रीमती सुझुकीसमवेत लेखिका



टोकिओ युनिव्हर्सिटी

होतें. प्रत्येकाला एक भाताची मूद वाढली होती. दुसऱ्या मोठ्या बशींत अनेक पदार्थ, तळलेली माशांची भजी, हॅमच्या गोल चकत्या, उकडलेल्या अंड्याचे तुकडे, कांदा, काकडी, टमॅटोच्या चकत्या, गाजराचे तुकडे, कोबीची कोवळीं पानें, शोभेसाठीं कोथिंबिरीप्रमाणें एक हिरव्या पानांची छोटीशी डहाळी इ. अत्यंत कलापूर्ण पद्धतीनें मांडले होते. त्यामध्यें पांढरा, लाल, हिरवा, केशरी असे पदार्थांचे अनेक रंग व त्यांची एका कलाकृतीप्रमाणें मांडणी केली होती. यामुळें ती भरलेली बशी इतकी सुंदर दिसत होती, कीं त्यांतले पदार्थ खाऊन ती मांडणी विस्कटणें देखील जीवावर येत होते. मी शाकाहारी असल्यामुळें अर्थात् सर्व पदार्थ एकत्र पाहून थोडें मन खट्टू झालें. तरीपण काड्यांच्या सहाय्यानें शक्य तितक्या दुरून फक्त शाकाहारी पदार्थ मांसाहारी पदार्थांचा स्पर्श शक्य तो टाळून अलगद उचलून खाल्लें. चिनी लोकांप्रमाणें जपानी लोकही उष्ट्याचें फारसे विधिनिषेध मानत नाहींत असें दिसतें. मीं न खाल्लेलें मांसाहारी पदार्थ आमच्या यजमानीणबाईंनीं व त्यांच्या मुलांनीं काड्यांच्या पकडींत धरून पटकन् मटकावले. जेवण झाल्यावर गरम गरम कोचा ( आपल्याकडील पद्धतीचा चहाचा रंग, ओचा नव्हे ) प्यावयास आला. जपानी लोक बहुशः लिंबूसाखर घालून हा चहा पितात. मीं मात्र लिंबाऐवजी दूध मागून घेतलें. जपानमध्यें ओचा हा कुठेंहि मिळतो. पण कोचा देणें म्हणजे जरा विशेष अगत्याचें समजलें जातें त्यामुळें घरीं जो चहा आम्ही कःपदार्थ मानतो तो जपानमध्यें मिळाल्यावर जुन्या मित्राची भेट झाल्यासारखा आनंद झाला.

## चहापान-विधीचें शिक्षण

आम्हांला फार वर्षांपासून जपानमधील चहापान-समारंभाबद्दल फार कुतूहल होतें. आम्हीं इच्छा व्यक्त केल्यावरून सुझुकी कुटुंबानें आम्हांला एका चहापान समारंभास त्यांच्या एका ओळखीच्या घरीं नेलें. स्त्रियांच्या शिक्षणामध्यें चहापानविधि व पुष्परचना या दोन गोष्टींना अत्यंत महत्त्व असतें.

त्यापैकीं चहापानविधीच्या शिक्षणाला आतां आधुनिक जपानी मुली फारसें महत्त्व देत नाहींत. तथापि अजूनहि सुमारें ३३ टक्के मुली हें शिक्षण घेतात. या विधीचें शिक्षण मुलींना आठवड्यांतून एकदां याप्रमाणें वर्षानुवर्षे घ्यावें लागतें. महिन्याची फी सुमारें २००० येन ( २ पौंड ) असते. कमींत कमी पांच वर्षें शिक्षण घेतल्यावर हा विधी शिकल्याचें प्रमाणपत्र मिळूं शकतें. पण प्रमाणपत्र घेतल्यानंतरहि हें शिक्षण चालूच असतें! वास्तविक या विधींत विशेष तें काय आहे? एखाद्या चलाख मुलीला महिन्या दोन महिन्यांत रोज अभ्यास ( Practice ) केल्यास तो यायला कांहीं हरकत नाहीं, असें अनेक प्रकारें मीं सुचवून पाहिलें. वास्तविक हा समारंभ धार्मिक म्हणावें तर तसाहि नाहीं. मग त्याचें एवढें अवडंबर कां? असें सूचक शब्दांत म्हणून पाहिलें. पण उत्तर आपलें एकच कीं हा चहा करतां यायला निदान तीन वर्षें तरी लागतात व तें तंत्र आत्मसात करायला अनेक वर्षें लागतात !

## जपानी चहा कसा करतात

एवंगुणविशिष्ट चहापान-समारंभास सुझुकी कुटुंबानें आम्हांला त्यांच्या एका ओळखीच्या कुटुंबांत नेलें. बैठक जपानी पद्धतीची म्हणजे खोलीभर चटई व बसण्यासाठीं पातळ चौकोनी गाद्या अशी होती. आम्हीं सर्वजण आपापल्या जागेवर स्थानापन्न झालों. व लक्षपूर्वक प्रत्येक कृति पाहूं लागलों. कारण शिकावयास अनेक वर्षें लागणारा हा विधी नुसत्या तासाभरांत पाहून लक्षांत राहणें व समजणें हें कठीणच काम होतें.

आतां चहा करण्याचा विधी सुरू झाला. चहा करणाऱ्या मुलीनें शेगडींत कोळसा टाकला. त्यानंतर तिनें विस्तवावर धूप टाकला. मग पाण्याची किटली शेगडीवर ठेवून कोळशाचें भांडें बाहेर नेऊन ठेवलें. दुसऱ्या एका मुलीनें जपानी मिठाई आणली व प्रत्येक पाहुण्यासमोर एकेका कागदाच्या तुकड्यावर ती वाढली, ( आम्हांला असें सांगण्यांत आलें कीं हा कागदाचा

तुकडा प्रत्येक पाहुण्यानें स्वतः बरोबर आणावयाचा असतो म्हणजे पूर्वी लग्नाच्या जेवणाला जातांना पाणी पिण्याचें भांडें बरोबर नेण्याची आपल्याकडे पद्धत असे, त्याची मला आठवण झाली. ) आतां त्या चहा करणाऱ्या मुलीनें दोरीनें तोंड बांधलेली एक पिशवी अगदीं हळुवारपणें दोऱ्या ओढून उघडली. त्या पिशवींत एक लहानसा डबा होता. त्यांत चहाची हिरवी पूड होती. तो डबा तिनें उघडला व मग एक लहानसा बांबूचा चमचा होता तो टोकापासून एक चतुर्थांश अंतरावर धरून चमचाभर पूड कपांत टाकली. मग कपांत किटलींतलें आधण पाणी ओतलें. एका बांबूंच्या ब्रशानें खूप हालवून चहाची पूड व पाणी यांचें चांगलें मिश्रण तयार केलें. असें एकेकावेळीं दोनच कप तयार करावयाचे असतात.

## चहा कसा द्यावा ? कसा प्यावा ?

पाहुण्यांपैकीं वयानें अथवा मानानें जो श्रेष्ठ त्यानें पहिल्या पानावर बसायचें असतें. आतां ही मुलगी सर्वांत जो चांगला कप त्यांत प्रथम चहा तयार करून तो त्या श्रेष्ठ पाहुण्यास देते. कपावरील नक्षीकाम पाहुण्यास दिसेल अशा रीतीनें कप त्याच्या हातीं द्यावयाला जातांना तिनें साडेसात पावलांत त्याचेपर्यंत पोंचलें पाहिजे. तसेंच, पावलें टाकतांना दोन चटयांच्या मधल्या शिवणीवर पाऊल-पडतां कामा नये. तिच्या पायाची टाच पाहुण्याच्या दृष्टीस पडतां कामा नये. असेच अनेक नियम व तंत्रें तिला संभाळावीं लागतात. पाहुण्यांनाहि कांहीं गोष्टींची माहिती असावी लागते. पाहुण्यानें चटईच्या शिवणी पासून ३० सेंटिमीटर दूर बसावें. कप उजव्या हातांत घेऊन डाव्या हाताच्या तळव्यावर ठेवावा व तो दोन वेळा गोल फिरवावा. मग जवळची थोडी मिठाई खावी व कपाची कड पुसून कपांतील चहा प्यावा. चहा तीन घुटक्यांत पिऊन संपवावा. तिसऱ्या घुटक्याला भुरका मारल्यासारखा आवाज करून चहा संपूर्ण प्याल्याचें ध्वनित करावें. हा चहा किंचित् कडू असतो म्हणून तो पिऊन झाल्यावर

पानावर वाढलेली उरलेली मिठाई खाऊन तोंड गोड करावें. हें समारंभाचें चहापान रोजचें नसून कांहीं प्रसंगानिमित्तच होत असतें.

### चहापानविधीचें पुस्तक

चहा देणारीचें व पिणारांचें हें मोठेंच तंत्र पाहून आम्हांला फार मौज वाटली. चहापानविधी व त्याचें सविस्तर तंत्र ह्याचें एक क्रमिक पुस्तक पहाण्यांत आलें. तें चांगलें मोठें २६५ पानांचें होतें. त्यांत चहापानविधींतील विविध कृतींचे फोटोहि होते. हें सर्व पाहून मला मोठा विस्मय वाटला व मीं सुझुकीला विचारलें, 'हा विधी शिकण्याचें उद्दिष्ट काय ?' तेव्हां ती म्हणाली, 'मुलींना चांगलें वळण लागावें व त्यांच्या प्रत्येक कृतींत व हाल-चालींत सौजन्य प्रतीत व्हावें, कलाप्रियता व सौंदर्यदृष्टि आत्मसात् झालेली असावी हा; या चहापानविधीच्या शिक्षणाचा हेतु आहे.' उदाहरणार्थ, चहाच्या डब्याच्या पिशवीची गांठ सोडावी कशी, चहाचा चमचा कोठें व कसा धरावा, पाहुण्याकडे कसें सामोरें जावें, पाहुण्याला चहा देतांना हातांत कप कसा धरावा, या प्रत्येक हालचालींत त्या मुलीचें व्यक्तिमत्व दिसून येत असतें. त्या व्यक्तिमत्वांत कला, सौंदर्य, सौजन्य, सद्भावना, आतिथ्य या सर्व गुणांचा अंतर्भाव व्हावा या करितां या विधीचें महत्त्व आहे. किंबहुना वरील प्रकारच्या शिक्षणाचें चहापानविधी हें एक प्रतीकच आहे. एवढें समजावून सांगितल्यावर मग मात्र त्या मुलीचें वागणें व हालचाल खरोखरच आकर्षक होती हें माझ्या लक्षांत आलें. त्या समारंभाच्या तंत्राचे बारकावे व त्यांचें कांटेकोर पालन यांमध्यें कांहीं तथ्य असावें असें मलाहि वाटलें.

### पुष्परचनेचें नव तंत्र

मुलींच्या शिक्षणांत चहापानविधीप्रमाणेंच पुष्परचना हा एक फार महत्त्वाचा विषय समजला जातो. अर्थात् तो विषय ऐच्छिक आहे. चहापान-विधीपेक्षां पुष्परचना शिकणाऱ्या मुलींचें प्रमाण अधिक आहे. पुष्परचनेमध्यें वैयक्तिक गुणांचा परिपोष होतो, तर चहापानविधीमध्यें सामाजिक गुणांचा

परिपोष होतो. पांच वर्षांच्या अभ्यासक्रमानंतर पुष्परचनेचें प्रमाणपत्र मिळूं शकतें. आठवड्यांतून एक दिवस वर्गाला येण्यास महिना १००० येन ( १ पौंड ) फी पडते. पूर्वी पुष्परचना म्हणजे खरोखरीच फुलांची आकर्षक मांडणी असे. ती एक मोठी कला आहे. पण या कलेमध्येंहि आतां कांहीं नवविचारांचा प्रादुर्भाव झाला असून पुष्परचनेमध्यें फुलेंच असायला पाहिजेत असा आग्रह राहिलेला नाहीं. किंबहुना मी एक पुष्परचनेचें प्रदर्शन पाहावयास गेलें, तेथील कलाकृतींत फुलें मुळींच नव्हतीं. गवत, वेत, कापूस, पिसें, तार, खडक, पत्रा अशा विविध प्रकारच्या पण अगदीं सामान्य वस्तूंमधून त्या कलाकृति बनविलेल्या होत्या. एवढें मात्र खरें कीं ती कलाकृति काय हें जरी नीटसें समजलें नाहीं तरी ती एक सुन्दर वस्तु होती व डोळ्याला सुखद चेतना देऊन मनांत भावनांचे विविध तरंग उठवित होती. त्या वस्तू बनविण्याचें कांहीं तंत्र हें असतेंच. वाटेल त्या नवशिक्याला अशा साध्या सामग्रींतून इतकी सुन्दर कलाकृति निर्माण करतां येणारच नाहीं. नवकाव्य किंवा नवचित्रकलेप्रमाणें मला या " पुष्परचना " दुर्बोध वाटल्या. तरीपण त्यामध्यें कांहींतरी सौंदर्यनिर्मिति खास आहे असें मात्र भासलें.

## बगीच्यांचें वेड !

जपानी लोक जसे सौंदर्यवेडे आहेत, तसेंच निसर्गवेडेहि आहेत. याची प्रतीति विशेषत: त्यांच्या बागेमध्यें दिसून येते. प्रत्येक जपानी घर किंवा हॉटेल यांमध्यें लहानशी बाग नक्कीच आढळेल. जागा असेल त्या मानानें ही बाग लहान किंवा मोठी असूं शकते. पण तिचें वैशिष्ट्य असें कीं बागेंत सौंदर्यनिर्मिति करतांना निसर्गावर मात करण्याची वृत्ति नसून निसर्गाशीं मित्रत्व व सहकार्याची वृत्ति असते. झाडाझुडपांच्या पानांची काटछाट करून त्यांना विविध आकार देणें किंवा भूमितीमधील रेखीव आकृतीप्रमाणें फुलांचें ताटवे बनविणें इत्यादि प्रकार त्यांत नसून, झाडांची व फुलांची

वाढ शक्य तितकी नैसर्गिक परन्तु मर्यादित ठेवणें हा त्यांत हेतु दिसतो तसेंच बागेची शोभा नैसर्गिक खडक व पाणी, एखादादुसरा प्राणी यांनीं वृद्धिंगत केलेली दिसते. क्वचित् तेथें एखादें देऊळहि दिसेल. जपानी शहरांतील दाट वस्तींत बरींच घरें लहानहि असतात. व आपल्या कल्पनेप्रमाणें तेथें बाग करण्याला बिलकुल सवड नसते. तरीपण लहानशा अंगणाच्या अगदीं लहान कोपऱ्यांतहि जपानी कुटुंबाला एक लहानशी बाग करतां येते.

## सामानविरहित जागा

जपानी घरांतील किंवा जपानी पद्धतीच्या हॉटेलमधील खोलींत सामानाची अडगळ फारच थोडी असते. एका बाजूस एखादा लहानसा बैठा आरसा व मध्यभागीं बुटकें टेबल असतें. कोपऱ्यांत साधारणपणें फळीवर एखादी कलाकृति व भिंतीवर गुंडाळीचें चित्र टांगलेलें असतें. मग यांचें सामान असतें तरी कोठें ? तर भिंतींतील पोकळींत. या पोकळ्या सरकत्या दरवाजांनीं झांकलेल्या असतात. हल्लीं मोठ्या शहरांत आपल्याला सिमेंटच्या इमारती दिसतात. एरवी जपानी घरें लाकडी असून घरांतील भिंती अगदीं हलक्या अस्बेस्टॉस सिमेंटच्या बांधलेल्या असतात. जपानमध्यें वरचेवर भूकंप होतात म्हणूनच अशीं हलकीं लाकडी घरें बांधण्याची पद्धत पडली असावी. निजावयास गाद्या खालीं चटईवरच अंथरतात. पांघरावयाच्या रजया अत्यंत उत्कृष्ट रंग व नक्षीकाम केलेल्या रेशमाच्या असतात. दिवसा या गुंडाळून भिंतींतील कपाटांत ( पोकळींत ) जातात. त्यामुळें पलंगासाठीं खोलींतील जागा अडत नाहीं. तसेच केर काढण्यास व स्वच्छता राखण्यास या पद्धतीचा फार उपयोग होतो.

## सार्वजनिक स्नानगृहें

प्रत्येक जपानी घरांत स्नानखोली असतेच असें नाहीं. अशा घरांतील मंडळी सार्वजनिक स्नानगृहांत आंघोळीसाठीं जातात. जपानी पद्धतीच्या हॉटेलांत जीं स्नानगृहें पाहिलीं त्यांमध्यें स्त्रियांसाठीं एक सामुदायिक स्नान-

गृह व पुरुषांसाठीं एक वेगळें सामुदायिक स्नानगृह दिसून आलें. स्नानगृहांत एक बाहेरची व एक आंतली खोली असते. बाहेरील खोलींत अंगावरील कपडे उतरवून आंतल्या खोलींत जावयाचें. तेथें गरम व थंड पाण्याचे बुटके नळ व जवळच पाण्याचीं लाकडीं भांडीं असतात. तेथें प्रत्येकीनें स्वच्छ आंघोळ करून मग जवळच गरम पाण्याची एक मोठी टाकी असते त्यांत उतरायचें. आंत एक बुडलेली पायरी असते त्यावर बसून थोडा शेक घ्यावयाचा. जपानमध्यें कांहीं संमिश्र स्नानगृहें असतात असेंहि सांगण्यांत आलें.

## जपानी नाट्य

आम्ही आमच्या टोकियोच्या वास्तव्यांत चार वेगवेगळ्या प्रकारच्या नाट्य प्रकारांना गेलों. त्यांचीं नांवें काबुकी, निचीगेकी, मिकॅडो, व काकुसाई; व हीं चढत्या प्रमाणांत आम्हांला आवडलीं. काबुकी हें जुन्या पद्धतीचें नाट्य असून त्याची रचना जुन्या पद्धतीची होती. यांत दृश्यापेक्षां श्राव्याचा भाग अधिक असल्यामुळें व भाषेच्या अडचणीमुळें आम्हांला त्यांत फारसें समजलें नाहीं. निचीगेकीमध्यें ‘ स्ट्रिप्टीं ’ चा नाच पाहिला. मिकॅडोमध्यें समोर नाट्य चालू असतांना जेवण घेण्याची प्रथा आहे. लहानलहान टेबलाभोंवतीं ४–५ जणांचे गट करून प्रेक्षकगण बसतात. नाट्य चालू असतांनाच जेवणाचे पदार्थ वाढले जात असतात व जेवण चालू असतें.

## कल्पक नेपथ्यरचना

इकडच्या नेपथ्यरचनेंत एक गोष्ट आढळून आली तीं ही कीं, स्टेजच्या पुढें आलेला कांहीं भाग काम करणाऱ्या नटासहित खाली जातो. सीतामाईला धरणीमातेनें दुभंग होऊन पोटांत घेतलें त्याप्रमाणें हा प्रकार वाटतो. तसेंच, स्टेजवर नुसत्या सचित्र पडद्यांनीं पार्श्वभूमि न दाखवितां प्रत्यक्ष देखावे उभे केले जातात. या बाबतींत आपल्याकडे आतां बरीच प्रगति दिसून येते. पण जपानमध्यें नेपथ्यरचनेमध्यें विविधता व कल्पकता फारच दिसून आली. काकुसाई थिएटरमध्यें तर या विविधतेचा उच्चांक गांठला होता. तेथें एका

प्रवेशांत घराला आग लागल्याचें दृश्य दाखविलें होतें. तें इतकें हुबेहूब होतें घराचे वासे अर्धवट जळून कडाडून कोलमडतांना व आगीचे लोट उठतांना पाहून खरोखरच आग लागली कीं काय असा संशय आला. पण प्रेक्षक स्वस्थ बसून पाहात असल्यामुळें तें केवळ नाट्य आहे याची खात्री पटली. एका स्विस गृहस्थानें आम्हांला हें थिएटर पाहावयाला सांगितलें. तो म्हणाला 'युरोपमध्येंदेखील आम्हीं एवढी प्रगति केलेली नाहीं.' टोकियो-मधील निऑन लाईटस्बद्दल हेच उद्गार काढणें चुकीचें होणार नाहीं. टोकियोला गेलेल्या कोणाहि व्यक्तीला तेथील गिंझा हा गजबजलेला विभाग व तेथील चमत्कृतिपूर्ण निऑन लाईटस् याचा उल्लेख करणें अपरिहार्य होईल. प्रभाकर पाध्ये यांनीं लिहिलेल्या 'तोकोनोमा' या उत्कृष्ट पुस्तकांत गिंझाला एक स्वतंत्र प्रकरण दिलें आहे. येथील निऑन लाईटस् हे इतक्या विविध प्रकारचे, विविध रंगाचे, विविध आकाराचे आहेत कीं न्यूयार्कमधील सुप्रसिद्ध टाईम्स स्क्वेअरलासुद्धां त्याची सर यावयाची नाहीं.

## जपानी चित्रलिपि

जपानी व चिनी लिपि ह्या सारख्याच आहेत. ही चित्रलिपि असल्यामुळें तीमध्यें हजारोंनीं अक्षरें आहेत. पण अलीकडे लिपिसुधारणा करून हीं अक्षरें बाराशेवर आणण्यांत आलीं आहेत. भाषा न समजली तरी चिनी जपानी लोकांना एकमेकांची लिपि वाचतां येते. पण आम्हां हिंदी लोकांना मात्र जपानी भाषाहि येत नव्हती व लिपीहि समजत नव्हती. यामुळें फारच अडचण पडते. लिपि येत असती तर निदान दुकानांचीं नांवें, पाट्या, जाहिराती यातरी गोष्टी समजल्या असत्या; जपानी भाषा लौकर समजा-यला मदत झाली असती. भारतामध्येंदेखील नाना भाषा असल्या तरी लिपि एक असावी ही जी मागणी आहे ती किती योग्य आहे हें या प्रसंगानें सहजच ध्यानांत आलें. जपानी चित्रमय-लिपि दिसते मात्र सुंदर. रस्त्यानें जातांना दुकानावरील पाट्या नक्षीकाम केल्याप्रमाणें शोभिवंत दिसत होत्या.

त्यांतच जाणाऱ्या येणाऱ्या लोकांचे तें आदबशीर वागणें व बोलणें, एकमेकांना भेटतांना वांकून अभिवादन करणें, बोलतांना हय (हुंकार), 'आनोने' (हें पाहा) इत्यादि सुस्वर शब्द उच्चारणें किंवा टेलिफोनवर 'मोशी मोशी' (हॅलो) असे ध्वनि मोठे गोड वाटतात. एकंदर जपानमधील वातावरण स्वप्नसृष्टीसारखें काव्यमय वाटतें.

**मुलांची स्वप्नसृष्टि !**

जपानमध्यें आम्हीं खरोखरीच मुलांची एक स्वप्नसृष्टि ( Children's dreamland ) पाहिली. ही नारा या ठिकाणीं वसलेली आहे. पूर्वीं जपानची राजधानी नारा ही होती. इ. स. ७८४ सालीं ती कियोटोला नेण्यांत आली व आतां ती टोकियोला आहे, हें सर्वश्रुतच आहे. नारा हें सुप्रसिद्ध औद्योगिक शहर ओसाका यापासून सुमारें ५० मैल अंतरावर आहे. नारा हें तेथें असलेल्या सर्वांत मोठ्या दाइबुत्सु या बुद्धाच्या मूर्तीबद्दल प्रसिद्ध आहे. ही मूर्ति तोडाइजी टेंपल या देवळांत आहे. तसेंच तेथें कासुगा श्राइन (देवालय) हरिणांची बाग, योकुशिनी पॅगोडा हींदेखील पाहण्यासारखीं ऐतिहासिक व धार्मिक ठिकाणें आहेत. पण आम्हांला नाराचें वैशिष्ट्य वाटलें तें तेथील 'मुलांची स्वप्नसृष्टि' हें होय. अमेरिकेंतील डिस्नेलँडप्रमाणें ही एक मुलांसाठीं सृष्टि निर्माण केलेली आहे. त्याचें क्षेत्रफळ पांच लाख चौरस मीटर एवढें आहे. त्यामध्यें फॅन्टसी लँड ( कल्पना सृष्टि ), ॲडव्हेंचर लँड साहस सृष्टि),टुमॉरो लँड ( उद्याची सृष्टि ), व अन्सेस्टर लँड ( पूर्वजांची सृष्टि ) असे विभाग आहेत. यांपैकीं फॅटन्सी लँडमध्यें मुलांना बोटीनें पाण्यांत एका अद्‌भुतरम्य राजवाड्यांत नेण्यांत येतें. ॲडव्हेंचर लँडमध्यें एक जंगल दाखवण्यांत येतें. तेथें वाघसिंहासारखे वन्य पशु अंगावर चाल करून येत आहेत, असा आभास निर्माण करण्यांत येतो. 'उद्यांच्या सृष्टीमध्यें' अशाच कांहीं कांहीं नवीन नवीन कल्पना व शोध यांचें दर्शन देण्यांत येतें. पूर्वजांच्या सृष्टींत आपल्या पूर्वजांची राहणी, त्या वेळचे प्रसिद्ध किल्ले व

अवशेष दाखविण्यांत येतात. याशिवाय छोटी बोट, डोंगर, बोगदे यांमधून प्रवास यांसारखीं प्रात्यक्षिकें ठेवलीं आहेत. एक भुताटकीचें घर दाखविण्यांत येतें व त्यामध्यें सामान्यतः भीति वाटण्यासारखीं दृश्यें ठेवलीं आहेत. हेतु हा कीं मुलांनीं कशाला घाबरूं नये. याशिवाय छोटें दुकान, उपाहारगृह, खेळांचें दुकान, पोस्टऑफिस, लायब्ररी, पोलिसठाणें, आगीचा बंब वगैरे सर्व लहान प्रमाणांत मुलांसाठीं येथें ठेवलें आहे. तें पाहण्यांत मुलेंच काय पण मोठीं माणसेंहि रंगून जातात. मुलांसाठीं ही फार सुंदर योजना केलेली आहे. जपानमध्यें इतर शहरांतहि लहानमोठ्या प्रमाणांत मुलांसाठीं अशीं रंजनस्थानें किंवा उद्यानें म्हणा, चालवलेलीं आहेत.

जपानमध्यें पाहण्यासारखीं स्थळें, संस्था, कारखाने, उद्यानें, राजवाडे, देवळें, बुद्धाच्या मूर्ती खूपच आहेत. पण थोड्याशा वास्तव्यांत व परदेशीय चलनटंचाईच्या काळांत फारसें पाहणें शक्य नव्हतें. जें कांहीं योगायोगानें पाहतां आलें त्याचाच उल्लेख करतां आला. बहुरत्ना वसुंधरेचें यथार्थ वर्णन कोण व कसें करणार ? ज्याला जें पाहण्याचें भाग्य लाभलें तेवढेंच त्यानें सांगावें. तरी आतां विराम.

⁂

११

# अमेरिकन महिला

उत्साह, उद्योग, धाडस, चौकसवृत्ति व सौंदर्योपासना यांचें मूर्तिमंत प्रतीक म्हणजे आजची अमेरिकन महिला असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. आणि याला ऐतिहासिकदृष्ट्या सबळ कारण आहे.

युरोपमध्यें नानाप्रकारच्या गांजणुकीमुळें व धार्मिक लढायांनीं त्रस्त झालेले लोक आपल्या बायका-मुलांसह नवीन देशांत नवे आयुष्य घालविण्यासाठीं म्हणून, कोलंबसनें शोधून काढलेल्या नवीन देशांत कायमची वसाहत करण्याच्या हेतूनें आले. देश मोठा व सुपिक खरा; परंतु नवीन घरांत राहावयास आलें म्हणजे ज्याप्रमाणें नवीन सामानसुमान खरेदी करणें, कुठें खुंट्या मारणें तर कोठें दांड्या लावून घेणें; तर कोठें फळ्या अथवा झोपाळा लावून घेणें, बागबगीचा करणें अशी व्यवस्था स्वतःच लावून घ्यावी लागते. त्याप्रमाणें या युरोपियन लोकांना मे फ्लॉवर बोटींतून प्रथम अमेरिकेंत पदार्पण केल्यावर अथपासून आपल्या राष्ट्रसंसाराची मांडणी करावी लागली. कोठें रस्ते कर, तर कोठें जंगलें तोड, शेती कर, इमारती बांध अशीं नाना प्रकारचीं कामें त्यांना करावीं लागलीं. त्यांतच त्या देशांतील आदिवासी लोक जे रेडइंडियन्स या नांवानें ओळखले जातात त्यांच्याशींहि सामना द्यावा लागला.

### स्त्रियांचा समान वाटा

या सर्व कामांत पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांनीं भाग घेतला. संकटांतून

मार्ग काढणें, अडीअडचणींना धीरानें तोंड देणें यांमध्यें स्त्रीपुरुषांचा भाग समान होता. मागील जीवन विसरून नवा संसार व नवा समाज आपल्या आवडीप्रमाणें निर्माण करण्याची ही जणूं संधीच त्यांना मिळाली. पूर्वींची परंपरा व तापदायक निर्बंध झुगारून देऊन समता, स्वातंत्र्य, समान संधि यांवर आधारलेलें कल्पनेंतील मनोराज्य प्रत्यक्षांत आणण्यास तें जसें कांहीं आवाहनच होतें. या गोष्टीचा या लोकांनीं पूर्ण फायदा घेतला. इंग्लंड, फरान्स, जर्मनी, इटली, पोलंड इत्यादि युरोपमधील वेगवेगळ्या देशांतील वेगवेगळ्या भाषा, पोशाख व चालीरीती असलेले हे लोक अमेरिकेंत येऊन अमेरिकन हें सामान्य नाम व इंग्लिश ही सामान्य भाषा (अर्थात् बहुसंख्य लोकांची) या नांवानें नांदूं लागले. यामुळें अमेरिकन संस्कृति ही मिश्र स्वरूपाची झाली आहे.

अमेरिकन जीवनांतील एक वैशिष्ट्य म्हणजे धांदल, धडपड व घाई (Tempo). शहरी जीवनांत हें विशेष अनुभवास येतें. उठल्यापासून रात्रीं झोपेपर्यंत मनुष्य सारखा धावपळ करीत असतो. जणूं कांहीं दिवसाचे २४ तास त्यास पुरत नाहींत. पण ही सर्व धांदल कशांसाठीं याचा अंतिम विचारहि त्यानें केलेला नसतो; किंबहुना करण्यास त्याला वेळ नसतो. तसेंच अमेरिकन स्वभावांत प्रत्येक गोष्टींत अतिरेकीपणा करण्याचा गुण आहे, सुवर्णमध्य हें तत्त्व त्याला मान्य नाहींसें दिसतें. म्हणूनच कमलादेवी चट्टोपाध्याय यांनीं अमेरिकेवरील त्यांच्या पुस्तकाला "America, the Land of Superlatives" असें नांव दिलें आहे. वर नमूद केलेलीं सर्व वैशिष्ट्यें अर्थात् अमेरिकन महिलांतहि दिसून येतात.

## अमेरिकन गृहिणी

अमेरिकन स्त्रियांची स्वभावरचना समजण्याकरितां ही पार्श्वभूमि लक्षांत घेणें अत्यंत जरूर आहे. अमेरिकन स्त्री ही साधारणपणें फार कर्तृत्ववान् असते. मध्यम वर्गांतील स्त्री बहुधा नोकरी करतेच. पुरुषाच्या बरोबरीनें

सर्व प्रकारच्या व्यवसायांत ती काम करीत असते. डॉक्टर, नर्स, वकील, टेलिफोन, रेडिओ, शिक्षक, समाजसेवक, हॉटेल, कारकून, टायपिस्ट, वृत्तपत्र, प्राप्तिकर, रेल्वे इत्यादि नाना प्रकारच्या कार्यक्षेत्रांत अमेरिकन स्त्रिया उत्तम तऱ्हेनें कामें करीत आहेत. त्याबरोबरच घरकामहि चांगल्या प्रकारें करण्याची या स्त्रियांना आवड आहे. बऱ्याचशा काम करणाऱ्या स्त्रिया अविवाहित आहेत तशाच विवाहितहि आहेत. सर्वच सुशिक्षित असल्यामुळें त्यांना घरचें काम हें अशिक्षितांचें आहे असें वाटत नाहीं. नोकरी केली म्हणजे संसाराकडे दुर्लक्ष होणारच असें जें आपल्याला वाटतें तसा तिकडचा अनुभव नाहीं. घरकाम उत्तम प्रकारें संभाळून नोकरीहि चांगल्या प्रकारें करणें तेथील स्त्रियांना जमतें. अर्थात् यामध्यें त्यांना नवऱ्याचें सहकार्य मिळतें. अमेरिकन नवरा बायकोला बशा धुण्यापासून सर्व प्रकारच्या घरकामांत मित्राप्रमाणें मदत करीत असतो. अमुक काम बायकोचें व तें बायकोनेंच केलें पाहिजे अशी त्याची वृत्ति नसते. मित्रत्वाच्या भावनेनें दोघेंजण मिळून संसाराचा गाडा चालवीत असतात. प्रत्येक घरांत टेलिफोन, फ्रिजिडेयर, व्हॅक्यूम क्लीनर, गॅस किंवा विजेचा स्टोव्ह हा असतोच. तसेंच बहुतेक इमारतींच्या तळघरांत कपडे धुण्याचें यंत्र बसवलेलें असतें. त्याचा भाडेकऱ्यांना फायदा घेतां येतो. धुलाईचें काम गृहिणी घरींच करते. स्वयंपाक सोपा व सुटसुटीत असतो. ब्रेडलोणी आयतेंच विकत घेतां येतें. कामाच्या वेळीं इतर एखादा पदार्थ झटपट करणें तिला जड जात नाहीं. बरेच पदार्थ तयार केलेले टिनमध्यें मिळतात. त्यामुळें टिन उघडून एखादा पदार्थ आयत्या वेळीं सहज करतां येतो. वाटणें, कुटणें, तुकडे करणें, फेटणें, फळांचे रस काढणें इत्यादि स्वयंपाकांतील कामें करण्यास उपयोगी पडतील अशीं यांत्रिक साधनें पुष्कळ असतात. त्यामुळें कोणताहि खाद्यपदार्थ करणें त्रासदायक वाटत नाहीं. पदार्थ चवीला तर चांगला हवाच, पण तो दिसायलाहि

आकर्षक असावा, प्लेटमध्यें त्याची मांडणी कलापूर्ण असावी याची अमेरिकन स्त्री खबरदारी घेते.

**स्वयंपाकगृह**

अमेरिकन स्वयंपाकघर अगदीं लहान असतें. खाद्यपदार्थांला लागणारे सर्व जिन्नस, पिठें, मीठमसाले, हात पोंचेल अशा उंचीवर भिंतीवरील कपाटांत ठेवलेले असतात. उभ्यानें स्वयंपाक करतांना लहान स्वयंपाकघर असल्यामुळें विशेष चाल न करतां किंवा ऊठबस करावी न लागतां पदार्थ लौकर तयार होतात. जवळच बेसिनमध्यें गरम व थंड पाण्याच्या तोट्या असल्यामुळें भांडीं विसळणें सोपें जातें.

नोकरी केली तरी अमेरिकन स्त्री गृहकृत्यांत मुळींच हयगत करीत नाहीं, आपण उत्तम गृहिणी आहों असें म्हणण्यांत तिला अभिमान वाटतो. आपलें घर सर्व सुखसोयींनीं सज्ज व उत्तम वस्तूंनीं नटलेलें व आकर्षक ठेवण्याची ती पराकाष्ठा करीत असते. घरचा केर–साफसुफी ती स्वतःच करते. फक्त आठवड्यांतून एक दिवस तासाच्या दरानें कामाला मदत म्हणून एखादी बाई बोलावते. एखादी दुर्मिळ वस्तु आपल्याकडे आहे असें सांगण्यांत तिला लहान मुलासारखा आनंद वाटतो. आयुष्याकडे पाहण्याची तिची दृष्टि खेळकर व मुलासारखी अल्लड असते. तिला मूल झालें तर ज्याप्रमाणें लहान मुलीला बाहुली मिळाल्याचा आनंद वाटतो त्याच प्रकारचा तिला आनंद वाटतो. मुलाबद्दल वाटणाऱ्या आपल्या आनंदाच्या, प्रेमाच्या व कौतुकाच्या भावना ती दाबून ठेवीत नाहीं, तर मोकळेपणानें दिग्दर्शित करते. आपल्याला बाळ होणार हें कळतांच मुलें कशीं वाढवावीं, त्यांना कपडे कसे घालावे, त्यांना खाऊ कसें घालावें, निजवावें कसें, त्यांना चांगल्या संवयी कशा लावाव्या, बारीक दुखणीं कशामुळें येतात, त्यावर उपचार काय करावे याचा ती मनोभावें अभ्यास करते व मूल वाढवण्याचा आनंद लुटते. विभक्त कुटुंबपद्धति असल्यामुळें घरांत अनुभवी वडीलधारें मनुष्य

नसतें. तरीपण घाबरून न जातां आयुष्यांतील प्रत्येक अनुभव ही एक आनंद प्राप्त करून घेण्याची संधीच आहे व आपल्या कर्तृत्वशक्तीला आवाहन आहे या दृष्टीनें ती वागते. आयुष्य ही ज्याची त्याची खाजगी दौलत आहे. ती ज्याची त्यानें मनमुराद उपभोगावी, या तत्त्वानुसार अमेरिकेंत व्यक्तिस्वातंत्र्यावर फार भर दिला जातो. अर्थात् व्यक्ति आणि समाज यांचे जे अन्योन्य संबंध आहेत त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्यावर आपोआपच थोडाबहुत आळा बसतो.

## सौंदर्यसाधना

अमेरिकेंत स्त्रीला आपण सुंदर, नीटनेटकें व मोहक दिसावें अशी फार हौस असते; व लग्न झालें तरी नवरा मिळाला म्हणून ती आपल्या स्वरूपाबद्दल उदासीन न राहतां अधिकाधिक आकर्षक दिसण्याचा प्रयत्न करते. आपलें वागणें, बोलणें व वेषभूषा शक्य तितकें मोहक ठेवण्याचा तिचा प्रयत्न असतो. कपडालत्ता किंमतीनें उंची नसला तरी कलात्मक व स्वतःला शोभेल असा घालते. अंगाला नीट बसणारा, उत्तम प्रकारें शिवलेला व व्यवस्थित इस्त्री केलेला पोशाख घालून, तसेंच केशभूषाहि आपल्या रंग—रूप—उंचीला साजेशी करून ती आपलें साधारण रूपहि खूपच खुलवितें. सौंदर्यप्रसाधनेसाठीं सल्ला देणाऱ्या संस्था असतात. त्यांच्या सल्ल्यानें परमेश्वरानें दिलेलें रूप जास्तींतजास्त उठून दिसेल असा तिचा प्रयत्न असतो. मात्र एकदां व्यवस्थित वेशभूषा झाल्यावर मग ती सारखा आपल्या दिसण्याचा विचार करीत राहात नाहीं व आपल्या कामांत पूर्णपणें गढून जाते.

दुसऱ्याशीं सौजन्यानें वागणें, अदबीचे शब्दप्रयोग करणें, शक्यतों दुसऱ्याच्या उपयोगी पडणें, दुसऱ्याच्या चांगल्या गुणांचा योग्य तो निर्देश करणें, योग्य तेथें दुसऱ्यास श्रेय देणें, कृतज्ञता व्यक्त करणें इत्यादि वागण्याच्या गोड पद्धतीमुळें ती सर्वांना हवीशी वाटते. कधीं कधीं हिंदी लोकांना यामध्यें औपचारिकपणा व दिखाऊपणाच फार आहे असें वाटतें; पण मला

तसें वाटत नाहीं. मनमोकळेपणा, खिलाडूवृत्ति व दिलदारपणा हाच स्वभाव त्यांत प्रतीत होतो.

अमेरिकेमध्यें क्षुल्लक कारणावरून घटस्फोट फार मोठ्या प्रमाणांत होतात अशी एक साधार टीका ऐकूं येते. हें नाकबूल करून चालणार नाहीं. तसेंच ही गोष्ट फारशी स्पृहणीय आहे असेंहि कोणी म्हणणार नाहीं. तथापि, त्याचीं कारणें शोधूं गेल्यास ती घटना कशी घडून आली हें समजूं शकतें. याकरितां विवाहविषयक सल्ला (Marriage Council), आप्तजन संबंध (Family Relations) असे घरगुती प्रश्न व समस्या यांबाबत सल्ला देणाऱ्या संस्था तेथें अस्तित्वांत आहेत. त्यांच्या मध्यस्थीनें बऱ्याच कुटुंबांत नाहींसा झालेला सलोखा पुनरपि प्रस्थापित होतो. आपल्याकडे घटस्फोटाचें प्रमाण फार थोडें आहे खरें, पण पति-पत्नींचा बेबनाव होऊनसुद्धां लाजेकाजेस्तव घटस्फोट न घेतां जन्मभर कुचंबणा भोगणारीं दांपत्यें आपल्याकडे नाहींत का ?

## दुर्दम्य उत्साह

अमेरिकन स्त्रियांचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आयुष्यासंबंधीं दुर्दम्य उत्साह—अर्थात् हें स्वभाववैशिष्ट्य अमेरिकन पुरुषांनाहि लागू आहे. आयुष्यांत कितीहि संकटें येवोत, शारीरिक व्यंगें असोत, त्यांतल्या त्यांत अधिकाधिक उद्योग करावयाचा, नैराश्याचें किंवा निरुत्साहाचें वारेंहि लागूं द्यावयाचें नाहीं अशी त्यांची प्रवृत्ति असते. आंधळी, मुकी व बहिरी प्रसिद्ध अमेरिकन विदुषी हेलेन केलर या कांहीं वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत आल्या होत्या. याच बाई जर हिंदुस्थानांत जन्माला आल्या असत्या तर आपल्याकडे अनेक मूक दुर्दैवी जीव जन्माला येतात व मृत्यु पावतात त्यांपैकींच त्या एक झाल्या असत्या. “ साहसे श्रीः प्रतिवसति ” हें वचन हल्लींच्या काळांत जर कोणास लागूं पडत असेल तर अमेरिकेला होय.

या सर्व वैशिष्ट्यांना विसंगत अशी जर एक गोष्ट अमेरिकन स्त्रियासंबंधीं दिसत असेल तर ती ही कीं, त्या राजकारणांत विशेष भाग घेतांना दिसून

येत नाहींत. हिंदी स्त्रियांना मताधिकार मिळाल्यापासून अल्पकाळांत त्यांनीं जी राजकारणांत आघाडी मारली त्या मानानें अमेरिकन स्त्रिया राजकारणांत चमकलेल्या नाहींत. युनोच्या आमसभेच्या अध्यक्षपदाचा मान प्रथम एका स्त्रीला मिळाला, तो म्हणजे विजयालक्ष्मी पंडित यांना. ही गोष्ट विशेष नजरेंत भरते. पण त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवावयास हवें कीं जगप्रसिद्ध नोबेल प्राईझ हें अजून हिंदी बाईला मिळालेलें नाहीं, पण पर्ल बक या या अमेरिकन बाईला मिळालेलें आहे.

अमेरिकन महिला या अशा आहेत.

१२

# मुलें आणि पुस्तकें

हल्लींच्या साक्षरतेच्या युगांत बालमनावर चांगले किंवा वाईट संस्कार करणाऱ्या बहुविध साधनांमध्यें पुस्तकांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. मुलांच्या हातीं आपण कोणतें साहित्य देतों यावर त्याचें मन सुसंस्कृत होईल कीं बिघडेल, त्यांचें भवितव्य उज्ज्वल होईल कीं दुःखमय होईल हें अवलंबून राहील.

यावरून मला एक गोष्ट आठवते. माझ्या मैत्रिणीच्या एकुलत्या एक मुलानें एकाएकी कसलीतरी धास्ती घेतली. रात्रीं तो एकदम दचकून उठे व भीतीनें घाबराघुबरा होई. या गोष्टीचा तलास लावतां असें आढळून आलें कीं त्यानें कोठेंतरी एक भुताच्या चाळ्यांचें पुस्तक वाचलें. तेव्हांपासून त्याच्या मनानें धास्ती घेतली व त्याचा परिणाम त्याच्या प्रकृतीवरहि झाला.

**योग्य अशीं पुस्तकें हवीं**

तसेंच, कित्येक मुलांना रहस्यकथा, प्रेमकथा, लैंगिक विश्लेषणाच्या गोष्टी वगैरे वाचण्याचा फार नाद असतो व त्याच्या पायीं त्यांना खाणेंपिणें, खेळ, अभ्यास हेंहि सुचत नाहीं. असेंहि माझ्या ऐकिवांत आहे कीं जें वाचूं नको म्हणून सांगावें तेंच नेमकें उघडपणें किंवा गुप्तपणें मुलांना वाचावेंसें वाटतें. त्यांची ही खोड घालवावयाची तरी कशी असें विचारणाऱ्या कितीतरी माता मला भेटलेल्या आहेत. मुलांना कोणतीं पुस्तकें वाचावयास द्यावीं ही खरोखरी एक महत्त्वाची समस्या शिक्षक-पालकांसमोर उभी आहे. किंबहुना

शैक्षणिक कार्याची यशस्विता त्यावर अवलंबून आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यासाठीं चांगलीं पुस्तकेंच लिहिलीं जातील व मुलांच्या हातीं पडतील अशी व्यवस्था केली पाहिजे. याला पोषक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीनें पालकांनींहि भलतींसलतीं पुस्तकें घरीं आणूं नयेत. मुलांसाठीं विशिष्ट प्रकारचीं पुस्तकें लिहिलीं पाहिजेत, याची जाणीव आपल्याकडे होऊं लागली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. त्या दृष्टीनें अलीकडे प्रयत्नहि चालू आहेत. तरीपण त्यामध्यें अजून योजनेचा अभाव दिसतो. नवसाक्षर झालेल्या प्रौढांसाठीं लिहिलेलीं सोपीं पुस्तकें व मुलांसाठीं लिहिलेलीं पुस्तकें यांमध्यें मोठा फरक आहे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. मुलांसाठीं लिहिलेलीं पुस्तकें आकर्षक असलीं पाहिजेत व त्यासाठीं भरपूर रंगीत चित्रें, उत्तम व जाड कागद, थोडाच पण मोठ्या टाइपांत मजकूर असावयास पाहिजे. पण या गोष्टी फारशा दिसून येत नाहींत. याचें कारण अशीं पुस्तकें थोड्या किमतींत द्यायला परवडत नाहींत व महाग पुस्तकें पालकांना घ्यायला परवडत नाहींत. चारआठ आणे व जास्तींत जास्त रुपया दीड रुपया एवढ्या किमतींत पुस्तक विक्रीला ठेवावयाचें म्हणजे, सुंदर कागद व बांधणी आणि रंगीत चित्रें कशीं देतां येणार ? हें एक दुष्टचक्र आहे व त्याकरितां बालवाङ्मयाच्या लेखकांना थोडीतरी आर्थिक मदत मिळाली पाहिजे.

## परदेशांतील प्रयत्न

या बाबतींत बहुतेक सर्व पुढारलेल्या देशांनीं बरीच आघाडी मारलेली आहे. बर्लिनमध्यें बालवाङ्मय-प्रकाशनसंस्था आहे. त्याच्या संपादक मंडळांत शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, लेखक, कलाकार यांचा समावेश असून, या सर्वांच्या सहकार्यानें पुस्तकांची योजना आखण्यांत येते. पुस्तकांचें हस्तलिखित तज्ज्ञांच्या समितींत संमत झाल्यावरच प्रकाशित केलें जातें. या प्रकाशनसंस्थेचा वार्षिक खर्च एक लाख मार्क आहे. पुस्तकांच्या

स्पर्धा ठेवून चांगल्या लेखकांना बक्षिसें दिलीं जातात. रशियामध्यें मुलांसाठीं स्वतंत्र नाट्यगृहें आहेत व मुलांनीं करण्यासारखीं छोटीं नाटकें बालशिक्षण-तज्ज्ञांकडून लिहवून घेतलीं जातात. या नाटकांचे प्रयोग मुलेंच करतात व मुलेंच पाहतात. अर्थात् मोठ्यांचें त्यांत मार्गदर्शन असतें. इंग्लड - अमेरिकेंतहि मुलांना आकर्षक असें पुष्कळ वाङ्मय निर्माण केलें जातें.

## वयपरत्वें गटाप्रमाणें पुस्तकें हवीं

बॉंबे स्टेट वुमेन्स् कौन्सिलनें गेल्या कांहीं वर्षांपासून उन्हाळ्याच्या व दिवाळीच्या सुट्टींत बालवाचनालयाचा कार्यक्रम चालू ठेवला आहे. तेथें वाचनांत गुंगून गेलेलीं मुलें पाहिलीं म्हणजे पुस्तकें हें मुलांच्या मनावर प्रभाव करणारें केवढें परिणामकारक साधन आहे याची खात्री पटते. तसेंच, मुंबईमधील बालभवनामध्यें मुलांच्या वाचनालयाचा विभाग आहे. त्यामध्यें मुलांना त्यांच्या वयाला अनुकूल असे विभाग ठेवले आहेत. मुलांना आपल्या हातानें त्यांतून पुस्तकें घेण्याची सवड ठेवली आहे. त्यांच्या पुस्तकांच्या निवडीवरून त्यांच्या मनाचा कल कोठें आहे हें स्पष्ट दिसून येतें.

मुलांकरितां लिहिलेलीं पुस्तकें मुलांचे वयपरत्वें गट पाडून त्या त्या वयाच्या मुलांची मानसिक गरज भागवणारीं असलीं पाहिजेत. उदाहरणार्थ, पूर्वप्राथमिक शाळांत जाणाऱ्या मुलांकरितां कापडाची पुस्तकें ज्याला ragbooks म्हणतात अशीं असावीं. म्हणजे तीं पुस्तकें हाताळावयास सोपीं जातात, फाटत नाहींत व मळल्यास धुण्याची शक्यता असते. शिवाय, पुस्तकाचें पान म्हणजे एखादें सुंदर रंगीत चित्रच असून खालीं एकाच ओळींत मोठ्या अक्षरांत दोन-तीन शब्दांचें वाक्य असावें. अशा पुस्तकांमुळें मुलांना अक्षरओळखहि आपोआपच होईल. हीं चित्रें विशेषत: कुत्रीं व मांजरें असे मुलांचे आवडते व परिचित प्राणी, तसेंच हत्ती, सिंह, वाघ, घोडा, कोल्हा, हरीण, मेंढ्या अशा वन्य प्राण्यांचीं असावीं. सामान्य पक्षी, फुलें, फळें यांचींहि चित्रें असावीं. अशा पुस्तकांनीं मुलांचें मनोरंजन तर होईलच; पण त्याचबरोबर

निसर्गजीवनाची सामान्य माहितीहि त्यांना सहज होईल.

## सामान्यज्ञान वाढविण्याकडे लक्ष

यानंतरचीं मुलें म्हणजे प्राथमिक शाळेच्या पहिल्या दोन तीन वर्गांतलीं. यांच्यासाठीं कागदाचीं पुस्तकें असलीं तरी तो कागद जाड व चांगला असावा. वरील प्रकारचींच चित्रें, पण मजकूर किंचित् अधिक म्हणजे दोन-तीन वाक्यें व टाइप किंचित् लहान असावा. मुलाचें वय जसजसें वाढतें तसतशीं चित्रें कमी व मजकूर अधिक करावयास हरकत नाहीं. विषयामध्यें विविधताहि आणावी. लहान लहान गोष्टी, खेळ, कोडीं, अभिनयगीतें, नाट्यसंवाद वगैरेहि असावे. म्हणजे मुलांना त्यांचा नाट्यकार्यक्रमाकरितां उपयोग व्हावा व जगाशींहि त्यांचा परिचय वाढावा. प्राथमिक शिक्षणाचे वरचे वर्ग व दुय्यम शिक्षणाचे वर्ग यांमधील मुलांसाठीं जीं पुस्तकें लिहावयाचीं त्यांत मुलांच्या ज्ञानाचें व अनुभवाचें क्षेत्र वाढलेलें असल्यामुळें पुष्कळच वेगवेगळे विषय हाताळतां येतील. यांमध्यें मुलांना विशेष आवडणारे विषय म्हणजे चरित्रें व आत्मचरित्रें, काल्पनिक व पौराणिक गोष्टी, पंचतंत्र, पराक्रमाचीं वर्णनें, प्रवासवर्णनें, लोककथा, ऐतिहासिक कथा, सोप्या हस्तव्यवसायांची कृति इ. होत. अशा प्रकारच्या पुस्तकांनीं मुलांचें मनोरंजन होऊन त्यांचें सामान्य व व्यवहारज्ञान वाढेल. त्यांपैकीं बरीचशीं पुस्तकें त्यांना स्फूर्तिदायक होतील. कांहीं पुस्तकें मुलांच्या संस्कारक्षम व ध्येयवादी तरुण मनाची पकड घेऊन त्यांना सबंध जीवनांत मार्गदर्शक होऊं शकतील.

## परिणामकारक व मार्गदर्शक साहित्य हवें

अलीकडे बहुतेक सर्व नियतकालिकांत एक बालवाङ्मय विभाग चालविला जातो. यावरून बालवाङ्मयाची केवढी जरूर आहे याची जाणीव चांगलीच झालेली उघड दिसते. पण मुलें तेवढाच भाग वाचतील असें कांहीं सांगतां येत नाहीं. किंबहुना तो सोडून इतरच गोष्टी म्हणजे जाहिराती किंवा अपघाताच्या बातम्या वाचण्याकडे त्यांची प्रवृत्ति दिसून येते. याकरितां

हे बालविभाग चालविणाऱ्या लेखकांना मुलांच्या मानसशास्त्राची चांगली माहिती असली पाहिजे, व कशा तऱ्हेचें लेखन मुलांच्या मनाची पकड घेईल तें चांगलें अवगत पाहिजे. विशेषत: गोष्टी, कोडीं, जादू, मुलांचे छंद, हस्त-व्यवसाय, परदेशीय मुलांशीं पत्रद्वारें मैत्री अशा तऱ्हेचीं विविध व आकर्षक सदरें घालतां आलीं पाहिजेत. मुलांसाठीं स्वतंत्र मासिकें चालविण्याचे प्रयोग आमच्या लेखकांनीं करून दाखविले आहेत. पण त्यांपैकीं कांहीं चालकांना आर्थिक कारणास्तव तीं बंद करावीं लागलीं.

## निसर्ग-परिचय

पुस्तकांमध्यें कितीतरी प्रकार असतात. कांहीं साधीं चित्रें असतात त्याच्यावरून पाण्याचा ब्रश फिरविला कीं तीं फारच सुंदर रंगीत चित्रें होतात. कांहीं पुस्तकें उघडल्याबरोबर त्यांतील चित्रें उभीं राहतात व एक मोठा देखावाच निर्माण होतो. अशा तऱ्हतऱ्हेच्या कल्पना लढवून मुलांचा निसर्गाशीं शक्य तितक्या लवकर निकट परिचय करून दिला पाहिजे. निसर्गाचा प्रत्यक्ष परिचय होणें ही सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे. पण हल्लींच्या मानव-निर्मित यंत्रयुगांत व दाटीदाटीच्या शहरी राहणींत असा परिचय होणें फारसें सुलभ नसतें. तेव्हां त्याहून किंचित गौण मार्ग म्हणजे पुस्तकद्वारां ज्ञानप्राप्ति करून देणें. कवि कालिदासानें म्हटलें आहे की, बालक हें एका महान् तेजाचें लहान बीज आहे, या तेजाची निरामय प्रतिभा पृथ्वीवर फांकून मानवजात जर सुखी व्हावयाची असेल तर त्या तेजाची जोपासना काळजी-पूर्वक केली पाहिजे. मुलांच्या मनावर सुसंस्कार घडावे, त्यांच्या मनांत सद्-विचार यावे व हातून सदाचार घडावा, असें वाटत असेल तर त्यांच्या कोवळ्या वयांत चांगलें व परिणामकारी साहित्य त्यांना मिळावें अशीच योजना केली पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...... दि: ......
क्रमांक ......

१३

# आजचा विद्यार्थी

आजचा विद्यार्थिवर्ग ही एक बेवारशी चीज होऊन बसली आहे. कोणींहि उठावें व विद्यार्थ्यांना बेजबाबदार, आळशी, अभ्यासचुकार, बेशिस्त म्हणावें. “ आमच्या काळीं आम्ही असें करीत नसू. आम्ही नियमानें अभ्यास करीत असूं. लेक्चर्स कधीं बुडवीत नसूं. प्राध्यापकांना भिऊन व त्यांचा मान राखून असूं. पण आतांचे विद्यार्थी पाहा. प्राध्यापकांना अरेतुरे म्हणायला कमी करीत नाहींत. पेपर कठीण निघाले कीं संप कर, परीक्षेवर बहिष्कार टाक, फीवाढ झाली तर मोर्चा काढ, दंगल नि धोपे माजव असले धंदे करतात. पण अभ्यास व्यवस्थित करतील तर शपथ. किंबहुना क्रमिक पुस्तक एकदांसुद्धां वाचण्याचे श्रम न घेतां, गाईड वाचून, दहा वर्षांच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अंदाज घेऊन किंवा परीक्षकांच्या वैयक्तिक आवडीनावडीचा तलास लावून किंवा परीक्षकांच्या डोळ्यांत धूळ फेकून पास व्हायला बघतात. खरोखरी, विद्यार्थिवर्गाची एवढी अधोगति आतांपर्यंत कधीं झाली नव्हती. ” अशा तऱ्हेचे उद्गार आपण हरघडीं ऐकतों.

प्रत्येक पिढीला असेंच वाटत असतें कीं आपण चांगले होतों पण पुढची पिढी बिघडलेली आहे. दोन पिढ्यांमध्यें असा सतत संघर्ष व सहानुभूति-शून्यता असणें अपरिहार्य आहे का ? उगवती पिढी ही तरी आमच्याच रक्तामांसाची आहे ना ? या पिढीची जोपासना व संगोपन आम्हींच केलें ना ? ही पिढी खरोखरीच बिघडलेली आहे का ? व असलीच तर ती

आमच्याच छत्राखालीं वाढविली असल्यामुळें तो दोष कांहीं अंशानें आमच्याच पदरीं येत नाहीं का? असे नाना प्रकारचे विचार मनांत येतात.

**स्नेहपूर्वक मार्ग दाखवा**

ज्या वेळीं आपण हल्लींच्या पिढीचें मूल्यमापन करतों त्या वेळीं आम्ही त्यांना निकष लावतो तो मात्र आमच्या वेळच्या परिस्थितीचा. समाज हा गतिमान् आहे, परिस्थिति बदलत राहते व बदलत्या परिस्थितीचा परिणाम त्या परिस्थितींतून बाहेर पडणाऱ्या व्यक्तींच्या वृत्तींत व आचरणांत प्रतीत होत असतो. हें ध्यानांत घेतलें तर आमच्या विद्यार्थ्यांच्या चांगल्या-वाईट वर्तनाचा कार्यकारण संबंध लक्षांत येईल. मानसशास्त्राचा नियम असा आहे कीं कोणत्याहि मानसिक विकृतीचें मूळ कारण शोधून काढलें तर ती विकृति सहज दूर करतां येते. पण कारणच जर न समजलें तर ती विकृति दूर करणें शक्य नाहीं. म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनाशीं समरस होऊन त्यांच्या आकांक्षा काय आहेत, त्यांच्या अडचणी काय आहेत व त्यांची खरी व्यथा काय आहे हें समजून घेणें जरूर आहे. वडील या नात्यानें आज सत्ता आपल्या हातीं आहे म्हणून मुस्कटदाबी झालेल्या तरुणपिढीला दोष देत न सुटतां त्यांचा आज आपण विश्वास संपादन करून घेतला पाहिजे, व ‘ प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ’ या सुभाषिताप्रमाणें मित्रभावनेनें त्यांच्या अडचणी दूर करण्याचा शक्य तो प्रयत्न केला पाहिजे. मागील पिढी व पुढील पिढी या कांहीं दोन वेगवेगळ्या पायऱ्या नाहींत, तर तो एकसंध मार्ग आहे. त्यावरून मानवजात हा महापुरुष प्रगतीचा मार्ग आक्रमीत आहे. हा मार्ग आक्रमीत असतां एक व्यक्ति पडते तर दुसरी लगेच तिची जागा घेऊन चालूं लागते. मानवजातीचा हा अखंड खटाटोप चालू आहे. त्यामध्यें पुढच्यानें मागच्यास स्नेहपूर्वक मार्ग दाखवून देणें हेंच उचित आहे.

सध्यांच्या विद्यार्थिवर्गावर जे आरोप केले जातात त्यांपैकीं कांहीं सुरुवातीस दिले आहेत; व ते अर्धसत्य या दृष्टीनें अगदींच कांहीं निराधार नाहींत.

तरीपण सहानुभूतिपूर्वक विचार केल्यास असें दिसून येईल कीं, सामान्यत: आजचे विद्यार्थी एका विशिष्ट परिस्थितीचे बळी आहेत. पूर्वींच्या पिढींतील विद्यार्थीच ध्येयनिष्ठ, नीतिमान्, उद्योगी व बुद्धिमान् होते व आतांच हे सद्गुण विद्यार्थिजनांमधून लुप्त झाले आहेत असें थोडेंच आहे. वरील गुण आत्मसात् होण्याच्या दृष्टीनें हल्लींच्या परिस्थितींत काय कमी पडतें व काय बदल व्हावयास हवा याचा शिक्षणतज्ज्ञ व शिक्षणाधिकारी यांनीं विचार केला पाहिजे. आजचे विद्यार्थी हे उद्यांचे नागरिक, शासनाधिकारी व नेते व्हावयाचे आहेत; किंबहुना ते देशाच्या भवितव्याचे शिल्पकार आहेत, हें लक्षांत ठेवून त्यांचेबद्दल कमालीची आपुलकी बाळगून त्यांना साहाय्य केलें पाहिजे. असें झाल्यास मला खात्री आहे कीं, विद्यार्थिवर्गाची प्रतिक्रिया-देखील हार्दिक सहकार्याची होईल, इतकेंच नव्हे तर कृतज्ञतेची होईल.

प्रस्तुतच्या लेखांत विद्यार्थी म्हणजे थोडा प्रौढ विद्यार्थी किंवा कॉलेज-विद्यार्थी असें मी धरून चालत आहें. या विद्यार्थ्यांच्या अडचणी तरी कोणत्या व त्यामुळें त्यांची कशी कुचंबणा होत आहे व त्यामुळें त्यांच्या जीवनांत कशी वैफल्याची भावना निर्माण झाली आहे याचा विचार करूं. म्हणजे सध्यांच्या विद्यार्थ्यांच्या ‘ बेशिस्त ’ वागणुकीचें बीज या भावनेंतूनच कसें उगम पावलें आहे तें दिसून येईल.

**मॅट्रिक परीक्षेचें दिव्य**

आज काल मॅट्रिकची परीक्षा इतकी अवाढव्य झाली आहे कीं या परी-क्षेला संबंध प्रांतांतून ९० हजारांचेवर विद्यार्थी बसतात. हे विद्यार्थी वेगवे-गळ्या प्रकारच्या शाळेंत, वेगवेगळ्या परिस्थितींत, वेगवेगळ्या रीतीने शिकविलेले असल्यामुळें या सर्वांना एकच पेपर्स घातल्यावर भिन्न परिस्थितींत झालेल्या त्यांच्या वैयक्तिक बुद्धिविकासाचें योग्य मूल्यमापन या प्रचंड परीक्षेच्या यंत्रांतून होणें कठीणच. यामुळें मॅट्रिकच्या परीक्षेंतून निभावणें हा एक नशिबाचा खेळ होऊन बसला आहे. त्यांतूनहि असामान्य विद्यार्थ्यांना

पास होण्याच्या दृष्टीनें विशेष धोका नसतो. परन्तु जे बहुसंख्य विद्यार्थी सर्व-साधारण बुद्धीचे आहेत, त्यांच्या बाबतींत मात्र पास किंवा नापास या सीमारेषेपाशीं ते कोणत्या बाजूला पडतात हा जीवनमरणाचा प्रश्न होऊन बसतो. तेथें त्यांची कर्तृत्वशक्ति लुळी पडते. गेल्या आठ वर्षांत पासाचे नापास व नापासाचे पास जे विद्यार्थी ठरवले गेले, ज्यांचे पेपर हरवले अथवा घाईनें तपासले गेले त्यांच्या बाबतींत अन्याय झाला नसेल असें परीक्षकही म्हणू शकणार नाहींत. आतां मॅट्रीकच्या परीक्षेच्या दिव्यांतून पार पडलेल्या मुलांची पुढें काय स्थिति होते तें पाहा.

## कॉलेज-प्रवेश

या मुलांना आतां प्रवेश मिळविण्यास अतिशय अडचण पडते. कारण जीं चांगली कॉलेजें आहेत त्यामध्यें मार्कांची कांहीं विशिष्ट टक्केवारी असल्या-शिवाय प्रवेश मिळत नाहीं. या टक्केवारीचें प्रमाण दिवसेंदिवस इतकें वाढत चाललें आहे कीं, त्यामुळें सामान्य मुलांना कॉलेजांत प्रवेश मिळणेंच कठीण होऊन बसलें आहे. मग पाहिजे त्याच कॉलेजांत प्रवेश मिळण्याची गोष्ट दूरच राहिली. एखादे वेळीं शेजारचें कॉलेज सोडून दूरच्या किंवा परगांव-च्याहि कॉलेजांत जाणें भाग पडतें. प्रथम हीं मुलें शास्त्रीय शाखेंत प्रवेश मिळविण्याची खटपट व तीहि असतील त्या सगळ्या कॉलेजांत करतात, व प्रवेश न मिळाल्यास इच्छा व आवड नसतांनाहि साहित्य शाखेकडे प्रवेश मिळवतात. पण या बाजूस कल नसलाच तर उगाच प्रवेश मिळवून सारखी असमाधानी राहतात. सायन्सची आवड असली तरी नावडते भाषाविषय घेऊन शिक्षण चालू ठेवतात. पैशापरी पैसा व श्रम खर्च करून हवें तें शिकायला न मिळालें तर किती वैताग येत असेल बरें! शिवाय अशा वैतागामुळें या बाजूला यश मिळण्याचा संभव कमीच.

ज्या विद्यार्थ्यांना कोठेंच प्रवेश मिळाला नाहीं किंवा ज्यांना विश्वविद्या-लयीन शिक्षण घ्यावयाची इच्छा नाहीं किंवा घेणें परवडत नाहीं

त्यांना व्यवसायमार्गदर्शनाचा आपलेकडे बराच अभाव आहे. अर्थात् 'एस्. एस्. सी. झाल्यावर पुढें काय?' अशा सदराखालीं दर मॅट्रिकच्या निकालानंतर लेखमाला येतात व थोडेबहुत मार्ग दाखवले जातात; पण हे सर्वच मार्ग खुले नसतात व अनेक कारणांस्तव फारशा मुलांना त्यांचा फायदा घेतां येत नाहीं, असा अनुभव आहे.

अशा प्रकारें दरवर्षी मॅट्रिक नापास झालेलीं किंवा पास होऊनहि कोठेंहि प्रवेश न मिळवूं शकलेलीं असंख्य सामान्य मुलें निराशेच्या गर्तेत पिचत पडलेलीं आहेत. कांहीं विद्यार्थ्यांना एखाद्या विषयाची अजिबात आवड नसल्यामुळें इतर विषयांत चांगली प्रगति असूनहि ते मॅट्रिक होऊं शकत नाहींत. एक बाहेरगांवचा विद्यार्थी टेक्निकल विषय घेऊन मॅट्रिकला बसून नापास झालेला मला माहीत आहे. हा मुलगा टेक्निकल विषयांत अत्यंत हुषार असून त्या विषयांत पहिल्याच प्रयत्नांत त्याला खूप मार्क व सूट (एक्झेम्शन) मिळाली. परंतु दर खेपेस भाषा विषयांत नापास होऊन तो तीनदां मॅट्रिकला बसूनहि नापास होतो. मॅट्रिक झाल्यावांचून तर सर्व शिक्षणांचे व बहुतांशीं नोकऱ्यांचेहि मार्ग बंद! आईबापांनीं आज या मुलांचें करायचें तरी काय?

## धंदेशिक्षण पाहिजे

आपल्याकडे धंदेशिक्षणाच्या सोयी उपलब्ध नाहींत. धंद्यांची शास्त्रीय पद्धतीवर रचना केलेली नाहीं. त्यामुळें या शिक्षणाला दर्जा नाहीं व त्यामध्यें उच्च शिक्षण घेण्याची शक्यता नाहीं. म्हणून आज आपल्याकडे धंद्याची वाढ होत नाहीं. धंदे नाहींत म्हणून धंद्याचें शिक्षण नाहीं. शिक्षण नाहीं म्हणून कारागीर नाहींत असें हें दुष्टचक्र आहे. सामान्य मुलांच्याबद्दल असें म्हटले जातें कीं मॅट्रिक झालेले सर्वच विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यास लायक असत नाहींत. कॉलेजांत नालायक विद्यार्थ्यांचा भरणा फार होतो म्हणून कॉलेजांत प्रवेश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांवर संख्यानियंत्रण असावें असें युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशनचे अध्यक्ष म्हणतात. पण प्रवेश न मिळालेल्या

विद्यार्थ्यांनीं दुसरें काय शिकायचें ? मॅट्रिक झालेल्या १६–१७ वर्षें वयाच्या कोवळ्या मुलाला पुढें शिकण्याची आवड व शक्यता असूनहि दुसरें कांहीं शिकण्याचे मार्ग त्याला उघडे नाहींत, म्हणून तो कॉलेजांत जाऊं पाहतो. इतर शिक्षणाचे मार्ग उघडे असते तर तो कॉलेजांत जाऊं पाहणार नाहीं व कृत्रिम संख्यानियंत्रणाची कॉलेजांना गरज भासणार नाहीं. मॅट्रिकच्या दोन वर्षें आधींच इतर विषयांची किंवा तंत्रविद्येची किंवा हस्तव्यवसायाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना धंदेशिक्षणाचे विविध मार्ग खुले करून देणें हा एकच याला उपाय आहे.

## डिग्री मिळाल्यावर

आतां ज्यांना कॉलेजांत प्रवेश मिळाला त्या भाग्यवंतांचें पुढें काय होतें तें पाहूं. दोन वर्षांनीं इंटर सायन्स झाल्यावर पुन्हा त्यांचेसमोर एक संकट वाढून ठेवलेलें असतें. कारण, बऱ्याच उच्च विद्याभ्यासांना इंटर सायन्सनंतर प्रवेश मिळवायचा असतो. युनिव्हर्सिटीच्या परीक्षांचा निकाल मॅट्रिकइतका नसला तरी साधारणतः नशिबाचा खेळच असतो. अगदीं वरच्या विद्यार्थ्यांना हव्या त्या अभ्यासक्रमांना——विशेषतः स्थापत्यशास्त्र व वैद्यकशास्त्र—प्रवेश मिळतो. पण इतरांना पुन्हा नाकेबंदी व मग निदान एखादी पदवी असावी म्हणून कोणतेतरी विषय घेऊन बी. एस्सी. व्हायचें किंवा साहित्यशाखेंतील विद्यार्थी कोणी बी. ए. तर कोणी बी. कॉम् वगैरे होतात. ‘ अशुभस्य कालहरणम् ’ या नियमाप्रमाणें डिग्री मिळेपर्यंत वेळ काढला पण पुढें काय हा दुष्ट प्रश्न आतां टाळणें शक्य नाहीं.

## अभ्यासांतील अडचणी

पहिल्या डिग्रीपर्यंत मजल मारतांनासुद्धां विद्यार्थ्यांची नानाप्रकारें कुचंबणा होत असते. प्राध्यापकांच्या आर्थिक अथवा वैयक्तिक अडचणींचा मी येथें विचार करीत नाहीं. पण विद्यार्थ्यांच्या बाजूनें विचार करतां काय वस्तुस्थिति आढळून येतें तें पाहा. बहुतेक प्राध्यापक ( अपवाद हे

नेहमींच आढळतात) परीक्षेला लावलेला अभ्यासाचा कोर्स वर्गांत पुरा करीत नाहींत. पहिल्या टर्ममध्यें अत्यंत सावकाशीनें शिकवायचें, बरींचशीं व्याख्यानें बुडवायचीं, हुषार विद्यार्थ्यांनीं अभ्यासांतील अडचणी विचारल्याच तर तो भाग परीक्षेला नाहीं असें सांगून त्यांची ज्ञानलालसा दडपून टाकायची, असा प्रकार करतात. दुसरी टर्म अर्धी संपून गेल्यानंतर अत्यंत गडबडीनें उरलेला अभ्यास अर्धामुर्धा संपवायचा, म्हणजे विद्यार्थ्यांना व्याख्यानांत ऐकलेलें समजायला आणि त्याचें अध्ययन व मनन करायला सवडच राहात नाहीं. ही विद्यार्थ्यांची गैरसोय जाणून कांहीं प्राध्यापक शिकवण्या घेतात किंवा वर्ग काढतात. पण कॉलेजचीच फी भरतांभरतां मेटाकुटीस आलेल्या विद्यार्थ्यांनीं ही खासगी शिकवणीची फी कोठून द्यावी ? तसेंच, पुस्तकांच्या किंमती हल्लीं भरमसाठ वाढूं लागल्या आहेत. ज्ञान हें सर्व एकच आहे ही गोष्ट खरी असली तरी प्राध्यापक सांगतील तींच पुस्तकें असतील त्या किंमतींत विकत घ्यावीं लागतात. जास्तींचीं पुस्तकें कॉलेजच्या वाचनालयांतून घेऊन अभ्यास करावा असें एखादा विद्यार्थी ठरवील, तर महत्त्वाचीं पुस्तकें व तींसुद्धां पाहिजे तेवढीं, प्राध्यापकांनीं घरीं नेलेलीं असतात; व पुस्तकें किती दिवसांत परत करायची हा नियम त्यांना कधींच लागू नसतो. विद्यार्थ्यांना मात्र एका वेळीं एक पुस्तक मिळण्याची मारामार व एखाद दिवस अधिक ठेवल्यास दंड ! कित्येक विद्यार्थ्यांना घरीं अभ्यास करायला निवांत जागा नसते. पुस्तकें पसरायला टेबल किंवा उचलून ठेवायला कपाट नसतें. ही अडचण मुंबई–पुण्यासारख्या शहरांत तर विशेषच जाणवते. कांहीं कॉलेजांत लायब्ररींत अभ्यास करण्याची सवड असते पण ती वेळ व जागा फार मर्यादित असल्यामुळें त्यापासून व्हावा तेवढा उपयोग होत नाहीं. कांहीं विद्यार्थी बाहेरगांवचे असतात. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांत सर्वांनाच जागा मिळत नाहीं. मिळाली तरी ती सोय फक्त सुखवस्तु मुलांनाच परवडण्याजोगी असते. बहुसंख्य विद्यार्थ्यांना राहण्याची फार

अडचण भासते. मोठ्या शहरीं एखाद्या नातेवाइकाच्या टीचभर जागेंत दाटीनें राहावें लागतें. कांहीं विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळें नोकरी करूनच शिक्षण घ्यावें लागतें. या विद्यार्थ्यांचे हाल कांहीं विचारूंच नये. शास्त्रीय शाखेचें शिक्षण तर घेतांच येत नाहीं. नोकरीची वेळ संभाळण्यासाठीं कॉलेजचे कांहीं तास बुडवावे लागतात. विद्यार्थ्यांच्या हजेरीचे नियम इतके कडक आहेत कीं फी भरूनसुद्धां हजेरीचे दिवस अपरिहार्य कारणास्तव न भरतां आले तर टर्म मिळूं शकत नाहीं. या बाबतींत अधिकाऱ्यांची वागणूक असावी तितकी सहानुभूतीची नसते असें दुर्दैवानें म्हणावें लागतें.

### दोष कोणाचा ?

एवढ्या सर्व दिव्यांमधून पार पडून शेवटीं परीक्षा पास झाली म्हणजे या विद्यार्थ्यांना काय वाढून ठेवलेलें असतें तर बहुतांशीं नैराश्यच. या दृष्टीनें गुरुजन विद्यार्थ्यांमध्यें लक्ष घालून त्या वेळीं मार्गदर्शन बहुधा करीत नाहींतच. अशा प्रकारें हवें तें शिकायला मिळत नाहीं,पुस्तकें मिळत नाहींत, अभ्यासाला जागा नाहीं, फी द्यायला पैसा नाहीं, भवितव्याची गुरुजनांना काळजी नाहीं, असा हा उपेक्षित विद्यार्थिवर्ग जीवनाच्या उंबरठ्यांतच निराश, खचलेला व कडवट झाल्यास नवल काय ? सुशिक्षितांची बेकारी हें आपल्या शिक्षणपद्धतीला एक आव्हानच आहे. ज्या शिक्षणाच्या योगें विद्यार्थ्याला नेकीनें अर्थार्जन करून मानाचें जीवन जगतां येत नाहीं त्या शिक्षणांत कोठेंतरी चुकत आहे असेंच म्हणावें लागतें. शिक्षणाचें संपूर्ण ध्येय जरी अर्थोत्पादन नसलें तरी अर्थोत्पादनक्षमता शिक्षणाच्या ध्येयांतील एक भाग खास आहे. यामुळें विद्यार्थिवर्गाचा शिक्षणसंस्थांवरील व शिक्षकांवरील विश्वास उडालेला आहे. या विद्यार्थ्यांना आपल्या गुरुजनांबद्दल आदर व प्रेम कसें वाटेल ? आणि मग त्यांच्या आवांक्यांत असेल त्या मार्गानें ते जर आपल्या असंतोषाला वाट करून देऊं लागले तर त्याबद्दल सर्वस्वीं त्यांना दोष कसा देतां येईल ?

विद्यार्थिजीवनांत विद्यार्थ्यांना नाना प्रकारच्या अडचणी येत असतात. त्यांपैकीं आर्थिक, कांहीं प्रासंगिक, कांहीं कौटुंबिक तर कांहीं बौद्धिक अशा असतात. या अडचणींचें निराकरण करण्याचा कोणताच मार्ग त्यांना उपलब्ध नसतो. त्यांचीं गाऱ्हाणीं शिक्षणाधिकाऱ्यासमोर मांडण्याची शक्यता नसते, हातांत काडीची सत्ता नसते. अशा रीतीनें सर्व तऱ्हेच्या कुचंबणेंत वाढलेला विद्यार्थी जीवनांत एकाएकी कार्यक्षम व आत्मविश्वासी कसा होणार ? आपल्या शिक्षणांत फक्त पुस्तकी ज्ञान मिळतें, पण जीवनोपयोगी शिक्षण मिळत नाहीं. यामुळें शिक्षणसंस्था म्हणजे विद्यार्थ्यांना कोंडवाडा किंबहुना तुरुंग झाल्या आहेत. त्यांच्या रसरसणाऱ्या क्रियाशीलतेला त्यांत स्थान नाहीं. अशा प्रकारें सहानुभूतिशून्य वातावरणांत वाढलेल्या व अनेक प्रकारें त्रस्त आणि कुंठितमति झालेल्या विद्यार्थ्यांना कोणी वाली नाहीं. आई-वडील मुलाच्या अडचणी दूर करण्यास असमर्थ, प्राध्यापकवर्ग उदासीन व शिक्षणाधिकारी निद्रिस्त अशा परिस्थितींत हे विद्यार्थी बेशिस्त न होतील तर काय होईल ? अर्थात् प्रत्येक विधानाला अपवाद असतातच. त्याप्रमाणें कांहीं विद्यार्थी उथळ, बेजबाबदार व आळशी असतील, नाहीं असें नाहीं. पण विद्यार्थिवर्गाला काय पाहिजे हें जाणून घेतलें पाहिजे. त्यांना कमालीचा उत्साह आहे, आकांक्षा आहेत, उतू जाणारी कर्तृत्वशक्ति आहे. तारुण्यसुलभ ध्येयवादी वृत्ति आहे. पण त्यांच्या सर्व शक्ति व प्रवृत्ति चिरडल्या जात आहेत. त्यांना संधि मिळत नाहीं. जर योग्य संधि दिली तर ज्यांना आपण आळशी म्हणत होतों तेच विद्यार्थी कमालीचे उद्योगी आढळून येतील; ज्यांना बेशिस्त म्हणत होतों ते शिस्तीसाठीं प्राण पणास लावतील. पण 'योजकस्तत्रः दुर्लभ':, विद्यार्थिवर्गाची सुप्त शक्ति कशी जागृत करावयाची हें आम्हांला कळलेलेंच नाहीं.

ॐ ॐ ॐ

१४

# एस्. एस्. सी. विद्यार्थ्यांनीं करावें तरी काय ?

मॅट्रिकच्या परीक्षेचा नुकतांच निकाल लागला असून, त्या दिव्यामधून पार पडलेलीं कित्येक होतकरू मुलें यापुढें तरी समाधानाचा निःश्वास टाकून पुढील शिक्षणाचीं स्वप्नें पाहूं लागतात, तोंच वर्तमानपत्रांतून एक धक्का देणारी बातमी वाचावयास मिळाली. ती ही कीं, या वर्षापासून मुंबई विद्यापीठानें त्याला संलग्न झालेल्या सर्व कॉलेजांमधून विद्यार्थ्यांच्या प्रवेशसंख्येवर नियंत्रण घातलें आहे ही होय. मुंबईच्या कांहीं कांहीं कॉलेजांत तीन हजारांवर विद्यार्थी शिकत होते. आतां या नवीन नियंत्रणाप्रमाणें प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांच्या संख्येवर दरवर्षी क्रमशः नियंत्रण घालून, पांच वर्षांअखेर प्रत्येक कॉलेजांत अडीच हजारांहून अधिक विद्यार्थी असणार नाहींत अशी ही पंचवार्षिक योजना आहे. अर्थात् या वर्षी विलेपार्लें येथें एक नवीन कॉलेज निघत आहे. त्यामुळें ही प्रवेशबंदी जरी फार जाचक झाली नाहीं तरी तसें जाणवल्याशिवाय खास राहणार नाहीं. या परिस्थितीवर व त्यावरील उपाययोजनेवर कांहीं विचार प्रस्तुत लेखांत मांडण्याचें ठरविलें आहे.

### हेतु स्तुत्य, पण...

वरील प्रकारचे प्रवेशसंख्या-नियंत्रण घालण्याचे दोन हेतु सांगण्यांत आले आहेत. एक म्हणजे विद्यार्थ्यांची संख्या कमी करून शिक्षक व विद्यार्थी यांमधील वैयक्तिक संबंध अधिक निकट करावे व शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे

व्यक्तिशः लक्ष देतां यावें हा होय. दुसरा म्हणजे शिक्षणाचा दर्जा खालावला आहे अशी सध्यां हाकाटी होत आहे तो दर्जा सुधारावा हा होय.

वरकरणी हे हेतु अगदीं सयुक्तिक वाटतात व त्या दृष्टीनें उपाययोजना हातीं घेणें हा मोठा स्तुत्य उपक्रम वाटतो. परंतु मला असें सांगावयाचें आहे कीं, वरील योजनेप्रमाणें कॉलेजमध्यें क्रमशः प्रवेशनियंत्रण केल्यास अनेक गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांवर अन्याय होणार आहे, व शिक्षणप्रसाराचे-ऐवजीं शिक्षणबंदीचें आडमुठें धोरण अवलंबिल्याचा दोष विद्यापीठ चालकांच्या माथीं येणार आहे.

## सदोष पद्धतीचा परिणाम

कॉलेजांचे चालक तरी प्रवेशनियंत्रण कसें अमलांत आणणार व प्रवेशाच्या बाबतींत कोणतें गमक लावणार तर विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकच्या परीक्षेंतील मार्कांच्या बेरजेवरूनच त्यांना प्रवेश देणार. कांहीं कॉलेजांत मुलांची मुलाखत घेण्याची पद्धत आहे. पण ही मुलाखत नाममात्र असते. वरच्या बेरजेप्रमाणें मुलें घ्यावयाचीं हीच पद्धत सरसहा चालू आहे. परंतु जोंपर्यंत आपली मॅट्रिकची परीक्षापद्धति सदोष आहे तोंपर्यंत त्या परीक्षेंतील मार्कांच्या बेरजेवर सर्वस्वीं अवलंबून राहण्यानें आधींच फार मोठा अन्याय होत आहे; त्यांतून संख्यानियंत्रण केल्यास प्रवेश देण्याबाबत इतर अनेक दोष निर्माण होण्याचा संभव आहे. पैसा, वशिलेबाजी इत्यादि प्रकारांना ऊत येऊन गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांना कॉलेजच्या शिक्षणाचा मार्गच बंद होण्याची शक्यता आहे. यामुळें व्यक्तिशः विद्यार्थ्यांचें तर नुकसान होईलच, परंतु कित्येक बुद्धिमान् विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला देश मुकेल अशी भीति वाटते. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून शिक्षणाचें महत्त्व लोकांना पटत आहे. अशा वेळीं अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करणें तर दूरच राहिलें पण आहे त्या संख्येंत घट केल्यानें शिक्षणप्रसारावर अनिष्ट परिणाम होणार आहे व शिक्षण ही एका लहान व सधन वर्गाची मिरासदारी होणार आहे.

## शिक्षणासाठीं अधिक खर्च करणें आवश्यक

मग प्रश्न असा उद्भवतो कीं, संख्यानियंत्रणाचीं वर जीं दोन कारणें सांगितलीं त्यावर दुसरी कोणती उपाययोजना करावी ? विद्यार्थ्यांकडे व्यक्तिशः लक्ष देतां यावें म्हणून प्रत्येक शिक्षकामागें विद्यार्थ्यांचें प्रमाण कमी असावें यासाठीं विद्यार्थ्यांची संख्या कमी करण्याऐवजीं शिक्षक वाढवावे व संस्था वाढवाव्या हाच विधायक उपाय ठरूं शकेल. पण या उपायाबाबत ठराविक उत्तर म्हणजे पैशाची टंचाई. संख्यानियंत्रण केल्यास खाजगी कॉलेजांना प्राध्यापकांचे पगार परवडणार नाहींत. फीचें उत्पन्न हेंच संस्थांचें मुख्य उत्पन्न असल्यानें शिक्षकांमागें विद्यार्थ्यांचें प्रमाण कमी केल्यास खाजगी संस्थांना खूपच मोठ्या प्रमाणांत आर्थिक मदत करावी लागेल. परंतु शिक्षणप्रसाराकरितां अशी मदत करणें हें सरकारचें आद्यकर्तव्य ठरतें. देशाच्या विकासांत शिक्षणाला आद्य स्थान—फर्स्ट प्रायॉरिटी—देणें जरूर आहे. आज रशियामध्यें शिक्षणाला असें आद्यस्थान आहे. म्हणून शास्त्रीय प्रगतींत रशियानें इतका उच्चांक गांठला आहे कीं, अमेरिकेंतील लोकही खडबडून जागे होऊन आज आपल्या शिक्षणव्यवस्थेंत कांहीं चुकतें आहे कीं काय याचा विचार करूं लागले आहेत तेव्हां सद्यःपरिस्थितींत विद्यार्थ्यांचें प्रवेशनियंत्रण न करतां संस्था व प्राध्यापक वाढवून त्यानिमित्तानें वाढलेला खर्च सरकारनें सोसणेंच योग्य आहे. जर्मनीमध्यें तर विद्यापीठाचा सर्व खर्च सरकारमार्फत होतो व असें असूनही विद्यापीठाचें बौद्धिक स्वातंत्र्य ( ॲकॅडेमिक फ्रीडम ) अबाधित ठेवण्यांत आलेलें आहे; इतकेंच नव्हे तर शालान्त परीक्षा पास झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेंत प्रवेश मिळण्यास कोणतीच आडकाठी असत नाहीं. मग तें वैद्यकशास्त्र असो, स्थापत्यशास्त्र असो, कायदेशास्त्र असो वा कोणतेंहि असो. ही परिस्थिति हिंदुस्थानांत मात्र कां असूं नये ? टक्केवारीनें पाहतां आधींच लहान प्रमाण असलेल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मार्गांत अडचणी उपस्थित केल्यास देशाची प्रगति होणार तरी कशी ?

## दर्जा सुधारा

संख्यानियंत्रणामागील दुसरा हेतु शिक्षणाचा दर्जा सुधारणें असा सांगण्यांत आला आहे. केवळ प्राध्यापकामागें कमी विद्यार्थी देण्यानेंच शिक्षणाचा दर्जा सुधारेल ही कल्पना चुकीची आहे. अर्थात् त्यामुळें थोडी मदत होईल ही गोष्ट खरी. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठीं आणखी अनेक गोष्टींची गरज आहे. त्यांपैकीं एक शिक्षणपद्धतींत सुधारणा ही आहे. परीक्षापद्धतींत सुधारणा ही दुसरी गोष्ट आहे. विषयाचें अध्ययन चांगल्या प्रकारें होण्यासाठीं श्रवण, मनन व निदिध्यास या तिन्हींची गरज आहे. यामध्यें मनन व निदिध्यास यासाठीं विद्यार्थ्यांना अनुकूल वातावरण व साधनें हवींत; व तींहि हल्लींच्या धकाधकीच्या काळांत विद्यार्थ्यांना मिळत नाहींत तेव्हां शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या प्रश्नाचा अनेक बाजूंनीं विचार करावयास हवा. त्यावरील उपाययोजनाहि अनेक बाजूंनीं व एकसमयावच्छेदेंकरून करावयास हवी. त्यांपैकीं कांहीं उपाय अंमलांत आणण्यास अधिक पैशाची गरज लागेल तर कांहीं अमलांत आणण्यासाठीं शिक्षणासंबंधींचा तात्त्विक दृष्टिकोण बदलावा लागेल. पण प्रस्तुत लेखाचा हा विषय नव्हे.

पुष्कळदां असें म्हटलें जातें कीं, विद्यापीठांत येऊं पाहणारे सर्वच विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्याच्या लायकीचे नसतात. ते उगाच हेतुशून्य शिक्षण घेत राहतात व अशा तऱ्हेने पैसा व आयुष्याचा काल फुकट घालवतात. तेव्हां संख्यानियंत्रणानें अशा विद्यार्थ्यांना वेळींच उच्च शिक्षणापासून परावृत्त केलें जाईल. वरवर हा युक्तिवाद मोठा समर्पक वाटतो. पण ज्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची आवड नाहीं तेसुद्धां कॉलेजमध्यें जाण्यासाठीं धडपडतात याचें कारण तरी काय ? त्यांना तरी ज्याची आवड नाहीं तें शिकण्याची, नापास होण्याची, पैसा व वेळ फुकट घालवण्याची हौस आहे कां ? नाहीं. पण १५–१६ वर्षांचे सुमारास मॅट्रिक झाल्यावर एवढ्या लहान वयांत शिक्षण

थांबवायाचें तरी कसें व न थांबवावें तर इतर शिक्षणाचे मार्ग त्यांना उपलब्ध आहेत तरी कोठें ? अर्थात् मॅट्रिक झाल्यावर इतर अभ्यासक्रमांचे थोडेबहुत जे मार्ग आहेत त्यांची माहिती मुंबईच्या व्यवसाय-मार्गदर्शन-केंद्रांत मिळते. पण टक्केवारीवरून पाहतां या मार्गानें फारच थोड्या मुलांची सोय होऊं शकते. बहुसंख्य मुलें विद्यापीठीय पुस्तकी शिक्षणाच्याच मार्गानें जाऊं पाहतात. याचें कारण धंदेशिक्षण व तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था आपल्या देशांत अत्यंत अपुऱ्या आहेत किंबहुना कित्येक धंद्यांच्या शास्त्रीय शिक्षणाची अजिबात सोयच नाहीं. पूर्वापार पद्धतीनें पित्यापासून मुलानें त्याच्या हाताखालीं काम करून करून धंद्याचें कौशल्य प्राप्त करून घ्यावें अशीच परंपरा आहे. हस्तकौशल्यास शास्त्रीय ज्ञानाची बैठक नसल्यामुळें या धंद्यामध्यें कालमानाप्रमाणें प्रगति होऊं शकत नाहीं. या बाबतींत जर्मनी-मधील धंदेशिक्षणाची योजना खरोखरीच अनुकरणीय आहे पण लक्ष देतो कोण ?

## संख्या घटविण्याचा कृत्रिम उपाय नको

विद्यापीठांत प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यांना त्यांच्या आवडीच्या व लायकीच्या इतर शिक्षणक्षेत्रांत वाव मिळाला तर आपोआपच घटेल व ही संख्या अशा तऱ्हेनें घटणेंच योग्य आहे. अमुक एका संख्ये-पर्यंतच प्रवेश द्यावयाचा व इतरांना मज्जाव करावयाचा अशा कृत्रिम उपा-यानें ही संख्या घटविण्याचा प्रयत्न करणें हें सर्वस्वी अन्याय्य व अयोग्य होईल. समाजवादी समाजरचनेंत सर्वांना समानसंधि व समान हक्क मिळणें योग्य आहे. तसेंच लहानथोर, गरीब, श्रीमंत सर्वांना आत्मप्रगतीचा मार्ग खुला असावयास पाहिजे. शिक्षणाला सरकारजवळ पैसा नाहीं म्हणून एका लायक व्यक्तीच्या शिक्षणाचा मार्ग खुंटला असें झाल्यास तो एक मोठाच अन्याय समजला पाहिजे. कृत्रिम संख्या-नियंत्रणामुळें अनेक विद्यार्थ्यांवर ही आपत्ति ओढवणार आहे. पर्यायानें ती देशावरील आपत्ति ठरणार आहे.

म्हणून सध्यां योजिलेल्या क्रमशः संख्या-नियंत्रणामागील जे दोन स्तुत्य हेतु आहेत ते साध्य होण्याकरतां दुसरे कोणते उपाय योजावे याचें थोड-क्यांत दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. हे उपाय तावडतोब अंमलांत आणतां आले नाहींत तर निदान संख्या-नियंत्रण तरी रद्द केल्यास शेंकडों विद्यार्थ्यांची कुचंबणा तरी थांबविल्याचें प्रतीकात्मक श्रेय विद्यापीठास मिळेल अशी आशा वाटते.

卐 卐 卐

१७

# विद्यापीठ-प्रवेशावर नियंत्रण पाहिजे काय ?

आज शिक्षणक्षेत्रांत वरील प्रश्नावर बरीच उलटसुलट चर्चा चालू आहे आणि खरोखरी हा विषय तसाच महत्त्वाचा आहे. दरवर्षी हजारोंच्या संख्येनें विद्यार्थी मॅट्रिकची परीक्षा पास होत आहेत ( व नापासहि होत आहेत. ) या पास झालेल्यांना जर कॉलेजांत प्रवेश न मिळाला तर त्यांनीं करावें तरी काय ? वय १५–१६ च्या सुमाराचें असल्यामुळें जीवनांत पदार्पण करावयाला ही मुलें फार लहान आहेत तसेच अर्थोत्पादनाला समर्थ करण्यासारखें त्यांना कोठलेंहि शिक्षण मिळालेलें नसतें. इतर शिक्षणाचे व व्यवसायाचे फारच थोडे मार्ग उपलब्ध असल्यामुळें जसें शाळेंत एका इयत्तेतून दुसऱ्या इयत्तेंत जायचे तसेच मॅट्रिकनंतर कॉलेजांत जायचे असें ही मुलें धरून चालतात आणि मग या प्रवेशावर जर नियंत्रण घातलें तर त्यांचा प्रगतीचा मार्गच खुंटतो.

अर्थात् मॅट्रिकनंतर तांत्रिक शिक्षणाच्या व इतर कांहीं फारच थोड्या व्यवसायाच्या डिप्लोमा कोर्सेसकडे जाता येते. पण असे मार्ग फारच थोडे उपलब्ध आहेत. इतकेंच नव्हे तर त्यामध्यें प्रवेश मिळविण्यासाठींदेखील इंटरसारख्या वरच्या परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांची स्पर्धा चालू असल्यामुळें नुसत्या मॅट्रिक्युलेटला नियमांत बसत असले तरी प्रवेश मिळविणें दुरापास्त होते. कॉलेज प्रवेशासाठीं बहुसंख्य मुलांची जी धडपड चालू असते ती त्यांना उच्च शिक्षणाची आवड आहे किंवा पात्रता आहे म्हणून नव्हे तर

अर्थोत्पादनक्षम शिक्षण कोणतें, कोठें व कसें मिळेल हें माहीत नसल्यामुळें केवळ कालहरणासाठीं चालू असते. त्यामुळें मुलांचें दुहेरी नुकसान होतें. एकतर तरुण वयांत जरूर नसलेलें शिक्षण घेण्यांत कालापव्यय होतो व दुसरें तें शिक्षण घेण्यांत पैशाचाहि अपव्यय होतो. या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी विद्यापीठप्रवेशांवर मॅट्रिकमध्यें अमुक टक्के मार्क असले पाहिजेत अशा स्वरूपाचें कृत्रिम नियंत्रण घालावें असें मी कधींच म्हणणार नाहीं.

याचीं कारणें दोन आहेत. एकतर आपली परीक्षापद्धती इतकी सदोष आहे कीं ५० टक्के मार्कांची मर्यादा घातल्यास ४९ टक्के मार्क मिळालेल्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळणार नाहीं व ५० टक्केवाल्याला मिळेल; पण मार्क देण्याच्या पद्धतींतील सदोषतेमुळें अशा नियंत्रणानें मोठाच अन्याय होण्याची शक्यता आहे. दुसरें, शिक्षणाचे इतर मार्ग खुले नसल्यामुळें शिक्षणाचा हा एकच मार्ग तरुण विद्यार्थ्यांना बंद करणें असंतोषाला व अन्यायाला कारणीभूत होण्यासारखें आहे. आजच्या लोकशाहीच्या युगांत प्रगतीचा मार्ग सर्वांना खुला असावयास पाहिजे. आज शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचें, मोफत व सार्वत्रिक झाल्यामुळें व लोकशाहींत आपल्या हक्काची जाणीव झाल्यामुळें अधिकाधिक लोक शिक्षणाचा फायदा घेतील व ही योग्य अशीच गोष्ट आहे. तरी पण त्या शिक्षणामुळें त्यांच्या काळाचा व पैशाचा अपव्यय न होता, त्यांची आवड, पात्रता व बुद्धिसामर्थ्य यांच्या अनुरूप त्यांचा विकास होण्याला त्यांना संधि मिळाली पाहिजे. नाहींपेक्षां नैराश्य, असमाधान व अन्यायाची जाणीव यामुळें लोकशाहीचा पाया डळमळीत होण्याची भीति निर्माण होईल.

## शिक्षणाचे तीन टप्पे

यासाठीं विद्यापीठ-प्रवेशाच्या वाढत्या मागणीवर कृत्रिम नियंत्रण न घालताहि विद्यापीठांतील भाऊगर्दी कमी कशी होईल व त्याचबरोबर जनतेच्या शैक्षणिक आकांक्षा समाधानकारकरीत्या फलद्रुप कशा होतील याचा विचार

करण्याची वेळ आली आहे. यासाठीं शिक्षणाचें जे सामान्यतः टप्पे मानले गेले आहेत त्यांचा उद्देश व कालावधी विचारांत घेऊन सध्यां शिक्षणाची व्यवस्था त्यांना अनुसरून आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे.

शिक्षणाचे तीन टप्पे मानले गेले आहेत. ते म्हणजे प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षण हे होत. यामध्यें सर्वसामान्य नागरिक म्हणवणाऱ्या व्यक्तीला किमान जें शिक्षण मिळणें जरूर आहे त्या शिक्षणाला प्राथमिक शिक्षण असें नांव दिलें जातें. हें साधारणपणें ७ ते ८ वर्षें कालावधीचें असतें. यानंतरचें तें दुय्यम शिक्षण होय.

या शिक्षणाचा उद्देश सामान्य नागरिकाला त्याचे विविध कल व पात्रता लक्षांत घेऊन तसेच समाजाच्या गरजांना अनुसरून त्याला विविध प्रकारचे शिक्षणाचे मार्ग दर्शवून अर्थोत्पादनक्षम करणें व त्याचें शालेय शिक्षण पूर्ण करणें, तसेंच त्याला जीवनांत अर्थार्जन करणारी एक स्वतंत्र व सुसंस्कृत व्यक्ति बनविणें हा आहे. दुय्यम शिक्षणाचें हें ध्येय असावयास हवें, किंबहुना पाश्चात्य देशांत तसें ध्येय आहे. आणि म्हणूनच त्या देशांत दुय्यम शिक्षण हें साधारणपणें १८ ते १९ वर्षें वयाला पूर्ण होतें. दुय्यम शिक्षण हें बहुलक्षी हवें. कारण १४ वर्षें वयाच्या सुमारास सर्वांना सामान्य असें प्राथमिक शिक्षण संपल्यानंतर प्रत्येकाचा वैयक्तिक कल, कुवत व पात्रता या गोष्टींना वाव मिळावयास हवा. यामध्येंच विविध प्रकारचें धंदेशिक्षण, तांत्रिक शिक्षण, व्यापारी शिक्षण, शेतकी शिक्षण व सध्यांचे भाषा व शास्त्र यांचें शिक्षण यांचा समावेश होतो. बहुसंख्य जनतेला दुय्यम शिक्षण हें स्वयंपूर्ण, अर्थोत्पादनक्षम व सुसंस्कारक्षम ठरावयास पाहिजे. दुय्यम शिक्षणाचा हा मूळ उद्देश जर सफल व्हावयाचा असेल तर तें शिक्षण १८ ते १९ वर्षांपर्यंत चालू रहाणें जरूर आहे. त्यामुळें ४ ते ५ वर्षें एखाद्या धंद्याचें शिक्षण व्यवस्थितपणें मिळूं शकेल. तसेंच किशोरावस्था संपलेल्या १८ ते १९ वर्षें वयाच्या मुलाला सरळ उद्योगधंदा किंवा नोकरीला लागता येते. मग त्याला विद्यापीठांत जाण्याची गरज भासणार

नाहीं. तो त्या विद्यापीठाच्या महागड्या शिक्षणाकडे वळणारही नाहीं. यासाठीं आणखीहि एका गोष्टीची गरज आहे. ती म्हणजे सरकारी किंवा खासगी नोकऱ्यांसाठीं विद्यापीठीय पदवी परीक्षेची सरसकट अट असतां उपयोगी नाहीं, ही होय. ज्या व्यवसायांना पदवीपरीक्षेची व्यावहारिक गरज नाहीं त्या व्यवसायांतील नोकरीसाठीं पदवी परीक्षेची अट ठेवण्याचें कारण काय ? पदवीपरीक्षेच्या ज्ञानाचा एरवी कांहीं उपयोग असो वा नसो, ती परीक्षा पास झाल्यास वरची नोकरी मिळते असें ठरल्यास स्वाभाविकपणें मुलांचा विद्यापीठांत जाण्याकडे ओढा निर्माण होतो. या कारणास्तव दुय्यम शिक्षण स्वंयपूर्ण व अर्थोत्पादनक्षम करणें, त्याची वयोमर्यादा १८ ते १९ वयापर्यंत वाढवणें व नोकरी मिळण्यासाठीं सरसकट पदवी परीक्षेची अट काढून टाकणें या तीन गोष्टी अमलांत आणल्यास विद्यापीठाकडचा विद्यार्थ्यांचा ओघ आपोआप कमी होईल. कृत्रिम नियंत्रणापेक्षां असें आपोआप घडलेलें नियंत्रण समाधानकारक व उपकारक ठरेल यांत शंका नाहीं.

आतां वरील सुधारणा घडून आल्यास विद्यापीठांत कोणते विद्यार्थी येतील तर ज्यांना खरोखरी तात्त्विक व शास्त्रीय शिक्षणाची आवड आहे, ज्यांना संशोधन करण्याची आवड व पात्रता आहे, ज्यांची बुद्धि सृजनशील आहे, ज्यांची जगांतील ज्ञानभांडारांत भर टाकण्याची कुवत आहे असेच विद्यार्थी विद्यापीठाकडे वळतील. ज्यांना अशी इच्छा असेल त्यांना जरूर प्रवेश मिळावा. आपली पात्रता असून आपल्याला संधि दिली जात नाहीं असें कोणालाही वाटतां उपयोगी नाहीं. ज्ञानाच्या उपासकाला सृष्टीचें गूढ उकलून घेण्यासाठीं, रात्रींचा दिवस करण्याची तयारी व तळमळ असणाऱ्या असामान्य बुद्धिमान्, विद्यार्थीवर्गाला विद्यापीठाचे दरवाजे सदैव खुले पाहि-जेत. सामाजिक दर्जा, आर्थिक परिस्थिति, राजकीय आंदोलनें यांपैकीं कांहींहि गोष्टी त्याच्या ज्ञानोपासनेच्या आड येतां उपयोगी नाहींत. ही परिस्थिति जेव्हां निर्माण होईल तेव्हांच विद्यापीठांतील बेसुमार गर्दी आपोआप कमी

होईल, विद्यापीठांचा दर्जा सुधारेल व विद्यापीठाचें प्रमुख कार्य जें संशोधन त्याला चालना मिळेल. उच्च शिक्षणाचा हेतु असाच आहे कीं, जे असामान्य बुद्धीचे विद्यार्थी आहेत त्यांच्या बुद्धीला वाव देऊन संशोधन व सुसंस्कृती यांचा समन्वय साधला पाहिजे. सामान्य म्हणजे कमी दर्जाचे या अर्थानें नव्हे तर बहुसंख्य या अर्थानें—विद्यार्थ्यांना १८ ते १९ वर्षांपर्यंत दुय्यम शिक्षण हें सर्व दृष्टींनीं पुरेसें आहे व त्यांना विद्यापीठाला जाण्याची गरज भासणार नाहीं असेंच दुय्यम शिक्षणाचें स्वरूप असावयास पाहिजे.

### व्यवसायाचें शिक्षण

आतांपर्यंत प्राथमिक, दुय्यम ( यांतच धंदेशिक्षण व इतर शिक्षणाचे बहुविध प्रकार आले ) व उच्च शिक्षण यांचा विचार झाला. जे विद्यार्थी विद्यापीठांत जाणार नाहींत व लगेच उद्योगधंद्याला लागतील त्यांना पुढील शिक्षणाचे मार्ग बंद झाले असा अर्थ नाहीं. या लोकांना नोकरी चालू असतांना शिक्षण ( In-Service Training ) देण्याचा एक मार्ग आहे. ज्या व्यवसायांत नोकरी असेल त्या व्यवसायाचें प्रात्यक्षिक शिक्षण तर नोकरीच्या निमित्तानें चालूच असतें. त्या विषयाचें पुढील तात्त्विक व शास्त्रीय शिक्षण देण्याची सोय कामाच्या ठिकाणींच झाली पाहिजे. दोन-तीन वर्षांच्या शिक्षण-क्रमाची परीक्षा घेऊन त्यांना वरचा दर्जा येईल. म्हणजे या परीक्षा सध्याच्या विद्यापीठीय परीक्षेसारख्या केवळ पुस्तकी स्वरूपाच्या न ठरतां त्यांना प्रात्य-क्षिकाची जोड मिळाल्यामुळें अधिक उपयुक्त व कार्यक्षम ठरतील. दुय्यम शिक्षणानंतर नोकरी करणारांना विद्यार्जनाचा दुसरा मार्ग म्हणजे प्रौढ शिक्षणाचा होय. ज्या विद्यार्थ्यांना दुय्यम शिक्षणानंतर व्यवसायांत पडावें लागलें त्यांना जर पुढें कांहीं काळानें अधिक ज्ञानप्राप्ती करून घेण्याची इच्छा असली, किंवा स्वतःच्या व्यवसायाव्यतिरिक्त इतर कोणत्या विषयाची केवळ आवड अथवा छंद म्हणून शिक्षणाची इच्छा असली तर त्यांना प्रौढ शिक्षणाचा मार्ग खुला ठेवलेला असावा. आपल्याकडे प्रौढशिक्षण म्हणजे निव्वळ

साक्षरताप्रसार एवढाच अर्थ उरला आहे. त्याचें कारण उघड आहे. तें हें कीं आपल्याकडे बहुसंख्य जनता निरक्षर आहे. परंतु ज्या प्रगत देशामध्यें अनेक पिढ्यांची शिक्षणाची परंपरा आहे, सर्वसामान्य नागरिक बहुश्रुत आहेत, अशाही देशांत प्रौढशिक्षणाच्या सोयी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. हे प्रौढ विद्यार्थी अनेक प्रकारचे असू शकतात. कांहींना आर्थिक अथवा कौटुंबिक अडचणीस्तव थोड्या शिक्षणानंतर व्यवसायांत पडावें लागलें. त्यांच्यासाठीं विद्यापीठांतील प्राध्यापकांतर्फे त्यांची उच्च शिक्षणाची भूक भागविली जाते. कांहीं विद्यार्थ्यांना आपल्या अर्थार्जनाच्या व्यवसाया-शिवाय इतर विषयांत गोडी असल्यास त्यांनाही त्या विषयाचा उच्च अभ्यास करण्याची संधि मिळते. प्रौढ शिक्षणानंतर मिळवलेलें ज्ञान किंवा एखादें पदवीप्रमाणपत्र यामुळें नोकरींत बढती होतेच असें नाहीं. कांहींना त्याचा आर्थिक फायदा होतोही. पण हें शिक्षण माणसाची अतृप्त ज्ञानलालसा भाग-विण्यासाठीं घेतलें जातें. त्यांचा मुख्य फायदा आर्थिक नसून सांस्कृतिक व आत्मिक आहे. त्यामुळें त्यांचा विद्याव्यासंग हा खरोखरी त्यांच्या ज्ञानाचा दर्जा वाढवणारा आहे. त्यांचा दृष्टिकोन परीक्षार्थी नसतो ही महत्त्वाची गोष्ट आहे.

शिक्षणाचें संकुचित उद्दिष्ट अर्थार्जनक्षमता हें तर आहेच, पण शिक्षणाचीं व्यापक उद्दिष्टें संस्कृतिसंवर्धन, चारित्र्य-संवर्धन, उदार व्यक्तिमत्व हीहि तितकीच महत्त्वाचीं आहेत. याची आज पाश्चात्य देशात जाणीव आहे. म्हणूनच दुय्यम शिक्षणांतहि धंदेशिक्षण, तांत्रिक शिक्षण, व्यापारी शिक्षण, शेतकी शिक्षण किंबहुना उमेदवारांना दिलें जात असलेलें अर्धवेळाचें शिक्षण यांमध्येंही भाषा, धर्म, नागरिकशास्त्र अशांसारखे कांहीं संस्कृती संवर्धनाचे व सामान्यज्ञानाचें विषय या शैक्षणिक कार्यक्रमांत अंतर्भूत असतात. कोणताही शिक्षणक्रम आंखतांना हा दृष्टिकोन सतत समोर ठेवला जातो.

शैक्षणिक अभ्यासक्रम लवचिक असावा. त्यामध्यें प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला व त्याच्या अंगभूत पात्रतेला जास्तींत जास्त वाव मिळावा व जीवनाचें साफल्य झालें असें आंतरिक समाधान प्राप्त व्हावें अशी सोय असली पाहिजे. विद्यापिठांच्या चाकोरींतून प्रत्येकाला जाण्याची इच्छा असतें असें नाहीं. व्यक्ती-व्यक्तीच्या पात्रापात्रता, आवडीनिवडी, कल यांमध्यें परमेश्वरानें विविधता ठेवली आहे. या विविधतेंतच व्यक्तीच्या तसेंच समाजाच्या विविध गरजा भागविण्याचें सामर्थ्य ठेवलें आहे. म्हणून या विविधतेची जोपासना केली पाहिजे, तिला उत्तेजन दिलें पाहिजे, तिला वाव दिला पाहिजे. परमेश्वराच्या सृष्टींत सहकार्यानें वागावयाचें मानवानें ठरवल्यास मानवाचें कल्याण होण्यासारखें आहे.

धंदेशिक्षणांतही प्राविण्य मिळविण्याचें व संशोधन करण्याचें उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम, उदा०, वैद्यक, स्थापत्य, व्यापार, शेतकी, तंत्रविद्या, हे विद्यापीठाच्या कक्षेंत येतात. धंदेशिक्षण हें देखील विविध पातळीवर द्यायला हवें. कारखान्यांत सर्वच डिग्रीवाले इंजिनिअर असून भागत नाहीं. निष्णात कामगार व कारागीर हे तर इंजिनियरांहून मोठ्या संख्येनें हवेत. तसेंच रोगनिवारणार्थ केवळ सर्वच डॉक्टर असून चालणार नाहींत, तर कंपाउंडर, परिचारिका, दाया यांची फार मोठ्या प्रमाणांत जरूर आहे. हेंच इतर धंद्यासंबंधींही म्हणतां येईल. या विविध व्यवसायांत व त्यांच्या पातळीमध्यें कमी अधिक दर्जाचा विचार येतां उपयोगी नाहीं. प्रत्येकानें आपापलें काम उत्तम प्रकारें बजावलें तरच समाजाचा गाडा व्यवस्थित चालेल. म्हणून समाजाच्या गरजा व व्यक्तीची पात्रता विचारांत घेऊन दुय्यम शिक्षण स्वयंपूर्ण व विविध प्रकारचे देण्याची सोय केल्यास व दुय्यम शिक्षणाची वयोमर्यादा १८ ते १९ पर्यंत वाढवल्यास विद्यापीठाकडे जो लोंढा जात आहे त्याला आपोआप आळा बसेल व विद्यापीठप्रवेशावर कृत्रिम बंधन घालण्याची गरज भासणार नाहीं. पाश्चात्य देशांचा अनुभव पाहिल्यास सुमारें ९५ टक्के मुलें

दुय्यम शिक्षणानंतर व्यवसायांत पडतील व साधारणपणें ५ टक्के विद्यापीठाकडे वळतील. या व्यवस्थेमुळें कोणाच्याहि व्यक्तीविकासावर किंवा ज्ञानलालसेवर अन्याय्य दडपण घातल्याच्या दोषापासून विद्यापीठें मुक्त राहतील. लायक व विशेष बुद्धिमान् मुलेंच केवळ विद्यापीठाकडे आकर्षित होऊन विद्यापीठाचा दर्जा वाढेल. प्राध्यापकवर्गाला मुलांकडे वैयक्तिक लक्ष देण्यास सवड मिळेल, संशोधनकार्याकडे अधिक लक्ष देतां येईल व नवीन संशोधनाचीं क्षितिजें आक्रमण करण्याकडे विद्यार्थीवर्गाला प्रवृत्त करतां येईल. असा निवडक, जबाबदार, संयमशील व अभ्यासू वृत्तीचा विद्यार्थीवर्ग विद्यापीठांत आल्यास बेशिस्तीचा प्रश्नच उद्भवणार नाहीं व विद्यापीठेंहि सरस्वतीच्या थोर उपासकांची पवित्र मंदिरें बनतील. विद्यापीठाचें हें चित्र साकार होणें निश्चित व एकसूत्री धोरण आंखून प्रयत्न केल्यास कठीण नाहीं अशी खात्री वाटते.

# १६

# विद्यार्थ्यांची बेशिस्त

'विद्यार्थ्यांची बेशिस्त आणि शिक्षकांची जबाबदारी' हा लेख एका साप्ताहिकांत वाचला. त्याच वेळीं विद्यार्थ्यांची बेशिस्त आणि पालकांची जबाबदारी ही या प्रश्नाची दुसरी व अत्यंत महत्त्वाची बाजू आहे व ती वाचकांच्या निदर्शनास आणून द्यावी हें ओघानेंच प्राप्त झालें. विद्यार्थ्यांसंबंधानें लिहितांना शालेय विद्यार्थी व उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी असे दोन वर्ग करावे लागतील. प्रस्तुत लेखांत शालेय विद्यार्थ्यांचा विचार करण्यांत आला आहे. कारण हेच विद्यार्थी पुढें कॉलेजचे विद्यार्थी होणार आहेत.

## घरांतील वळण व वातावरण

विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीच्या बाबतींत जसे शिक्षक कांहीं अंशीं जबाबदार आहेत, तसेच पालकही जबाबदार आहेत, हें निर्विवाद आहे. या बाबतींत कोणाची जबाबदारी अधिक हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाहीं. दोघांनीं आपापली जबाबदारी ओळखली पाहिजे व पत्करली पाहिजे, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. पण तुलना करायचीच झाली तर मातापितरांची म्हणजेच घरची जबाबदारी अधिक असेंहि म्हणावें लागेल. याचें कारण उघड आहे. एकतर शाळेंत जाण्यापूर्वीं मुलाच्या संस्कारक्षम वयाचा बराच काळ घरांत गेलेला असतो. शाळेंत जाण्यापूर्वींच मुलाचें व्यक्तित्व सामान्यतः ठरून गेलेलें असतें. वागणें, बोलणें, चालणें, स्वच्छास्वच्छतेच्या संबयी या सर्व मूळ धरूनच राहिलेल्या

असतात. अर्थात् त्यांची वाढ व जोपासना यापुढें व्हावयाची असते. याबाबतींत शाळेंतील वातावरण घरांतील वळणाला पोषक हवें व तदनुरुप शाळेंत शिक्षण दिलें जावें. याचबरोबर असें म्हणावें लागेल, कीं मुलांना चांगलें वळण लावण्याच्या शाळेंतील प्रयत्नाला घरचें वातावरण अनुकूल व पोषक हवें. शाळेपेक्षां घरांत मुलांचा वेळ अधिक जातो म्हणून मुलांचे मनावर सुसंस्कार करण्याची जबाबदारी पालकांवर मोठ्या प्रमाणावर पडते. मुलाला शाळेंत घातलें व त्याची फी वेळच्या वेळेवर दिली म्हणजे आपली जबाबदारी संपली असें पुष्कळ पालकांना वाटतें. पण हा भ्रम जितक्या लौकर दूर होईल, तितकें बरें, असें म्हणावेंसें वाटतें. घरांतील अनुकूलतेशिवाय व पूर्व नियोजित सहकार्याशिवाय शाळेंतील प्रयत्न सर्वस्वी व्यर्थ होत.

## नैतिक मूल्यांची जोपासना

गेल्या वर्षी केंद्रसरकारनें मुंबईचे राज्यपाल यांचे अध्यक्षतेखालीं मुलांच्या धार्मिक व नैतिक शिक्षणविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली होती. तिचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला असून तिनें दोन मुख्य शिफारसी केल्या आहेत असें समजतें. पहिली म्हणजे बालवयापासूनच नैतिक व अध्यात्मिक मूल्यांची बुद्धिपुरःसर जोपासना करणें जरूर आहे व यासाठीं शिक्षणसंस्थांमधून धार्मिक शिक्षण देण्याची सोय करावी ही होय. मात्र धर्मांची विविधता हें भारताचें वैशिष्ट्य असल्यामुळें भारतांतील प्रमुख धर्मांचा वस्तुनिष्ठपणें, तौलनिक दृष्ट्या व सहिष्णुतापूर्वक अभ्यास करण्यांत यावा असेंहि सूचित करण्यांत आलें आहे.

## आईबापांनीं आत्मनिरीक्षण करावें !

सूचना चांगली आहे. बालवयापासूनच अध्यात्मिक मूल्यांची जोपासना केली पाहिजे हें खरें आहे व यामध्येंच पालकांचा व घरांतील वातावरणाचा मोठा वांटा येतो. घरामध्यें पालकांनीं स्वतः आर्यवृत्तीनें रहावें, सदाचार पाळावे हें तर जरूर आहेच. पण हल्लींच्या धांदलीच्या जीवनक्रमांतसुद्ध

मुलांना निदान रात्रीं झोपण्यापूर्वीं एकत्र घेऊन मित्रत्वानें विचारविनिमय करणें, चांगल्या पुस्तकाचें सामुदायिक वाचन व रसग्रहण करणें इत्यादि कार्यक्रम करावे. अभ्यासाची प्रगति, दिवस कसा गेला, काय विशेष प्रसंग घडले, कोणाच्या गांठीभेटी पडल्या वगैरे गोष्टींची प्रेमळपणें चौकशी करावी. जरूर वाटल्यास प्रेमाचा सल्ला द्यावा. आज आमचीं मुलें जिव्हाळा, प्रेम व सुरक्षितता याला पारखीं झालेलीं आहेत. आईबाप असून सुद्धां त्यांना मुलांशीं बोलायला फुरसत नाहीं. मग प्रेम करायला किंवा मित्रत्वाचा सल्ला द्यायला तर दूरच राहो, अशी परिस्थिती आहे. आईबाप दोघेही शिकलेले असले, म्हणजे बहुधा दोघेही नोकरीवर किंवा घराबाहेर ! बरोबरीचें नातें म्हणून दोघांमध्येंही सदैव वादविवाद. अशा घरांमध्यें मुलांची मोठी कुचंबणा होते. आपलीं मुलें चांगलीं सत्प्रवृत्त, सदाचारी, शिस्तप्रिय निपजावयाचीं असल्यास आईबापांनीं कठोर आत्मपरीक्षण करून आपलें काय चुकतें याचा विचार करावा व मुलांचें प्रेम आणि आदर संपादन करावयाचा बुद्धिपुरःसर प्रयत्न करावा. तसेंच हें प्रेम व आदर आई आणि वडील या दोघांबद्दल वाटेल याबद्दल एकमेकांनीं खबरदारी घ्यावी. आईवडीलांमध्यें मतभेद असल्यास मुलांच्या लक्षांत येऊं देऊं नये. मुलांचें धार्मिक शिक्षण घरींच व्हावें असें मला वाटतें. आपल्या धर्माचीं मूलतत्त्वें कोणतीं, पौराणिक कथा, सण व आचार कोणते हें आईनें गोष्टीरूपानें मुलांस सांगावें. सण साजरे करतांना त्यांचा इतिहास व गर्भित अर्थ समजावून द्यावा. त्यांतील कोणतें तत्त्व सद्यःस्थितींत आचरणांत आणण्यासारखें आहे हें दाखवून नवा संकल्प करण्यास उत्तेजन द्यावें. अशा प्रकारें ज्याला त्याला आपापल्या धर्माची शिकवण घरीं आईवडिलांकडून मिळणें उचित आहे.

## शाळा व धार्मिक शिक्षण

शाळांमध्यें धार्मिक शिक्षण देण्यांत बऱ्याच व्यावहारिक अडचणी उत्पन्न होण्याचा संभव आहे. एकतर भारतांत बहुधर्मी लोक असल्यामुळें एकाच

धर्माचें शिक्षण देण्याची व्यवस्था करतां येणार नाहीं, करणें इष्ट नाहीं. तसेंच आपली राज्यघटना निधर्मी (Secular) असल्यामुळें सरकारची आर्थिक मदत घेणाऱ्या शिक्षण-संस्थेला विशिष्ट धर्माचें शिक्षण देतां येणार नाहीं. उपरिनिर्दिष्ट कमिटीनें सुचविलें आहे कीं मुख्य धर्मांचा तौलनिक व सहानभूतिपूर्वक अभ्यास करण्यांत यावा. परंतु एकाच धर्माचीं तत्त्वें आत्मसात् करावयास सबंध जन्म पुरत नाहीं, तर शाळेंत जाणाऱ्या कोवळ्या मुलांना अनेक धर्मांचीं तत्त्वें समजणें कठीणच जाईल. बरें, वेगवेगळ्या धर्मांतील वैशिष्ट्यांचीं मार्गदर्शक तत्त्वेंच फक्त एकत्रित करून सांगणें म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचीं सुंदर फुलें खुडून त्यांचा तुरा करून हातीं देण्यासारखें आहे. हा तुरा प्रथम सुंदर दिसला तरी दोन दिवसांतच सुकून जाणारा ठरतो. कारण तीं फुलें त्यांच्या मुळा-पासून खुडलेलीं असतात. याकरितां धार्मिक शिक्षण देण्याचें काम व्यक्तिशः प्रत्येक घरांत दिलें जाणें योग्य ठरेल व शाळांमध्यें नैतिक शिक्षण देणें सोयीचें ठरेल. म्हणजे वेगवेगळ्या धर्मांचीं मुलें शाळांमध्यें नैतिक पातळीवर एकत्र येऊं शकतील. निदान तसा प्रयत्न केला जावा.

**नीतिशिक्षण कसें द्यावें ?**

शाळांमध्येंसुद्धां नैतिक शिक्षण कशा प्रकारें दिलें जावें हा प्रश्न विचार करण्याजोगा आहे. नैतिक शिक्षणांचा वेगळा तास ठेवणें योग्य होणार नाहीं असें शिक्षणतज्ज्ञांचें मत आहे. कारण नीतीची महती गाण्यानें कांहीं नीति आत्मसात् होत नाहीं. अशा शिकवण्याची चेष्टा होण्याचाच संभव फार आहे. तसेंच हा तास घ्यायचा कोणी हा प्रश्न राहील, म्हणून नैतिक शिक्षणाचा स्वतंत्र तास न ठेवतां प्रत्येक शिक्षकानें प्रत्येक घड्यांत व प्रत्येक विषयांत योग्य त्या स्थळीं ओघानें नैतिक मूल्यांचें विशदीकरण करावें. भाषा, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र अशा विषयांत अशी संधि भरपूर मिळण्याची शक्यता आहे. शास्त्रीय विषयांमध्यें निसर्गाची नियमबद्धता, शिस्त व कार्यकारणभाव उठाव-दारपणें रंगवून सांगतां येईल. गणितामधील निश्चितता, एकवाक्यता,

आकड्यांमधील नियम संगती दाखवून दिल्यास गणितविषय मनोरंजकच नव्हे तर शिस्तीचा व सत्याचा मूर्तिमंत दाखला आहे असें दाखवतां येईल. प्रत्येक व्यवहारांत शिस्त पाहिजे, नियमबद्धता पाहिजे, सर्वांचें सहकार्य पाहिजे, उद्योगप्रियता पाहिजे, नाहींतर अराजक माजेल, अंदाज चुकतील, मनुष्य-मात्र गोंधळून जाईल. अशा सर्व गोष्टी शिक्षकाला विषय शिकवतां शिकवतां ओघानें सांगतां आल्या पाहिजेत. ही झाली नीतीचें पुस्तकी शिक्षण देण्याची बाजू. शाळेमधील एकंदर एकमेकांशीं व्यवहार व वागणें हें उच्च नीतिमत्तेचें प्रात्यक्षिक असलें पाहिजे. शिक्षक व मुख्याध्यापक यांचे एकमेकांशीं संबंध, शिक्षकमुलांचे संबंध, मुलामुलांचे संबंध, किंबहुना शाळेशीं संबंधित असलेल्या सर्व व्यक्तींचें एकमेकांशीं संबंध प्रेमाचे, आदराचे व सहकार्याचे ठरले पाहिजेत अशी दक्षता घेतली पाहिजे. शिक्षकांनीं कठोर आत्मपरीक्षण करून मुलांचें प्रेम व आदर संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुलांबद्दल खरोखरी आपुलकी व कळकळ बाळगली पाहिजे. अर्थात् वर्गांत फार मुलें असलीं म्हणजे हें फार कठीण होतें. पण एकंदरींत शिक्षकाची सहानभूतीची वर्तणूक असल्यास निदान शाळेंतील बालकें तरी शिक्षकावर प्रेमाचा वर्षाव करतात, असा माझा अनुभव आहे. शिक्षकानेंच त्या प्रेमाची स्वतःची लायकी संपादन करावयास हवी. शिक्षकाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा शिक्षणसंस्थांनीं व सरकारनें आटोकाट प्रयत्न करणें जरूर आहे. म्हणजे शिक्षकाला खाजगी शिकवण्याची गरज पडूं नये. कारण खाजगी शिकवणी घेत असलेल्या श्रीमंताच्या मुलाला त्या शिक्षकाबद्दल फारसा आदर वाटत नाहीं. वास्तविक ज्यांना मुलांसाठीं खासगी शिक-वण्या परवडतात अशा आईबापांनीं या शिकवण्याऐवजीं शाळेलाच अधिक फी देणें योग्य होईल. अशी योजना मी परदेशांत कांहीं ठिकाणीं पाहिली आहे. असो. या बाबतींत अधिक विवेचन न करतां एकंदरीनें एवढेंच सांगा-वयाचें, कीं नैतिक तत्त्वें आत्मसात् करून शाळेच्या दैनंदिन व्यवहाराची

पातळी उंचावण्याचा शिक्षकांनीं व मुलांनीं प्रयत्न केला पाहिजे. घरांमध्येंही असाच प्रयत्न व विशिष्ट धर्मांची आईवडिलांकडून शिकवण मिळाली पाहिजे. म्हणजे शाळा व घर ही नैतिक शिक्षणाच्या बाबतींत एकमेकांना पूरक होतील व प्रत्येकाला आपल्या मुलांना धार्मिक शिक्षणाचें व्यक्ति-स्वातंत्र्य राहील. तसेंच धार्मिक शिक्षण ही एकाग्रता, मनन व चिंतन करण्याची बाब आहे. शाळेसारख्या सार्वजनिक स्थानापेक्षां घरांतील निवांत कोपरा व निकटवर्ती मंडळींचें मार्गदर्शन याच गोष्टी अधिक अनुकूल होत.

## मुलांसाठीं मातांनीं महत्त्वाकांक्षा दूर ठेवाव्या

कमिटीची दुसरी शिफारस अशी आहे, कीं घरांतील वातावरण अंत-र्बाह्य दृष्ट्या उत्तम राखण्यासाठीं पत्रकें, भाषणें, रेडियो आणि सिनेमा या माध्यमांद्वारें तसेंच स्वयंस्फूर्त संघटनांकडून जरूर ते सर्व प्रयत्न व्हावेत. शाळें-तील प्रयत्नांना जोड म्हणून घरांतील वातावरण उत्तम पाहिजे याबद्दल शंकाच नाहीं. याकरितांच प्रौढ शिक्षणाची योजना आंखावयास हवी. मातृत्वाची कर्तव्यें व जबाबदारी याचा अभ्यासक्रम आंखून मातांना त्याची माहिती करून दिली पाहिजे. मुलें सदाचारी निपजण्यासाठीं आधुनिक मातांनीं स्वतः-च्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा थोडा वेळ बाजूला ठेवून जातीनें मुलांची जोपा-सना केली पाहिजे. जीं मुलें लहानपणीं मातेच्या सहवासाला आंचवतात, तीं नेहमीं प्रेमाला भुकेलीं, अतृप्त व कुढ्या स्वभावाचीं बनतात. म्हणून पाश्चात्यांसारख्या देशांतहि मुलें लहान असतांना मातांनीं शक्य तों नोकरी करूं नये, सार्वजनिक कार्याची हाव धरूं नये असेच विचारप्रवाह दिसतात. मुलें जसजशीं मोठीं होतील, तसतशी मातांना इतर कार्यासाठीं अधिकाधिक सवड मिळूं शकेल. पत्रकें, भाषणें, रेडियो, सिनेमा इत्यादि गोष्टींनीं घरांतील वातावरणावर कितपत परिणाम होईल हें सांगणें कठीण आहे. घरांतील वडील मंडळींना धार्मिक व तत्त्वज्ञानविषयक वाचन व मनन यांच्या द्वारें

सदाचारी जीवन जगण्याची अंःतस्फूर्ति झाली पाहिजे. अशा जीवनापासून प्राप्त होणाऱ्या मानसिक शांतीचें अमोल मोल समजलें पाहिजे. याचा परिणाम मुलांवर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## छडी हवीच का ?

धार्मिक वृत्तीचें पुनरुज्जीवन होण्याची ग्वाही देणारे विचारप्रवाह समाजांत वाहूं लागले आहेत. जर्मनी व अमेरिका, यांसारख्या राष्ट्रांतील मोठमोठे नेतेहि मानवी जीवनांतील अध्यात्मिक मूल्यांची महति वर्णू लागले आहेत. याप्रमाणें घरांतील सांस्कृतिक वातावरण चांगलें असलें, मातापितरांना मुलांबाबत आपल्या कर्तव्याची जाणीव झाली तर शालेय मुलांमधील शिस्तीचा प्रश्न राहाणार नाहीं. मात्र घर व शाळा यांमध्यें सहकार्य हवें. आमच्याच रक्तामांसाचीं हीं निष्पाप बालकें मूलतःच दुष्प्रवृत्तीचीं असतील तरी कशीं ? म्हणून पालकांनीं व शिक्षकांनीं आत्मपरीक्षण करून मुलांना सहानुभूतिपूर्वक प्रेम व वचक ठेवून वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मला एक शिक्षक म्हणत होते. " अहो, मुलें मोठीं आडदांड असतात. त्यांना वेळप्रसंगीं ठोक देण्याची शिक्षकांना परवानगी असल्याशिवाय शाळेंत शिस्त राखणें व मुलांना वळण लावणें शक्य नाहीं. " ही गोष्ट मला पटत नाहीं. मला जो शिक्षणकार्याचा थोडा बहुत अनुभव आहे, तो मला असें सांगत नाहीं. मुलें आडदांड असतात तर भरपूर शारीरिक खेळ, कवायत, बहादुरीचीं व शौर्याचीं कृत्यें करण्याची संधि मुलांस दिली पाहिजे. म्हणजे त्यांच्या रसरसणाऱ्या शारीरिक शक्तींना वाव मिळेल. त्यांच्या ध्येयप्रियतेला व विभूतिपूजा करण्याच्या बालमानससुलभ प्रवृत्तीला त्यांचेसमोर चांगला आदर्श ठेवून योग्य तें वळण व आवाहन दिल्यास त्यांच्या नैतिक विकासाला प्रोत्साहन मिळेल.

## क्रीडांगणाची जरुरी

मुलांच्या मनावर संस्कार घडविणारें घर व शाळा याहून तिसरें क्षेत्र

म्हणजे क्रीडांगण किंवा त्याचे अभावीं रस्ता, गल्ली, घराचें अंगण यांमध्यें शेजारीं, मित्र व सोबती यांची संगत हें होय. याकरितां मुलांना कोणाची संगत आहे, फुरसतीचा वेळ मुलें कशीं घालवतात याकडे पालकांनीं लक्ष ठेवणें जरूर आहे. मुलांना चांगली संगत मिळावी यासाठीं पालकांनीं मुलांचे मित्र निवडण्यास मदत करावी. त्यांचे मित्रांना घरीं अधूनमधून बोलवावें. त्यांच्या आईवडिलांची ओळख करून घ्यावी व दोन्ही कुटुंबांचा घरोबा वाढविण्याचा प्रयत्न करावा. थोडक्यांत म्हणजे शालेय मुलांना चांगलें वळण व नैतिक शिक्षण देण्याचा प्रयत्न घरीं, शाळेंत व घराबाहेर या तिन्ही ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून झाला पाहिजे. या प्रयत्नाचें सुंदर फळ म्हणजे सच्छील, सद्वर्तनी, बलवान् व तेजस्वी प्रजा, म्हणजेच पुढील पिढी होय. शालेय मुलांचें वर्तन सुधारलें तर तींच मुलें पुढें उच्च शिक्षण घेणारीं असल्यामुळें प्रौढ विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीचाही प्रश्न थोड्या फार अंशानें हाताळल्यासारखा होईल.

१७

# शिक्षक-पालक सहकार्याची योजना

एकदां एक अमेरिकन माता एका शिक्षणतज्ज्ञाकडे आपल्या चार वर्षांच्या मुलाला घेऊन गेली व म्हणाली, ' हा चार वर्षांचा झाला तेव्हां आतां याला शाळेंत पाठवून याच्या शिक्षणाला सुरुवात करावी काय ? ' त्या शिक्षणतज्ज्ञानें उत्तर दिलें. ' तर मग याच्या शिक्षणाला आधींच चार वर्षें उशीर झालेला आहे. ' मथितार्थ असा कीं शिक्षणाची सुरुवात जन्मापासून होते. जीवन हीच शिक्षणाची प्रयोगशाळा होय. माता हीच मुलाची प्रथम शिक्षक असून घर ही शिक्षणसंस्था आहे.

शिक्षण म्हणजे निव्वळ लेखन, वाचन व अंकगणित एवढेंच नसून मुलांचा सर्वांगीण, शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकास हेंच होय, हा शिक्षणाचा व्यापक अर्थ आतां सर्वमान्य होऊं लागला आहे. यशस्वी जीवन जगण्याची कला म्हणजेच शिक्षण. नुसत्या पुस्तकी शिक्षणानें जीवन यशस्वी होत नाहीं, याचीं अनेक उदाहरणें दिसतात. पुस्तकी ज्ञान हा शिक्षणाचा केवळ एक भाग आहे. सर्वांगीण शिक्षणामध्यें अनेक इतर गोष्टींचा अंतर्भाव होतो. त्यामध्यें परमेश्वरानें दिलेल्या ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांवर ताबा मिळवून योग्य प्रकारें त्यांचा उपयोग करतां येणें, चांगल्या संवयी लावून घेणें, चांगलें कोणतें, वाईट कोणतें, खरें कोणतें, खोटें कोणतें वगैरे गोष्टींचें तारतम्यानें ज्ञान मिळवता येणें यालाहि शिक्षण घ्यावें लागतें. तान्ह्या मुलाला दृष्टि स्थिर ठेवून पहायला शिकावें लागतें. हातानें एखाद्या वस्तूची पकड घेण्यास

शिकावें लागतें. उठणें, बसणें, चालणें, स्वतःचें हातानें खाणें या सर्व गोष्टी शिकाव्या लागतात आणि म्हणूनच घराच्या शाळेंत मातेच्या मार्गदर्शनाखालीं जन्मापासून मुलाच्या शिक्षणाला सुरुवात होते असें म्हटल्यास चूक तें काय?

मुलांच्या नैतिक शिक्षणालाहि घरांतच सुरुवात होते. आई म्हणते 'भावंडाला मारूं नको, आपल्या खाऊमधील थोडा शेजारच्या मुलाला दे. आपलीं खेळणीं दुसऱ्याला दाखवून किंवा देऊनच खेळांची मजा लूट. घरांत बाळगलेल्या प्राण्यांवर प्रेम कर. मुक्या जनावरांना मुद्दाम त्रास देऊं नको. कपडे जागचे जागीं ठेव. देवाला नमस्कार कर. मोठ्या माणसांना नमस्कार कर.' एक ना अनेक अशा रीतीनें मुलाला नीतिशिक्षण मिळत असतें. स्वच्छपणा, व्यवस्थितपणा, नम्रपणा, मोठ्यांविषयीं आदर, दुसऱ्याचे उपयोगी पडण्याची वृत्ति या सर्व गोष्टींचे धडे घरांतच मिळावयाचे असतात. अशा रीतीनें शिक्षणाचा ओनामा घरींच झालेला असतो. मूल पांच सहा वर्षांचें झाल्यावर त्याच्या शालेय शिक्षणाला सुरुवात होते. अलिकडे पूर्व-प्राथमिक शिक्षण देण्याच्या मॉंटेसोरी, फ्रोबेल, पेस्टालोत्सी वगैरे पद्धतीच्या शाळा निघाल्या आहेत. त्यांत तर दोन-अडीच वर्षांचीहि मुलें घेतलीं जातात व आधीं वर्णन केलेल्या घरांतील शिक्षणासारखाच कार्यक्रम या शाळांत आंखला जातो. हल्लींच्या यांत्रिक युगांत मातांना कमी वेळ, घरांतील जागा लहान, भावंडाचा अभाव अशा परिस्थितींत पूर्वप्राथमिक शाळा ह्या साधारणतः घराचीच प्रतिकृति बनून वरील उणीवा भरून काढीत असतात.

## घराचाच विस्तार

पुस्तकी शिक्षणास मात्र प्राथमिक शाळेमध्यें सुरुवात होते. तेव्हां शाळा हा घराचाच एक विस्तार आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. लहान मुलाचें अनुभवक्षेत्र संकुचित असेपर्यंत आई शिक्षण देतें. मुलाचें अनुभवक्षेत्र

विस्तृत झालें, समाजाशीं त्याचा संबंध येऊं लागला म्हणजे आई त्याला शाळेंत घालते व आपल्या पाल्याचा विकास करण्याची जबाबदारी कांहीं अंशी शाळेवर सोंपवते. तरीपण मुलगा ५-६ तासच शाळेंत असतो. पण त्याचा बराचसा वेळ घरीं जातो. त्यामुळें त्याचें घरांतील शिक्षण संपलें असें केंव्हांहि होत नाहीं. किंबहुना शाळेमध्यें त्याला जें ज्ञान प्राप्त होतें त्याचें प्रात्यक्षिक करण्याची संधि त्याला बहुधा शाळेबाहेरील व घराबाहेरील जीवनांतच मिळत असते. शाळेंतील व घरांतील शिक्षण हें या घराबाहेरील विशाल जीवनाची तयारी म्हणूनच दिलें जात असतें. शिक्षक शाळेंत ज्या चांगल्या गोष्टीं सांगतो, घरीं अभ्यास करावयास देतो, त्याला घरचें वातावरण पोषक पाहिजे. घरच्या मंडळींचें त्याला सहकार्य पाहिजे. शिक्षकानें घरीं करावयास दिलेला अभ्यास मुलगा नियमित करतो याकडे आईनें लक्ष ठेवलें पाहिजे. शाळेंतील नियम पाळले पाहिजेत याला आईची साथ असली पाहिजे. घरांतील माणसांनीं शिक्षकांचा आदरानें उल्लेख केला पाहिजे. त्यांचा एकेरी नांवानें उल्लेख करतां कामा नये. पालकांना शिक्षकाची एखादी कृति जरी आवडली नाहीं तरी मुलांसमोर त्याची वाच्यता न करतां शिक्षकाची भेट घेऊन खुलासा करून घ्यावा म्हणजे बहुधा गैरसमजुतीचाच कांहीं प्रकार होता याची खात्री पटते. त्याचप्रमाणें शिक्षकानेंहि मुलाची वर्तणूक घरच्या पार्श्वभूमीवरूनच समजून घेतली पाहिजे व याकरितां शिक्षक पालकांमध्यें विचारविनिमय होणें जरूर आहे.

**दोन संघटना हव्यात**

एक काळ असा होता कीं मुलाला शाळेंत घातलें कीं आपलें कर्तव्य संपलें असें पित्याला वाटत असे. माता तर शिकलेल्या नसल्यामुळें मुलांच्या शिक्षणांत लक्ष घालीत नसत. फक्त प्रगति-पुस्तकावर कधीं कधीं न पाहतांच सही करावयाची, वर्षअखेर मुलगा नापास झाला तरच शिक्षकांची भेट घ्यावयाची असा प्रकार होता. पण आतां मध्यमवर्गीय माता साधारण तरी

शिक्षित असल्यामुळें त्या मुलांच्या शिक्षणांत थोडें बहुत लक्ष घालूं शकतात. शालेय शिक्षणांतील अनेक गोष्टी पालकांना खटकतात. उदा., क्रमिक पुस्तकें बाजारांत न मिळणें, मुलाला न झेपण्याइतका घरचा अभ्यास, बेसुमार वह्या-पेन्सिली इत्यादि उपकरणें वापरण्याची सक्ती, अभ्यासामध्यें बेसुमार वाढ व त्यामुळें एकाहि विषयांत चांगली प्रगती नसणें, तसेंच नाटक, वक्तृत्व, सहली इत्यादि बहिःशाल कार्यक्रमांची इतकी गर्दी कीं त्यामुळें अभ्याससुद्धां एकाग्र चित्तानें करण्याची मुष्किली. त्यांतच भरमसाट फीवाढ हे व असे अनेक प्रश्न आहेत कीं ज्यांमधून पालकांनीं शिक्षकांच्या व शिक्षकांनीं पालकांच्या अडचणी समजावून घेऊन परस्परांच्या सहकार्यानें व संघटितपणें कांहींतरी मार्ग काढणें जरूर आहे. यासाठीं दोन प्रकारच्या संघटना निर्माण करणें जरूर आहे. एक पालक-संघटना व दुसरी शिक्षक-पालक-संघटना. या दोन्ही संस्थांचें कार्य कांहीं अंशीं भिन्न पण एकमेकांना पोषक असेंच होईल. यांपैकीं नुसत्या पालक-संघटनेची जरुरी काय असें वाटणें साहजिक आहे. त्याचें कारण असें कीं पालक-संघटनेची शिफारस किंवा मागणी ही एका वैयक्तिक पालकाची न होतां सबंध पालकवर्गाची विचारविनिमयानंतर ठरवलेली अतएव प्रातिनिधीक मागणी होईल. तसेंच अनेक विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या एका शिक्षकाला एवढें सर्व विविध विचारसरणीचे पालक व्यक्तिशः भेटण्याची गरज व शक्यता रहाणार नाहीं. एखाद्याच मुलाचा विशेषच कांहीं प्रश्न असल्यास तो पालक शिक्षकांना भेटूं शकेल.

**अमेरिकेंतील संस्था**

अमेरिकेमध्यें युनायटेड पेरेंटस असोशिएशन नांवाची पालकांची खूप मोठी संघटना आहे. त्याचे वीस लाखांहून अधिक सदस्य आहेत. हे पालक मुलांच्या शिक्षणासंबंधीं वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा करून आपलीं निवेदनें शाळाधिकारी, शिक्षणाधिकारी, कायदेमंडळें यांच्यापर्यंत पोंचवीत असतात. तसेंच शाळांच्या इमारती, शिक्षण-साधनें इत्यादि बाबतींतहि शाळांच्या

अडचणी लक्षांत घेऊन शक्य असेल तेथें स्वतःचें वजन खर्च करून जरूर त्या गोष्टी घडवून आणतात. अशा रीतीनें कांहीं वजनदार पालकांचा सर्व संस्थेला व सर्वच मुलांना फायदा होतो. जर्मनीमध्येंसुद्धां प्रत्येक शाळेंत शिक्षक-पालक संघ असतो व कधीं कधीं शिक्षकांच्या बैठकींत पालकसंस्थेचा प्रतिनिधी व पालक-संस्थेंत शिक्षकांचा प्रतिनिधी भाग घेण्यासाठीं बोलाविण्यांत येतो. प्रत्येक शाळेची शिक्षक-पालक संघटना करून या सर्व शाखांची एक मध्यवर्ती संघटना बनवली पाहिजे. म्हणजे या संघटनेला प्रचंड प्रतिनिधित्व व अधिकार प्राप्त होईल व पालकांना आपल्या मुलांच्या शिक्षणाचें मार्गदर्शन योग्य प्रकारें करून घेतां येईल.

**व्यवसाय-मार्गदर्शन**

जर्मनीमध्यें प्राथमिक शिक्षणाच्या आठव्या म्हणजे शेवटच्या वर्षात व्यवसायमार्गदर्शनाची सोय करण्यांत येते. या विषयांच्या एका तज्ञ मनुष्याकडून उच्च शिक्षण न घेणाऱ्या मुलांना त्या वयांत कोणत्या वेगवेगळ्या धंद्यांत शिक्षण घेण्याच्या सोयी आहेत, ते शिक्षण देणाऱ्या संस्था कोणत्या, शिक्षणास कालावधी किती लागतो, खर्च किती येतो, पुढें कोणतें काम मिळण्याची शक्यता आहे, तसेंच त्या धंद्यांत शिरण्यासाठीं कोणती पात्रता अंगीं पाहिजे वगैरे सर्व माहिती पालकांना देण्यांत येते. म्हणजेच पालकांना त्यानंतर मुलांच्या वर्गशिक्षकांशीं विचारविनियम करून मुलाला कोणतें शिक्षण द्यावयाचें तें ठरविण्यास सोपें जातें.

आपल्याकडे क्वचित् थोड्या शाळांत महिन्यांतून एकदां पालकांना बोलवावयाचें किंवा वार्षिक समारंभाला वर्षातून एकदां बोलवावयाचें असा प्रघात आहे; पण शिक्षक-पालक सहकार्याचा अंतिम उद्देश यामध्यें सफल होत नाहीं. आपल्या मुलांना उत्तम शिक्षण मिळावें, त्यांचें जीवन यशस्वी व्हावें, त्यांच्या बुद्धीला व कर्तृत्वशक्तीला संधि मिळावी असें सर्वच आईबापांना वाटतें. आपल्या मुलांबद्दल ज्या आपल्याला प्रेमभावना वाटतात त्याच समाजांतील

सर्व मुलांबद्दल वाटल्या पाहिजेत. कारण व्यक्तीचें हित समाजाच्या हितामध्यें व समाजाचें हित व्यक्तीच्या तसेंच देशाच्या हितामध्यें सामावलेलें आहे. याकरितां मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सामुदायिकरीत्या सहकार्यानें व संघटित रीतीनें सोडविण्याकरितां मुलांच्या भवितव्याचे शिल्पकार असणाऱ्या पालक व शिक्षकवर्गानें संघटनेचें सामर्थ्य पैदा करून बद्धपरिकर झाले पाहिजे.

१८

# शिक्षणाचें माध्यम काय असावें ?

शिक्षणाचें माध्यम काय असावें हा प्रश्न माझ्या कल्पनेप्रमाणें कोणत्याहि दुसऱ्या देशांत उद्भवला नसेल. कारण या प्रश्नाचें उत्तर इतकें सोपें व स्वाभाविक आहे कीं त्याबद्दल शंका निर्माण होणें शक्य आहे असेंहि कुणाला वाटलें नसेल. अर्थात भाषाविषयाच्या बाबतींत मात्र डायरेक्ट मेथड ज्याला म्हणतात ती पद्धती कांहीं शिक्षणतज्ज्ञांनीं पुरस्कारली होती. या पद्धतींप्रमाणें जी भाषा शिकायची तीच भाषा शिकण्याचें माध्यम असावयास हवें. म्हणजे इंग्रजी इंग्रजीमधून शिकावयाचें, फ्रेंच फ्रेंचमधूनच शिकावयाचें. त्यामध्यें इतर भाषेंत भाषांतर होतां उपयोगी नाहीं. पण हा अपवाद सोडून दिल्यास इतर कोणत्याहि विषयांचें माध्यम मातृभाषेशिवाय इतर कोणतें असूं शकेल ही कल्पनाहि कोणा स्वतंत्र राष्ट्राला सहन होणें शक्य नाहीं.

### विद्यापीठाच्या समितीचा अहवाल

आपल्या हिंदुस्थानांत मात्र माध्यमाच्या प्रश्नानें शिक्षणांत धुमाकूळ माजवला आहे. कांहीं दिवसापूर्वीं मुंबई येथें या विषयावर एक परिसंवाद झाला. त्यामध्यें बहुतेक सर्व वक्ते प्राध्यापक होते. नऊ वक्त्यांपैकीं चौघांनीं मातृभाषा माध्यम असावें असें म्हटले व पांचांनी हिंदी असावें असें सांगितलें. यांपैकीं एकानें तर असें म्हटलें कीं हिंदी माध्यम स्वीकारण्यापूर्वीं अजून बरींच वर्षें इंग्रजी हेंच माध्यम रहाणें इष्ट आहे. हा परिसंवाद विद्यापीठाच्या माध्यमापुरताच मर्यादित होता. तरीपण पूर्वविद्यापीठ शिक्षणाच्या माध्यमाचाहि बहुतेकांनीं उल्लेख करून तेंच मत

प्रतिपादिलें. मुंबई विद्यापीठानें या बाबतींत शिफारस करण्याकरितां २३ सदस्यांची एक समिती नेमली होती. तिचा अहवाल बाहेर पडला असून त्याला नऊ सदस्यांनीं भिन्नमतपत्रिका जोडल्या आहेत व तिघांनीं सह्या केलेल्या नाहींत. उरलेल्यांची शिफारस हिंदी माध्यम असावें ही आहे. यावरून शिक्षणतज्ज्ञांत याबाबतींत किती तीव्र मतभेद आहेत हें दिसून येतें.

## वयस्क पुढाऱ्यांचा दृष्टीकोण

हिंदुस्थानांत शिक्षणाचें माध्यम ही एक मोठीच समस्या होऊन बसण्याचीं कारणें काय ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. एक कारण म्हणजे गेलीं दीडशें वर्षें इंग्रजी अंमलाखालीं राहून इंग्रजी माध्यमांतून शिक्षण घेतलेले आपले वयस्क पुढारी इंग्रजीला वाघिणीचें दूध मानूं लागले. शिक्षण व इंग्रजीचें ज्ञान यांचें समीकरण होऊं लागलें. इंग्रजी जाणणारा शिक्षित व इंग्रजी न जाणणारा अशिक्षित असें जवळ जवळ ठरूनच गेलें. आधुनिक शास्त्रीय ज्ञान व शोध इंग्रजीमधून आपल्याला अवगत झालें त्यामुळें इंग्रजीविना ज्ञानाचा दर्जा खालावेल अशी साधार भीति वाटूं लागली. इंग्रजी भाषा ही साधारणपणें आंतरराष्ट्रीय भाषा झाली आहे. साहित्याच्या दृष्टीनें ती एक समृद्ध भाषा आहे ही गोष्ट खरी आहे. इंग्रज लोकांनीं आपल्यावर राज्य केलें म्हणून त्यांच्या भाषेनें कांहीं आपलें घोडें मारलें नाहीं. उलटें आंतरराष्ट्रीय दळणवळणाचा मार्ग आपणास खुला केला हेंहि खरें. या सर्व गोष्टीवरून एक निष्कर्ष फार झाले तर निघूं शकेल कीं ज्याला उच्च शिक्षण घ्यावयाचें त्याला इंग्रजी येणें आवश्यक आहे; पण तें माध्यम असण्याची जरुरी आहे काय ? मेकॉलेनें जेव्हां हिंदी शिक्षणांत इंग्रजी हें माध्यम ठरविलें त्यावेळीं त्याला इंग्रजी लोकांच्या शासनपद्धतीला उपयोगी पडणारे फक्त इंग्रजीच उत्तम जाणणारे कारकून पाहिजे होते. स्वतंत्र बुद्धीचे शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते किंवा संशोधक नको होते. इंग्रजी माध्यम केल्यामुळें हा हेतु पूर्णपणें सिद्धीस गेला. कारण असें शिक्षण घेतलेले लोक इंग्रजी उत्तम लिहावाचायला शिकलें त्याचबरोबर

त्यांचेमध्यें स्वतःच्या मातृभाषेबद्दल अज्ञान व तिरस्कार निर्माण झाला. त्या प्रमाणांत आपल्या संस्कृतीलाही ते पारखे झाले. व इंग्रजी शिकलेल्या लोकांची एक नवीनच जात निर्माण झाली. जन्मानें हिंदी पण आचार, विचार, भाषा, पेहराव, संस्कृती या दृष्टीनें अर्धवट इंग्लिश असे हे लोक झाले. इंग्रजी सत्ता स्थिरावण्यास या लोकांची चांगलीच मदत झाली. आतां प्रश्न असा आहे कीं, हिंदुस्थान स्वतंत्र झाला तेव्हां आतां इंग्रजी भाषेचें या देशांत स्थान कोणतें ? इंग्रजांबरोबर इंग्रजीही सोडावयाची कीं तिचा आपल्या गरजे-पुरता मर्यादित उपयोग करून घ्यावयाचा ?

**हिंदीचें आगमन**

गेल्या पिढीपर्यंत दुय्यम व उच्च शिक्षणाचें माध्यम इंग्रजी हें होतें त्यानंतर गेल्या कांहीं वर्षांत दुय्यम शिक्षणाचें माध्यम मातृभाषा हें मान्य होऊन बऱ्याच अंशीं अंमलांत आलें, पण विद्यापीठांचें माध्यम इंग्रजी हेंच राहिलें आहे. यानंतर बऱ्याच राजकीय उलाढाली होऊन आपल्या घटनेंत चौदा देशी भाषा मान्य करण्यांत आल्या. त्यांपैकीं हिंदी ही राष्ट्रभाषा ठरवण्यांत आली. घटना अमलांत आल्यापासून १५ वर्षांत राज्यकारभारांत इंग्रजीचें स्थान हिंदीला द्यावें असें नमूद करण्यांत आलें. या निर्णयानुसार दुय्यम शाळांतून इंग्रजीचा अभ्यास कमी करण्यांत आला व त्याच्याऐवजी हिंदी व हस्तव्यवसाय शिकविण्यांत येऊं लागले. दुय्यम शाळांतून इंग्रजीचें माध्यम या नात्यानें उच्चाटन झाल्यामुळें मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजांत एक-दम इंग्रजी माध्यम झेपेनासें झालें. तेव्हां उच्च शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न धसास लावण्याची गरज भासूं लागली. विश्वविद्यालयीन शिक्षण समिती ऊर्फ राधाकृष्णन् समितीनें उच्च शिक्षणाचें माध्यम प्रादेशिक भाषा असाव्या अशी शिफारस केली आहे. तरी पण प्रत्येक विद्यापीठ आपापल्या कार्यक्षेत्रापुरता हा प्रश्न सोडवूं पहात आहे. त्यामुळें विद्यापीठांच्या धोरणांत एकसूत्रता राहिली नसून कांहीं विद्यापीठांत फक्त पहिल्या दोन वर्षांपुरतें तर कांहीं

विद्यापीठांत कांहीं विषयांपुरतें देशी भाषा माध्यम तर बाकी सर्व बाबतींत इंग्रजी माध्यम असा वेगवेगळा प्रकार होऊं लागला आहे. कांहींना पाठ्य-पुस्तकांची अडचण भासते, तर कांहींना पारिभाषिक शब्दांची अडचण, तर कांहींना अध्यापकांची उणीव भासते. कांहींना आंतरप्रांतीय व आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीची अडचण भासते. राजकीय, व्यावहारिक व शैक्षणिकदृष्ट्या कोणतें माध्यम इष्ट आहे याबद्दल अजून एकमत नाहीं. अखिल भारतीय स्वरूपाचें धोरण आंखलेलें नाहीं यामुळें शिक्षणक्षेत्रांत अत्यंत गोंधळ माजलेला आहे. अखिल भारतीय स्पर्धा-चांचणीमध्यें वेगवेगळ्या प्रांतांतील मुलांना समान संधि व न्याय मिळूं शकत नाहीं. म्हणून माध्यमाचा प्रश्न शक्य तितक्या लवकर सोडवला गेला पाहिजे व त्या बाबतींत अखिल भारताचें धोरण एकच असलें पाहिजे. या बाबतींत दिरंगाई झाल्यामुळें निदान एका पिढीचें तरी अपरिमित नुकसान होत आहे व त्याचे परिणामहि पुढील पिढीवर झाल्यावाचून राहणार नाहींत हें निश्चित आहे.

## तत्त्व व तपशीलाचा वाद

आपल्या लोकांना एक मोठी वाईट खोड आहे ती म्हणजे तत्त्व मंजूर पण तपशील नामंजूर असें म्हणण्याची होय. खरोखरीं तत्त्व ज्याला मंजूर आहे त्याला तपशील ठरवतां आलाच पाहिजे. नाहींतर ती तत्त्वनिष्ठा बेताचीच असे म्हणावें लागेल. आतां हें तत्त्व तरी कोणतें तर सात हजार मैल दूर असलेल्या इंग्रजी लोकांची भाषा हें आमच्या शिक्षणाचें माध्यम कदापि होणें शक्य नाहीं हें होय. एका शिक्षणतज्ज्ञानें म्हटलें आहे कीं, No original thought can germinate through a foreign language. इंग्रजी माध्यमांतून ज्यांचें शिक्षण झालें त्यांची परकी भाषा आत्मसात करण्यांतच इतकी बौद्धिक शक्ति खर्च होते कीं ज्ञान संपादन व आकलन करण्याची व संशोधन करण्याची त्याला पात्रता उरत नाहीं. तेव्हां अशी परकी भाषा शिक्षणाचें माध्यम म्हणून सर्व राष्ट्रावर लादणें कितपत इष्ट

होईल ? पण हें तत्त्व आतां सर्वांना पटलें आहे. मात्र दुसरें कोणतें माध्यम स्वीकारावें याबाबतींत दोन पर्याय सुचविलें जातात. एक म्हणजे राष्ट्रभाषा म्हणून हिंदी व दुसरा म्हणजे मातृभाषा हे होत. आणखी एक पर्याय म्हणजे प्रादेशिक भाषा हा होऊं शकतो. अर्थात पुष्कळांचे बाबतींत मातृभाषा व प्रादेशिक भाषा या एकच असूं शकतील; पण जेथें ती असत नाहीं तेथें या दोन्हींपैकीं कोणतें माध्यम स्वीकारावें हा प्रश्न सोडवावा लागेल. या तिन्ही पर्यायांचा आतां क्रमशः विचार करूं.

## प्राथमिक शिक्षणाचें माध्यम

या बाबतींत शिक्षणाच्या प्राथमिक, दुय्यम व उच्च या तिन्ही अवस्थांचा विचार करणें जरूर आहे. यांपैकीं प्राथमिक शिक्षणाचें म्हणजे पहिल्या चार इयत्तांचें माध्यम मातृभाषा हेंच असूं शकतें हें निर्विवाद आहे. कारण स्वतःची मातृभाषाच जेथें शिकण्याची जरूर आहे तेथें शिक्षणाचें माध्यम इतर भाषा असून चालेल कसें ? आतां प्रश्न आहे दुय्यम शिक्षणाचा. सात वर्षांच्या या कालांत हिंदी माध्यम असूं शकत नाहीं. कारण प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या चार वर्षांत फक्त मातृभाषेचाच अभ्यास झालेला असतो पण प्रादेशिक भाषा वेगळी असल्यास तिचाहि थोडाबहुत अभ्यास असतो. त्या कालांत हिन्दी शिकलेली नसते. हिंदीला सुरुवातच दुय्यम शिक्षणाच्या आरंभीं होणार मग ती भाषा एकदम माध्यम कसें होऊं शकेल ? मात्र हें माध्यम आतां प्रादेशिक भाषा होऊं शकेल. कारण प्राथमिक शिक्षणांत मातृभाषेशिवाय प्रादेशिक भाषेचा अभ्यास ठेवण्यांत येईल. मातृभाषा व प्रादेशिक भाषा बहुसंख्य मुलांच्या बाबतींत एक असेल त्यावेळीं हा प्रश्न अधिकच सोपा होईल. उदाहरणादाखल मुंबई शहराचा विचार करूं. मुंबईमध्यें मराठी, गुजराथी, हिंदी, कानडी, बंगाली, तामीळ, तेलगु, मल्यालम, उर्दू इत्यादि भाषिक मुलें शाळांत असतात. यांपैकीं मराठी, गुजराथी या प्रादेशिक भाषा असल्यानें त्या बोलणाऱ्यांचें प्रमाण मोठें आहे.

याशिवाय इतर भाषा बोलणाऱ्या मुलांची संख्या स्वतंत्र शाळा चालवितां येण्याइतकी मोठी नसल्यास त्यांनीं जी प्रादेशिक भाषा शिकली असेल त्याच माध्यमाच्या दुय्यम शाळेंत त्याना जावें लागेल. बरें, एकदां दुय्यम शिक्षणाचें माध्यम ठरवल्यावर मग विश्वविद्यालयांत एकदम तें माध्यम बदलून कसें चालेल. म्हणून प्रादेशिक भाषा हेंच माध्यम विद्यापीठांतहि कायम ठेवलें पाहिजे. ज्यांची मातृभाषा प्रादेशिक भाषेहून वेगळी आहे त्यांनीं प्रादेशिक भाषा पत्करली पाहिजे कारण ज्या भागांत आपण कायम राहतो ती भाषा आत्मसात् झालीच पाहिजे. नाहींपेक्षां शिक्षणासाठीं स्वतःच्या भाषिक प्रांतांत जावयास पाहिजे हा दुसरा पर्याय.

**प्रादेशिक भाषाच पाहिजे**

आता हिंदी हें माध्यम कसें गैरसोयीचें होतें तें पाहूं. हिंदी दुय्यम शिक्षणाचें माध्यम—अर्थात् अहिंदी प्रदेशांत—होऊं शकत नाहीं हें मागें दाखवलेंच आहे. मग विद्यापीठाचें तें एकाएकी माध्यम कसें होऊं शकेल ? शिवाय कांहीं कांहीं प्रादेशिक भाषा हिंदीपेक्षां खूपच समृद्ध आहेत व त्या माध्यम म्हणून स्वीकारल्यास आणखी समृद्ध होण्यासारख्या आहेत. प्रत्येक देशाची संस्कृती त्या त्या देशाच्या भाषेंतूनच प्रतीत होत असते. भाषेची गळचेपी झाल्यास त्या संस्कृतीचीहि गळचेपी होते. या करितां शिक्षणाचें माध्यम प्रादेशिक भाषाच झालें पाहिजे, हिंदी नव्हे. यासाठीं प्रादेशिक माध्यम ठेवून प्रत्येक कॉलेजनें भाषावार विद्यार्थी वाटून घ्यावे. भाषावार प्रांतरचना झाल्यावर हा प्रश्न सोपा होईल. मुंबईसारख्या विद्यापीठाला दोनतीन माध्यमें ठेवावीं लागतील. उदा., मराठी, गुजराथी व हिंदी. इतर विद्यापीठांत हा प्रश्न उद्भवणार नाहीं. मुंबई, कलकत्ता, दिल्ली या अपवादात्मक विद्यापीठांत दोनतीन माध्यमें ठेवावीं लागतील. यामध्यें असा प्रश्न उपस्थित केला जातो कीं वरच्या वर्गांत फार थोडीं मुलें असलीं तर दोनतीन माध्यमांचें प्रोफेसर ठेवणें परवडेल का ? पण हा प्रश्न फक्त वरील अपवादात्मक विद्यापीठांचे

बाबत निर्माण होईल व तो प्रादेशिक भाषांच्या कॉलेजांनीं सहकार्य करून आंतरकॉलेज व्याख्यानें ठेवली तर सुटण्यासारखा आहे. उदा., मराठी माध्य-माची मुंबईत पांच कॉलेजें असल्यास ज्या विषयाला थोडीं मुलें असतील तीं या सर्व कॉलेजांतून एकत्र येऊन एका प्रोफेसरच्या हाताखालीं शिकूं शकतील.

**तांत्रिक भाषेंतील पारिभाषिक शब्द**

कांहींचें म्हणणें देशी भाषांचें माध्यम फक्त आर्ट्सपुरतें मर्यादित ठेवावें. विज्ञान, स्थापत्य, वैद्यक, तंत्रविद्या, शेतकी वगैरे कॉलेजांचें माध्यम इंग्रजीच ठेवावें कारण तेथें पारिभाषिक शब्दांचा प्रश्न उपस्थित होईल. पारिभाषिक शब्दांचा आपल्या येथें फार मोठा बाऊ केला जातो. मी तर म्हणेन कीं तांत्रिक विद्येंतील पारिभाषिक शब्द खुशाल वापरून आत्मसात करावे. कांहींची अगदीं सोपीं सुटसुटीत भाषांतरें होत असलीं तर घ्यावीं पण उगाच बेढब लांबलचक संस्कृतप्रचुर पारिभाषिक शब्द रूढ करण्याचा प्रयत्न करूं नये. म्हणजे आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधनहि फारसें कठीण जाणार नाहीं. कोणी म्हणतील कीं मग काय नुसतीं क्रियापदेंच देशी भाषेंतील वापरून घेड-गुजरी भाषा बोलायची ? पण ही अतिशयोक्तीची भाषा आहे. फक्त तांत्रिक शब्दच परकीय भाषेंतील वापरावयाचा व तोहि पुढेंमागें आपल्या भाषेंतच रूढ होण्याच्या हेतूनें. मग काय वाक्यामध्यें क्रियापदाशिवाय इतर शब्दच नसतात ? टेबल, स्टेशन यासारखे शब्द आपल्या भाषेंत आत्मसात् झालेले नाहींत कां ? तसेंच कांहीं तांत्रिक शब्द आत्मसात होतील तर कांहींच्याऐवजीं आपलें सोपे शब्द रूढ होतील, हें कालांतरानें ठरवायचें आहे. भाषा ही ठराव करून बनत नसते तर आपोआप उत्क्रांत होत असते. अवजड शब्द आपोआप गळतील. आणि उचित व सोपे शब्द रूढ होतील त्याचा बाऊ वाटण्याचें कारण नाहीं. आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधनाचा प्रश्न अशा रीतीनें सुटेल. युरोपमधील विद्यार्थी इंग्लंड-अमेरिकेला जातात तेव्हां त्यांना तशी अडचण पडत नाहीं. शिवाय परराष्ट्रांत शिक्षण घ्यायला जाणारे विद्यार्थी अगदींच

थोडे असणार व तेहि असामान्य बुद्धीचेच असणार. त्यांना आपल्या कामापुरते परकीय भाषेंतील शब्द शिकणें नक्की कठीण वाटणार नाहीं. ३० वर्षांपूर्वी मी जेव्हां एम्. ए. ला थियरी ऑफ नंबर्स हा विषय घेतला त्यावेळीं त्या विषयावर इंग्रजीमध्येंही फारशी पुस्तकें नव्हती म्हणून आमचे प्रोफेसर एन्. एम्. शहा यांनीं जर्मन तात्पुरते शिकून त्या पुस्तकांतून माहिती मिळवून लेक्चर्स दिलीं. संशोधन करण्यास्तव परदेशांत शिक्षण घेणाऱ्या विशेष बुद्धिमान् मुलांना परकी भाषा गरजेपुरती शिकणेंही जड जात नाहीं. मग केवळ पारिभाषिक शब्द शिकणें कितीसें जड जाईल ?

## क्रमिक पुस्तकांचा प्रश्न

यापुढील प्रश्न क्रमिक पुस्तकांचा. वास्तविक पाहतां ज्यावेळीं दुय्यम शाळांतील माध्यम देशी भाषा केले आणि त्या माध्यमांतुन शिकणारीं तीचं मुलें कॉलेजला आलीं त्याचवेळीं कॉलेजांत देशी भाषा माध्यम व्हायला हवें होतें व त्याच तुकडीबरोबर तें माध्यम पुढें चालू रहायला हवें होतें. म्हणजे क्रमिक पुस्तकें लिहिणारांनाहि भरपूर वेळ मिळाला असतां. देशी भाषा हें नक्की माध्यम झालें असें ठरल्यास पुस्तकें लिहून व्हायला उशीर लागणार नाहीं पण आपलें अनिश्चितीचें व धरसोडीचें धोरण असल्यामुळें लेखक पुस्तकें लिहावयास सरसावत नाहींत. सरकारनें पुस्तकाच्या छपाईस आर्थिक मदत केल्यास क्रमिक पुस्तकांचा प्रश्न चुटकीसरशी सुटण्यासारखा आहे; सरकारचें धोरण मात्र निश्चित व अखिल भारतीय स्वरूपाचें हवें. त्याच-प्रमाणें अखिल भारतीय स्पर्धा-चांचणी विद्यार्थ्यांच्या मातृभाषेंत झाली पाहिजे. मात्र त्यांच्या हिंदी व इंग्रजी भाषांच्या ज्ञानाची स्वतंत्र परीक्षा व्हावी म्हणजे कोणावरहि अन्याय होणार नाहीं.

## परकीय भाषांचें भवितव्य

आतां प्रादेशिक भाषा हें जर उच्च शिक्षणापर्यंत माध्यम झालें तर हिंदी व इंग्रजी भाषांचें स्थान कोणतें ? तसेच संस्कृत व इतर परकी भाषांचा

अभ्यास कोणी, कसा व किती करावयाचा हा प्रश्न उद्भवतो. अहिंदी प्रांतांत दुय्यम शिक्षणाची सातहि वर्षें हिंदी सक्तीचा विषय असावा, म्हणजे प्रत्येक नागरिकाला हिंदी या राष्ट्रभाषेचें ज्ञान होईल. इंग्रजी भाषा दुय्यम शिक्षणाच्या शेवटच्या चार वर्षें शिकविली जावी व ती सुद्धां जे पुढें कॉलेजमध्यें उच्च शिक्षणासाठीं जाणार असतील त्यांनाच सक्तीची असावी. इंग्रजी न घेतां मॅट्रिकची परीक्षा पास होण्याची शक्यता असावी, मात्र अशा विद्यार्थ्याला जर पुढें कॉलेजला जाण्याची इच्छा झालीच तर त्यानें खाजगीरीत्या इंग्रजी शिकून इंग्रजीच्या विषयांत पास झाल्यावर मगच त्याला कॉलेजमध्यें प्रवेश मिळावा. पण सर्वसामान्यतः सध्यांच्या सात इयत्तांनंतर कोणतीं मुलें उच्च शिक्षण घेण्यास लायक आहेत याची परीक्षा घेऊन निकाल लावला पाहिजे. म्हणजे उच्च शिक्षणाकडे जाणारीं मुलें पुढील चार वर्षें इंग्रजी हा विषय घेऊं शकतील. ही परीक्षा साधारणपणें १२–१३ वर्षें वयाच्या सुमारास होईल. जर्मनींत तर दहा वर्षें वयाला ही विभागणी होते. मात्र वर लिहिल्याप्रमाणें अपवादात्मक मुलांना नंतर केव्हांहि उच्च शिक्षणाला जाण्याची सवड ठेवलेली असते.

### इंग्रजीची आवश्यकता

आतां उच्च शिक्षणाचें माध्यम जर देशी भाषा झाल्या तर या चार वर्षांच्या इंग्रजीची तरी काय जरुरी असें कोणी म्हणेल. एक तर चार वर्षें शिकलेलें इंग्रजी पूर्वीं सात वर्षें शिकलेल्या इंग्रजीपेक्षां कमीच असणार असें त्रैराशिक मांडून चालणार नाहीं. याचें कारण भाषा किती वर्षें शिकली हा महत्त्वाचा मुद्दा नसून ती शिकायला कोणत्या वयांत सुरवात केली व कोणत्या पद्धतीनें शिकली हा महत्त्वाचा मुद्दा आहे. फार पूर्वीं शिकलेल्या लोकांच्या इंग्रजीपेक्षां हल्लीं तितकींच वर्षें इंग्रजी शिकलेल्या मुलांच्या इंग्रजी ज्ञानाचा दर्जा फार कमी आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे. याचें कारण गेल्या २५ वर्षांत इंग्रजी डायरेक्ट मेथडनें शिकविण्याची टूम निघाली हें होय. या पद्धतीनें इंग्रजी शिकल्यामुळें इंग्रजी ज्ञानाचा दर्जा खालावला. माझा

विश्वास आहे कीं, डायरेक्ट मेथडनें सात वर्षें शिकलेल्या इंग्रजीपेक्षां भाषांतर व व्याकरणपद्धतीनें शिकलेलें व थोड्या जाणत्या वयांत सुरू केलेल्या इंग्रजीचें ज्ञान नक्कीच अधिक असेल. उच्च शिक्षणाचें इंग्रजी हें माध्यम नसलें तरी इंग्रजी उत्तम येणें हें आवश्यक आहे. याचें कारण जोंपर्यंत आपल्याकडे देशी भाषेंत सर्व विषयांवर पुस्तकें थोडीं आहेत तोंपर्यंत क्रमिक पुस्तकांना पूरक म्हणून इतर वाचन इंग्रजीमधून करतां आलें पाहिजे. तसेंच, एखादी परकी भाषा कोणाहि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला येणें जरूरच आहे. मग ती भाषा इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन अशांपैकीं कोणतीहि असो. अर्थात् इंग्रजीच्या पूर्वपीठिकेमुळें इंग्रजीच आपणांस सोपी जाईल.

**शाळांचे दोन गट**

संस्कृत व इतर भाषांचें स्थान ठरवतांना मॅट्रिकचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळांचे दोन प्रकार करावे लागतील. भाषाप्रधान शाळा व विज्ञानप्रधान शाळा. ज्या विद्यार्थ्यांचा भाषेकडे कल आहे तो भाषाप्रधान शाळेंत जाईल; तेथें संस्कृत, पाली किंवा इतर परकी भाषा शिकेल व त्याचा विज्ञानाचा अभ्यास कमी असेल व विज्ञानप्रधान शाळांत भाषा-विषय कमी असतील. महत्त्वाचा प्रश्न आहे तो तत्त्वाचा. स्वतंत्र हिंदुस्थानांत शिक्षणाचें माध्यम शेवटपर्यंत देशी भाषाच असणें सयुक्तिक, स्वाभाविक व फायदेशीर आहे. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असूनहि ती पटवून देण्यासाठीं वाद घालावा लागतो ही दुर्दैवाची गोष्ट आहे. जोंपर्यंत देशी भाषा या शिक्षणाचें माध्यम नाहींत तोंपर्यंत आपल्या देशाची बौद्धिक पातळी कदापि वाढणार नाहीं. जात्या बुद्धिमान् व महान् सांस्कृतिक वारसा असलेला भारत देश जर बौद्धिक क्षेत्रांतहि आघाडीवर यावयाचा असेल, तर अडचणींचे डोंगर बाजूला करूनहि देशी भाषा समृद्ध केल्या पाहिजेत, तरच देशांतील सुप्त बौद्धिक शक्ति जागृत होईल व हिंदुस्थानांत ज्ञानसूर्य तळपेल. स्वभाषेचें माध्यम हाच त्याला उपाय आहे.

१९

# स्वातंत्र्योत्तर शिक्षणाची नवी दिशा

आजचीं प्रौढ माणसें हीं स्वातंत्र्यपूर्व काळांत शिक्षण घेतलेलीं आहेत. त्या वेळीं चांगली नोकरी मिळविणें हेंच शिक्षणाचें ध्येय होतें. त्यामुळें ठराविक साच्याचें पुस्तकी शिक्षण घेऊन लेखी परीक्षा चांगल्या प्रकारें उत्तीर्ण होणें हें सर्वसामान्य विद्यार्थ्यांचें उद्दिष्ट असे. त्यांतहि सरकारी नोकऱ्या अधिक वेतनाच्या, मानमरातबाच्या व शाश्वतीच्या असत. त्यामुळें उच्च मध्यमवर्गीय मुलें इंग्रजीवर प्रभुत्व मिळवून विद्यापीठाकडे धांव घेत. शिक्षणाचा प्रसार साधारणपणें सुखवस्तु वर्गापुरताच मर्यादित होता. कारण ती ब्रिटिशांची राजनीति होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या सर्वच बाबतींत मोटा फरक झालेला आहे. शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें झाला आहे. शिक्षण हें फक्त एका विशिष्ट वर्गापुरतें मर्यादित राहिलें नसून समाजाच्या सर्व थरांपर्यंत पोचलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार ६ ते ११ वर्षें वयाचीं सर्व मुलें शाळेंत जाऊं लागतील. ही सक्तीच्या शिक्षणाची योजना पुढें ६ ते १४ वर्षें वयापर्यंत वाढवावयाची आहे. पण १४ वर्षें वयापर्यंत शिक्षण स्वयंपूर्ण होऊं शकत नाहीं. तें फक्त प्राथमिक शिक्षण होईल. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा उदरनिर्वाह करतां येईल अशा तऱ्हेचें शिक्षण मिळणें जरूर आहे. म्हणून १४ वर्षेंपर्यंत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणानंतर प्रत्येकाला त्याच्या लायकीप्रमाणें,

आवडीप्रमाणें व कलाप्रमाणें कोणत्यातरी उद्योगधंद्याचें शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्य आहे.

व्यक्तीमध्यें सुप्त असलेल्या अंगभूत कलांना व प्रवृत्तींना जागृत करून त्यांच्या विकासाला वाव देणें हें शिक्षणाचें कार्य आहे. निसर्गशक्तींना आवाहन देऊन व त्यांना शास्त्रीय बैठक देऊन त्या पूर्णत्वापर्यंत विकासित केल्या म्हणजे व्यक्तीलाहि आंतरिक समाधान प्राप्त होतें. पुस्तकी शिक्षणाची सर्वांनाच आवड असते असें नाहीं. तसेंच सर्वच विषयांत सर्वांना रस वाटेल असेंही नाहीं. एखाद्या मुलाची गणितांत बुद्धि चालत नाहीं किंवा भाषाविषयांत प्रगति होत नाहीं म्हणून तो मुलगा कांहीं मंदबुद्धीचा ठरत नाहीं. त्याचेमध्यें कदाचित् एखाद्या उत्कृष्ट कलाकाराचीं बीजें असतील. पण आपल्याकडील शिक्षणपद्धतीप्रमाणें त्याला जर शालेय विषय न आले तर त्याचेवर वरचेवर नापासाचा शिक्का बसून त्याच्यामधील कलाप्रवृत्ति कायमच्या डोळ्याआड राहतील व विकासाची संधि न मिळाल्यामुळें त्या करपून जातील. आमच्या शिक्षणपद्धतीनें ठरवून दिलेल्या चाकोरींत जे बसतील तेच लायक व न बसतील ते नालायक व निरुपयोगी असा जो पायंडा पडलेला आहे, त्यामुळें अनेक कर्तबगार व विविध क्षेत्रांमध्यें चमक दाखवूं शकतील अशा होतकरू विद्यार्थ्यांची आपण कुचंबणा करीत आहों, त्यांच्यामधील विविध कला व गुण दृष्टोत्पत्तीस येण्यापूर्वींच त्यांचेवर नालायकीचा व मंदबुद्धीचा शिक्का मारून आपण त्यांना जीवनामधून उठवीत आहों व आपल्या देशांतील मानवसंपत्तीचा संहार करीत आहों, ही गोष्ट स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तरी आपल्या लक्षांत यावयास हवी. आपल्या जनतेला दारिद्र्य व बेकारीच्या खाईत आपण लोटलेलें आहे कारण आपली एकमार्गी शिक्षणपद्धति. याकरितां आपणांस आपली शिक्षणपद्धति विविधमार्गी करावयास हवी व प्रत्येक मुलामध्यें जो गुण निसर्गतः प्रकर्षानें वास करीत असतो त्याचा विकास करून त्या

द्वारेंच त्याला उदरनिर्वाहाचा मार्ग दाखवावयास हवा. विविध धंद्यांचें शिक्षण देण्याची जर योजना आंखली तर सर्व प्रकारच्या गुणांना पोषक अशा तऱ्हेचें शिक्षण मुलांना देतां येईल. त्यांच्या गुणांचा विकास होऊन त्यांच्या जीवनांत आनंद निर्माण होईल. त्यांना उदरनिर्वाहाचें साधन प्राप्त होईल. समाजाच्या विविध गरजा देशांतल्या देशांत भागल्या जाऊन प्रत्येक वस्तूसाठीं परदेशाकडे पाहण्याची पाळी येणार नाहीं.

धंदेशिक्षणाच्या अभावी आपण अत्यंत परावलंबी झालों आहोंत. आपल्या लोकांना बेकार ठेवून परदेशी कामगारांची आपण चंगळ करीत आहों हें आत्मघातकी धोरण नव्हे काय ? आपल्या समृद्ध देशांतील कच्चा माल परदेशीं पाठवून त्यावरील सर्व संस्कार करण्याचा आनंद, श्रेय व धन आपण परदेशीय कामगारांना देऊन मालाच्या शंभर पटीनें महाग झालेली परदेशीय वस्तु वापरतों. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर आपलें हित-अहित आपल्याला कळलें पाहिजे. विशेषत: आपलें भवितव्य ठरविण्याची शक्यता स्वातंत्र्यप्राप्तीमुळें आपल्या हातीं आली आहे. तेव्हां आपण आपल्याच लोकांना शिक्षणाची संधि देऊन निरनिराळ्या धंद्यांना उत्तेजन दिलें पाहिजे. यामुळें व्यक्ति व समाज दोन्हींचा फायदा होणार आहे. व्यक्तीला त्याच्या आवडीच्या व्यवसायाचें शिक्षण मिळाल्यामुळें मानसिक हुरूप व आनंद प्राप्त होऊन त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुलभ होणार आहे. पुस्तकी परीक्षांमध्यें नापास झाल्यामुळें शिक्षक व पालक दोघांकडून बोलणीं खाऊन जीवनाच्या उंबरठ्यावर खट्टू, उदासीन व अनन्यगतिक होणारीं मुलें तारुण्याच्या जोमांत उद्योगी, उत्साही व महत्त्वाकांक्षी होतील आणि आपापल्या विषयांत तरबेज होऊन समाजांत मानमान्यता पावतील.

त्याचबरोबर समाजाच्या ज्या विविध गरजा आहेत त्या जर आपल्याच लोकांकडून भागल्या व ज्या विविध वस्तूंचा वापर जीवनाला आवश्यक

आहे त्यांची निर्मिति जर आपल्याच देशांत झाली तर आपल्या सर्व लोकांना काम मिळेल, उद्योगधंद्यांची भरभराट होईल व देशाची संपत्ति वाढेल, हें उघड आहे. किंबहुना सर्वच मुलांना पुस्तकांची गोडी वाटत नाहीं हेंही चांगलेंच आहे. कारण सर्वच कारकून व ऑफिसर झाले तर औद्योगिक गरजा भागवावयाच्या कोणीं ? म्हणून समाजाच्या विविध गरजा भागविण्यासाठीं विविध प्रकारच्या कला व व्यवसायांची आवड मुलांमध्यें असणें हें चांगलेंच आहे. पण आपण त्यांना कमी-अधिक लेखतां कामा नये. डोक्यानें काम करणारा तो वरच्या दर्जाचा व हातानें काम करणारा खालच्या दर्जाचा ही कल्पना चुकीची आहे. जो सचोटीनें, कष्टानें व प्रामाणिकपणानें काम करून आपला व आपल्या कुटुंबियांचा निर्वाह करतो तो कोणतेंहि काम करीत असला तरी समाजाचा एक उपकारक व श्रेष्ठ सेवक आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. समाजाचा गाडा आर्थिक, नैतिक व पारमार्थिक दृष्टीनें सुरळीत चालण्यासाठीं सर्वप्रकारच्या माणसांची गरज आहे. व्यक्तीच्या अंगभूत गुणांप्रमाणें तिला या महान् कार्याला हातभार लावण्याची संधि मिळाल्यास त्यामुळें व्यक्ति व समष्टि यांचा उत्कर्ष आहे. साध्य एकच पण विविध साधनें त्याला पोषक व्हावीं त्याप्रमाणें समाज व व्यक्ति यांचा संबंध असावयास हवा. शिक्षणाच्या दृष्टीनें वरील विधानांचा खालीलप्रमाणें निष्कर्ष निघतो.

प्राथमिक शिक्षण हें प्रत्येक व्यक्तीला किमान शिक्षण दिलें जातें तसेंच तें सर्वांना समान असावें. १४ वर्षें पूर्ण झाल्यानंतर माध्यमिक शिक्षणाच्या कालखंडांत शिक्षणाचे विविध मार्ग उपलब्ध व्हावे. सध्यांचा विद्यापीठाकडे नेणारा मार्ग हा त्या अनेक मार्गांपैकीं एक असावा. त्याशिवाय विविध प्रकारच्या धंद्यांचें शिक्षण देणारे विविध अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध असावे. कोणता अभ्यासक्रम निवडावा व विद्यार्थ्याची प्रगति कोणत्या धंद्यांत विशेष चांगली होईल यासंबंधीं सल्ला देणारे व्यवसाय-मार्गदर्शक-केंद्र

प्रत्येक तालुक्याचे गांवीं असावें. येथील व्यवसाय-मार्गदर्शक हा मानसशास्त्रज्ञ, गुणग्राही, विविध व्यवसायांची माहिती असलेला, समाजाच्या गरजा व विकासाची दिशा ओळखणारा व तज्ज्ञ असावा. विद्यार्थी व पालक यांच्या भेटी घेऊन जास्तींतजास्त चांगला व मुलाला झेपणारा अभ्यासक्रम कोणचा याबद्दल त्यानें सल्ला द्यावा. अर्थात् हे विविध प्रकारचे अभ्यासक्रम शिकविण्याच्या सोयी व संस्था अजून आपणाकडे निर्माण व्हावयाच्या आहेत. तोंपर्यंत शिकण्याची सोय नसल्यास नुसता सल्ला देऊन कांहींच उपयोग होणार नाहीं.

धंद्याचें शिक्षण देण्याच्या सोयी निर्माण करावयास आपल्या देशांतील उद्योगपति, कारखानदार व खाजगी धंदेवाले यांनीं पुढें आलें पाहिजे. कारण, धंद्याच्या प्रगतीसाठीं व वाढीसाठीं तज्ज्ञ कामगार व कारागीर यांचा पुरवठा होणे त्यांनाहि लाभदायक आहेच.

शिक्षकाचें जें कार्य आहे तें समाजांतील सर्व क्षेत्रांत व सर्व थरांवर होणें जरूर आहे. त्यामध्यें व्यक्ति व समाज या दोहोंचे संबंध निगडित झालेले आहेत. शिक्षणाची अंतिम जबाबदारी व एकीकरण हें जरी सरकारचें काम असलें, तरी खाजगी संस्था व जनता यांचें सक्रीय सहकार्य व मदत असल्या-शिवाय शिक्षणाच्या कार्यांत जोम येणार नाहीं. कामगारसंघटनांनींहि कामगारांच्या शिक्षणप्रसारामध्यें भाग घेणें हें कामगार कल्याणाच्या दृष्टीनें उचित होईल.

जनतेच्या दैनंदिन जीवनाच्या गरजांमधून शिक्षणाचें धोरण आखलें गेलें पाहिजे; तरच त्या शिक्षणामध्यें सामर्थ्य व उत्कर्षाचीं बीजें निर्माण होतील व त्या शिक्षणावर जोपासना झालेले नागरिक स्वावलंबी, स्वाभि-मानी व सदाचारी होऊन देशाला वैभव प्राप्त करून देतील.

卐 卐 卐

## ३०

# स्त्रीशिक्षण स्त्रीत्वाला पोषक हवें !

'नवशक्ती' च्या वनिता–विहार या सदरामध्यें "शिक्षण, शाप कीं वरदान?" या चर्चेस आरंभ करून व या महत्त्वाच्या विषयाला चालना देऊन भगिनीवर्गाला आपलें विचार-प्रदर्शन करण्याची संधि दिली याबद्दल प्रथम वनिता–वहिनींचें अभिनंदन करावयास हवें. आपल्या देशांत मुलींनीं इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरुवात केल्याला सुमारें पाऊण शतक लोटलें आहे. एवढ्या कालावधीनंतर या शिक्षणाचे अपेक्षित असे सुपरिणाम दिसून येतात किंवा नाहीं याचा आढावा घेण्याची वेळ आलेलीच होती.

या चर्चेमध्यें १३ भगिनींनीं भाग घेऊन आपले साधकबाधक विचार प्रदर्शित केले. त्यांपैकीं कांहीं भगिनी पदवीधर तर कांहीं बिनपदवीधर, कांहीं विद्यार्थिनी तर कांहीं गृहिणी होत्या. त्यामुळें चर्चेमध्यें प्रकट झालेले विचार सर्वांगीण व प्रातिनिधिक स्वरूपाचे होते असें म्हणावयास हरकत नाहीं. लेखाचे कांहीं मथळे विचारप्रवर्तक होते. उदाहरणार्थ, "शिक्षणानें आज स्त्री स्त्रीत्व विसरली", "शिक्षणाला शाप म्हणणें हेंच महान् पाप", "शिक्षण हा दिखाऊ दागिना नाहीं", "घरकुल उदास बनलें", "शिक्षणाला योग्य वळण हवें". इत्यादि. ही सर्व चर्चा चांगल्या उच्च पातळीवरून झाली. या चर्चेमधून जे निष्कर्ष निघाले ते शिक्षणतज्ज्ञांनीं व शिक्षणाचें धोरण आंखणारांनीं जरूर लक्षांत घ्यावे असेच आहेत.

## शिक्षण हीच एक शक्ति

खरें पाहतां शिक्षण हा शापहि नाहीं व वरदानहि नाहीं. शिक्षण ही एक शक्ति आहे, एक प्रकारचें सामर्थ्य आहे. त्याचा जसा उपयोग करावा तसें त्याचें फळ मिळतें. हा उपयोग चांगल्या प्रकारें केला जाईल व 'सत्यं, शिवं, सुंदरम्' हीं जीं सुसंस्कृत जीवनाचीं मूल्यें समजलीं आहेत तीं जतन केलीं जातील असें शिक्षणास वळण दिलें गेलें पाहिजे. "सदभिरुचि व सदाचरण हेंच शिक्षणाचें एकमेव साध्य आहे. सुखी व समृद्ध जीवनाचें तें सूत्र आहे" असें एका लेखांत म्हटलेंच आहे. सुसंस्कृत जीवन जगणें हें स्त्री-पुरुषांच्या बाबतींत शिक्षणाचें समान ध्येय म्हणतां येईल. पण शिक्षणाचीं विशिष्ट ध्येयें मात्र मुलांमुलींचे बाबतींत वेगळीं असावींत असें म्हणणें जरूर आहे.

मुलांच्या शिक्षणाचें विशिष्ट ध्येय त्याला सन्मार्गानें द्रव्यार्जन करतां येईल अशी विद्या प्राप्त करून घेणें हें होय. संसाराचा आर्थिक भार वाहणें हें सामान्यत: पुरुषाचें कर्तव्य समजलें जातें; आणि म्हणून अर्थार्जनक्षमता हें पुरुषाच्या शिक्षणाचें प्रमुख अंग समजलें जातें. विशिष्ट विद्या प्राप्त करून घेऊन त्यामध्यें नैपुण्य मिळविणें हें पुरुषाच्या शिक्षणाचें ध्येय आहे. याउलट सर्वत्र उपयोगी पडेल असें सर्वसामान्य ज्ञान, बुद्धीचा विकास व कोंड्याचा मांडा करण्याची पात्रता आणणारें बहुविध शिक्षण, हें स्त्रीच्या शिक्षणाचें विशिष्ट ध्येय असावें असें म्हणतां येईल. याचें कारण उघड आहे. स्त्री-पुरुषांचीं जीवनामधील भिन्न कार्यक्षेत्रें हेंच तें कारण होय. मुलाला आपलें कार्यक्षेत्र लहानपणींच ठरवितां येतें पण मुलीच्या जीवनाला कोणतें वळण लागेल, तिचें कार्यक्षेत्र कोणतें होईल हें तिच्या जीवनाचा सोबती तिच्या आयुष्यांत येईपर्यंत ठरूं शकत नाहीं. म्हणून मुलीचें शिक्षण असें हवें कीं विवाह झाल्यास तिच्या संसारांत तें उपयोगी पडावें—आणि बहुसंख्य मुलींचे विवाह होतातच—पण विवाह न झाल्यास एखाद्या चांगल्या आवडीच्या व्यवसायांत पडून तिला कोणावर भारभूत होऊन राहण्याची पाळी येऊं

नये व स्वतःच्या ध्येयप्राप्तीसाठीं स्वतंत्रपणें राहण्याची पात्रता व सामर्थ्य अंगीं यावें. मुलीचें शिक्षण हाच तिचा हुंडा व हाच तिचा विमा असें समजलें पाहिजे

## गृहजीवन समृद्ध झालें पाहिजे

साहित्य, अध्यात्म, शास्त्र व कला यांचें ज्ञान संपादन करून स्त्रीला गृह-जीवन समृद्ध करतां आलें पाहिजे. साहित्यामधील सुंदर विचार व आदर्श यांचें आकलन केल्यानें घरामधील जीवनाची व व्यवहाराची सांस्कृतिक पातळी तिला उच्च दर्जाची ठेवतां आली पाहिजे. अध्यात्माचा अभ्यास करून संसाराच्या सुख-दुःखांतून मार्ग काढतांना मनाचा समतोलपणा राखतां आला पाहिजे. शास्त्राच्या अध्ययनानें घरामधील मंडळींचें आरोग्य, आहार व व्यवहार चांगल्या प्रकारें संभाळतां आलें पाहिजेत. घरामधील शारीरिक परिश्रमाचीं कामें आधुनिक शास्त्राच्या साहाय्यानें सुकर करून वाचलेला वेळ सत्कारणीं लावतां आला पाहिजे. आपल्या सांस्कृतिक वारशामधील चांगल्या परंपरेंतील मूलतत्त्वें कायम ठेवूनही कालमानपरिस्थितीप्रमाणें नवीन कल्पना आत्मसात् करून, मागील परंपरा अधिक समृद्ध करून पुढील पिढीला त्याचा वारसा देतां आला पाहिजे. कलेच्या उपासनेनें घरांतील वातावरण सौंदर्यपूर्ण होऊन तें शांति व समाधान यांचें माहेरघर झालें पाहिजे. हल्लींच्या आर्थिक विवंचनेच्या युगांत पुरुषांना बाहेरील वातावरण अतिशय तापदायक झालें आहे, म्हणून पतीला बाहेरील धकाधकीच्या जीवनाचा क्षणभर विसर पाडून तृप्ती देणारें असें प्रसन्न वातावरण स्त्रीला निर्माण करतां आलें पाहिजे. घर हें बालकांना मातापित्यांच्या प्रेमाची ऊब व साक्ष देणारें सुखसमाधानाचें मंगलधाम झालें पाहिजे.

## गरजा वाढवूं नका

पतीच्या मिळकतींत बसेल अशाच बेतानें स्त्रीला घराचा अर्थसंकल्प करतां आला पाहिजे. कारण गरजा वाढवाव्या तेवढ्या वाढतात. त्यांना

योग्य ती मर्यादा घालतां आली पाहिजे. जरूर पडली तर पतीच्या अर्थार्जनाला हातभार लावण्याचे अनेक प्रकार आहेत. संसार काटकसरीनें व स्वपरिश्रमानें केल्यास जी बचत होते ती मिळकतच नव्हे कां ? तसेच पतीच्या कामांत घरीं मदत करणें, निरनिराळ्या प्रकारचे वर्ग चालवणें, कलाकौशल्याच्या वस्तु बनवणें, शिकवणें किंवा अपरिहार्य असल्यास अर्धवेळाचें काम करणें या मार्गांनीं आर्थिक हातभार लावतां येतो. मुद्दा एवढाच कीं, "घरकुल उदास बनलें" असें एका चर्चेत भाग घेतलेल्या भगिनीनें म्हटल्याप्रमाणें संसाराची अवस्था होणार नाहीं अशी खबरदारी सुशिक्षित गृहिणीनें घ्यावयास हवी.

सामान्य परिस्थितींतही हातून थोडातरी दानधर्म व्हावा अशी गृहस्थाश्रमाची प्रथा आहे. पूर्वी संक्रांतीचीं वाणें लुटणें, माधुकरी वाढणें, वारानें गरीब विद्यार्थ्यांना जेवावयास घालणें असे दानधर्माचे प्रकार असत. आतां या प्रकारांत बदल जरूर होईल पण थोडेतरी दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची ही परंपरा चालू ठेवणें इष्ट आहे. स्त्री ही पुरुषाची प्रेरक शक्ति आहे. या शक्तीचा सदुपयोग व्हावयाचा असल्यास तिला सुशिक्षण मिळालें पाहिजे. स्त्रिया भावनाप्रधान असतात म्हणूनच त्यांना उत्तम शिक्षण देण्याची जरुरी आहे. भावनेला बुद्धि, ज्ञान व स्वाध्याय यांची जोड हवी; नाहींतर निव्वळ भावनेपायीं अजाणतेपणीं का होईना अनर्थ घडतील.

## मुलांसंबंधीं जबाबदारी

खरी सुशिक्षित स्त्री तिच्या या प्रेरक शक्तीनें पुरुषाला सत्प्रवृत्त करूं शकेल. सार्वजनिक जीवनांतील वशिलेबाजी, लांचलुचपत, काळा बाजार इत्यादि प्रकारांना अशा रीतीनें आळा घालून सार्वजनिक जीवनाची पातळी उंचावणें स्त्रियांना शक्य आहे. पतीप्रमाणें मुलांच्या बाबतींतहि स्त्रीची जबाबदारी फार मोठी आहे. हल्लीं विद्यार्थ्यांमधील बेशिस्तीचें व गैरवर्तनाचे आपण किती प्रकार वाचतो. अप्रत्यक्षरीत्या याचा ठपका सुशिक्षित मातांवरच येत

नाहीं का ? शालेय शिक्षण न झालेल्या पण सुसंस्कृत आणि जुन्या परंपरेंत वाढलेल्या स्त्रियांच्या मुलांपेक्षां शिक्षित मातांच्या मुलांमध्येंच ही प्रवृत्ति अधिक दिसून येते. कारण या मुलांना लहानपणीं त्यांच्या शिक्षित मातांचा फार थोडा सहवास मिळाला. लहान मुलांचीं पहिलीं सात वर्षें अत्यंत संस्कारक्षम व महत्त्वपूर्ण असतात. या वयांतच मातेनें त्यांना चांगलें वळण लावावयाचें असतें. या गोष्टीचें महत्त्व आता पाश्चात्यांनाही पटूं लागलें आहे व म्हणून जर्मनीसारख्या पुढारलेल्या राष्ट्रांतही स्त्रियांनीं आधीं आपला संसार नेटका करावा, मुलांना चांगलें वळण लावावें व बाहेरील नोकरी किंवा सार्वजनिक जीवन यांच्या मागें लागूं नये असे विचारप्रवाह हल्लीं दिसून येतात. स्त्रीशिक्षणाची परिणती घर, पति व मुलें यांच्याद्वारें सार्वजनिक जीवन शुद्ध व मंगलमय करणारी आदर्श स्त्री निर्माण करण्यांत झाली पाहिजे असेंच कोणीहि म्हणेल.

२१

# पदवीधर स्त्रियांचीं कर्तव्यें

आजचा विषय नुसता स्त्रियांचीं कर्तव्यें असा नसून पदवीधर स्त्रियांचीं कर्तव्यें असा आहे ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. सर्वसामान्य स्त्रियांचीं जीं कर्तव्यें मानलीं जातात तीं पदवीधर किंवा सर्वसाधारणतः ज्यांचें शिक्षण पूर्ण झालें आहे अशा स्त्रियांच्या बाबतींत लागू असतातच; पण शिक्षण मिळाल्यामुळें स्त्रियांवर थोडी अधिक जबाबदारी पडते व त्यांच्याकडून कांहीं विशेष अपेक्षा केल्या जातात. शिक्षणाची संधि मिळाल्यामुळें कर्तव्यांचें बाबतींत कदाचित् बिनशिकलेल्या स्त्रीला जी सवलत किंवा क्षमा केली जाईल ती सुशिक्षित स्त्रीच्या बाबतींत केली जाणार नाहीं. यासाठीं विद्याविभूषित स्त्रियांकडून कोणत्या अपेक्षा केल्या जातात व त्यांचें कर्तव्य काय याचाच येथें विचार करावयाचें योजिलें आहे.

### तीन प्रकारचें ऋण

कर्तव्यांचे बाबतींत कांहीं सर्वसाधारण नियम सांगतां येतील. तरीपण प्रत्येक व्यक्तीचें विशिष्ट कर्तव्य त्या त्या व्यक्तींच्या कालमान परिस्थितीनें मर्यादित होऊन वेगवेगळें असूं शकेल. साधारणतः प्रत्येक व्यक्तीला तीन प्रकारचें ऋण फेडावें लागतें :–कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय. कौटुंबिक कर्तव्यामध्यें अविवाहित असतांना आपले माता पितर, बंधु, भगिनी व विवाहोत्तर पति, पतीचें निकट नातेवाईक व मुलें यांच्या बाबतींत स्त्रीनें आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावलें पाहिजे. विशेषतः विवाहोत्तर स्त्रीवर कौटुंबिक जबाबदारी विशेषच पडते.

पति तेवढा आपला पण त्याचे नातेवाईक आपले कोणी नव्हेत असें मानण्याची जी प्रवृत्ति दिसते ती कौटुंबिक सौख्याला घातक आहे. त्यामुळें पुष्कळदां पतीची फार कुचंबणा होते व पत्नी आणि आपले नातेवाईक यांमध्यें निवड करण्याचा प्रसंग येऊन व्यावहारिक कारणास्तव पत्नीची बाजू घेऊन नातीं तोडावीं लागतात. कोणत्याहि सुशिक्षित स्त्रीनें नवऱ्यावर हा प्रसंग आणू नये. तत्त्वाच्या बाबतींत खंबीर पण तपशीलाच्या बाबतींत तडजोडीस नेहमीं तयार असावें. तसेंच मुलें झाल्यावर त्यांचा शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकास स्वतःचे देखरेखीखालीं त्यांना शिक्षण देऊन करणें हें आपलें आद्य कर्तव्य समजलें पाहिजे. मुलांना जन्म देण्यापूर्वी मातृत्वाचें शिक्षण प्राप्त करून घेतलें पाहिजे.

## सामाजिक जबाबदारी

कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर सामाजिक जबाबदारीचा विचार करणें जरूर आहे. व्यक्ति व समाज यांचा अन्योन्य संबंध फार निकटचा आहे. ज्या समाजापासून व्यक्तीचा अनेक प्रकारें फायदा होतो. त्या समाजाचें ऋणमुक्त होण्यासाठीं व्यक्तीनेंहि समाजाला कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत उपयोगी पडणें जरूर आहे. ही परस्पर देवाणघेवाण करण्यांतच अखिल मानवजातीच्या उन्नतीचा मार्ग आहे. व्यक्तीनें समाजाला काय द्यावें याबाबत पुष्कळ वेगवेगळे प्रकार होऊं शकतील. साधारणतः स्त्रीचा वाटा समाजांतील सत्प्रवृत्ति व सामाजिक मूल्य टिकवून ठेवणें व त्यामध्यें भर घालणें या स्वरूपाचा असतो. हीं मूल्यें कशी टिकवावयाचीं हें प्रत्येक स्त्रीच्या वैयक्तिक कार्यक्षमतेवर अवलंबून राहील. पण एवढें मात्र निश्चित कीं प्रत्येक सुशिक्षित स्त्रीनें आपल्या नियोजित कार्यक्षेत्राच्या द्वारें समाजोन्नतीचा कांहीं ना कांहीं वाटा उचलला पाहिजे. याकरितां प्रथम तिनें स्वतःस बौद्धिक व शारीरिक दृष्ट्या कार्यक्षम बनविलें पाहिजे.

## शिक्षण सर्वांगीण पाहिजे

सुशिक्षित स्त्रियांमध्यें शारीरिक ताकद किंवा काटकपणा मुळींच नसतो अशी एक साधार तक्रार नेहमीं केली जाते. केवळ एकांगी पुस्तकी शिक्षण घेतल्यामुळें अंगमेहनतीचीं कामें त्यांना येत नाहींत किंवा आवडत नाहींत. म्हणून कोणतेंहि कार्य अंगिकारण्यापूर्वीं शारीरिक ताकद प्रथम पाहिजे हे लक्षांत ठेवून समाजसेवा करूं इच्छिणाऱ्यांनीं शरीरप्रकृति उत्तम ठेवली पाहिजे. आतां बौद्धिक क्षेत्रांत बी. ए. चें शिक्षण साधारणपणें ज्याला ' लिबरल एज्युकेशन ' म्हणतात त्या प्रकारचें असतें. त्यानंतर आपला जो आवडीचा विषय किंवा व्यवसाय असेल त्याचें विशिष्ट शिक्षण घेणें जरूर आहे. तो व्यवसाय शिक्षिकेचा ( पूर्व प्राथमिक, प्राथमिक वा दुय्यम ) असो वा रुग्णपरिचारिकेचा अथवा डॉक्टरचा असो, अथवा वृत्तपत्रव्यवसायाचा असो किंवा संगीत, कलाकौशल्य, ड्रॉइंग, पेंटिंग, शिल्पकला, शिवणकाम व विणकाम असा कोणताहि असो पण त्यामध्यें प्राविण्यपत्र किंवा प्रशिक्षण घेतलें पाहिजे तरच त्या शिक्षणाचा दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठीं किंवा जरूर असल्यास अर्थोत्पादन करण्यासाठीं उपयोग होऊं शकतो. नाहींपेक्षां मॅट्रिक काय किंवा बी. ए. काय व्यावहारिक दृष्ट्या फारसा फरक पडत नाहीं. म्हणून आपली आवड पाहून आपणच आपल्या कार्यक्षेत्राची निवड करून प्रत्येक पदवीधर स्त्रीनें प्रथम स्वतःचीं शैक्षणिक पात्रता व शारीरिक कार्यक्षमता वाढवावी. व त्यानंतर आपल्या क्षेत्रांत काम करून स्वार्थ व परमार्थ साधण्याचा प्रयत्न करावा. भगवद्गीतेमध्यें म्हटलें आहे ' स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः। स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः '. तेव्हां आपला व्यवसाय कोणताहि असो त्यामध्यें प्राविण्य मिळवून त्यायोगें जनता-जनार्दनाची सेवा म्हणजेच परमेश्वराची सेवा करण्याचें श्रेय मिळविण्याची सुशिक्षित स्त्रीला सुदैवानें प्राप्त झालेली संधि तिनें घालवूं नये.

## नोकरीचा प्रश्न

पदवीधर स्त्रियांनीं नोकरी करावी कीं नाहीं हा प्रश्न प्रत्येक स्त्रीच्या वैयक्तिक परिस्थितीवर अवलंबून आहे. अविवाहित किंवा विधवा स्त्रियांनीं नोकरी केल्यास त्याबद्दल कांहींच हरकत असण्याचें कारण नाहीं. विवाहित स्त्रीनें मात्र खरोखरीच आपल्या संसाराच्या आर्थिक परिस्थितीचा निःपक्षपातीपणानें विचार करून जर गरज असली तरच नोकरी करावी. घरांत मन रमत नाहीं व मिळेल तितका पैसा हवाच, याच केवळ बुद्धीनें नोकरी करूं नये. त्याच्याऐवजीं आपल्या शिक्षणाचा व बुद्धिमत्तेचा संसार अधिकाधिक वैशिष्ट्यपूर्ण करण्यांत उपयोग करावा व उरलेला वेळ समाधानी वृत्तीनें विनावेतन व आवडीचें समाजकार्य करण्यांत खर्च करावा.

## विधायक कार्य

देशामध्यें आज केवढें तरी विधायक कार्य करण्याची जरुरी आहे. त्यासाठीं ध्येयवादी, निष्ठावंत व तज्ज्ञ अशा कार्यकर्त्यांची जरुरी आहे. पुरुष हा स्वाभाविकरीत्या संसार व बायकामुलें यांसाठीं अर्थोत्पादन करण्यांत गुंतलेला असतो. तेव्हां प्रत्येक विवाहित स्त्रीनें आपल्या पतीवरील वजन त्याला सत्प्रवृत्त करण्याकडे खर्च करावें. ही गोष्ट विनशिकलेल्या पत्नीला करतां येत नाहीं. कारण पति तिला "तुला या गोष्टी समजत नाहींत" असें म्हणूं शकतो, पण सुशिक्षित स्त्रीनें आपल्या पतीच्या व्यवसायांत शक्य त्याप्रकारें सहाय्यभूत होऊन त्या व्यवसायाचें पावित्र्य व सार्वजनिक जीवनांतील स्थान उच्च ठेवण्याचे बाबतींत पुरुषाला सहाय्यकारी व्हावें. सार्वजनिक व्यवहार शुद्ध व सचोटीचा राखण्यांत, स्त्री पुरुषाला प्रवृत्त करूं शकेल असा भरंवसा वाटतो. स्त्री-पुरुषांच्या काल्पनिक समानतेच्या हक्काबाबत रण न माजवतां एकमेकांच्या सहकार्यानें एकमेकांना पूरक होण्याचा पतीपत्नींनीं प्रयत्न करावा.

विवाहित स्त्रीची अर्थोत्पादन करण्याची जबाबदारी पुरुषाच्या मानानें कमी असते. आपल्या समाजरचनेंत पुरुषानें तें काम अंगीकारलेलें आहे. तेव्हां अशा पुरुषाच्या सुशिक्षित पत्नींनें आपल्या शिक्षणाचा समाजसेवेसाठीं विनावेतन किंवा गरज असल्यास सवेतन उपयोग करावा. कोणी लेखिका असल्यांस त्यांनीं लेखनाद्वारें; कोणी वक्त्या असल्यास त्यांनीं भाषणाद्वारें समाजामध्यें सुविचार पेरावे. शिक्षकिर्णींनीं मुलांना शिकवितांना त्यांच्या मनांत सुसंस्कार रुजवावे. डॉक्टरिर्णींनीं समाजाचें आरोग्य सुधारावें; संगीतज्ञांनीं संगीताचे वर्ग चालवावे. कोणी अधू व अपंग मुलांसाठीं असलेल्या संस्थांत काम करावें.

**सार्वजनिक कार्यांतील धोका**

सार्वजनिक काम करण्यांत एक मोठा धोका असतो; तो स्त्रियांनीं टाळला पाहिजे. तो म्हणजे एकदां सत्ता प्राप्त झाली कीं त्याचा लोभ सुटतो व सत्त ही सेवेकरतां हवी ही गोष्ट विसरून सत्तेकरतां सत्ता, आपल्या वैयक्तिक अहंकारवृत्तीकरतां सत्ता हवी अशी वृत्ति होण्याचा संभव असतो. म्हणून जोंपर्यंत आपल्या हातून खरोखरी जनतेची सेवा घडत आहे, तोंपर्यंत सार्वजनिक संस्थांत सत्तेची व मानाची जागा अडवावी व कोणत्याहि कारणास्तव आपलीं कार्यक्षमता कमी झाल्यावर आपणहून आपलें कार्य पुढें चालू ठेवणारे अनुयायी तयार करून ठेवावे. कोणतेंहि सत्कार्य सातत्यानें चालवाव या एकाच ध्येयानें प्रेरित होऊन व्यक्तीनें स्वतःला गौण मानून कार्याला प्राधान्य दिलें पाहिजे.

बहुसंख्य स्त्रियांच्या बाबतींत संसाराचा आर्थिक भार पुरुष वाहतात. त्यामुळें स्त्रियांना घरामध्यें शिक्षणाचे निरनिराळे प्रयोग करण्यास सवड मिळते. त्याचप्रमाणें उरलेल्या वेळांत सार्वजनिक कार्य करण्यास स्त्रीला जी सवड असते ती पुरुषाला आर्थिक क्षेत्रांतील जीवनकलहापायी शिल्लक रहात नाहीं. या कारणामुळें पुरुषापेक्षांहि समाजकार्य हा विशेषतः स्त्रियांचाच

प्रांत होऊं शकतो. याशिवाय त्यांनीं आपल्या स्त्री-स्वभावसुलभ वात्सल्य, सौजन्य व त्यागवृत्ति या गुणांची व्याप्ति स्वतःच्या संसारापुरती मर्यादित न ठेवतां जर समाज व देश यांतील समस्या सोडविण्यासाठीं विकसित केली तर स्त्रीशिक्षणाचें साफल्य झालें असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. आजच्या जगांत ॲटम बॉंब, हायड्रोजन बॉंब यांसारखीं महान् विध्वंसक अस्त्रें हातीं असलेल्या राष्ट्रांना विश्वशांति व सहजीवनाचा संदेश द्यायचा असेल तर तो आजच्या सुशिक्षित स्त्रियाच निःसंशय देऊं शकतील.

११

# विनोबा आणि शिक्षण : एक मुलाखत

विनोबांच्या पदयात्रेंत भाग घ्यावा व त्यांचे शिक्षणविषयक विचार समजून घ्यावे अशी माझी फार दिवसांची इच्छा. विनोबांनीं महाराष्ट्रांत प्रवेश केल्यापासून माझी ही इच्छा पूर्ण होण्याची शक्यता वाटूं लागली. १३ तारखेला सकाळीं मी सांगलीस पोंचलें. विनोबांचे मीं जे फोटो पाहिलें होतें त्यावरून ते फारच म्हातारे व खंगलेले असावे अशी माझी कल्पना होती. विनोबा कृश खरेच पण फारच तेजस्वी, सात्विक, सोज्वळ व प्रसन्न वृत्तीचे दिसले. तेव्हां दुसरे दिवशीं पहांटें सांगली ते मिरज या पदयात्रेमध्यें विनोबांशीं शिक्षण विषयावर चर्चा करावयाची असें ठरलें. मीं त्यांचें शिक्षणविषयक विचार हें पुस्तक पूर्णपणें अभ्यासून माझे प्रश्न मनांत योजलेलें होतें.

## ज्ञानाची किल्ली

विनोबांचें व माझें जवळजवळ पाऊण तास चालतां चालतां संभाषण झालें. मीं त्यांना शिक्षण विषयावर नानाप्रकारचे प्रश्न विचारलें व त्यांनींहि त्यांचीं अत्यंत सविस्तर उत्तरें दिलीं. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनें वयाच्या १६ वर्षें वयापर्यंत स्वावलंबी झाले पाहिजे. हें स्वावलंबन केवळ आर्थिकच नसून बौद्धिकहि असलें पाहिजे. बौद्धिक स्वावलंबन प्राप्त करून घ्यावयाचें असल्यास वेदानाम् वेदः म्हणजे नुसती ज्ञानप्राप्तीच नव्हे तर: ज्ञानप्राप्तीची किल्ली विद्यार्थ्यानें हस्तगत करून घेतली पाहिजे. ज्ञान हें इतकें अगाध आहे कीं, सर्व ज्ञानप्राप्तीची माणसानें आशा

सोडून दिली पाहिजे. याकरितां जें विशिष्ट ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचें त्याला लागणारी बौद्धिक पात्रता संपादन करून घेणें हें व्यवहार्य व अधिक महत्त्वाचें ठरतें. योग्य प्रकारच्या शिक्षणानें प्रेम व शांति प्राप्त होईल. म्हणूनच देशाच्या निदान अंतर्गत संरक्षणाची जबाबदारी पोलिसांवर नसून शिक्षित लोकांवर आहे असें विनोबांचें मत आहे. ज्ञान हें कर्माशीं संबद्ध आहे. ज्ञानाचें पर्यवसान उपयुक्त कर्मांतच झालें पाहिजे. समाजांत कांहीं श्रमजीवि लोक आहेत तर कांहीं बुद्धिजीवि आहेत हें चूक आहे. श्रम करणारांना ज्ञान पाहिजे व ज्ञानप्राप्ति झालेल्यांनीं श्रमहि केले पाहिजेत हें विनोबांचें मत शास्त्रीय ज्ञान व व्यवहारोपयोगी ज्ञान (Theory व Practice) यांची सांगड घातली पाहिजे या मूलगामी शिक्षणतत्त्वास अनुसरूनच नाहीं का ?

## शिक्षणाचें वैशिष्ट्य

दुसरें त्यांचें म्हणणें असें कीं वस्तु जितकी चांगली तितकी ती फुकट पाहिजे. हवा, पाणी, उजेड या वस्तु परमेश्वरानें सर्वांना फुकट नाहीं का दिल्या ? तसेंच शिक्षणहि फुकट पाहिजे. मातृभाषेचें शिक्षण हें मातेकडून फुकटच नाहीं का मिळत ? चांगल्या वस्तूचा उपभोग सर्वांना मिळाला पाहिजे. ती थोड्यांची मिरासदारी होतां कामा नये. शिक्षण हें जीवनाच्या प्रत्येक क्रियेमधून प्राप्त करून घ्यावयाचें असतें. या संबंधांत ते म्हणाले, जिथें शिक्षण चालू आहे अशा वेगळ्या क्रियेचें भान होतें तेथें शिक्षण नाहीं. शाळांमधील औपचारिक पुस्तकी शिक्षणांत खऱ्या शिक्षणाचा भाग फारच थोडा आहे. खरें शिक्षण शाळेबाहेर जीवन समस्यामधूनच प्रतीत होत असतें हें यावरून त्यांनीं स्पष्ट केलें. ज्याप्रमाणें खऱ्या उत्तम प्रकृतीचें लक्षण हें कीं शरीराच्या कोणत्याहि भागाची जाणीव असतां कामा नये तसें शिक्षणक्रियेचें भान न राहतां जे सुसंस्कार आत्मसात् होतात तेंच शिक्षण होय.

## मूलोद्योग म्हणजे काय ?

मुलोद्योगाबद्दल मीं त्यांना विचारलें कीं सर्वच विषय एका विशिष्ट मूलोद्योगाचें अनुषंगानें शिकवणें अशक्य असतें, मग कांहीं तरी कृत्रिम संबंध ओढूनताणून आणावा लागतो, याबाबतींत आपलें काय म्हणणें आहे ? त्याला त्यांनीं उत्तर दिलें कीं असा विषय शिकवण्याची जरूरच नाहीं. ज्या गांवांत जो धंदा प्रधान आहे तोच धंदा तेथील शिक्षणाचा मूलोद्योग असावा. शेती हा उद्योग अनिवार्य असावा असें त्यांनीं प्रतिपादन केलें. तें मला विशेष मान्य नाहीं असें दिसतांच तें म्हणाले, शाळेंतील सफाई हा जरी मूलोद्योग मानला तरी चालेल. शाळेंतील सफाई हा मूलोद्योग बऱ्याच विषयांना अंतर्भूत करणारा व सर्वसामान्य असा होऊं शकेल असें मला वाटलें. अर्थात् सर्वच महत्त्वाचे विषय त्याचे भोंवतीं गुंतवतां येणार नाहींत ते मात्र शिकवण्याची तयारी असावी.

हल्लींची शिक्षणपद्धती त्यांच्या मतें गचाळ असून कांहीं थोर माणसें जरी त्यांमधून निर्माण झालीं तरी त्याचें श्रेय शिक्षणपद्धतीला नसून त्यांच्याच अलौकिकतेला आहे. एखादा माणूस दगड बांधूनहि पोहून जाऊ शकेल पण त्याचा अर्थ तो दगड बांधला म्हणून पोहला असा होत नाहीं. शिक्षणामध्यें पहिली सुधारणा करावयाची ती ही कीं, शिक्षण सरकारी सत्तेंतून मोकळें करावयाचें. जीवनाच्या रंगानें रंगलेलें शिक्षण द्यावयाचें म्हणजे तें लोकांच्या हातांत हवें. शिक्षक पूर्णपणें स्वतंत्र असावेत व त्यांचा चरितार्थ त्या त्या गांवच्या लोकांकडून चालेल अशी खबरदारी घ्यावी.

शिक्षण गांवांतील धंदे व गरजा यांना अनुसरून द्यावें. प्रत्येक गांवांत विद्यापीठ असलें पाहिजे. पण तेथील डिग्रीचा नोकरीशीं संबंध असूं नये. सरकारनें नोकरवर्ग नेमतांना आपापल्या खात्याच्या परीक्षा ठेवाव्या. या प्रकारची शिफारस राधाकृष्णन् कमिटीनेंहि केली आहे व जर्मनीमध्येंहि सरकारी नोकऱ्यांसाठीं भरती करतांना त्या त्या खात्यातर्फे परीक्षा होते.

शिक्षकाला शिक्षणस्वातंत्र्य पाहिजे ही गोष्ट खरी असली तरी सबंध देशांतील शिक्षणाची आर्थिक जबाबदारी मात्र सरकारनें टाळतां उपयोगी नाहीं व शिक्षकाच्या चरितार्थाची जबाबदारी ही केवळ गांवकऱ्यांवर टाकतां कामा नये असें मला वाटलें पण त्यांच्या सूचनेमागील तत्त्व मात्र मला पटलें.

## सेवानिवृत्ति आणि शिक्षण

शिक्षकांविषयीं बोलतांना विनोबाजी म्हणालें, कॉमर्स कॉलेजमधील शिक्षकानें व्यापार कधीं केलेला असतो ? ज्यानें तो व्यवसाय प्रत्यक्ष केलेला आहे व ज्यांत त्यानें कांहीं पुरुषार्थ गाजवून दाखवला आहे तोच त्यानें शिकवावा. उदाहरणार्थ, बिर्ला, जवाहरलाल नेहरू, नेपोलियन या लोकांनीं व्यापार, राज्यशास्त्र, सैनिकी शास्त्र हे विषय शिकवावे. यासाठीं विनोबांची सूचना अशी कीं प्रत्येक व्यक्तीनें ५५ चे ऐवजीं ४५ वर्षें वयाला सेवानिवृत्त व्हावें व पुढील १०-१५ वर्षें ज्या व्यवसायांत आपण आयुष्य वेचलें त्या व्यवसायाचें शिक्षक व्हावें. विनोबांनीं ही सूचना केली त्या वेळीं मला जर्मनींतील Lehrbeauftragte या शिक्षकवर्गाची आठवण झाली. हे लोक आपापल्या विषयांतील तज्ज्ञ असून त्या त्या विषयापुरते कॉलेजांत अर्धवेळ प्राध्यापक म्हणून काम करतात. यावरून विनोबाजींचे शिक्षणावरील विचार खरोखरीच महत्त्वाचे असून जर्मनीसारख्या पुढारलेल्या देशांतहि ते रूढ आहेत असें दिसून आलें. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा गुरु, मित्र व मार्गदर्शक असला पाहिजे असेंहि ते म्हणाले. आपण अडचणीच्या प्रसंगीं आप्तांचा किंवा मित्रांचा सल्ला घेतो. या सल्ल्यामध्यें प्रेमाची भावना असते. शिक्षकाचा सल्ला म्हणजे प्रेम व ज्ञान या दोन्हींचा संगम असतो. पण शिक्षकांचा जीवनसमस्यांबाबत सल्ला घेणारे विद्यार्थी हल्लीं दिसतात का ? ज्या वेळीं शिक्षक विद्यार्थी यांचा असा संबंध येईल तेव्हांच विद्यार्थ्यांमधील बेशिस्तीची समस्या सुटेल व शिक्षकांबद्दल आदर वाढेल.

मुलींना मुलांहून वेगळें शिक्षण द्यावें का असें विचारलें असतां त्याची जरुरी नाहीं असे ते म्हणाले. स्त्रियांच्या स्वतंत्र विद्यापीठाबद्दल त्यांचें काय म्हणणें आहे असें विचारतां ते म्हणाले, ४० वर्षांपूर्वीं अण्णासाहेब कर्वे यांचे वेळीं त्याची जरुरी भासली असेल पण आतां त्यांना त्याची गरज आहे असें वाटत नाहीं.

**भाषांचें शिक्षण**

इंग्रजी शिक्षण किती वर्षें द्यावें असें मीं त्यांना विचारलें तेव्हां ते म्हणाले, मॅट्रिकच्या आधीं दोन वर्षें इंग्रजी भाषा शिकवावी. पण सध्यां मॅट्रिकच्या आधीं चार वर्षें इंग्रजी शिकूनहि इंग्रजीचें ज्ञान कमी पडतें असें दिसून येतें. मग दोन वर्षें इंग्रजी कसें पुरेल असें मीं विचारलें तेव्हां ते म्हणाले, ' एक भाषा चांगली आत्मसात झाली म्हणजे दुसऱ्या भाषा लौकर शिकतां येतात. म्हणून मातृभाषेचें शिक्षण उत्तम झालें असल्यास दोन वर्षांतही इंग्रजी उत्तम येण्यास हरकत नाहीं. ' यावर मी त्यांना म्हणालें, ' पंडित नेहरू, रँग्लर महाजनी वगैरे लोकांचें म्हणणें असें आहे कीं लहान वयांतच भाषाज्ञान लौकर होऊं शकतें म्हणून १२–१३ वयाला दोनतीन भाषा शिकणें चांगलें. ' तेव्हां ते म्हणाले, ' त्यांचा स्वतःचा अनुभव तसा नाहीं. इच्छाशक्ती पूर्ण ओतल्यास पुढील वयांतच भाषा चांगल्या येऊ शकतात. ' विनोबाजींना स्वतःला अठरा भाषा येतात व सध्यां ते जर्मन व जपानी यांत्रिकांकडून जपानी भाषा शिकत आहेत.

हिंदुस्थानांत लोकशाही जरा लौकरच आली व ती यशस्वी होत नाहीं याचें कारण बहुसंख्य अशिक्षित लोक हें नसून अल्पसंख्य गैरशिक्षित लोक हे होत असे एका प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले. आम्ही जवळ जवळ पाऊण तास बोलत होतों. शेवटीं चर्चा चांगली रंगली असें ते म्हणाले याचा मला विशेष आनंद झाला. विनोबाजींची शिक्षणावरील सर्वच मतें मला व्यवहार्य वाटलीं नाहींत. याचें कारण त्यांच्या मनाची ध्येयनिष्ठ पार्श्वभूमि

असेंच म्हटलें पाहिजे. त्यांचीं उत्तरें नाविन्यपूर्ण, मूलगामी व कांहींशी क्रांतिकारक वाटलीं तरीपण कांहीं सूचना उपयुक्तहि वाटल्या. तपशीलांत थोडा फरक केल्यास त्यांच्या शिक्षणविषयक तात्त्विक विचारांचें भारतांतील शिक्षणाची नवी दिशा ठरवितांना आपणास फारच बहुमोल मार्गदर्शन होईल अशी माझी खात्री झाली.

✠ ✠ ✠

२३

# मानवी जीवन : एक अमूल्य संधि

मानसशास्त्राचा एक सिद्धान्त आहे कीं एखादी गोष्ट करूं नका म्हटलें कीं ती नेमकी करावीशी वाटते. ॲडम आणि ईव्हना ज्ञानवृक्षाचें फळ चाखूं नका म्हटलें तेव्हां नेमकें तें चाखण्याची त्यांना बुद्धि झाली. कदाचित् मुद्दाम असें सांगून ठेवलें नसतें, तर त्या फळाकडे लक्षहि गेलें नसतें. इतकीं, इतर सुंदर सुंदर फळें ईडनच्या बागेंत होतीं.

एका साधकानें एका योग्याला विचारलें ' मला ईश्वरप्राप्तीचा उपाय सांगा. ' योग्यानें त्याला सांगितलें कीं ' तूं फक्त एवढेंच कर कीं माकड या प्राण्याचा विचार करूं नको म्हणजे तुला ईश्वरप्राप्ति होईल. ' साधकाला वाटलें गोष्ट फार सोपी आहे. पण ती प्रत्यक्षांत आणतांना त्याला फारच कठीण वाटूं लागली. माकडाचा विचार करायचा नाहीं असें ठरवतांच सारखें माकड डोळ्यासमोर दिसूं लागलें. तेव्हां तो साधक योग्यास शरण जाऊन म्हणाला, ' आपण सांगतां ती गोष्ट फारच कठीण आहे. मला कशाचा विचार करूं नये हें न सांगतां कशाचा विचार करावा हें सांगाल तर फार उपकार होतील. '

**मानसशास्त्र**

वरील दोन्ही कथांत एक मोठें तत्त्व गोवलेलें आहे तें म्हणजे माणसाचा करनकरी स्वभाव. लहान मुलांच्या बाबतींत आपणांस हाच अनुभव येतो. मुलानें एखाद्या गोष्टीसाठीं हट्ट घेतल्यास ती गोष्ट वाईट आहे, ती आपण घेऊं

नये, तसें करणें आपणास इष्ट नाही असें सांगण्यापेक्षां मुलाचें लक्ष दुसऱ्या चांगल्या गोष्टीकडे वेधल्यास मुलास आपोआपच निषिद्ध गोष्टीचा विसर पडतो. मुलाला वाईट वागूं नये अशी शिकवण देत बसण्यापेक्षां चांगलें वागावें अशी शिकवण दिल्यास तोच हेतु चांगल्या प्रकारें साध्य होतो. जी वाईट गोष्ट आहे ती अनुल्लेखानें टाळणें व जी चांगली गोष्ट आहे ती आर्जवानें नजरेसमोर आणणें हें मानसशास्त्राचें तंत्र आहे. दारूबंदीचे बाबतींत हें तंत्र अवलंबिण्यांत आल्यास ती अधिक यशस्वी होईल असा भरंवसा वाटतो.

लोकांना ' दारू पिऊं नका ' असें सांगण्यापूर्वी माणसें दारू पितातच का याचा विचार करणें योग्य ठरेल. त्यांतहि सुशिक्षित व मोठ्या हुद्द्यावरील व्यक्तींपेक्षां अशिक्षित व कामगार वर्गांत दारू मोठ्या प्रमाणांत प्याली जाते याचें कारण काय तें पाहूं व मूठभर वरच्या वर्गाचा नंतर विचार करतां येईल.

खालच्या दर्जाचें राहणीमान व शिक्षणाचा अभाव यांमुळें कामगारांच्या जीवनाचा दृष्टिकोण संकुचित झालेला असतो. कामावरून दमूनभागून आल्यावर मनाला कांहींतरी विरंगुळा हवा असतो. फुरसतीचा वेळ घालविण्याचीं कोणतीं साधनें उपलब्ध आहेत बरें ? एक तर सिनेमा पाहणें, जुगार–पत्ते वगैरे खेळणें, घरच्या अथवा बाहेरच्या घरगुती बाबींचा ऊहापोह करणें, भांडणें, स्त्रियांच्या शीलाबद्दल संशय घेणें, अनैतिक व्यवसाय करणें, हेवेदावे, मारामारी, मत्सर, दारू पिणें इत्यादि गोष्टींत वेळ घालवणें यांमध्यें कामगारांचें जीवन व्यतीत होत असतें.

### उच्च ध्येयाचा आदर्श हवा

या सर्व व्यवसायांत सिनेमा त्यांतल्यात्यांत बरा. पण त्यांतील कथानकेंहि पुष्कळदां फारच हीन दर्जाचीं व वरील व्यसनांना पोषक अशींच असतात. पुष्कळदां जीवनांतील कष्ट व दुःखें यांचा विसर पडण्याकरितां मनुष्य दारू

पितो व दारूच्या नशेमध्यें आपलीं दुःखें बुडवून टाकतो. पण जीवनांतील ही एक पळवाट आहे. जीवन हा एक संग्राम आहे. त्यामध्यें शूर पुरुषानें धैर्यानें संकट, दुःख व कष्ट यांना सामना द्यावयास पाहिजे. त्यांतच पुरुषार्थ आहे; मानवी जीवनाचें सार्थक आहे; बुद्धि, श्रम, आत्मिकबल, धार्मिक निष्ठा या आयुधांच्या जोरावर हा लढा द्यावयाचा असतो. संकटापासून पळून न जातां त्याला तोंड दिलें पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा माणसानें बाळगली पाहिजे. दारू पिऊन दुःखें विसरणें हा भ्याडपणा आहे.

मानवी जीवन ही एक महान् व मोलाची संधि आहे. " नरेंचि केला हीन किती नर " व या उलट " नरका नारायण हो सकता है " या दोन्ही शक्यता माणसाच्या कर्तृत्वावर अवलंबून आहेत. याकरितां जीवनांतील उच्च ध्येयाचा आदर्श जनतेच्या समोर ठेवला पाहिजे.

याकरितां घरोघरीं जाऊन समाजसेवकांनीं प्रचार करावा. हा मार्ग कितपत योग्य ठरेल याचा विचार करण्यासारखा आहे. एकतर यासाठीं समाजसेवकांची प्रचंड सेना उभी करावी लागेल. समाजसेवक विशिष्ट लायकीचे असावे लागतील. शिवाय प्रचाराचें काम म्हणजे एकदां भेटून भागणारें नाहीं. घरांतील मंडळींना समाजसेवकांबद्दल विश्वास व श्रद्धा असावयास पाहिजे. नाहींतर धडाधड घराचीं दारें बंद होऊन एक प्रकारची विरोधी आघाडीच निर्माण व्हावयाची.

### संस्कार-केंद्रें-हर्षांत

कामगारवर्गाचा विश्वास संपादन करणें हेंच पहिलें अवघड कार्य आहे. दारू प्यायची नाहीं कबूल. पण त्याऐवजीं दुसरें काय करावयाचें या प्रश्नाचें उत्तर देतां आलें पाहिजे. यासाठीं जेथें कामगार व मजूरवर्गाची दाट वस्ती आहे अशा ठिकाणीं रंजनकेंद्रें अथवा संस्कारकेंद्रें काढलीं पाहिजेत. यांना सरकारचें आर्थिक सहाय्य असावें. अशीं संस्कारकेंद्रें सध्यां बऱ्याच ठिकाणीं चालू आहेत. पण त्यांचें कार्य अधिक व्यापक प्रमाणावर व अधिक जोमानें

चाललें पाहिजे. अशा केंद्रांत वेगवेगळे व्यवसाय विभाग असावेत. त्यांपैकीं कांहीं पुढीलप्रमाणें असूं शकतील.

(१) वाचनालय:—यामध्यें विविध विषयावर पुस्तकें, नियतकालिकें, वर्तमानपत्रें इत्यादि ठेवून तीं साक्षरांनीं स्वतः वाचावीं. अर्ध-साक्षरांना तीं वाचून दाखविण्याची सोय करावी. (२) एक बदलतें पण सतत चालू प्रदर्शन ठेवावें व त्यांत पोस्टर्स, जगांतील माहितीपत्रकें, कलाकौशल्य इत्यादि वस्तु ठेवाव्या. प्रदर्शनाचा विषय आलटूनपालटून वेगवेगळा असावा. (३) विविध बैठे खेळ (पत्ते नव्हे) खेळण्याची सोय असावी. (४) एखादें नमुनेदार उपाहारगृह ठेवावें. (५) संगीत, गायन, वादन, भजन, प्रवचन, कीर्तन, व्याख्यानें, चर्चा, वादविवाद इत्यादि कार्यक्रम असावे. (६) विविध प्रकारचे छंद–विभाग असावे कीं ज्यामध्यें कामगारांना आपल्या हस्तकौशल्याचा विकास करतां येईल. (७) लहान लहान नाट्यप्रवेश, विविध गुणदर्शन असे कार्यक्रम ठेवावे व त्यांची आखणी व योजना तज्ज्ञ समाजसेवकांवर सोपवावी म्हणजे कामगारांना फुरसतीचा वेळ चांगल्याप्रकारें घालविण्यासाठीं त्यांच्या वैयक्तिक आवडीप्रमाणें विविध कार्यक्रम उपलब्ध होतील.

कामगार-कल्याण-केंद्रें मुंबईत कांहीं विभागांत आहेत, पण अशा केंद्रांचें नुसतें अस्तित्व असून भागत नाहीं तर त्यामध्यें कोणता कार्यक्रम आंखला जातो ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्याशिवाय हा कार्यक्रम वर्षांतून एखादवेळ नसून दैनंदिन स्वरूपाचा पाहिजे कीं जेणेंकरून कामगारांना या क्लबाबद्दल घराप्रमाणें आपुलकी वाटावी.

कामगारांचा फुरसतीचा वेळ चांगल्याप्रकारें व्यतीत व्हावा, त्यांच्यामधील बहुविध गुणांचा विकास करण्याची त्यांना संधि मिळावी, जीवन ही एक अमोल संधि आहे याची जाणीव होऊन वेळाचा जास्तींतजास्त व उत्तम प्रकारें व्यय करण्याची त्यांना इच्छा व्हावी, त्यामुळें त्यांचें सांस्कृतिक, नैतिक व धार्मिक जीवन समृद्ध व्हावें, अशी खटपट या केंद्रातर्फे झाली पाहिजे. त्यासाठीं या

केंद्राचे चालक दूरदर्शी, निस्वार्थी, ध्येयवादी असले पाहिजेत. उच्च जीवन जगण्याची संधि व आदर्श डोळ्यासमोर ठेवल्यास दारूच्या धुंदींत बेहोष होऊन अमोल जीवनचा विध्वंस करण्यासारखें करंटेपण कोणांत असेल काय ?

卐 卐 卐

# १४

# माझी षष्ट्यब्दि

माझी आतां लौकरच साठ वर्षें पुरीं होणार आहेत असा घरांत बोलबाला होत आहे. मुलीनें अमेरिकेहून पत्र लिहिलें कीं आईची षष्ट्यब्दि साजरी करा. वास्तविक साठ वर्षें पुरीं झालीं यांत साजरें तें काय करायचें ? काळ हा अनंत आहे. वर्षामागून वर्षें जातात. यांत मानवाचें कर्तृत्व तें काय ? कधीं-तरी, केव्हांतरी, कोठेंतरी (या भूतलावर किंवा अंतराळयानानें ज्या अनेक भूतलावर जाण्याची मानव अपेक्षा करतो त्या ठिकाणीं म्हणा वाटल्यास ) प्रत्येक व्यक्तीचीं साठ वर्षें पुरीं होणारच. याच भूतलावर साठ वर्षें टिक-ण्याची चिकाटी ज्या मानवानें दाखवली त्याचें वाटल्यास कौतुक करावें. पण त्यांत तरी मानवी कर्तृत्व कसलें ? मानव अधिक जगूं म्हटल्यानें जगत नाहीं व लौकर मरूं म्हटल्यानें मरत नाहीं. जी गोष्ट दिवसामागून रात्र व रात्रीमागून दिवस इतकी स्वाभाविकपणें व अव्याहतपणें घडते त्याची नव-लाई कसली ? हरघडी कुणाच्यातरी वयाचीं साठ वर्षें पुरीं होत असतातच, म्हणून मुलीला म्हटलें, ‘ अग, साठ वर्षें साजरीं करावयाचीं म्हणजे काय ? ’

पंडित नेहरू आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात, ‘ प्रत्येक वाढदिवस आप-ल्याला मृत्यु जवळ येत आहे, याची आठवण करतो. म्हणून वाढदिवस हे विशेषतः उतार वयांत खेदकारकच वाटतात. ’ आणि खरेंच आहे. साठ वर्षें पूर्ण झाल्याचा आनंद वाटण्याचा संभव कमीच. या वयाला कांहींना कांहीं शारीरिक व्याधी सुरू झाल्या नाहींत अशी व्यक्ति विरळा. मानवानें

वैद्यकीय शास्त्रांत केवढीहि आश्चर्यकारक प्रगति केली तरी माणसाला शारीरिक व्याधींनें सोडलेलें नाहीं. अर्थात् त्या व्याधीचा प्रकार बदलला. एका रोगावर शास्त्रानें विजय मिळवला तर दुसरा रोग निर्माण झाला. एकंदरींत काय तर मानवाचें जीवित हें मर्यादित आहे व राहणार. म्हणूनच श्रीमद्भगवत्‌गीतेमध्यें म्हटलें आहे—

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ॥
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥

जन्मापूर्वीं मनुष्य अव्यक्त स्थितींत होता. मृत्यूनंतरहि अव्यक्त स्थितीप्रत जाणार. जीवन हा मधला लहानसा कालखंड आहे. ज्या स्थितींत मनुष्य जन्मापूर्वीं होता, त्याच स्थितीप्रत मृत्यूनंतर जाणार. मग मृत्यूची भीति कशाला? उलट भीति वाटायचीच तर जीवनाच्या व्यक्त स्थितीचीच वाटायला हवी. कारण त्या स्थितींत व्यक्तस्वरूप म्हणून शरीर प्राप्त झालेलें असतें. त्याच्या आधीव्याधी, तहानभूक, अन्नवस्त्र या सर्व गरजा भागवावयास हव्या. शरीराला कोण केव्हां इजा करील याची भीति. अव्यक्त स्थितींत ही भीति राहिली कुठें? तहानभूक लागायला, काळजी करायला शरीराची उपाधीच कुठें? म्हणून मला तर वाटतें ६० वर्षें सहीसलामत पूर्ण झालीं ही केवढी समाधानाची गोष्ट! आतां थोडे दिवस उरले, थोडी उरली कळ सोसावी हा मृत्यूनें दिलेला केवढा दिलासा? हत्ती गेला व शेपूट उरलें म्हणून ६० वें वर्ष खरोखरीच आनंदानें साजरें करावें. परीक्षेचा पेपर संपत आला, पेपर चांगला गेला तर फारच समाधान असतें. विशेष चांगला गेला नसला किंवा वाईट गेला तरी विद्यार्थी सुटकेचा निःश्वास टाकतोच. ६० वें वर्ष ही पेपर संपत आल्याची पूर्वसूचना देणारी घंटाच नव्हे काय?

मनुष्य आगगाडींतून किंवा सद्यःकाळाला अनुसरून विमानांतून प्रवास करीत असतो. प्रवास मोठा व विमानानें झाला तरी कंटाळा येतोच. आणि

मग 'कुर्सी पेटियाँ बाँधिये' असा जेव्हां दिव्यानें इषारा मिळतो, किंवा तुमच्या तैनातींत राहणारी, तुमचें मन रिझविणारी, तुम्हाला खाऊंपिऊं घालणारी सुंदर तरुणी तुम्हांला आपल्या कृत्रिम कोकिळ आवाजानें लाडिकपणें पट्टे बांधायला बजावते, त्यावेळीं उतरायचें ठिकाण जवळ आलें म्हणून तुम्ही समाधानाचा सुस्कारा टाकतांच. तसाच सुस्कारा ६० वर्षांशेवटीं मी टाकीत आहें.

शिवाय प्रौढपणाचे कांहीं फायदे असतातच. प्रौढपणाच्या आपणांस कांहीं सवलती मिळतात. आपल्या शब्दाला थोडा स्वाभाविकपणेंच मान मिळतो. अनुभवाचें क्षेत्र थोडें मोठें झाल्यामुळें निर्णय घेण्यास मदत होते. हे फायदे लक्षांत घेऊन एका सात्त्विक समाधानानें मी प्रौढपणाचें स्वागत करतें. Growing old gracefully असा माझ्या आयुष्याचा उर्वरित कालखंड जावा अशी माझी इच्छा आहे. त्याचप्रमाणें 'वार्धक्यीं निज शैशवास जपणें' या उक्तीप्रमाणें आपल्या आयुष्याच्या सायंकाळीं इच्छा-आकांक्षा थोड्याबहुत पूर्ण झालेल्या असल्यावर स्वभावांतली लहान मुलांसारखी शांत, सोज्वळ, निष्पाप मनोवृत्ति पुन्हां उफाळून येऊन कोणाशीं स्पर्धा नाहीं, हेवा नाहीं असें आपलें वार्धक्य व्यतीत व्हावें. वृद्धत्वाला दुसरें बालपण म्हणतात तें कोणत्या अर्थानें असेल तें असो. पण मला त्यांत मोठा सुंदर अर्थ गर्भित दिसतो.

कधीं कधीं माझें मन भीतीनेंहि ग्रस्त होतें हें कबूल करावयास हवें. तात्यासाहेब केळकरांनीं मृत्यूच्या आदले रात्रीं 'दिसों लागे मृत्यू तरिहि मज तो भिववुं न शके,' असें लिहून ठेवलें होतें. तसें मी खास म्हणूं शकत नाहीं. नाहीं म्हटलें तरी आयुष्यांत माझ्या वांट्याला पुष्कळ सुखें आलीं. एखाद वेळीं होणाऱ्या दुःखाबद्दल तक्रार करतांना जरी या सुखांचा मला विसर पडला तरी हें जीवन सोडून जायचें मनांत आल्यावर अशी भीति वाटते कीं हीं सुखें पुन्हां वांट्याला येतील का? आमच्या धर्माप्रमाणें पुनर्जन्म वांट्याला येणारच. तो जन्म माणसाचाच येईल कीं प्राण्याचा? मनुष्यजन्म

मिळण्याइतकें आपण पुण्य केलें आहे का ? आणि समजा, मनुष्य-जन्म मिळालाच तर त्या जन्मांत या जन्माइतकें तरी भाग्य वांट्याला येईल का ? या जन्मांतील आपल्या पापपुण्याची बेरीज केल्यास पाप उरतें कीं पुण्य उरतें ? पण मग कधींतरी असाहि विचार मनांत येतो, कीं आपल्याच वांट्याला सर्व भाग्य यावें अशी तरी स्वार्थी इच्छा कां करावी ? परमेश्वराच्या सृष्टींत सुखदुःख जें काय आपल्या वांट्याला येईल तें येवो. पण परमेश्वरा, तें सहन करण्याची मात्र शक्ति दे. तुकाराममहाराजांनीं म्हटलें आहे " जळो ते जाणीव जळो ते शहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलापायीं " म्हणून मागणें एवढेंच कीं कशीहि परिस्थिति प्राप्त होवो, पण परमेश्वरा, तुझ्यावरील निष्ठा मात्र कायम राहो !

मानवी सुखोपभोग हे असे आहेत कीं ते भोगल्यानें मनाची तृप्ति तर होत नाहींच; उलट आणखी भोगाची तृष्णा वाढते. संस्कृतमध्यें म्हटलें आहे ना कीं, अग्नीवर तूप शिंपडून तो विझवूं म्हटल्यास तो विझत तर नाहींच, पण उलट जास्त भडकतो. सुख भोगून तृप्त होऊन समाधानानें मृत्यु येईल असें होतच नाहीं. मुलें झालीं म्हणजे नातवंडें पहावींशीं वाटतात. मग त्यांच्या लीला पहाव्याशा वाटतात. मग त्यांचीं लग्नें संसार इत्यादि. मानाची जागा प्राप्त झाली तर वरच्या मानाची जागा हवीशी वाटते हें सर्वांच्या परिचयाचें आहेच. मानवी मनाची ही घडण राजा ययाति याच्या जीवनावरून पुरातन प्रवृत्ति आहे हेंच सिद्ध होतें. हजार वर्षें मुलाचें तारुण्य घेऊन भोग भोगूनहि तृप्ति होत नाहीं हाच ययाति राजाचा अनुभव होता ना ? मग माझ्यासारखीची कथा काय ?

असे विचार मनांत थैमान घालतात तोंच मला शाहीर कवि गोविंद यांची आठवण होते. कवि जन्मभर अधु होते. या शरीरशृंखलेचा त्यांना फार त्रास झाला. ते मृत्यूची मित्राच्या भेटीप्रमाणें वाट पहात होते. देवलांच्या नाटकांतील बालिका शारदासुद्धां ' सदय शांत असशी मरणा । भीति तुझी

वाटेना ॥ ' म्हणून मृत्यूला आळवीत नव्हती का ? अशा या सदयशांत जगन्मित्राला भेटीसाठीं आळवतांना कवि गोविंद म्हणतात ' सुंदर मी होणार रे, मरणानें जगणार ' मृत्यु मला नवीन घडधाकट कोरा देह देणार आहे. मृत्यूमधूनच नवजीवनाचा प्रारंभ होतो. म्हटलेंच आहे ' मरणांत खरोखर जग जगतें. ' तसेंच श्रीमत् भगवद्गीतेंतहि ' वासांसि जीर्णानि यथा विहाय । नवानि गृण्हाति नरोपराणि । तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ '. हें फाटकें जुनें वस्त्र टाकून नवें घ्यायचें आहे याचा आनंदच वाटावयास पाहिजे. भगवंतांनीं दुसऱ्या अध्यायांत अर्जुनाला आत्म्याच्या अमरत्वाची ग्वाही दिली ती भगवद्गीता मला दिलासा नाहीं कां देणार ? नचिकेत आपणहून मृत्यूच्या द्वारीं वाट पहात बसला. मृत्यूचें रहस्य समजावून घेऊन तो अमरत्व पावला. ज्या पवित्र देशाच्या पुण्यभूमीमध्यें अशीं नररत्नें जन्म पावलीं आणि वाढलीं, ज्या भूमिभागावर प्रभु रामचंद्र, भगवान् श्रीकृष्ण, भगवान् गौतमबुद्ध यांच्यासारखे अवतार परमेश्वरानें घेऊन मानवजातीला उच्च जीवन व उच्च आदर्श यांचा कित्ता घालून दिला, त्या सेवामय, त्यागमय संस्कृतींत रुजलेलें माझें जीवनपुष्प सायंकाळ झाली म्हणून कोमेजेल व उद्यां मातींत पडून मृण्मय होईल याची मला भीति कां वाटावी ? जीवन हें अनंत आहे. फक्त इच्छा एवढीच कीं हे भारतमाते,

प्रतिजन्मनि मे चित्तं वित्तं देहश्च संपति
त्वत्सेवानिरता भूयुर्माता त्वं करुणामयी ॥
न मे वांच्छास्ति यशसि विद्वत्वे नच वा सुखे
प्रभुत्वे नैव वा स्वर्गे मोक्षेऽप्यानंददायके ॥
परन्तु भारते जन्म मानवस्य च वा पशोः
विहंगस्य च वा जन्तोर्वृक्षपाषाणयोरपि ॥
निरंतरं भवतु मे मातृसेवांशभाग्यभाक्
एषैव वांछा हृदये साक्षी सर्वात्मकः प्रभुः ॥

...ठा ग्रंथ संग्रहालय, ...
६३६५६ ... दि: ...

REFBK-0013107

[ आवरण पृष्ठ २ वरून ]

करून त्यांवर पुस्तकें लिहिण्याकरितां जर्मनींतील 'इंटरनेशन्स' या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक दळणवळणाचें कार्य करणाऱ्या सुप्रसिद्ध निमसरकारी संस्थेनें त्यांना खास आमंत्रण देऊन बोलावले व त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. वरील दौऱ्याची फलश्रुति म्हणजेच त्यांची वरील विषयांवर Education in Germany, University Education in Western Germany, Kindergarten in Germany आणि Vocational Education in Germany हीं पुस्तकें होत. जर्मन शिक्षणपद्धतीच्या विविध अंगांवर लिहिलेलीं इंग्रजींतील अधिकृत पुस्तकें हींच पहिलीं होत म्हणून या पुस्तकांचें जर्मनींत फार कौतुक झालें व शेवटच्या पुस्तकावर जर्मन शिक्षण-तज्ज्ञांचे उत्कृष्ट अभिप्राय प्रसिद्ध झाले.

१९५४ सालीं ऑस्लो येथें भरलेल्या जागतिक शिक्षकसंघटनेच्या ( W. C. O. T. P. ) द्वैवार्षिक परिषदेंत त्यांनीं अखिल भारतीय शिक्षण-परिषदेच्या (A. I. F. E A.) अधिकृत प्रतिनिधि म्हणून भाग घेतला. पश्चिम युरोपमधील इतर अनेक देश त्यांनीं या भेटींत पाहून घेतले. १९५७ सालीं ( A. I. F. E. A. ) नें चीनमध्यें पाठविलेल्या शिक्षकांच्या शिष्टमंडळाचें त्यांनीं नेतृत्व केलें. १९६० सालीं त्यानीं सिलोनचा व १९६२ सालीं जपानचा दौरा केला.

अॅडल्ट एज्युकेशन कमिटी, बॉम्बे सोशल एज्युकेशन कमिटी, बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन, पुणें विद्यापीठ कोर्ट यांसारख्या अनेक कमिटयांच्या व संस्थांच्या त्या सभासद होत्या. ऑल इंडिया फेडरेशन ऑफ एज्युकेशनल असोशिएशनस्च्या गेली कित्येक वर्षे त्या उपाध्यक्ष होत्या. आदर्श एज्युकेशन सोसायटी, मुंबई, या संस्थेच्या त्या सध्या अध्यक्ष आहेत व महाराष्ट्र स्टेट अप्रेंटिस कौन्सिलवर त्यांचीं अलीकडे नियुक्ती झाली आहे.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणें सामाजिक क्षेत्रांतही त्यांनीं बरेंच कार्य केलें आहे. अखिल भारतीय महिला परिषदेशीं त्यांचे सुरवातीपासून घनिष्ठ संबंध असून या संस्थेची दादर–माटुंगा शाखा १९३८ सालीं त्यांनींच पुढाकार घेऊन स्थापन केली.

तसेंच मागील मुंबई प्रांताच्या जुव्हेनाइल कोर्टांत त्यांनीं ऑनररी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट व जेलव्हिजीटर म्हणून कार्य केलें आहे. गेल्या १६ वर्षांपासून त्या जे. पी. म्हणून नियुक्त झाल्या आहेत.

अनाथ विद्यार्थी गृह
प्रकाशन, पुणे

## याच लेखिकेचे प्रकाशित ग्रंथ

**English**

(1) Education in Germany.

(2) University Education in Western Germany.

(3) Kindergarten in Germany.

(4) Vocational Education in Germany.

**मराठी**

(१) नव्या जगांत

(२) विचारधारा